पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ४१

सभावृत्तांत

दिनांक – २०.०२.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी- २०२० ची मासिक मा. महापालिका सभा गुरुवार दिनांक २०.०२.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
१२) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१४) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लौंढे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लौंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.प्रमोद कुटे

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.शैलजा अविनाश मोरे

५५) मा.बाबर शर्मिला राजू

५६) मा.अमित राजेंद्र गावडे

५७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६१) मा.ढाके नामदेव जनार्दन

६२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६३) मा.करुणा शेखर चिंचवडे

६४) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६५) मा.भोईर सुरेश शिवाजी

६६) मा.अपर्णा निलेश डोके

६७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवानी

७२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७३) मा.सुलक्षणा राजू धर

७४) मा.शाम गणपतराव लांडे

७५) मा.सुजाता सुनिल पालांडे

७६) मा.योगेश मंगलसेन बहल

७७) मा.कदम निकीता अर्जुन

७८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८१) मा.नढे विनोद जयवंत

८२) मा.पाडाळे निता विलास

८३) मा.काळे उषा दिलीप

८४) मा.कोकणे संतोष अंकुश

८५) मा.बारणे अर्चना तानाजी

८६) मा.अभिषेक गोविंद बारणे

८७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८८) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०) मा.बारणे माया संतोष

९१) मा.निलेश हिरामण बारणे

९२) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९३) मा.दर्शले रेखा राजेश

९४) मा.कलाटे राहुल तानाजी

९५) मा.ममता विनायक गायकवाड

९६) मा.कामठे तुषार गजानन

९७) मा.चोंधे आरती सुरेश

९८) मा.कस्पटे संदिप अरुण

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०१) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०४) मा.कुटे निर्मला संजय

१०५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०८) मा.मुंढे उषा अंकुश

१०९) मा.कदम शशिकांत गणपत

११०) मा.लोखंडे चंदा राजू

१११) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११७) मा.नवनाथ दत्तू जगताप

११८) मा.संतोष बबन कांबळे

११९) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२१) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२२) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१२३) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२५) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर - आयुक्त , मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार-उपसचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम, भालकर - सह

शहर अभियंता, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.गाडेकर-प्र.सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औ.प्र.केंद्र मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.गलबले, मा.घोडे, मा.भोसले, मा.देशमुख, मा.वाघुंडे- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मो.गोफणे-आरोग्य अधिकारी, मा.बहुरे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. महापौर- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.शारदा सोनवणे - मा.महापौर साहेब, हिंगणघाट जळीतकांडातील पिडीत प्राध्यापिकेचा मृत्यू, विदया बाळ- महिलांच्या अधिकारासाठी आयुष्य वेचणा-या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, संपादिका आणि लेखिका यांचे निधन, रमेश रंजन- जम्मु काश्मिरमधील श्रीनगरमध्ये दहशतवादया समवेत झालेल्या चकमकीत सीआरपीएफचा जवान शहीद, गिरीराज किशोर- पद्मश्री विजेते लेखक आणि शिक्षणतज्ञ यांचे निधन, काकासाहेब चितळे - चितळे उदयोग समुहाचे प्रमुख यांचे निधन, विलास नखाते- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कर्मचारी व कर्मचारी महासंघाचे संचालक यांचे निधन, सुरेश खांबे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मुख्य लिपीक कर्मचारी यांचे निधन, प्रभाकर जनार्दन मिरजकर- चिंचवड गावातील सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, सुशिला वसंत मिरजकर - चिंचवड गावातील यांचे निधन, अशोक दत्तात्रय सायकर- चिंचवड गावातील यांचे निधन, संगीता सुभाष बारणे- थेरगाव, राणूबाई नागूभाठ बारणे, श्रीम.चिखले यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते. हिंगणघाट येथील जळीत हात्याकांडात पिडीत असलेल्या पंचवीस वर्षीय प्राध्यापिका अंकिता हिचा मृत्यू झालेला आहे तरी तीच्या विषयी आम्हां सर्व नगरसेवीकांना श्रध्दांजली वाहायची आहे तरी त्यासाठी आम्हांला संमती दयावी.

मा.माधवी राजापुरे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे. (सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.प्रियंका बारसे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच शारदाताईनी आपल्या सर्वांसमोर हिंगणघाट जळीत प्रकरणाबद्दल त्यांनी याठिकाणी मुद्दा मांडला. खरतर कालच शिवजयंती झाली आणि या शिवरायांच्या महाराष्ट्रामध्ये

आज आम्हांला महीलांना या सभागृहामध्ये जळीत हात्याकांड विषय घेवून याठिकाणी भावना व्यक्त करण्याची तुम्ही संधी दिली, खरतर ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आपला भारततर जळतोय, जळतोय का त्याला कुणीतरी जाळतंय हा एक महीलांच्या सुरक्षिततेचा गंभीर मुद्दा आहे. आपण आज २१ व्या शतकामध्ये वाटचाल करतो आणि आजही आपला कायदा, सुरक्षा आणि महीलांच्या प्रती असलेला आदरभाव आपल्याला दिसेनासा होत चालला आहे. "कणखर देशा, महाराष्ट्र देशा, दगडांच्या रेषा असं जे महाराष्ट्राच वर्णन आपल्या जनमनाच्या हृदयावरती कोरलेल आहे आणि अशा क्षणी हा कणखर महाराष्ट्र आज रडतो. आपल्या लेकी, सुणा याठिकाणी जळत आहेत. महाराष्ट्रामध्ये आज पालघर घ्या, नवी मुंबई किंवा हिंगणघाट, परवा दिवशी झालेली लासलगावची घटना, अगदीच लांबची नाहीतर आपल्या पुण्यातली सुध्दा घटना. अशा अनेक घटना आहेत की त्या घटना आपल्या हृदयाला चटका लावून जातात. परंतु जोपर्यंत आपल्या रक्ताच नातं कुणीतरी याठिकाणी जळतं नाही तोपर्यंत त्या घटनेची गंभीरता आपण घ्यायला पाहीजे ती गंभीरता याठिकाणी निर्माण होत नाही. आपल गृह खातं, आपल राज्यसरकार त्याशिवाय जागृत होत नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. एवढे चांगले चांगले आपल्याकड कायदे असताना त्या कायदयाचा वापर आपण का करत नाहीत. हा मोठा गंभीर प्रश्न आमच्या सारख्या सुशिक्षीत महीलांच्या मनामध्ये निश्चितच आहे. ही जी घटना झाली, पेट्रोल बाटलीमध्ये मिळते म्हणजे केवढी ही गंभीर गोष्ट आहे. त्याचप्रमाणे ऍसीड सारख्या गोष्टी, केमीकल मेडीकलमध्ये ईझीली मिळतात याच्यावरती गंभीर कायदे का बरं होत नसतील. मी आज महाराष्ट्र सरकारला आवाहन करते की जे सुट पेट्रोल किंवा ऍसीड सारख केमीकल या गोष्टी सुट्टया स्वरुपामध्ये नागरीकांना मिळणार नाहीत यासाठी जास्तीत जास्त प्रखर आणि कठोर असे निर्णय घेतले पाहीजेत. हैद्राबादमध्ये आपण बघीतल की एका महीन्याच्या आत त्याठिकाणी निकाल लगेच, पण आपला महाराष्ट्र का बरं असे निर्णय घेत नाही. या एक महीन्याच्या काळातच एवढया घटना का वाढलेल्या आहेत. एवढी असुरक्षितता महीलांच्या मनामध्ये का बरं निर्माण झाली. का एवढी महीलांना अंदोलन करावी लागत आहेत. आपण फास्ट्रॅगवरती एखादी केस घेतो पण त्याचा निर्णय लागत नाही. आज निर्भया सारखी दिल्लीतली घटना आहे. जेलमध्ये वर्षानुवर्ष हे खातात, त्यांना आपण पोसतोय परंतु आपण त्यांना शिक्षा करत नाहीत. त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहीजे. त्यांना ती वेदना सलग करायला लागली पाहीजे. आज निर्भयाची आई जेलच्या बाहेर अंदोलनाला बसते की माझ्या मुलीला न्याय मिळावा म्हणून. अशा कितीतरी निर्भयाच्या आई आहेत की ज्या

आपल्या न्यायाच्या प्रतीक्षेमध्ये याठिकाणी महाराष्ट्रामध्ये वाट बघतोय पण महाराष्ट्र सरकार मात्र कशाची वाट बघतय. हा खुप मोठा गहण प्रश्न सर्वांच्या समोर निर्माण झाला आहे. अशा नामर्द, निष्ठूर असे समाजामध्ये जे काही समाजकंटक आहेत जे की समाजामधली महीलांमध्ये असुरक्षितता निर्माण करत आहेत. खरच यांच्यासाठी कठोरात कठोर निर्णय त्यांनी घेतले पाहीजेत आणि जर कठोरात कठोर निर्णय घेतले नाहीततर आम्हां महीलांना असेच अंदोलनाला उभ रहाव लागेल. यासाठी अधिकाधिक महाराष्ट्र सरकारने प्रबोधन करणारे काहीतरी याठिकाणी निर्माण केल पाहीजे. लोकप्रतिनिधीना काहीना काहीतरी काम सूचवून दिली पाहीजेत की समाजामध्ये या विचाराना आळा बसेल अशाप्रकारचे काहीतरी वर्ग पण चालू केले पाहीजेत. संस्कार वर्गामधून सुध्दा समाज घडत असतो. या सभागृहातर्फे परत महाराष्ट्र सरकारला आवाहन करेन की पेट्रोल आणि ऍसीड सारख्या वस्तू आहेत या वस्तू सुट्या परिस्थितीमध्ये नागरीकांना मिळायला नाही पाहीजेत आणि तुम्ही जरी एखादा कोर्टामध्ये निर्णय घेतलातर तो निर्णय एक महीन्याच्या आत कसा लागला जाईल याच दृष्टिने अधिकाअधिक कडक पावल उचलली पाहीजेत किंवा कायदयामध्ये सुध्दा आपल्याला आता बदल करता येतात, कायदयामध्ये बदल करण्याचे अधिकारी जर तुमच्याकडे आहेत तर त्या अधिकाराचा वापरही तुम्ही केला पाहीजे आणि यासाठी महाराष्ट्र सरकारला मी आवाहन करते यामध्ये बदल नाही झालातर आमचे आंदोलन आम्ही करतच राहणार आहोत आणि आम्ही आमची मागणी पाठवतच राहणार आहोत. पण या सगळयामध्ये आपल्या महीला मात्र दुर्दैवाने याच्यामध्ये जळत राहणार आहेत आणि हे जळणं जर थांबवायच असेलतर महाराष्ट्र सरकारन कठोर पावल ही उचललीच पाहीजेत. सभागृहामध्ये आज हा विषय मांडला आणि आम्हां सर्वांना दोन शब्द का होईना आमच्या भावना व्यक्त करण्याची, महाराष्ट्र सरकार पर्यंत पोहचवण्याची संधी दिलेली आहे त्याबद्दल मी आपली आभारी आहे पण खरच हे म्हणण आहे ते आपण सरकारतर्फे अधिक कठोरतेनी अधिक तीव्रतेनी त्यांच्या पर्यंत नेण्याची आज गरज आहे हे मी सभागृहातल्या सर्व लोकप्रतिनिधीना सांगू इच्छिते, धन्यवाद.

मा.माया बारणे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर ही हिंगणघाटची घटना घडली आणि आपल्या सगळयांच्या अंगावर शहारे उमटले. अतीशय लाजीरवाणी गोष्ट राजमाता जिजाऊ, क्रांतीसुर्य सावित्रीबाई फुले यांच्या पद्स्पर्षाने पावन झालेल्या या महाराष्ट्रामध्ये महीलांवर होणा-या अत्याचाराच्या या घटनामुळ संपुर्ण महाराष्ट्राची मान लाजेनी खाली गेली. ३ फेब्रूवारीला हिंगणघाटची घटना घडली संपुर्ण देशान त्याच्या विरोधात आंदोलन केली. परंतु या महीलांच्या

बाबतीत जी घटना घडली तीचा दोष काय होता. ज्या नराधमाने हे कृत्य केलं त्याची पत्नी, मुलगी असूनही त्यानी अशाप्रकारच कृत्य केलं, खरतर ही मनोविकृतीच म्हणाव लागेल. त्याच दिवशी दुसरी एक घटना घडली ती औरंगाबाद जिल्हयातली सिल्लोड तालुक्यातील अंधारी याठिकाणी बिअरबारच्या मालकानी घरात जावून महिलेवर पेट्रोल ओतून तीला जाळले. ही घटना ताजी असतानाच ५ फेब्रूवारीला तीचाही मृत्यू झाला. हिंगणघाटच्या त्या महीलेचाही आठ दिवसानी मृत्यू झाला. या घटना ताज्या असतानाच पुन्हा ६ फेब्रूवारीला दुसरी घटना घडली पनवेलमध्ये जोंधारी गावातील ५५ वर्षाची बाई. खरतर केवळ मंगळसुत्राच्या चोरीचा संशय, पुरावाही नव्हता की ही तीनेच कृत्य केल आहे म्हणून. केवळ संशया खाली तीन पुरुष आणि दोन महीला, अतीशय लाजीरवाणी गोष्ट आहे की महीला असुनही ती या कृत्यामध्ये सामील झाली. खरतर अशा महीलाना चप्पलने मारल्या शिवाय पर्याय नाही. हे घडल्यानंतर पुन्हा १३ फेब्रूवारीला अशाचप्रकारची घटना नागपूर जिल्हयातील सावनेर येथील प्राध्यापिका जी डॉक्टर आहे तीच्या बाबतीत घडली तीच्या वरती ऍसीड हाल्ला करण्यात आला परंतु ती यामध्ये बचावली तीने स्वत:ला यामध्ये वाचवण्याचा प्रयत्न केला परंतु तीच्या बरोबर जी महीला होती तीच्या चेह-यावरती आणि तीच्या बरोबर जी विदयार्थीनी होती तीच्या हातावरती ऍसीड पडलं. म्हणजे यांचा काहीही दोष नसताना केवळ मनोविकृती, या एका गोष्टीमुळ त्यांना या गोष्टी फेस कराव्या लागल्या. कुठेतरी या घटनांचा आपण केवळ मेनबत्या पेटवून किंवा निदर्शन करुन या घटना संपणार नाहीत. यासाठी शासनावरती कुठतरी आपल्याला दबाव आणावा लागणार आहे. या गोष्टींचा आपण विचार केलातर आपल्यालाही प्रश्न पडतो की खरच राज्यात कायदा आणि सुव्यवस्था योग्य प्रकारे आहे का. हे प्रश्नचिन्ह तेव्हाच दुर होईल जेव्हा आपल्या कायदयात बदल होतील. ३०२ सारख कलम आपण याठिकाणी लागू केलं परंतु त्याचीही भीती अशाप्रकारच्या नराधमाला राहीलेली नाही. जितक्या कायदयामध्ये आपण बदल करतो, जितक्या वाटा काढतो तीतक्याच पळवाटाही निघतात आणि त्यालाही सर्वस्वी जबाबदार आपणच आहोत. कारण ज्यावेळेस हायकोर्टात, सुप्रिम कोर्टात या केसेस चालतात त्यावेळेस त्यांना मध्ये पिरीएड भरपूर मिळतो ते त्यातन पळवाटा काढण्याचा प्रयत्न करतात. माझी मनापासूनची इच्छा आहे की अशाप्रकारची जी काही प्रकरण आहेत ती फास्टॅग कोर्टामध्ये चालवण्यात यावी. खुप गंभीर प्रकारची याठिकाणी त्यांना शिक्षा देण्यात यावी. या घटना मी आता पंधरा दिवसाच्याच सांगीतल्या याच्या आदि तेलंगणामध्ये जी घटना घडली त्याच जगाने कौतूक केलं. का कौतूक केल, तर ते जे आरोपी होते त्यांना एन्कांऊटरमध्ये मारण्यात आलं,

दाखवल त्यांनी पण त्यांना ताबडतोब शिक्षा झाली. अशाप्रकारची कौतूकाची बाब सगळया देशानी उचलून धरली. महाराष्ट्रामध्ये काय होत की वर्षानुवर्ष यांना निकाल दयायला वेळ लागतो. तरी हा कुठेतरी आपलाही नाकर्तेपणा आहे अशाप्रकारच्या घटना आताच घडतात अशातला भाग नाही, काल आपण शिवजयंती साजरी केली ज्यांचे आपण स्वत:ला अनुयायी समजतो, कधी आपण त्यांच्या विचारांचा आदर केला का कधी आत्मसात करण्याचा विचार तरी केला का. नाही केला, कारण आपण फक्त त्यांचे वारस बनवतो आपल्याला, परंतु आपल्या कृतीमध्ये ते प्रत्यक्षात दिसत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्री मातेसमान मानली. म्हणूनच पररा‌ज्यातल्या स्त्रिया देखील त्यांच्या पुढे नतमस्तक झाल्या, एवढ मोठ विशाल हृदय महाराजांचच होतं. आज वस्तुस्थिती राहीलेली नाही. त्यांच्या काळातही महिलांवर अत्याचार होत होतें परंतु महाराज त्यावेळेस कठोर शिक्षा करत होते. हातपाय तोडून त्यांना भीक्षा मागायला चौकामध्ये ठेवायचे आणि येणा-या जाणा-या लोकांना त्यांना दगड मारा म्हणून सांगायचे. मृत्यू नाही झालातर बाकीच्या लोकांना चपराक होती की अशाप्रकारच जर आपण कृत्य केलतर आपलीही स्थिती त्याच पध्दतीने होणार आहे. मग हे जर महाराज करु शकतात तर आपण का नाही करु शकत. आपल्याकड संविधान आहे, आपल्याकडे कायदे आहेत. जर आपण परदेशामध्ये पाहीलतर तीथही अशाप्रकारच्या दूषकृत्याना अतीशय कठोर कायदे आहेत. मान्य आहे आपल्याकडे लोकशाही आहे परंतु लोकशाहीमध्येही आपण जर त्या कायदयामध्ये बदल केलेतर नक्कीच आपल्याला यामध्येही परिणाम जाणवायला लागेल. खरतर अतीशय निंदनीय गोष्टी या घडतात आणि राज्यशासन याची दखल घेत नाही यासारख दुसर कुठलही कृत्य याठिकाणी नाही. आपण लोकप्रतिनिधी आहोत, आपलही काम आहे की महीलां विषयी समाजामध्ये एक आदर निर्माण करण्यात यावा. केवळ उपभोगाची वस्तू म्हणून या महिलांकड पाहील नाही पाहीजे. आज आपण लाख म्हणतो की महीला पुरुष समान आहेत पण वस्तुस्थिती आहे का हो, नाही. आजही महीलांना दुय्यम स्थान दिलं जातं. कुठल्याही प्रकारच्या निर्णयप्रक्रीयेमध्ये तीच्या विचाराचा आदर केला जातो का, नाही. आजही आपल्याकड पुरुषप्रधान सांस्कृती मानली जाते, जपली जाते. तर कुठेतरी या गोष्टी बदलल्या पाहीजेत. आपली मानसीकता आपली बौध्दीकता बदलली पाहीजे आणि लोकप्रतिनिधी म्हणून ती आपली ही नैतीक जबाबदारी आहे. आपल्या ज्या महानगरपालिकेच्या शाळा आहेत त्या शाळांच्या मार्फत महीलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात यावेत, पाठयपुस्तकामध्ये जसे आपले विषय असतात तशाचप्रकारचा हाही एक विषय त्यांना देवून स्वसंरक्षणाचे धडे त्याठिकाणी देण्यात यावे असं मला

स्वत:ला मनापासून वाटत. या राज्यशासनाचा याठिकाणी मी निषेध करते, या ज्या घटना घडलेल्या आहेत या नराधमाचाही या सभागृहात निषेध करते आणि याठिकाणी थांबते, धन्यवाद.

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज पुन्हा एकदा एका मुलीवर पेट्रोल टाकून तीच्यावर प्राणघातक हाल्ला त्यामध्ये तीचा मृत्यू. मला वाटत रोजच पेपर वाचायला सुरवात केली की पहील्यांदी अंगावर काटाच येतो की आज पुन्हा कुठल्या महीलेवर ऍसीड फेकलं, कुठल्या मुलीवर पेट्रोल टाकल किंवा कुठल्या महीलेवर अत्याचार झाला, कुणावर बलात्कार झाला. या नराधमानी इतकी पातळी ओलांडली की अगदी नऊ महीन्याच्या चिमुरडी मुलीला सुध्दा या लोकांनी सोडलेलं नाही की अगदी ऐंशी वर्षाच्या म्हातारी पर्यंत. आज पुन्हा एकदा हिंगणघाट येथील भर रस्त्यावर प्राध्यापिका अंकिता हीच्या अंगावर पेट्रोल टाकून तीला जाळण्यात आलं. एवढ झालतरी राज्य सरकार झोपलेलं आहे का. पेट्रोल आणि रॉकेल एवढी स्वस्त, मला राज्यसरकारला प्रश्न विचारायचा आहे की तुम्ही आतापर्यंत कुठली ठोस अशी पावल उचलली आहेत आणि याच्या पुढे तुम्ही उचलणार आहात. रोज आम्ही महीलांवर झालेले आत्याचारच ऐकत बसणार आहोत आणि त्याच्यावर आम्ही आंदोलन करत राहणार आहोत का. म्हणजे आमच्या महीलांच्या हातामध्ये पन्नास टक्के आरक्षण देताना या सरकारन आम्हांला ही गोष्ट दिली का की रोज तुमच्यावर आत्याचार होणार आणि रोज तुम्ही आंदोलनासाठी रस्त्यावर उभे राहणार. राज्यसरकारचा मी निषेध करते. आतापर्यंत याच्यावर ठोस पावल राज्यसरकारने उचलायला पाहीजे होती. कारण मुलींच फक्त नाव बदलल जात पण जात मात्र एकच, स्त्रि. महीला वर्गाला संताप आलाय की आम्ही नेहमी कुठल्या पध्दतीने कुठल्या सरकारवर, ज्या सरकारला आम्ही मायबाप समजतो त्या मायबापाला आम्हांला रोज सांगाव लागतं का, की आमच्या सुरक्षिततेचा प्रश्न तुम्ही कुठल्या पध्दतीन सोडवणार आहात म्हणून. आताच माझ्या सहकारी मायाताईनी सांगीतल की महाराजांच्या काळामध्ये, हो महाराजांच्या काळामध्ये आपल्या महीलेला खरोखर आदरभाव होता पण आता तो आदरभाव या सरकारमध्ये राहीलाय का हा मुळात खुप मोठा प्रश्न आहे. मला वाटत त्यासाठी माझ्या महीला वर्गाला एक माझ सांगण आहे "लाट उसळली संतापाची विचार आता काय, लाट उसळली संतापाची विचार आता काय, कापून टाका नराधमांचे हात आणखी पाय, वखवखलेले विकृत आता दिसतील जेथे जेथे, ठेचून टाकू हीच शपथ मग करू या खरीच तेथे, षंढ कायदा गेंडा शासन म्हणुनी गुन्हा पुन्हा हा, भीती घालतो रोजच हल्ली रस्ता सुना सुना हा, रोजच निघती हल्ली

मोर्चे घेऊन हाती दिवे, दात विचकती मोर्चालाही नराधमांचे थवे, किती प्रियांका किती निर्भया या देशी मेलेल्या, किती अनामिक कळ्या बिचा-या शिकार मग केलेल्या, सन्मानाच्या रोज घोषणा वाचून महिला हसते, गल्ली, दिल्ली, शाळा, रस्ता सर्वत्रच ती फसते, तूच हो आता झाशीवाली करण्यासाठी वार, नराधमांना दाव तळपत्या समशेरीची धार" मला वाटत आता या शासनाच्या विरोधात मग कुठल्याही पक्षाची ती महीला असो त्या सर्व पक्षाच्या महीलांनी एकत्र येवून एक वेगळया पध्दतीने आंदोलन करुन या शासनाला जाग कराव लागेल की याच्यामुळे कुठल्याही महीलेवर झालेला अन्याय आम्ही खपवून घेणार नाहीत आणि त्यासाठी महापौर ताई तुम्हांला आमची विनंती असेल की पिंपरी चिंचवडमध्ये कायदा व सुव्यवस्था जी आता ठजाड होते त्याच्यासाठी तुम्ही सुध्दा सगळया आमच्या नगरसेवीकांना मिटींगला बोलवा, आपल्या प्रत्येक वॉर्डामधले जे प्रश्न आहेत ते मांडण्याची तुम्ही संधी दया. कारण ज्यावेळेला प्रथम नागरीक म्हणून आम्ही आमच्या वॉर्डात काम करत असतो तेव्हा आम्हांलाही काम करणं सोप जाईल. मला वाटत सर्व महीलांनी यासाठी सक्षम व्हायला पाहीजे. राज्यशासनान यासाठी जागृत होण्याची खरोखरच प्रचंड गरज आहे एवढच बोलते आणि इथेच थांबते.

मा.वैशाली घोडेकर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी आताच माझ्या सहकारी मैत्रिणीनी अतीशय चांगला मुद्दा मांडला. ख-या अर्थाने हे आज विचारायची गरज आली की महीलांना नुसत तुम्ही लक्ष्मी म्हणता, देवठिकाणी पुजता पण त्याठिकाणी खरच तीचा आदर करता का हा विचार करण्याची गरज आहे. आज मग हिंगणघाटची घटना असेल, नाशिकची घटना असेल आणि मी इथेही दाखवून देते की निर्भयाच्या आरोपीना अजून फाशी झाली नाही, याची देखील केंद्राने दखल घेतली नाही. याचा देखील याठिकाणी निषेध करते. केंद्राने याची दखल घेवून त्याठिकाणी फाशी दिलीच पाहीजे होती. जर तीथ इतकी वर्षे झाल ठशिर होतो तर आम्ही महीलांनी काय म्हणून अपेक्षा पकडायची हाच याठिकाणी मला प्रश्न पडला आहे. पुन्हा एकदा याठिकाणी मी केंद्रसरकारचा निषेध करुन आज जे काही महीलांसाठी होतय ते झाल नाही पाहीजे. मा.महापौर याठिकाणी आताच सुजाताताईनी अतीशय चांगला मुद्दा मांडला आहे की आपण एक मिटींग बोलवली पाहीजे कारण की अशा घटनाची वाढ ही पिंपरी चिंचवडमध्ये पण वाढलेली आहे. त्याची पण नैतीक जबाबदारी ही आपल्यावरच आहे. याठिकाणी अतीशय चांगला मुद्दा त्यांनी दिलेला आहे तरी आपण मिटींग लावावी आणि पिंपरी

चिंचवडमध्ये वाढती गुन्हेगारी आहे त्याला देखील आळा बसवावा आणि पुन्हा एकदा मी या घटनेचा निषेध करते आणि याठिकाणी थांबते.

मा.बाळासाहेब ओव्हाळ - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हिंगणघाटसारखी घटना त्यानंतर लगेचच नाशिकची घटना. मा.महापौर साहेब, गेल्या आठ पंधरा दिवस झाल कन्टीन्यू एकएक बातमी दिवसाआड चालू आहे. कुठेतरी अत्याचार होतो, कुठेतरी अन्याय होतो, कुठेतरी बलत्कार होतो. याच कारण काय, मी तुम्हांला आज या सभागृहाला आठवण करुन देवू इच्छितो की २०१६ साली कोपर्डी याठिकाणी बलात्कार झाला आणि त्या बीचारीचा त्या बहीणीचा घात केला गेला तीला ठार केल गेलं. परंतु त्यावेळेला काही राज्यकर्त्यानी, तुम्हांला आठवण करुन दयायची मुद्दाम की तोच मुद्दा जातीवाचक राजकारण केल गेलं. त्यावेळेस पुर्ण महाराष्ट्रामध्ये कायदा आणि सुव्यवस्था बीघडवायच काम केलं, त्यावेळेसच्या विरोधकानी हे काम केल आणि आज जे कोणी विरोधक असतील त्यांना का आज जाणीव होवू नये. हा माझा खुप मोठा प्रश्न आहे मी सभागृहाच्या माध्यमातून सरकारला हा प्रश्न विचारु शकतो. जे गेल्या पंचवार्षीकमध्ये संविधाना विषयी विचारत होते, संविधान कुठतरी तोडल जातय, बुडवल जातय म्हणजे संविधान आज त्यांच्या हातात नाही का. आज राज्यसरकारच्या हातात संविधान नाही का, त्यांच्याकडे तो मुद्दा नाही का. का ते वापर करु शकत नाहीत, का त्यांचा प्रशासनावरती वचक राहीलेला नाही. नेमक काय राहीलय. आजच्या पेपरला सुध्दा सिल्लोड याठिकाणी गरीब महीलेवरती आणि तीच्या मुलावरती आत्याचार करुन तीला विहीरीमध्ये फेकून दिल जातय. परवाची नाशिकची घटना आहे, बसस्टॉपवरती महीलेंवरती पेट्रोल टाकून जाळल जातंय. म्हणजे आज हा गेल्या सहा महीन्यापासून चढता आलेख आहे. जस नवीन राज्यसरकार सत्तेत आल्यापासून एखादा तोहफा दिला जातो तसा आपल्या नागरीकांना खुप मोठा तोहफा दिला जातो. याबद्दल त्यांच अभिनंदन करायच का निषेध करायचा हे नागरीकांनी ठरवायचं. मला पुन्हा एकदा आठवण करुन दयायची आहे की प्रत्येकवेळेस यांनी राजकारण केलय. त्यावेळेस या छोटया गोष्टी म्हणल्या गेल पंरतु ज्याप्रमाणे बॉम्ब हाल्ल्यामध्ये त्यावेळेसचे उपमुख्यमंत्री आर.आर.पाटीलांनी राजीनामा दिला होता त्याचप्रमाणे आजचीही जबाबदारी स्विकारुन आजचे उपमुख्यमंत्री यांनी का राजीनामा देवू नये असा मला प्रश्न विचारायचा आहे. आज जर महाराष्ट्रामध्ये कायदा आणि सुव्यवस्था जर ढासळत असेलतर हे राज्यसरकार खरोखर षंढ आहे का, आता सुजाता ताईनी सांगीतल त्यांच्या कवीतेमधुन. कायदा तर जागेवरती आहे परंतु कायदयाच पालन

करणारे, कायदयाच अवलंबन करणारे जर योग्य नसतीलतर कायदा कितीही चांगला बनवला, कितीही परखड बनवलातर तो कायदा योग्य ठरणार नाही कारण शासनाच काम आहे, राज्यकर्त्याच काम आहे त्यांनी तो कायदा आणि सुव्यवस्था पाळली गेली पाहीज, त्यांनी प्रशासनावरती वचक ठेवला पाहीजे. परंतु हा वचक दिसून येत नाही म्हणून मी आज या राज्यसरकारचा निषेध करतो आणि त्याच बरोबर आज खुद उपमुख्यमंत्री यांनी ती जबाबदारी स्विकारुन कुठेतरी आपल्या मनामध्ये दाद देवून त्यांनी राजीनामा दिला पाहीजे. त्याच बरोबर मी या माझ्या बहीणीना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

मा.मंगला कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला असं वाटत की आज आपण महीलां विषयी जर बोलत असूतर, राजकारणाचे आपण अंदोलन करतो, यांनी का केल नाही मागच्यावेळेस आम्ही केल आता तुम्ही करायच असं आमच म्हणण नाही पण कमीत कमी ही माहिती घ्या की कुठल खात कुणाकडे आहे आणि मग राजीनामा कुठल्या मंञ्यानी कसा दिला पाहीजे. उगीच आपल्याला काहीतरी बोलायच म्हणून बोलून विषयांतर करणं योग्य नाही, कारण सभागृहामध्ये सर्वपक्षीय लोक आहेत. उगीचच तुम्ही बोलले म्हणून आम्ही बोलायच महीलांचा विषय परत कुठेतरी फाटयावर नेऊन सोडणार. शंभर टक्के मागणी करा परंतु त्या खात्याची जबाबदारी कुणाची आहे. आज जे महीलांच्या बाबतीत एवढ घडतयनां तरी सगळया आपल्या बांधवानी हिंगणघाटच्या कुठल्या जेलमध्ये त्याला ठेवलाय तीथ आपण जाऊ मी पण तुमच्या बरोबर असेल अशी डोक्यात भावना ठेवा. आज तेलंगणामध्ये ज्यावेळेस झाल आणि त्यांना तेथे मारल, त्यांचे एन्काऊंटर करण्यात आले. पब्लिकनी त्या पोलीसांच अभिनंदन केलं. परंतु त्यावेळेला अशी सुध्दा बाजू मांडण्यात आली की यांनी जाणुनबूजुन मारलं. यांच्यावर गुन्हे दाखल करा. दोन्ही बाजूनी आपल्याला अभ्यास करावा लागतो. कायदयाच्या बाबीनुसार सुध्दा अभ्यास करावा लागतो म्हणून आमच्यासारख्या सिनीअर महीलांनी असंजर काहीतरी वेगळ बोलायच ठरवलतर आम्ही काही इतरांची बाजू घेतो का अंस होईल म्हणून बोलताना, नक्कीच सरकारच्या विरोधात बोला मी सुध्दा म्हणते की सरकारला जाग आली पाहीजे. कायदे कडक केले गेले पाहीजे. फास्टॅग कोर्ट चालल पाहीजे. यासाठी कशाला आठ दिवस, दहा दिवस लागतात. पुरावे मिळालेत नक्की त्याना फाशीची शिक्षा दया. जास्तीत जास्त दिवस न लावता त्यांना चौकात फाशीची शिक्षा दया असं मी म्हणते. परंतु वेगळ वळण देवू नका. काही भगीनी बोलल्या सगळयांच्या मनामध्ये तेच आहे. परंतु याच्यापेक्षा

सुध्दा मन सळसळतं. आमच्याकडेही सुना आहेत, मुली आहेत, नातवंड आहेत. आज समाजात जी घटना घडते ती छोटयातल्या छोटयात अगदी वृध्द महीलांपर्यंत अत्याचार चाललेले आहेत आणि हे अत्याचार आपण नेहमी डोळयानी बघत असतो, प्रत्येक स्त्रिला आणि पुरुषाला सुध्दा अंतकरण आहे त्या प्रत्येकला असं वाटत असतं की अशी घटना घडल्यानंतर आपण तीथे जाव आणि आपण या नराधमाना काहीतरी वचक म्हणून काहीतरी केल गेलं पाहीजे असं प्रत्येकाला वाटत असंत. कारण आपण जीवंत माणस आहोत. प्रत्येकाला असं वाटत असतं माझी घरात बायको आहे, माझी मुलगी आहे, माझी बहीण आहे असं प्रत्येकाला वाटत असतं. त्यादृष्टीकोनातून प्रत्येकाच्या मनामध्ये ही भावना आहे. सभागृहाच्या वतीने मा.महापौर हे राज्यसरकारला पाठवा, केंद्रसरकारला पाठवा. मग राज्यसरकारनी केल नाहीतर मग केंद्र सरकारन निर्भयाबाबतीत का केल नाही. कुठल सरकार आहे त्याच काही घेणंदेण नाही. महीलांची सुरक्षा पहीली महत्वाची असं मला याप्रसंगी वाटतं. मा.महापौर आपल्या महापालिकेच्या शाळा असतील तुम्ही शिक्षणमंत्री यांना पण पाठवा प्रत्येक शाळेमध्ये मुलीला परसेन्टेज चांगले नाही मिळालेतरी चालतील परंतु ती स्वावलंबी झाली पाहीजे. तीला चांगल कराटयाच प्रशिक्षण दिलं गेल पाहीजे. तीला स्वसंरक्षणाच्या सगळया गोष्टी दिल्या पाहीजेत. प्रत्येक विदयार्थ्याला पाच वर्ष मेन्टेन केलं पाहीजे. प्रत्येक व्यक्तीन पाच वर्षे मिलीटरीमध्ये काम करुन यायला पाहीजे म्हणजे त्याला समाजाच आणि सगळया गोष्टीच भान राहील. आणि त्या कायदयानुसार आणि त्या तत्वावनुसार चालण्यासाठी माणस तयार राहतील, महीला तयार राहतील, मुल तयार होतील. जी अंकिता म्हणून मुलगी होती ती इतकी देखणी होती की काय तीची चुक होती. त्या मुलीकड बघीतल्यानंतर सभागृहामध्ये बोलायला शब्द सुध्दा नाहीत. ज्या माणसाच लग्न झालेल होत त्याला स्वत:ला मुलगी आहे, आपल्या मुलीच्या बाबतीत एक सेंकद सुध्दा त्याच्या मनामध्ये विचार आला नाही की माझ्या मुलीच्या बाबतीत जर अंस काही घडल असतंतर का होईल. अंकिता तर गेलीच गेली परंतु त्या बाईला आणि तीच्या मुलीला आज ज्यावेळेला जगायच आहे त्यावेळेला तुझा बाप असां होता, हे त्या मुलीच्या मनामध्ये आयुष्यभर गाठ होवून राहणार आहे की तुझे वडील असे होते. तुझ्या वडीलांनी हे कृत्य केल आहे. आणि म्हणून केंद्रसरकार असो किंवा राज्यसरकार असो तुम्ही सगळया बरोबर या मी पण तुमच्याबरोबर अंदोलनाला आहे. केंद्रसरकारकड पण अंदोलनाला आहे आणि राज्यसरकारड पण अंदोलनला आहे. आंदोलन करायलाच पाहीजे, सरकारने दोन्ही गोष्टीला जबाबदार धरुन या लोकांना लवकरात लवकर शिक्षा झाली पाहीजे. आपण जेवढया भागात आहोत

तेवढया भागातला पहील्यांदा विचार करावा. आपण आपल्या लोकांना आपल्या ऐरीयामध्ये जसं मगाशी मी सांगीतल की माई तुम्ही सगळया नगरसेवीकानंची बैठक बोलवा. कमीत कमी आपण चांगल केल गेलं पाहीजे. त्या दृष्टीकोनातून आपण प्रयत्न केले गेले पाहीजेत. आपल्या इथे सुध्दा कितीतरी घटना घडल्या जातात. आज टीव्हीवर दाखवत होते की वर्षाला २२ हजार, २५ हजार मुली, महीला बेपत्ता होतात. बेपत्ता झालेल्या महीला सापडत नाहीत. म्हणजे हीतर त्याच्यापेक्षा वाईट घटना आहे. परवाच्या दिवशी एक आकरा वर्षाची मुलगी बेपत्ता झाली. रोज टिव्हीवर दाखवल जातं. मग या मुली जातात कुठं. बेपत्ता होण्याची संख्या पण भयंकर आहे. आज समाज विकृतीन भरलेला आहे. याच्यासाठी आपण काय केलं गेलं पाहीजे. हे सुध्दा आपण बघीतल पाहीजे. आपण समाजामध्ये काम करतो, राजकारणापेक्षा आपण समाजकारण करतो असं आपण म्हणतो तर मग आपण काय केल गेल पाहीजे. समाजकारण जर आपल्याला करायच असेलतर आपण मग काय केल गेल पाहीजे याचा सुध्दा आपण विचार केला गेला पाहीजे. कॉलेजमधली मुल असतील, सातवीचे, आठवीचे, नववीचे, दहावीचे मुल असतील या सगळयाना सगळया गोष्टीच स्पष्टीकरण हे सगळ शाळेतून दिल गेल पाहीजे. आणि म्हणून आपण हाळू हाळू समाज बदली केला पाहीजे. आपण राज्यसरकारला अगदी ठणकावून विचारु की तुम्ही त्या नराधमाला किती दिवसानी फाशी देणार आहात हे सांगा. उज्जवल निकम यांच्याकड केस गेलेली आहे. आपण उज्ज्वल निकम यांना सुध्दा सगळेजण पत्र पाठवू शकतो. विचारु शकातो की आज कितवा दिवस आहे आणि किती दिवसात तुम्ही केस उभी करणार आहात. तरी आज याला वेगळ वळण न देता ओव्हाळ यांच्या बोलण्याचा उद्देश वाईट आहे असं मला म्हणायच नाही माणुस ओघाने बोलून जातो. उपमुख्यमंत्री यांच नाव घेतल म्हणून मला त्रास होणार नाही हे लक्षात ठेवा. चुकी असेलतर शंभर टक्के आजीतदादा राजीनामा देतील हेही तुम्हांला आतापासून सांगते. पण त्यांच्याकडे ते खातं असलं पाहीजे. आज आम्हांला सुध्दा ते असं सांगतात की मी आताशी उपमुख्यमंत्री आहे. तुमच्या सगळया कामासाठी नाही झालो. मला बाकीचे पण काम आहेत. म्हणून जबाबदारीपुर्वक बोलावं इतकच आमच म्हणण आहे. इतर गोष्टी बाजूला राहतात आणि तुम्ही आणि आम्हीच भांडत बसतो. बाकी ठिकाणी वर केंद्र राज्य सगळ अलबेल चाललेल आहे. तुम्ही आम्ही इथ का वाद घालायचा आणि चांगल्या पध्दतीने सभागृहामध्ये विषय झाले पाहीजेत. आपण ठराव करा, सगळया नगरसेवकांच्या सहया घ्या आणि केंद्रसरकारला, राज्यसरकारला हे पाठवा की आमची ही भावना आहे की यांना लवकरात लवकर फाशी झाली पाहीजे. पोलीस

यंत्रणा वाढली पाहीजे. मा.महापौर साहेब आपण हे केल गेल पाहीजे की पोलीस आयुक्तालय इथे आहे. आपल्याकडे पेट्रोलींगच्या सुध्दा गाडया नाहीत. १०० नंबरला फोन केला तर गाडी येवू शकत नाही. कारण पोलीस स्टेशनवाले सांगतात की पेट्रोलींगवाल्याकड गाडयाच नाहीत. मग आता महापालिकेनी त्यांना गाडया पुरवायच्या का. आपण काय केल पाहीजे, आपण मोर्चे काढले पाहीजे, आपण आंदोलन केले पाहीजे, आपण पोलीस आयुक्ताना जावून बोलल पाहीजे. आमच्या इथ आमच्याकडे सुरक्षावाले चांगल्या पध्दतीने वाढले पाहीजे. आपण याच्यावर उपाययोजना सुध्दा चांगल्या पध्दतीने शोधल्या पाहीजेत. मला तर बोलायची इच्छा

नव्हती कारण बोलायला शब्द नाहीत. इतकी सुंदर देखणी मुलगी ज्या घरातली गेलेली आहे त्या आई वडीलाच काळीज कस फाटत असेंल आणि आज आपण या विषयावर जर चर्चा करतो तर ते आईवडील म्हणतील तुम्ही आमच्या विषयी काही चर्चा करु नका. निर्भयाच्या आईला बघीतलना तर ती ओरडून ओरडून सांगते, त्या लोकांची फाशी दरवेळेला पुढे पुढे जाते. आपणही एक आई आहोत त्यावेळेला असं वाटत की अस कोण बोलू शकतं. बोलायची सुध्दा हिम्मत नाही आणि बोलायची सुध्दा ताकद माझ्यासारखीत नाही की अशा विषयावर सभागृहात बोलाव. लवकरात लवकर फास्टॅग कोर्टात जावुन त्या नराधमाना लकवरात लवकर फाशीची शिक्षा देता येईल. आपल आयुक्तालय, आपली पिंपरी चिंचवडची यंत्रणा आपल पुर्ण पिंपरी चिंचवड शहर, आजूबाजूचा परिसर याच्यामध्ये पोलीस यंत्रणा असेल वेळ आलीतर आपण नक्की देवू आपण इतके करोडो रुपये खर्च करतो. एखादा पुल करु नका किंवा आणखीन काही एक दोन गोष्टी करु नका पण कॅमेरा बसवा हे पण मी मागे सांगीतले होते. शहरामध्ये सगळीकडे कॅमेरे बसवले गेले पाहीजेत. सगळीकडे सगळया यंत्रणा सुरळीत चालल्या पाहीजेत. स्मार्ट सिटीच्या तुम्ही केबल टाकताय त्याच्यातन काय काय गेल काय तुम्हाला माहिती आहे. नाहीतर कॅमेरेसाठी परत खोदून ठेवा. म्हणून सगळया शहरामध्ये कॅमेरे हे चांगल्या पध्दतीने बसले गेले पाहीजेत. सगळा ऐरीया कव्हर झाला पाहीजेत. यंत्रणा इतकी फास्ट असली पाहीजे की कुठल्याही ठिकाणी कुठली गोष्ट घडली तरी पोलीस चौकीला किंवा पोलीस स्टेशनमध्ये जिथे जिथे आपण कॅमेरे बसवलेत एक त्यांच्याकडे कॉपी असली पाहीजे आणि एक माझ्याकडे कॉपी असली पाहीजे. याचीही यंत्रणा पाहीजे तरच या चिमुरडीना या महीलांना श्रध्दांजली वाहील्यासारखी वाट्टेल नाहीतर उगाचच ओरडायच, उठायच, बसायच, तुम्ही बोलतात म्हणून आम्ही बोलायच आम्ही बोलतोत म्हणून तुम्ही बोलायच हे करण्यात काही अर्थ आहे अस मला वाटत नाही.

मनापासून माझ्याकडून माझ्या कुटूंबीयाकडून, पक्षाकडून सगळयाकडून मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहते आणि थांबते.

मा.मीनल यादव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम जे असे कृत्ये करतात ते नराधम कुठल्या जातीचे, कुठल्या पातीचे किंवा कुठल्या पक्षाचे किंवा कुठल्या केंद्रशासनाच्या काळातले किंवा राज्यशासनाच्या काळातले हे नसतात. त्यांची ही वृत्ती ठेचली गेली पाहीजे. आजच्या या घडीला कोणीही या बाबतीत राजकारण न करता, याला त्याला दोष देण्यापेक्षा प्रत्येकानी केंद्रशासनाने आणि राज्यशासनाने त्यांची त्यांची कर्तव्य लवकरात लवकर पुर्ण करुन अशा नराधमाना शिक्षा होणं महत्वाच आहे. कारण अशा गोष्टी ज्या कुटूंबावर होतात त्याचेसारख दु:ख आपण फक्त बोलून होत नाही, ज्या कुटूंबाला भोगाव लागतं त्यानांच हे कळतं त्याच्यामुळे हे फक्त चर्चा करणं आणि याला त्याला दोष देणं याच्यात वेळ न वाया घालवता मा.महापौरांना मी विनंती करते की तुम्ही राज्यशासनाकड, केंद्रशासनाकडे पिंपरी चिंचवडच्या वतीने लवकरात लवकर कारवाई व्हावी, प्रत्यक्ष शिक्षा व्हावी अशी विनंती करते त्याच बरोबर आपण पिंपरी चिंचवडच्या प्रथम नागरीक या नात्याने काय करु शकतो. इथेही भरपूर महीला आहेत त्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत आपण काय करु शकतो. आपण महीला महापौर म्हणून लाभलेला आहात त्याच्यामुळे नवीन नवीन योजना आखाव्यात. महीलांना स्वसंरक्षणाचे धडे या गोष्टी आपण करणारच आहोत. त्याच बरोबर महापौरांचा किंवा आयुक्तांचा ऑनलाईन नंबर महीलांसाठी जो चोवीस तास उपलब्ध राहू शकतो की पिंपरी चिंचवडमध्ये काहीजर घडलतर इथे एक सुरक्षा कक्ष वेगळ तयार करा की फक्त महीलांच्यासाठी. कुठली जर महीलाच्या बाबतीत अघटीत घटना घडत असेल, राञी, चोवीस तास दिवस रात्र कधीहीतर आपल्या वतीने, पोलीसांच्या वतीने तर ते संरक्षण करतीलच कमीशनर साहेब आणि तुम्ही तुमच्या वतीने काय करता येवू शकतं किंवा नवीन काही योजना महीलांसाठी करता येवू शकतात याचा आपण विचार करावा. आणि निर्भयाच्या बाबतीत जो प्रकार मागील काळात घडला त्याचा अजून निकाल लागला नाही त्याच्यामुळे या घटना वरच्या वर घडत चाललेल्या आहेत. मी विनंती करते की पक्षाच राजकारण, केंद्राच, राज्याच असं न करता अशा वृत्तीला ठेचल गेल पाहीजे अशी विनंती करते, धन्यवाद.

मा.आशा धायगुडे- शेंडगे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर १० फेब्रूवारीला जी घटना घडली, ज्या तरुणीचा शेवट त्या दिवशी झाला १० फेब्रूवारीला सकाळी ६.५५ मिनीटांनी. सर्वाच हृदय पिळवटून टाकणारी, मनाला दु:ख

देणारी अत्यंत वाईट, दुर्दैवी घटना ३ फेब्रूवारीला जो काही अन्याय, अत्याचार झाला त्या अत्याचारातून ती वाचेल ही आशा ती अपेक्षा प्रत्येकाच्या मनामध्ये होती आणि ती वाचली पाहीजे. तीच्या समोर त्या नराधमास शिक्षा देण्याची संधी या राज्याला देता आली असती. परंतु दुर्दैवाने मृत्यूशी झुंज देत देत ती सात आठ दिवस मृत्यूशी खेळत होती. १० फेब्रूवारीला तीचा मात्र शेवट झाला. मला आठवल की अगदी आजपासून वीस वर्षापुर्वी रिंकू पाटील नावाच एक प्रकरण १९९० साली, मी त्यावेळेला नववी किंवा दहावीला असेल, ती पहीली घटना आपल्या सगळयांना ज्ञात असणारी, पेपरला आलेली खुप ती गाजली, गाजली या कारणांन की अत्यंत वाईट असं वाटत की त्यावेळेला तो जो कोण नराधम होता त्या नराधमाला चौकात फाशी झाली असती, त्याला चौकात मारल असतंतर पुन्हा या माझ्या देशामध्ये, या जिजाऊच्या राज्यामध्ये, या शिवाजी महाराजांच्या भूमीमध्ये पुन्हा कोणत्याही नराधमाने ही चुक करण्याची पुनरावृत्ती केली नसती. कुठतरी कायदा आहे, न्याय आहे, सुव्यवस्था आहे याच्या आशा अपेक्षावरती आपण सगळेजण राहतो. परंतु परवाची घटना झाली आणि रिंकू पाटील माझ्या डोळयासमोर उभी राहीली. कारण आपल ते आठवी नववीत तरुण असल्याच वय आणि त्या वयात अशी घटना, कालपर्यंत एखादया माणसाने एखादया मुलीला छेडलं काहीतरी बोलले इथपर्यंत व्हायचं परंतु त्यावेळेला रिंकु पाटीलची घटना घडली होती मला वाटत सगळयांना ती आठवत असेल. आज सभागृहामध्ये पक्षीय राजकारण करायच नाही असे आपण कितीही म्हणलोतरी त्याचवेळेला जर आपण त्या नराधमाला सगळयांच्या दबावाने, आज इथे असलेल्या सगळया माझ्या भगीनी, बंधु असतील जे प्रत्येक प्रभागातून प्रतिनीधीत्व करतात. जर माझ्या घरात माझ्या मुलीला, माझ्या सुनेला असेल, माझ्या पत्नीला असेल असा जर कुणावरती अन्याय झालातर आपण गप्प बसूत का. या भावना या सभागृहामध्ये प्रत्येकाच्या बोलण्यात नक्कीच येतात. प्रत्येकाचा हेतू एकच आहे. मला तर असं वाटतय की १९९० साली त्याला आपण झापल असंततर या शहरामध्ये, या राज्यामध्ये पुनरावृत्ती झालीच नसती. त्या नराधमाला अशी शिक्षा दयायला पाहीजे होती की पुन्हा अशी घटना घडायला नाही पाहीजे. त्यावेळेला आपण चुकलोत. अशा चुका करत करत आज तीस वर्षे जवळपास उलटल्यानंतर सुध्दा त्या घटना कमी होण्याच्या ऐवजी दिवसांदिवस वाढतात. कधीतरी दोन-चार- सहा महीन्यातून एखादी घटना घडायची, दुर्दैवाने आज मात्र रोजच वृत्तपत्र उघडल्यानंतर फक्त नाव बदलतात मात्र जी काही मानहानी होते ती रोजचीच झाली, नित्याची झाली. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते की या राज्याचे गृहमंत्री असतील त्यांच्यावर जबाबदारी येते, आता ताईनी बोलण्याच्या

ओघात आमचा शेखर म्हणाला की उपमुख्यमंत्री हे काही पक्षाचे नाहीत, जबाबदारीचा विषय होता आणि ज्यांची जबाबदारी सन्मा.महापौर साहेब विनंती करते की त्यांना आपण सगळयांनी, आपल्या सगळया नगरसेवकांची १३३ नगरसेवक स्विकृत सहीत या सगळयांनी एका पत्रावर लिहील पाहीजे की आमच्या शहरात सुध्दा तीच, वेगळी अवस्था नाही आम्हांला आमच्या शहरात नवीन रिंकु पाटील नको, आमच्या शहरामध्ये एकही हत्याकांड या पुढच्या काळात आम्ही सहन करणार नाहीत. कोणत्यां नां कोणत्या मुलीवर अन्याय होतो, अत्याचार होतो आणि ती बळी जाते, तीच्या बरोबर तीच कुटूंब आयुष्यभराच उध्दवस्त होतं. आज निर्भया हत्याकांडाचा प्रकार सगळयांना माहीती आहे. निर्भया काही एकच चेहरा नाही फोटोत बघीतला, फोटोत बघतो, दुर्दैवाने आपण समोर पाहीलतर आपण निश्चितपणे आपल्या भावनाना आपण आवर पण घालू शकणार नाहीत. त्या लोकांना शिक्षा झालीच पाहीजे. का इतक्या वर्ष तीला मागणी करावी लागते. तीच्या नंतर अशा अनेक निर्भया या देशामध्ये या राज्यामध्ये घडत असतात. परंतु मला वाटते की या राज्यातील एक घटक म्हणून असणा-या गृहमंञ्यांनी त्यांचा राजीनामा दयायचा का तर निश्चितपणे दिला पाहीजे. आणि या पुढच्या काळामध्ये जे काही अशा दुर्दैवी घटना घडणार नाहीत या दृष्टिकोनातून आपल्या सगळयांचे १३३ लोकांची पाऊल उचलली गेली पाहीजेत. जसं आपण राज्याबद्दल बोलतो त्या दृष्टीकोनातून आपण हया शहराबद्दल सुध्दा बोलल पाहीजे. आज हाकेच्या अंतरावरती पोलीस आयुक्तालय आहे. त्या आयुक्तालयात सुध्दा आपल्या सगळयांची एकदा भेट झाली पाहीजे. १३३ नगरसेवक कोणत्याना कोणत्या प्रभागाचे प्रतिनीधीत्व करतात त्यांच्या प्रभागात एक ना अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतीलतर त्या वेळीच रोखल्या पाहीजेत. इथ यायच या सभागृहात उभ रहायच आणि कुणालातरी श्रध्दांजली अर्पण करायची या कामासाठी, या गोष्टीसाठी या वाईट घटनेसाठी ही दुर्दैवी वेळ पुन्हा या सभागृहावरती येवू नये या दृष्टिकोनातून निश्चित आपण प्रयत्न केले पाहीजेत. इथ यायच सभागृहात उभा रहायच, कुणावरती टिका करायची नाही परंतु त्याच बरोबर ती माझी जबाबदारी आहे, माझ कर्तव्य आहे अद्य कर्तव्य आहे या भावनेतून सुध्दा आपण सगळयांनी बघीतल पाहीजे. म्हणजे जर का त्याचवेळेला रिंकु पाटीलच्या घटनेला आपण थांबवू शकलो असतोतर निर्भयाच प्रकरण झाल नसतं, हैद्राबादच प्रकरण झाल नसतं नव्हेतर आजच्या अंकिताच प्रकरण झाल नसतं. आज शासनाकडून जो वचक जी कायदा सुव्यवस्था असते ती आज त्यांच्यात राहीलेली नाही. आज आपण वृत्तपत्र उघडलतर अनेक घटना आपल्याला दिसतात. फसवणूकीच्या असतील, लुबाडणूकीच्या असतील त्याच बरोबर महीलांवरती अन्याय,

अत्याचार घडणा-या घटना असतील मा.महापौर साहेब, अशा घटना घडतातच का. आज एकीकडे ५० टक्के आरक्षण आहे, सभागृहामध्ये आम्ही सगळया महीला भगीनी पुरुषाच्या खांदयाला खांदा लावून काम करतो. आज सभागृहातच नव्हेतर आज आपण म्हणतोय एकवीसाव्या शतकाकडे वाटचाल करतो. आज महीलांना उच्चस्थान आहे. पुजा असेल की महीलांनी पुढे यायच हाळदी-कुंकू वहायच आणि हाळदी-कुंकू वाहून नमस्कार करायचा इतक्या पुरतीच आमची महीला मर्यादीत नाहीहो. आमच्या महीलेमध्ये सुध्दा ताकद आहे परंतु ती ताकद आपण सगळयांनी एकवटली तर निश्चितपणे आपण येथून पुढच्या काळामध्ये होणा-या चुकीच्या घटना ज्या असतात त्या थांबवण्यासाठी आपण सगळेजण तीतकेच जबाबदार असलो पाहीजे. सन्मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते की आपल्या सभागृहाच्या वतीने आपल्या पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने खरतर या मुलीचा इतका देखणा फोटो पेपरला पहील्यांदा पाहीला तो डोळयासमोरुन फोटो जात नाही. इतकी देखणी मुलगी होण सुध्दा माझ्यासारख्या आईला पाप असेल, असं वाटत की येथून पुढ इतकी सुंदर मुलगीच नको माझ्या पोटी, इतक दु:ख त्या मुलीच्या आईला झालेल असणार आहे. परंतु मा.महापौर साहेब आपण सगळया १३३ जणांनी सांगीतल पाहीजे की अंकीताला न्याय दिलाच पाहीजे आणि न्याय देण्याची परंपरा जी आहे की त्यांना फाशी दयायची ही सगळी परंपरा आता बंद करा. भर चौकात या लोकांना मारल पाहीजे, त्याची भीती, दहशत बसली पाहीजे. चुकीच्या लोकांच्या आपल्याला दहशती होतात, आपण गुंडाना घाबरतो आपण त्याला घाबरतो. का प्रशासनावरती सुध्दा, का शासनावरती सुध्दा या नराधमाने घाबरल नाही पाहीजे. मला वाटत हैद्राबादच्या हात्याकांडामध्ये जो आरोपी मुलगा होता त्याच्या आईची वृत्तपत्रामध्ये मुलाखत होती तीच म्हणण वाचल होतं. ती म्हणाली की माझ्या मुलाने ज्या मुलीला मारलं, त्या मुलीला जर जाळल असेलतर त्याच प्रकारच मरण माझ्या मुलाला सुध्दा याव अशी त्या मुलाला जन्म देणारी माता सुध्दा म्हणते. ती म्हणते की मी जरी एका मुलाला जन्म दिलेला असेलतर दुर्दैव माझ की मी अशा मुलाला जन्म दिला. मी सुध्दा आई आहे, मी सुध्दा महीला आहे आणि जर माझ्या पोटी असा राक्षस जन्माला आला असेलतर या राक्षसाला त्याच प्रकारचा मृत्यू दयावा असं जर ती माता म्हणतेतर निश्चितपणे सभागृह म्हणून आपण सगळया महीला भगीनी असतील आपण सगळे माझे बांधव असतील की जे प्रत्येक प्रभागाच प्रतिनीधीत्व करतात त्या सगळयांना विनंती आहे की आपल्याकडन सुध्दा मा.महापौर साहेब, एक पत्र गेल पाहीजे राज्यशासनाला आणि सांगीतल पाहीजे की आता येथून पुढे फास्टॅगमध्ये त्या मुलीला न्याय दिला जाईल का, फास्टॅगमध्ये

किती दिवस, किती वर्षे याच्यावर सुध्दा कालमर्यादा घातली पाहीजे. फास्टॅगचा अर्थ काय, किती दिवसात, किती तासात. खरतर तासामध्येच बोलल पाहीजे. त्या माणसाने ते कृत्य केलेल आहे हे आपल्या सगळयांना माहीती आहे. कसला शोध आणि कसला पर्याय त्याच म्हणण ऐकूण घेतो आपण. याठिकाणी आपल्या सगळयांना दु:ख होतय त्याप्रमाणे आपण सगळयांनी सांगीतल पाहीजे की येत्या आठ दिवसामध्ये त्या मुलाचा ज्यांनी हे वाईट कृत्य केलेलं आहे त्या मुलाला ताबडतोब शिक्षा झाली पाहीजे आणि ती कोणत्याही पारंपारीक पध्दतीने नाही त्याला वरती फासावर लटकून वगैरे नको तर ती शिक्षा भर चौकामध्ये झाली पाहीजे. पुन्हा एखादयाच्या डोक्यात जर आल की आपण अस काही करु यात का तर त्याला तो व्यक्ती, ती घटना समोर दिसली पाहीजे आणि त्यान त्यापासून लांब गेल पाहीजे. आपल्या शहरामध्ये, आपल्या राज्यामध्ये अशा गोष्टीची पुनरावृत्ती होवू नये याच अपेक्षेनी या अंकीताला मी माझ्या कुटूंबीयाच्या वतीने आपल्या सभागृहाच्या वतीने मनापासून भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि मा.महापौर साहेब, याबाबतीत आपण आपल्या सभागृहाच्या वतीने कठोर पावल उचलावीत अशी आपल्याकडे अपेक्षा व्यक्त करते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

मा.स्विनल म्हेत्रे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता महीला बाहेर पडतात ही काळाची गरज आहे. समाजाची गरज आहे, शिक्षण घेतल पाहीजे कुटूंबाला हातभार म्हणून महीलांना नोकरी करावी लागते. परंतु हे सर्व करत असताना, कुटूंबाला साथ देत असताना खरच ही महीला सुरक्षीत आहे का. ज्यावेळेस ती ऑफिसमधुन, कॉलेजमधुन घरी परत येईल त्यावेळेस ती घरी परत येताना कशी येईल ही माझ्या सारख्या आईला आणि निर्भयाच्या सारख्या आईला ती खंत असणार आहे. ज्याप्रमाणे आपला महाराष्ट्र घडला आणि जिजाऊनी शिवाजी महाराजांना जी शिकवणूक दिली की राजे तुमचा जन्म हा बायका नाचवण्यासाठी नाहीतर बायका वाचवण्यासाठी झालेला आहे. अशा या महाराष्ट्राच्या सांस्कृती वसा, वारसा जपणा-या आपण भूमीत ज्यावेळेस जन्म घेतो त्या भूमीत महिलांवर अत्याचार होणारी संख्या जास्त आहे, ज्या नराधमाना शिक्षा होती त्यांची शिक्षा कमी, असं का. मला राज्यशासनाला विचारायच किंवा प्रत्येक अधिका-याना विचारायच की महीलांची अत्याचाराची संख्या जास्त पाहीजे का शिक्षा झालेल्यांची संख्या जास्त पाहीजे. कुठे हा न्याय न्यायचा. ज्यावेळेस निर्भया जळते, प्रियंका जळते त्यावेळेस आम्ही इथे बसलेली प्रत्येक महीला जळत असतो. कारण ती देखील एक माय मावली आहे. आम्ही देखील कुणाच्यातरी आई आहोत. जी घटना

घडायला अगदी दहा मिनीटाचा काळ लागतो, जी घटना घडायला अगदी दहा मिनीटाचा काळ लागतो त्या घटनेचा न्याय दयायला दहा वर्षे लागतात. हे कुठले न्यायपीठ, हे कुठले व्यासपीठ किंवा हे कुठले सभागृह, हे कुठले शहर आणि हा कुठला महाराष्ट्र. ज्या महाराष्ट्रात एवढे संत, सज्जन ज्या सांस्कृतीचा वारसा आपण जपतो त्या महाराष्ट्रात असं कृत्य होणं पार दुर्दैवी घटना या महाराष्ट्रात घडतात. मान्य आहे महाराष्ट्रात या घटना घडतात. आंध्रातही आपण पाहीलेल आहे की एन्काऊंटर केलं, अभिनंदन झालं. पण मला असं वाटत की आपल्याला ताटात काय वाढल ते आपण पहील्यांदा पाहील पाहीजे. आपल्या शहरात काय होतय, आपल्या महाराष्ट्रात काय होतय ते पहील्यांदा आपण पाहू या आणि त्याच्यावर आपण कारवाई करु यात. जर महीलांसाठी स्वतंत्र पोलीसचौकी झाली त्याठिकाणी सर्व महीला पोलीस असतील तर नक्कीच ती जी महीला पोलीस असेल तीला अंतकरण असेल, त्या महीलाचे पाठपुरावे, पुरावे पाहते. म्हणून मला असं वाटत की स्वतंत्र महीला पोलीस चौकी आपल्या शहरात व्हावी आणि याचा जो काही पाठपुरावा करायला लागेल तो पाठपुरावा करणेसाठी इथे बसलेली आजची प्रत्येक नगरसेवीका महीला ही माई तुमच्या पाठीशी आहे. एवढच बोलते आणि थांबते.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या तासभर आपण याठिकाणी हिंगणघाटमधील जळीत हात्याकांडाच्या संदर्भात माझ्या महीला भगीनी निषेध नोदवताना असं दिसतात त्यामध्ये आमचे बंधु सुध्दा कमी नाहीत. त्यांनी सुध्दा याठिकाणी दाखवून दिल की उदया जर काही एखादा अत्याचार एखादया महीला भगीनीवर होत असेलतर आम्ही तुमच्या रक्षणासाठी असणार आहोत. ज्यांनी ज्यांनी याठिकाणी भावना व्यक्त केल्या त्या सगळया भावांच मी मनापासून आभार मानते. कारण तुम्ही सगळेजण आमच्या बरोबरीन थांबणार याच्याबद्दल आमच्या मनामध्ये अजीबात शंका नाही. बोलत असताना माझ्या मैत्रिनीनं सांगीतल की राज्यसरकारच काम आहे, राज्यसरकारच कर्तव्य आहे, राज्यसरकारचा निषेध झाला पाहीजे. झाला पाहीजे का तर शंभर टक्के निषेध झाला पाहीजे. सरकार कुणाच आहे याच्याशी काही काडीच घेणंदेणं नाही. एखादा कोवळा जीव जातो, एखादी तरुण मुलगी भर रस्त्यावर पेट्रोल टाकून पेटवली जाते आणि मग एखाद सरकारवर असेल, एखादा जबाबदार अधिकारी असेल, मंत्री असेल, पोलीस अधिकारी असेल, कमीशनर असेल जो कोण असेल त्यांनी जबाबदारी उचललीच पाहीजे या मताची मी सुध्दा आहे. आणि त्यासंबंधी कुठल्याच महिलाच दुमत असण्याच कारण नाही. या सभागृहातल्या कुठल्याही सभासदाच दुमत

असण्याच कारण नाही. आणि म्हणून तीव्र शब्दात याठिकाणी मी राज्यसरकारचा कडाडुन निषेध करते. कारण त्याठिकाणी वारंवार मी बघीतल गृहराज्य मंत्री असतील, होम मिनीस्टर म्हणून अनिलजी देशमुख आहेत. मला फार त्यांच्या बद्दल आदर वाटला होता. पुण्यामध्ये ते आले आणि त्यांनी पुण्याच्या शिवाजीनगरच्या कार्यालयाच उद्घाटन करताना त्यांनी फोनवरुन एका माणसाला पासपोर्टच्या संदर्भात फोन केला की हॅलो मी अनिल देशमुख बोलतो, तुमची इन्क्वॉयरी झाली का, तुम्ही आलात का, तुम्ही येणार असालतर तुमची कागदपत्र तयार आहेत. जितक्या तत्परतेन एखादया गोष्टीचा तुम्ही फोन केला तीतक्या तत्परतेन तुम्ही हिंगणघाटला गेलात का. त्यांच्या घरापासून किती दुर होतं. राज्य सरकारमधले किती मंत्री त्याठिकाणी गेलेत? गुगल आहे सगळयांच्याकडे, मोबाईल आहे, सर्च करा वाचा बघा तुम्ही आणि मग सांगा आम्हीं निषेध करायचा का नाही करायचा. मा.महापौर साहेब, याठिकाणी राज्य कोणाचही असो निषेध झाला पाहीजे कारण की मी जळालेली आहे. माझी मैत्रीण आहे, माझी बहीण आहे, माझी मैत्रीण जळाली, पुढच्या पिढीतली एक कन्या जळालेली आहे. का निषेध करायचा नाही यांचा. मगाशी आमचे ओव्हाळदादा चुकले, त्यांना असं वाटल की पुण्यात ज्या घटना घडतात त्याची जबाबदारी म्हणून पालकमंञ्यांनी राजिनामा दयावा. बोलताना चुकला असेल माणुस, भावनेच्या भरात होणार इकडे तीकडे. आम्ही राज्यसरकारवर टिका केली म्हणजे आम्ही विरोधक आहोत का. जर तुम्ही न्याय देणार नसालतर शंभर टक्के तुमच्या विरोधात दंड थोपटून रस्त्यावर उतरणार आहोत आम्ही. किती वर्षे आम्ही न्याय मागायचा. कधी घरातन, काधी रस्त्यातन, कधी ऑफिसमध्ये सगळीकडे आमच्या जीवाला भीती निर्माण झालेली आहे. आणि अशाच एखादया प्रकरणातन नागपूरच प्रकरण घडत. ज्यावेळेस निराशा येतेना त्याचवेळेस हे कृत्य आमच्या हातून घडतात आणि तशा एखादया कृत्याची राज्यशासन याठिकाणी वाट बघतय का. आमच्या न्याय मागण्यासाठी आम्हांला जर का शस्त्र हातात घ्यावे लागत असतीलतर आम्हांला गरज नाही कुठल्याही राज्यशासनाची आणि कुठल्याही शासनाची. निर्भया हात्याकांडामध्ये शंभर टक्के तिथे विलंब होतो, सुप्रिम कोर्टामध्ये केस चालू आहे, आम्हांला रोज वाटतय की आज फाशी झालीतरी चालेल, उदया फाशी झालीतरी चालेल, आता या क्षणात झालीतरी चालेल, चौकात फाशी दया, तुकडे करा काय करायच ते करा पण एकदा संपवा ते. मा.महापौर साहेब, संताप होतो. राजकारण म्हणून बोलत नाही आणि सिमा सावळे एवढया खालच्या दर्जाची निश्चितच नाही. अनेक घटना आम्ही या शहरामध्ये बघतो. क्राईमचे रिपोर्टर आहेत संदीप भिसे, लेख लिहीतात. मी त्यांच एकटयांचच नाव यामध्ये घेते कारण की

त्यांची एक बातमी त्यांनी टॅंक केली होती. १८० गुन्हे पिंपरी चिंचवड शहरात या दोन वर्षात झालेले आहेत. त्यात अनेक मुलीवरच्या अत्याचाराच्या घटना आहेत. संघटन गुन्हेगारी आहे. रोडरोमिओ आहेत. शाळांच्या पुढे पोलीसकाका होते ते बंद केलेले आहेत. शाळेच्या बाहेर पोलीसकाकाची डयूटी होती तीही बंद आहे. अरे, भावानो, बहिणीनो आमची सगळयांची जबाबदारी आहे. आमच्या वॉर्डामध्ये शाळा आहेत. आपण याठिकाणी आयुक्तालय केल कशासाठी केलं. ज्या शाळेच्या बाहेर पोलीसच नाहीत तर आयुक्तालय काय करायच आम्हांला. का पोलीसकाका बंद केले तेथे. एखादया वृत्तपत्रामध्ये आल्यानंतर धावपळ करुन करुन अर्धवट बातमी टाकायची किंवा बातमीसाठी म्हणून पोलीसांनी ते प्रयत्न करायचे. चालणार नाही मा.महापौर साहेब. आज तुम्ही कुठल्याही कॉलेजच्या बाहेर जा, अगदी तुम्ही जा, कमीशनरनी जाऊ देत, तुम्ही सकाळीच ज्यांना कुणाला वाटेल त्यांनी जा. शाळा सुटण्याच्यावेळेस आणि भरण्याच्यावेळेस तुम्ही जाऊन बघा. किती रोडरोमीओ पोर असतात, अरे, ती सातवीची मुलगी, पाचवीची मुलगी तीला कळत सुध्दा नाही. तीला रस्ता ओलंडता येत नाही तीची सुध्दा छेड काढल्या जाते. दुर्दैव आहे की अशाप्रकारच्या कामाला एकही युवक पुढ येत नाही. दुर्दैव आहे या शहराच. आज या शहराची जिल्हयाकड वाटचाल आहे. इथ कुठ आमच्या भगिनी सुरक्षीत आहेत. हिंजवडी याठिकाणी जाण्या-येण्यासाठी साहेब, आपण चांगला प्रयोग केला होता. महिलांना प्रशिक्षण दिलं काय झाल पुढ त्याचं. ओला, उबरशी आपल बोलण झाल होतं. गाडीत बसायची भीती वाटते, एखादया टॅक्सीमध्ये बसायची भीती वाटते. रिक्षात बसलतरी भिती वाटते. काल एका रिक्षावाल्यांनी खुप चांगल काम केलं. बेंगलोर वरुन आलेल्या दोन शाळकरी मुलीनां त्या रिक्षात बसल्या, मुंबईला उतरल्यानंतर रिक्षावाल्यांनी त्यांना विचारल कुठ जायच आहे. त्यांनी एका ठिकाणचा पत्ता सांगीतला तीथ नेऊन सोडलं. रिक्षावाल्याच्या लक्षात आल की या पोरी घरुन पळून आलेल्या आहेत. दरडाऊन विचारल की सांगीतल की हो आम्हांला पिक्चरमध्ये हिरोईन व्हायच म्हणून आम्ही पळून आलोत. त्यानी स्वत:च्या खिशातले पैसे काढले, त्यांच तीकीट काढल पोलीसांच्या हवाली सुपूर्द केलं आणि परत गावाला पाठवलं. असेही रिक्षावाले आहेत असेही टॅक्सीवाले आहेत की जे खुप मदत करतात. एखादी दुसरी कुठेतरी घटना घडते म्हणून त्या सगळयांना बदनाम करण योग्य नाही. पण चांगली माणुसकी सुध्दा या शहरामध्ये या देशामध्ये आहे आणि चांगली लोक जी आहेत ती त्यांचा चांगलेपणा दाखवायला कुठ कमी पडत नाहीत. आपण अशाप्रकारचा जो एक उपक्रम हाती घेतला होता त्या उपक्रमाच पुढे काय झालं मा.आयुक्त साहेब. ज्या दिवशी बजेट असेल त्यादिवशी तुम्ही उत्तर

दयायच आहे आम्हांला. त्या टॅक्सी आमच्या भागातील महीलांच्या सुरक्षीततेसाठी, तीने चांगल्याप्रकारे कामावर जाव आणि महीला कर्मचारी जर ती टॅक्सी चालवत असेलतर तीच स्वागत होईल किंवा तीला भीती वाटणार नाही. सहज ती जाण येण करेल. आता यांच्या भीतीन घराबाहेर पडायच नाही. घरात राहीलतर नातेवाईकांची भीती. काही ठिकाणी स्वत:च्या जन्मदात्या बापाकडन अत्याचार होतात, काही ठिकाणी काका मामांकडून अत्याचार आहे. सुरक्षीत रहायच का नाही रहायच असा विचार येतो. आता असं वाटायला लागलेल आहे की पोरगी आली की या सगळया गोष्टीला मला सामोर जाव लागेल. आम्हीतर ठिक आहे हो आम्ही खमक्या आहोत. मगाशी आमच्या ताई बोलल्या की महीलांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळते. शंभर टक्के मिळते, नाही कोण म्हणतय. पण अधिकार आम्ही मागणा-यातले अजीबात नाही तर या सभागृहात बसुन आम्हांला हिसकावून कसं घ्यायच तेही आम्हांला माहिती आहे. कोण आपल्याला काय म्हणेल ज्याच त्याच्यापशी. त्याच्या बोलण्यानी आपल घर काही चालत नाही. आपला संसार चालत नाही त्यामुळ समोरचा काय म्हणतो याच्याकड न लक्ष देता आपण ज्या कर्तबगार महीला आहेत, ज्या समाजापुढे आयडॉल होवून तुम्ही याठिकाणी या संपुर्ण शहरामध्ये, पंचवीस लाख लोकसंख्येच्या शहरामध्ये या शहरातल्या या सभागृहात बसलेल्या या ज्या महीला भगीनी आहे त्या आयडॉल आहेत. आपण असे जर बोललातर बाकीच्याना काय हो त्यांनातर तेवढचय, की काय लईच बोलतेय. त्या खुप चांगल्या स्टाईल्सन बोलतात, त्या काहीच बोलत नाहीत तुम्हांला काय चांगल वाटतं. कारण बोलणारे सारखे टोकतात आणि म्हणून आपल खच्चीकरण होत असतं आपण फार काही त्याच्याकडे लक्ष दयायच नाही. मा.महापौर साहेब, हिंगणघाट असु देत, सिल्लोड असु देत, पनवेल असु देत पिंपरी चिंचवड शहरातल्या २०८ गुन्हे पास्को अंतर्गत झालेल आहेत. म्हणजे लहान मुलांवरती झालेले अत्याचार. आयुक्त साहेब आपली महानगरपालिका आहे आपण शिक्षणमंडळावर प्रचंड खर्च करतो. आता तुम्ही कॅमेरे लावलेत, फेस रिडींग आहे. कुठला ऍप लावला तुम्ही सांगीतल खुष असेलतर कसा दिसेल, दु:खी असेलतर कसा दिसेल. तीच्या बरोबर जर अत्याचार होत असेलतर त्याच काय. कालच कासारवाडीमध्ये एक घटना घडलेली आहे ती तुमच्या कानावरती आहे. खर का खोट मला माहिती नाही. पण आपण व्हिजीटला गेलात का. आणि गेलेला नसालतर तीथ तुमच्या पाठीमागे बसलेले अजीत पवार आहेत, संतोष पाटील आहेत तुमच्याकडच आहेना शिक्षणमंडळ. संतोष पाटील सुट्टीवर गेले की तुम्ही बील एकदम फास्ट करता, तुमची लगेच सही होते. त्यामुळे जवाबदारी घ्यायला पण शिका. खर किती आहे खोट किती आहे हे तपासायला किती लोक

गेलेत. आपली महानगरपलिका आहे, कोटयावधी रुपये खर्च करत असुतर महापालिकेमध्ये येणारी कुठलीही व्यक्ती असु देत तीच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही आपल्या शिक्षकांची आणि आपली आहे. मा.महापौर साहेब, आपण सुध्दा कमीशनराना कडक भाषेत समस दिली पाहीजे. शहरामध्ये आपण कॅमेरे बसवणार, वेगवेगळया चौकात बसवतो आनंद आहे आम्हांला. आमच संपुर्ण शहर जर कॅमेराच्या अंतर्गत येणार असेलतर आणि तीथ होणा-या हालचाली जर का टिपून एखादया गुन्हयांच प्रमाण जर का कमी होणार असेलतर आम्हांला खुप आनंद आहे. पण ते चालविण्याच ऑफिस तुम्ही ज्याठिकाणी निगडीला महीलांसाठीच अस्तित्व मॉल होता त्याठिकाणी तुम्ही नेलं. त्याच्यावर कंट्रोल कुणाचा असणार आहे. तुम्ही तीथ गेला होता का. आम्ही तीथ जावुन सांगायच का. तो जो डेटा आहे तो ईझीली शेअर होणार. ते कार्यालय आपल्या महानगरपालिकेच्या बिल्डींगमध्ये कराव म्हणून वारंवार म्हणजे मी ज्या दिवशी स्टॅण्डींग कमिटीची चेअरमन असताना स्मार्ट सिटीन विचारलं त्यावेळेस तुम्ही आम्हांला सांगीतल होत ते कार्यालय दुसरीकडे कुठे हलवू नका. ते ऑफिस आपल्याच बिल्डींगमध्ये पाहीजे. आपल त्यावरती नियंत्रण पाहीजे. ते आपण त्याठिकाणी नेलेल आहे. कॅमेरे बसवताना तुमच्या त्या कॅमे-याची फ्रिक्वेन्सी काय आहे. किती मेगाफिक्सलचा आहे. किती दुरवरुन कॅच होणार आहे. आम्ही आडाणी आहोत, फार काही शिक्षण नाही सगळयांच. आम्हांला दाखवा किती मेगाफिक्सलचा आहे. दोन आणि चार मेगाफिक्सलचा कॅमेरा शाळेत बसवणार असूतर आणि त्यातन जर तुमची फेस रिडींग होत असेलतर आश्चर्य वाटत मला. तुम्ही आम्हांला एकदा दाखवातरी. तुम्ही बसवतातर चांगल्या क्वालीटीच का नाही करत. आपल्या महानगरपालिकेच्या बिल्डींगचे कॅमेरे बघा तुम्ही काय परिस्थितीचे आहेत. संपुर्ण शहरभरामध्ये चांगल्या क्वालीटीचे बसवा. जेणेकरुन दुरवरुन माणुस गेलातरी तो दिसला पाहीजे. गुगलमॅपवरती तुमची सगळे कॅमेरे दिसले पाहीजे. विदेशामध्ये पाचशे मीटरवर हजार मीटरवर आहे असा सांगीतल तसे इथे इतक्या इतक्या किलो मीटरवरती कॅमेरा लागलेला आहे अस दिसल पाहीजे. हे सगळ करत असताना सुरक्षीततेची जी साधन आहेत त्या साधनावरती जास्तीत जास्त लक्ष दया. महानगरपालिकेच्या शाळेमध्ये विदयार्थी नसल्यामुळे आपण आता वर्ग एकत्रीकरण केलेलं होतं आणि त्या वर्गामध्ये आता सातवी, आठवी, नववी, दहावीचे विदयार्थी जे आहेत त्या शाळांची परिस्थिती खरंच जावुन बघा तुम्ही. तीथ किती टवाळखोर असतात काय काय शेरेबाजी होते. गोरगरीबांची लेकर शिकायला येतात त्यांच्याकडे कुणाचच लक्ष नसतं. त्याच बरोबर या शहरातल्या सगळया शाळांच्या बाहेर जावुन बघा, कॉलेजच्या बाहेर जावुन बघा तीच परिस्थिती आहे. मुलींना घरी

सांगायची सोय नाही, सांगीतलतर शिक्षण बंद होईल का. सहन करण्यासारखी परिस्थिती नाही. मागच्यावेळेस वृत्तपत्रामध्ये वाचल की शाळेच्या बस मध्येच मुलीसोबत वेगळे प्रकार घडतात. पेपर वाचायला लागल की अंगाची आग होते. असं वाटत की आता हे हाताबाहेर जायला लागलं. काय कराव, कुणाला जावुन सांगाव, जे मायबाप म्हणून सरकार बसलेल आहे त्यांच्याकडे लडायची सोय नाही. कारण लडायला लागलोतर हे म्हणतात लडू नका, त्यांना दोष देवू नका. आता ज्यांनी मायबाप म्हणून स्विकारल त्यांच्याकडच जावून रडाव लागेल. आणि लडलतर काही हरकत नाही हे त्यांनी सुध्दा मोठया मनाने मान्य केल पाहीजे. इथ पोलीस कमीशनर ऑफिस आणलेल आहे. इथ भटक्या, सोडून गेलेल्यांच्या ज्या गाडया आहेत त्यांच्याकरीता सुध्दा मशिन पुरवायचा विषय केला, आनंद आहे आम्हांला. त्यांच्या कडे गाडया नाहीततर विकत घ्या, दया, पुरवा. काय पाहीजे ते दया पण आम्हांला सुरक्षिततर करा. जबाबदारी घेणार कोण. या पुणे जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून आमची मागणी निश्चितपणे मा.अजितदादा पवारांकडे असणार आहे. आमच्या बहीणीची, तुमच्या मुलीची, तुमच्या नातीची सुरक्षिततेची जबाबदारी दादा तुम्हीच घेतली पाहीजे कारण तुमच्या नावात पण दादा आहे. त्यामुळे आम्ही त्यांना तशी मागणी घालू शकतो, तशी आम्ही त्यांच्यावर टिका पण करु शकतो आणि तो अधिकार निश्चितपणे ज्यादिवशी आम्ही त्यांना दादा म्हणतो त्यादिवशी आम्हांला ऍटोमॅटीक आलेला आहे त्यासाठी कुणी वाईट वाटून घ्यायच काही कारण नाही. मा.महापौर साहेब, आपण सगळया घटनांवरती किती जरी बोललात किती जरी आगपाखड केलीतर एक समाजाची मानसीकता बदलवण्याच जे काम आहे त्याच्यामध्ये आपल्याला ज्या शाळा असतील किंवा इतर शाळा असतील या सगळया शाळांना आपल शिक्षणमंडळ परवानग्या देते, अनेक शाळांमध्ये आपण व्हिजीट करतो, आरटीईची योजना राबवतो त्या त्या शाळामध्ये कौन्सिलर नेमा. विदयार्थ्याला विचारा काय त्रास आहे, आत-बाहेर काय आहे, घरी काही त्रास आहे का. हे जोपर्यंत तुम्ही करणार नाही तोपर्यंत अशाप्रकारच्या घटना उघडकीस येणार नाहीत. अनेक माझ्या मुली, छोटे बालक असतील अनेकवेळा अत्याचाराला बळी पडतात. कळतच नाही, समजत नाही, आई-वडीलांना सांगायची लाज वाटते आणि मग असे प्रकार घडल्यानंतर, म्हणजे हिंगणघाटचीतरी मोठी होती अनेक बालीका सुध्दा आहेत. मागच्यावेळेस निगडीला अगदी छोटया बालीकेवर झालेला अत्याचार पण आम्ही वाचलेला आहे. त्यावेळेस आम्ही शिवसेनेत होतो हे सभागृह आम्ही डोक्यावर घेतलं. महीलांच्या बाबतीत कुठल सरकार, कुठल काय आम्ही बघत नाहीत. त्यावेळेस आम्ही सभागृह डोक्यावर घेतलं होतं तसं आजही तुम्हांला हात

जोडून विनंती आहे मा.कमीशनर साहेब, मा.महापौर साहेब, की आपण राज्यशासनाला तातडीने पत्रव्यवहार करावा, शासनाला सांगाव की नवीन अशा अनेक प्रकरणामध्ये जे काही गुन्हे घडतात त्या गुन्हेगाराना जलदगतीच न्यायलय उपलब्ध करुन दयाव किंवा त्यांना म्हणजे आता पास्कोच्या अंतर्गत असेल किंवा एखादयाचा विनयभंग झाला किंवा एखादयावरती अत्याचार झाला आणि तो जर निष्पन्न झाला तर त्याच्यात जामिनच होत नाही. तरी असे जे कायदे आहेत ते विधी मंडळात होतात आणि विधी मंडळाला कायदे करण्याचे अधिकार आहेत. एखादा कायदा जर का सक्षम नसेलतर नवीन कायदा ते करु शकतात आणि ती जबाबदारी आम्ही सरकारमध्ये असतो तर ढकलली नसती. म्हणून आम्ही मागणी करतो की तो कायदा सक्षम करा. तुमच्या घरच्या सहीत इतर ज्या महीलां आहेत यांचीही सुरक्षीततेची जबाबदारी सरकार मायबाप म्हणून तुमचीच आहे. आणि म्हणून सरकारने जर त्याच्याकडे लक्ष नाही दिलंतर येत्या काही दिवसात निश्चितपणे आंदोलनाला सरकारला सामोर जाव लागेल. कारण कुठल्या आई-बहीणीची ईज्जत रस्त्यावर पडलेली नाही. आज पास्कोचे गुन्हे दाखल होतात, लहान मुलांवरचे अत्याचाराचे गुन्हे दाखल होतात. त्या गुन्हयांच काय होत त्याचा आपण कधी विचार केला. पोलीस कमीशनरांची बैठक लावली पाहीजे, त्यांना विचारल पाहीजे की या गुन्हयामध्ये किती अटक केले. आताची कंडीशन काय आहे. ज्या घरात मुलींवरती बापाकडुन अत्याचार झाला असेल, ज्या घरात काका-मामंकडून अत्याचार झाला असेल त्यांची अवस्था काय आहे. कुणाकड बघायच. रोज उठून तोंडावर तोंड पडणार आहे. पन्नास टक्के आरक्षण आम्हांला मिळाल राजकारणात, म्हणून किमान इथ येवून बोलू तरी शकतो. म्हणजे ख-या अर्थान आमच जे स्वातंञ्य आहे, आमच जे स्त्रित्व आहे ते जोपासण्यासाठी जोपर्यंत आम्हांला स्वातंञ्य मिळत नाही तोपर्यंत या स्वातंञ्याला या पन्नास टक्क्याला पण काही अर्थ उरत नाही. इथ यायच, भाषण करायची, वृत्तपत्र आहेत म्हणून लीहीतील पण किती महीला भगीनी जागेवर जातात याचा पण विचार झाला पाहीजे. या शहरात घडणा-या घटनांसाठी किती जणी एकञ येतात याचा पण विचार झाला पाहीजे. मा.महापौर साहेब, आपल्याला या सगळया घटनांच्या अनुषंगाने एक विनंती करत आहे. आपण पोलीस कमीशनरांना भेटून जितके पास्कोचे गुन्हे झाले असतील, जेवढे मुलींवरती शारीरीक अत्याचार झालेले असतील आणि त्या संदर्भातल्या आपल्या वायसीएम हॉस्पिटलला, साहेब आपल्याकडे पुर्वी आपण करत नव्हतो आता आपण करतो शारीरीक तपासणी. तरी त्या संदर्भातली आपल्याकडे अत्यंत गोपनीय अशी पध्दत असली पाहीजे. एन्ट्रन्स एकच आहे आत मध्ये

गेल्यानंतर व्यक्ती कोण आहे लगेच कळून येतं. दबावतंत्र वापरल्या जातं. तो एक जो विभाग आहे तो पुर्णपणे स्पेशल विभाग असला पाहीजे. त्याच्यासाठी आपल्याकड कौन्सिलर असलं पाहीजे. काल झाला तो प्रकार खरा, खोटा माहिती नाही पण कोण कौन्सिलर गेले तेथे. आपले शिक्षक गेले, आपले पुरुष कर्मचारी गेले. आता तुम्ही सांगा एखादया पुरुषानी एखादया मुलीला विचारल असं झाल का तर ती काय सांगणार आहे. विचारण्याच्या पध्दती असतात. स्पेशल अशी लोक तुम्ही नेमा. जेणेकरुन असे अन्याय, अत्याचार कमी होतील. मा.महापौर साहेब, पुढील आठ ते दहा दिवसाच्या आतमध्ये आपण पोलीस कमीशनराची भेट घेवून या संदर्भात तातडीने कठोर पावल उचलण्याची अत्यंत गरज आहे. हे थांबणार की नाही हे मला माहित नाही. मग कोपर्डीची घटना असेल, जेवढया कुठल्या घटना झालेल्या असतील मग त्या कुठल्या जातीच्या, समाजाच्या कोण श्रीमंत, गरीब हा विषय ही किडलेली, सडलेली माणसीकता आहे. तीथ कोण कोणाची जात बघुन काही अत्याचार होत नाही. त्यामुळे या अत्याचारीत मुलींच्या बाजूने उभे रहाण्याची, त्याना ताकद देण्याची ही वेळ आलेली आहे आणि ती वेळ योग्य वेळी आपण आता हातात घेतली पाहीजे, त्यावेळेचा सद्पयोग केला पाहीजे म्हणून आपण पोलीस कमीशनरांना भेटून त्यांना आपल्याकडन काय हाव आहे, आपण काय केल पाहीजे. याच बरोबर या जिल्हयाचे पालकमंत्री आहेत मा.अजीतदादा यांची सुध्दा आपण भेट घेतली पाहीजे. जे होम मिनीस्टर आहेत यांना सुध्दा भेटल पाहीजे. ते जितक्या तातडीन फोन करतात पास्पोर्टवाल्यांसाठी तीतक्या तातडीन आमच्या आत्याचारीत झालेल्या बहीणीसाठी फोन केला का आणि नसेल केला तर का नाही केला, विचारल पाहीजे. आणि या विचारण्यासाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरायला लागलतरी चालेल पण निश्चितपणे आपण सगळयाजणी एकत्र येवू यात. परत एकदा सांगते पक्षीय राजकारण जरी नाही म्हणलतरी ज्यांना विधी मंडळात कायदे करण्याचा अधिकार आहे, सक्षम कायदे करण्याचा अधिकार आहे त्यांच्याकडे निश्चितच कोणी बोट दाखवण्याचा अधिकार सर्वसामान्य जनता म्हणून मला आहे. याठिकाणी या सगळया माझ्या मुलीना मी मनापासून श्रध्दांजली वाहते, देव त्यांच्या आत्म्यास शांती देओ. त्या दिवशी हिंगणघाटच्या मुलीच डॉक्टरांच पहील बुलेटीन आल आणि त्यांनी सांगीतल तीच डोक, जिभ, दात पुर्ण जळालेल आहे. मी देवाला प्रार्थना केली की देवा या यातनेतून तीला सोडव. कारण वाचलीतरी काहीच होणार नाही. ज्यांना जिवंत जाळल्या जातं ज्याच्या यातना त्यालाच माहीती. त्या शरीरालाच माहीती त्या मनालाच माहीती आहेत. त्या बीचारीची सुटका झालेली आहे पण तो नराधम सुटता कामा नये म्हणून आपण निश्चितपणे चांगली पावल उचलली पाहीजेत

त्यासाठी आपण पोलीस कमीशनरांची वेळ घ्यावी. याठिकाणी सर्व या माझ्या मुलींना मी मनापासून श्रध्दांजली वाहते, थांबते.

मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरंतर निर्भया प्रकरण असेल, हिंगणघाटच असेल याबाबत आज आपल्या सभागृहामध्ये सर्वचजणानी आपआपल्या भावना व्यक्त करत आहेत, निषेध व्यक्त करत आहेत. आम्हीही या विषयाचा तीव्र शब्दात निषेध करतो. ब-याच भगीनींनी सांगीतल एक अशी तरुण सुंदर मुलगी तीच्यावर असे अत्याचार होणं हे खरेतर एक मनोवृत्तीचाच भाग म्हणलतर वावग ठरणार नाही. ब-याच जणांनी आपआपल्या पक्षावर ताषेरे ओढण्याच काम केलं. ब-याच जणांनी पक्षाची खिल्ली उडवण्याच काम केलं. शेवटी सत्ता ज्याच्या हातात असते त्यामुळे त्याच्यावर आरोप-प्रत्यारोप होत असतात त्याचा साहजीकच आम्हांला अनुभव आहे. पण खरतर शेवटी काही घटना घडल्यानंतर जस मंगलाताईनी सांगीतलं की एखादा गुन्हा घडल्यानंतर त्या गुन्हयाला त्यावर शिक्षा दयायची असते, त्यावर त्याला आपल्या मनातल्या भावना तीव्र शब्दात व्यक्त करायच्या असतात की असं आपल्यालाही ते बघुण वाटणार आहे. त्याठिकाणी कुणीही उभा राहीला असता आणि ते त्यांनी पाहील असतंतर त्याच्याही डोक्यात आलं असतं आणि तो म्हणाला असता याला आपल्या हातात जे असेल त्यांन पहील्यांदा ठोकाव किंवा याला खलास कराव. अशी निर्दई भावना आपल्याही कुणाच्याही मनात नक्कीच आली असती. कारण की ती घटनाही त्या पध्दतीने तशी झालेली होती. काही लोक म्हणतात, आमच्यासारखाही एखादा कार्यकर्ता म्हणतो की आंध्रामध्ये जे प्रकरण घडल त्या प्रकरणामध्ये अतीशय आनंदोत्स्व साजरा केला त्या भागामध्ये. ज्याठिकाणी ही घटना घडली तेथे त्या नराधमाना त्या स्पॉटवर जावुन पहाटे चार वाजता त्याना त्याठिकाणी गोळया घालण्याचा प्रयत्न केला किंवा त्यांना गोळया घालून सांपवण्याचा प्रयत्न केला. जशास तशी शिक्षा देण्याचा त्याठिकाणी प्रयत्न केला गेला आहे. साहजीकच आहे आख्ख सरकार त्याच्या पाठीमाग होतं, आख्खा नागरीक त्याच्या पाठीमाग होता, आख्खा कायदा त्याच्या पाठीमागे होता पोलीस यंत्रणा त्या अधिका-याच्या पाठीमागे होती. आपल्या इकडे तशी घटना घडण्यासाठी तसा कायदा करण्यासाठी आपल्यालाही पाऊल उचलणं गरजेच आहे. खरतर काय सगळाच राज्याचा भाग नाही, यामध्ये केंद्राचीही गरज आहे. केंद्रामध्ये आदरणीय नरेंद्रजी मोदींच सरकार आहे, राज्यामध्ये आघाडीच सरकार जरी असलतरी आणि राज्यानी जरी तो कायदा पारीत केलातरी त्याला केंद्राची मंजूरी ही लागतच असते. तेवढ ज्ञान आपल्याला

असाव असं मला वाटतं. कोण काय म्हणत, कोण काय म्हणत आता मी तर म्हणेल की मागे एका आमदारांनी भाजपचे एक आमदार म्हणाले की एखादी मुलगी पटली की तीला आणा आणि मी तीच्या बरोबर लग्न लावून देतो. आता ही पण मनोवृत्ती आहेनां आपल्यामध्ये. या मनोवृत्तीचे सुध्दा आमदार आहेत. आमदार सुध्दा आपल्या पक्षात या मनोवृत्तीचे आहेतनां. ठिक आहे त्यांची ती भावना असेल, त्यांचा भेजा फिरला असेल एखादया मुलीच्या भावनेबाबतीत त्यांच्याबद्दल काहीतरी निर्णय वेगळा घडला असेल. ठिक आहे ही घटना वाईट आहे, या घटनेच कोणीही समर्थन करणार नाही. ही घटना चांगली केली असं कोणीही म्हणणार नाही. कुठल्या पक्षाच आहे, कोण आहे काय आहे याच आम्हांला काही घेणंदेण नाही. पण याबाबतीत बोलत असताना, निषेध करत असताना हे सभागृह एक आहे, या सभागृहामध्ये एक शब्दता, एकवाक्यता निषेधाच्या निमीत्ताने तरी व्हावी असं मला वाटतं. मला माहित नाही ती मुलगी कुठल्या पक्षाची आहे किंवा तो कुठल्या पक्षाचा आहे का त्याला कुठल्या पक्षानी सुपारी दिली नव्हती की जा बाबा, अस अस त्या आमक्या तमक्याच कर म्हणून असं पण कोणी काही केलेलं नव्हतं. ठिक आहे त्याची ती मनोवृत्ती असणार आहे, तो त्या वृत्तीचा असणार आहे. त्याच्या आई-बापानी काय शिकवल हे माहीत नसणार. आई-बापानी चांगली शिकवण दिलेली असेल पण त्याच्यावर काय परिणाम झाला हे माहीत नाही. पण त्यानी ते कृत्य केल आहे या केलेल्या कृत्याला अजीबात कुणी माफी देणार नाही किंवा माफ होणार नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की या शहराचा आपला विचार करु. उदया घटना तीकड झाली, राज्याच्या कुठल्या कानाकोप-यात झाली, उदया हीच घटना आपल्या शहरात घडलेली आहे, चिमुकल्या मुलीवर झालेला अन्याय आहे. एका मुलीला आपण सगळयांनी डोळयानी बघीतलेल आहे. छोटया मुलीवर अन्याय झालेला आहे. हे सगळ असताना आपण काय करणार आहात. त्यावेळेस तर तुमचे पालकमंत्री गिरीषभाऊ बापट होते. त्यावेळेस सुध्दा तुम्ही असे पोटतीडकीने बोलला असतालतर आम्ही तुमचा आदर केला असता, सन्मान केला असता. ठिक आहे आज दादांची जबाबदारी आहे, शंभर टक्के जबाबदारी आहे. आपण सगळेजण त्यांच्याकडे जावु की हा निर्णय घेणं गरजेच आहे. चांगले कायदे करणं गरजेचे आहे. कायदा व सुरक्षीतता राखण्याची गरज ही शहराची आहे. म्हणून मा.महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की महीला व बालकल्याणच्या माध्यमातून एक निर्णय घ्यावा, उदयाच बजेट आपल आहे महापालिकेच्या शाळा आणि खाजगी ज्या शाळा आहेत त्याठिकाणी मुलीना सुरक्षिततेसाठी आपण आपल्या महानगरपालिकेच्या वतीने एक तास का होईना तीथ

प्रशिक्षण देणं गरजेच आहे आज ती काळाची गरज आहे. ते या बजेट मध्ये करा. ज्या ज्या वेळेस बजेट आले त्या त्या वेळेस हे विषय काढलेले आहेत. बजेट झाल्यानंतर आम्ही बोललेल सगळ विसरुन जाता. उदया कोणीही त्या मुलीच्या अंगावर आलातर तीला स्वत:ला सेफ राहण्यासाठी काहीतरी कायदा करणं गरजेच आहे असं मला वाटत. तीच्यासाठी एखाद प्रशिक्षण महापालिकेच्या वतीने देणं गरजेच आहे. आतापर्यंत आपण खुप काही केलं आहे. मुलांना शिक्षण देतो, फ्रूट देतो सगळ देतो मग यासाठी जर थोडाफार खर्च झालातर मला वाटत नाही सभागृहामध्ये याबद्दल कुणाच दुमत असेल. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की यामध्ये आपण लक्ष घालावं. आता अनिलजी देशमुख साहेबांच गृहमंञ्यांच कुणी काही बोललं. त्यांनी एक व्हिजीट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आंध्र प्रदेशमध्ये जी घटना घडली आहे ती "दिशा" कायदयाची माहीती घेण्यासाठी राज्याचे गृहमंञी, आंध्र प्रदेशचे गृहमंञी, मुख्यमंञी, पोलीस महासंचालकांची भेट घेणार आहेत. महिलांवर अत्याचार करणा-या नराधमांना चाप बसविण्यासाठी राज्यात कठोर कायदा आणण्यात येणार आहे. राज्यशासन त्यासाठी सातत्याने प्रयत्नशिल असून याबाबत आंध्र प्रदेश सरकारने केलेल्या "दिशा" कायदयाची माहिती घेण्यासाठी गृहमंञी अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्ठमंडळ आंध्र प्रदेशात दाखल झालेले आहे. विजयवाडा येथे गृहमंञी आणि शिष्ट मंडळाचे स्वागत आंध्र प्रदेशचे अप्पर पोलीस महासंचालक ए.रविशंकर यांनी केले. हिंगणघाट येथील जळीतकांडावर अवघा महाराष्ट्र पेटउन उठला. महिलावरील अत्याचारात जी गंभीर दखल घेत राज्यसरकारने हे पाऊल उचललेले आहे. हे शिष्टमंडळ आंध्र प्रदेशचे मुख्यमंञी जगनमोहन रेड्डी, मोकाथोटी, गृहमंञी व आंध्रचे पोलीस महासंचालक यांच्यासोबत "दिशा" कायदयाची चर्चा करणार आहेत. शिष्ठमंडळात गृहमंञ्यांचे अप्पर मुख्य सचिव संजय कुमार, पोलीस महासंचालक सुबोध जयस्वाल, विशेष पोलीस महानिरीक्षक प्रताप दिघावकर, अश्वती दोरजे हे वरिष्ठ अधिकारी त्याठिकाणी पोहचलेले आहेत. आता आपली चर्चा चालली त्या माध्यमातून आदरनीय आपले गृहमंञी त्याठिकाणी पोहचलेले आहेत. त्याठिकाणी तो कायदा कशा पध्दतीने केला गेला. आंध्राची जी घटना घडली त्याला त्यांनी कस त्या कायदयाच्या चौकटीत बसवून त्या पोलीसांना किंवा ज्यांनी केलेल्या घटनेला वाचवणेचा किंवा त्या अधिका-यांना सेफ करण्याचा जो काही माणस त्यांनी केला त्या घटनेची माहिती घेण्यासाठी गेलेले आहेत. जे कोण आता राजीनामा कोणाचा मागतात, कोण काय करतय त्यांना मी हे वाचून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना हे सांगण्यासाठी केल आहे की यंत्रणा ही कुठलही सरकार अशा घटनेच्या बाबतीत, तीथ उदया

भाजप जरी असलतरी सुध्दा त्यांनी हेच केल असतं. जे आज आमच राष्ट्रवादी किंवा महाविकास आघाडी सरकार करतय त्यामध्ये कुणीही तीथ पक्षाच कुणी काही काम करायच कारण नाही. तरी माझी आपल्याला विनंती आहे की या घटना घडत असताना, महीलावर अत्याचार घडत असताना महापालिकेमध्ये आपल्या महिला व बालकल्याणच्या माध्यमातून, शिक्षणमंडळाच्या माध्यमातून जर आपल्याला काही करता आलतर त्या माध्यमातून करावं असं या निमीत्तान सांगतो. या मुलीवर जो अत्याचार घडलेला आहे त्याचा मी जाहीर शब्दात निषेध करतो आणि माझी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो, धन्यवाद.

मा.भाऊसाहेब भोईर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. साहजीकच आहे की देशामध्ये अशाप्रकारच्या निदंनीय घटना घडल्यानंतर त्याचे पडसाद प्रत्येक ठिकाणी तीव्र स्वरुपात निघत असतात. या घटना प्रथवी मानवनिर्मीत झाली तेव्हापासून या घटना अशा पध्दतीने विकृत झाल्या. राम जरी होता तरी रावण होताच. या सगळया घटना घडत असताना विकृती आणि अतिरेकी हे दोन प्रकार असे आहेत ते गव्हर्मेंट बघुन हाल्ला करत नाहीत. सत्ता कोणाची आहे ही प्रवृत्ती आजपासून नाहीतर पुरातन काळापासून देव लोकांमध्ये सुध्दा अशा प्रवृत्ती होत्या. मग यावर उपाय काय आपण चर्चा कशासाठी करायची. तर हे होवू नये यासाठी कोणत्याही ठरावाच्या रुपान किंवा आपल्या सर्व भगिनीनी जे काही वक्तव्य केलं त्याच एक शहानिशा करुन, आज गव्हर्मेंट कोणतही असु दयात, कोणत्या गव्हर्मेंटला वाटतय की माझ्या कालखंडात माझ्या राज्यामध्ये मी गृहमंत्री असताना, मी पालकमंत्री असताना अशी घटना घडावी. पण सभागृहाच्या माध्यमातून आपली तीव्र भावना कोणती आहे ही भावना पोहचवणं म्हणजेच सभागृहात मत व्यक्त करणं. कोणताही विषय दिशाहीन न होवू देता त्याच्यातल गांभीर्य कमी न होवू देता आपण जे तीव्रतेने आपल शहर कस सुरक्षीत ठेवायच, अशा घटना परत घडता कामा नये याच्यासाठी आपण कोणत्या उपाययोजना प्रशासनाला सुचवायच्या यावर विचारांच अवलोकन होणं अत्यंत गरजेच आहे आणि म्हणून मा.महापौरांना मी विनंती करतो की मी शिंदे मॅडमला पहीला प्रश्न दिला होता की आपल्या शाळेच्या ज्या मुली आहेत त्या मुलींची तुम्ही प्रत्येकांची जावुन भेट घ्या. कशाप्रकारच विदारक चित्र कदाचित येवू शकतं कारण की अशा घटना फार घडत चाललेल्या आहेत. त्यावर आपल्यापासून आपण जर सुरवात केलीतर, उपाययोजना जर केल्यातर किंवा आताच सांगीतल सीसी कॅमेरेच्या संदर्भात किंवा या संदर्भात ज्यांनी सांगीतल हे सर्व मुद्दे हायलाईट करुन त्यावर मार्ग काढायचा

त्यावरही विचार होणं, चर्चा होणं तर त्या आपल्या भगीनीनां श्रध्दांजली अर्पण आहे. नाहीतर बाकीची क्षेत्र आहेतच आपली एकमेकांवर कशा पध्दतीनी आरोप-प्रत्यारोप करुन तो राजकारणाचा भागच असतो परंतु मला असं वाटत की खुप चर्चा झालेली आहे. मा.महापौर साहेब, आपल्यातल्या सर्वानी मुद्दे मांडलेले आहेत त्याची शहानिशा करुन आपल्याला काय अपेक्षीत आहे आणि आपल शहर किती सुरक्षीत राहील कारण का पोलीस जरी आलेतरी पोलीसांच पहील असतं की शहराची लोकसंख्या २७ लाख आणि आमची लोकसंख्या किती आहे. या सगळया परिस्थितीच भान ठेवून किंवा अवलोकन करुन आणि चिंतन करुन मा.महापौर साहेब योगायोगाने तुम्ही स्त्रि महापौर आणि एक माई आहेत तुमच्यामध्ये आई पण आहे म्हणून एक सर्वपक्षीय शिष्ठमंडळ, सरकार कोणतही असू दयात त्यांना जाब विचारण्यासाठी परंतु ते सरकार आहे म्हणून या घटना घडतात किंवा मागच सरकार होतं म्हणून घटना घडल्याच नाहीत किंवा केंद्रात सरकार आहे असं काहीच नसतं. निर्भयाच एवढ खतरनाक प्रकरण घडलेल असतांना त्याला फाशी होणार आहे हे समजत असताना देखील लाखो घटना या देशात त्यानंतर घडलेल्या आहेत. खरतर पवार साहेबांचे मानावे तेवढे आभार थोडे आहेत की पन्नास टक्के महीलांना आरक्षण दिलं असल्यान तुमची भूमीका मांडता येण्याच हे स्वातंत्र देखील त्यामुळ मिळालं. एक एक महीला मुलींच्या एका एका शाळेत जावुन आठवडयातून एक तास जरी दिलातर तुमच्या समोर हे चित्र येइल हीच सुरक्षीतता आहे. त्या चर्चेतन हे उत्तर आहे की पुढ काय होवू नये यासाठी आपण आपल्या उपाययोजना करणं अत्यंत गरजेच आहे. सर्वानी आपल्या भावना व्यक्त करत असताना, हे न होण्यासाठी जे जे काय आपल्याला करता येईल म्हणून आपला एक संपुर्ण सभागृहाचा ठराव राज्यशासनाकडे जावु दया, केंद्रशासनाकडे पण जाऊ दया. अशा पध्दतीने मी भावना व्यक्त करतो.

मा.सुवर्णा बुर्डे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हिंगणघाटमध्ये घडलेली घटना, औरंगाबादमध्ये घडलेली घटना, महाराष्ट्रात महीला व मुली या सुरक्षीत नाहीत, असुरक्षीत आहेत. या दोन्ही खुपच अनिंदनीय घटना घडलेल्या आहेत. त्या मुलीला दिवसा जीवंतपणे जाळण्यात आले. ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे त्याचा मी निषेध करते. महाराष्ट्र शासनाला व पोलीस प्रशासनाला विनंती करते, कारण की विनंती करण्या इतपतच आमच्या हातात आता राहीलेले आहे. आतापर्यंत ज्या घटना घडल्या त्यामध्ये फक्त मेणबत्या जाळून निषेध करणं एवढच आमच्या हातात आहे. आता प्रशासनाला मी विनंती करते की लवकरात

लवकर या घटनेचा निकाल लावावा व जे आरोपी आहेत त्या आरोपीना लवकरात लवकर त्यांना शिक्षा देण्यात यावी. आता आपले विरोधी पक्षनेते जे बोलले त्याच्यावरती मी थोडस बोलेल की बाजू मांडतांना, विरोधी पक्षनेत्यांनी जी बाजू मांडली त्यांनी महीलांच्या अत्याचारावरती निर्मुलनासाठी काय योजना करायच्या हे बोलायला पाहीजे होते, काय करायला पाहीजे न करायला पाहीजे याच्यावरती त्यांनी बोलायला नव्हतं पाहीजे. गरीब गाय आपल्या बछडयावरती संकट आलं की तर ती शिंगावर घेते तसं आम्ही महीलानी कोणावरही संकट आलतर शिंगावर घेण्यास कमी राहणार नाहीत. मी महीला आहे महीलेच्या बाबतीत घडलतर मी प्रयत्न करुन बोलणारच. आज कोणी इथ माझ्या बाबतीत बोलत असेल की हीला बोलता येत नाहीतरी बोलायचा प्रयत्न करते तर असं समजू नका. वेळ आलीतर ही महीला कमी पडणार नाही हे लक्षात ठेवा. मृत्यू म्हणजे काय, मृत्यू म्हणजे काय तरुण हाईल, मी तरुण होईल, आई होईल, आजी होईल पण असा मृत्यू येतो त्यावेळी खुप दु:ख होतं. प्रियंका, निर्भया, अंकिता जळत नाही. इथे बसलेली प्रत्येक महीला जळते. टिव्ही पेपरमध्ये बातम्या वचताना काळीज फाटते, आश्रूचा बाण फुटतो. खरंतर महाराष्ट्र प्रशासनाला व पोलीस आयुक्ताला माझ कळकळीच सांगण आहे की खरचच तुम्ही मुली, महीला यांच्यावरती जे अत्याचार घडतात त्याच्यावरती लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि त्यांना कडक शासन व्हाव, त्याला शिक्षा मिळावी अशी विनंती करते व माझ्या परिवाराच्या तर्फे तीला श्रध्दांजली वाहते, धन्यवाद.

मा.एकनाथ पवार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर या विषयावर मी बोलणार नव्हतो. परंतु माझे परमस्नेही पुरुष नगरसेवकांनाही, नेत्यांनाही याठिकाणी बोलाव लागतं. मंगलाताईनी बोलता बोलता सांगीतल की अशा एखादया विषयामध्ये शंभर टक्के राजकारण नाही झाल पाहीजे. पण एक गोष्ट निश्चित सत्य आहे. अकिंताची किंवा सिल्लोडची घटना असेल, नाशिकची घटना असेल, पनवेलची घटना असेल, आपल्या शहरामधल्या काही घटना असतील. गेल्या तीन महीन्यामध्ये या राज्यामध्ये जी परिस्थिती खरतर महीलांच्या संदर्भामधली असेल, शेतक-यांच्या संदर्भामधली असेल अत्यंत वाईट परिस्थिती कायदा आणि सुव्यवस्थेची या सरकारमध्ये या राज्यामध्ये झालेली आहे. आणि कधी कधी भाऊसाहेब तुम्ही खरच म्हणालात की अशा पध्दतीच्या प्रवृत्ती ठेचून काढल्या पाहीजेत. हे नाही झाल पाहीजे याच्यासाठी अपण काय केल पाहीजे. खरतर सरकार हे त्याच्याचसाठी असतं. दत्ताकाका तुम्ही सांगीतल की आमचे गृहमंत्री, या राज्याच्या सन्मा.गृहमंत्र्यांना अंध्रामध्ये जायला वेळ मिळाला आणि नागपुरपासून

हिंगणघाट मला असं वाटत की जवळपास पंचवीस ते तीस मिनीटाच अंतर आहे तीथ जायला वेळ मिळाला नाही. ही दुर्दैवी घटना आहे राज्याच्या दृष्टीने लक्षात ठेवा. ज्यावेळेस छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवनेरीवर या राज्याचे मुख्यमंत्री येवून या राज्याला कायदा, सुव्यवस्था आम्ही किती चांगल्या पध्दतीची करतोय अशा पध्दतीची भावना व्यक्त करतात. मला खेदान वाटतय की छत्रपती शिवाजी महाराजांच राज्य आहे त्यांच नाव घेवून केलेल असेल, सन्मा.बाळासाहेब ठाकरे आजजर असते आणि अशा पध्दतीची घटना घडली असतीतर त्यांनी सांगीतल असतं की अशा प्रवृत्तीला जागेवर ठेचून काढल पाहीजे. दुर्दैवान याठिकाणी ज्या पध्दतीन सरकार या राज्यामध्ये राज्य करतय आणि मला असं वाटतय की एखादी घटना म्हणजे पोलीसांच्या संदर्भातील असेल, शेतक-यांच्या संदर्भातली असेल म्हणजे ज्या पध्दतीने सरकार या राज्यामध्ये काम करतय, आम्ही राजकारण करत नाहीत तुम्ही राजकारणावर बोलले. कुणीतरी सांगीतल की अजीतदादा नेते आहेत, पालकमंत्री आहेत सरकारच्या विरोधामध्ये विरोधीपक्षाच्या लोकांना बोलण्याचा नैतीक अधिकार असतो. तुम्ही ज्यावेळेस बोलत होते त्यावेळेस बरोबर होत आणि आम्ही ज्यावेळेस या सभागृहामध्ये सरकारच्या नाकर्तेपणाबद्दल आवाज उठवितो खरतर वाईट वाटायच काहीच कारण नाही. मला असं वाटतय की या राज्यामधली परिस्थिती अत्यंत दयनीय झालेली आहे. तुम्ही सगळयांनी सांगीतल मा.महापौरांच्या नेतृत्वामध्ये याठिकाणी या शहराची परिस्थिती बघीतली, गेली तीन महीने आपण बघतोय या तीन महीन्यामध्ये महीलांवर अत्याचार या शहरामध्ये होतात.

(गोंधळ)

मा.महापौर- काका साहेब, पक्षनेते बोलतात त्यांना जे मांडायच आहे ते मांडू दयात.

(गोंधळ)

मा.एकनाथ पवार- मा.महापौर साहेब, माझ्या बोलण्याचा राग खरतर तुम्हांला यायला नको होता. मी आता पक्षनेता आहे परंतु एक लक्षात ठेवा मी माझ्या पार्टीचा अत्यंत प्रामाणिक कार्यकर्ता आहे. तेव्हा माझी तुम्हांला विनंती आहे की हे सरकार या राज्यामधल आताच सरकार हे .....

(गोंधळ)

मा.महापौर- पक्षनेते बोलतात आपण सर्वांनी शांत रहावे.

(गोंधळ)

मा.एकनाथ पवार- मा.महापौर साहेब, शिवनेरीवर जावून ज्या पध्दतीने भाषण करताय आणि छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेल सरकार नाही हे लक्षात ठेवा. हे औरंगजेबला अभिप्रेत असलेल सरकार आहे. या निमीत्तान मा.महापौर आपल्याला विनंती आहे की ज्या पध्दतीन या राज्यामधल्या सरकारनं कायदा आणि सुव्यवस्थेचा खेळखंडोबा मांडलेला आहे. हे सरकार अधोगतीला येतंय. हे सर्व सरकार माझ्या सगळया भगीनींची अब्रू वाचवण्यास यशस्वी होत नाही. खरतर मान खाली घालावी अशाप्रकारच्या घटना अंकिता असेल, सिल्लोडची घटना असेल, पनवेलची घटना असेल हे ऐकूण आपल्याला काय वाटतय. मी या सरकारचा जाहीर शब्दामध्ये निषेध करतो आणि या सरकारच डोक आतातरी पुढच्या काळामध्ये ठिकाण्यावर येईल की नाही अशा पध्दतीची भावना व्यक्त करतो आणि थांबतो, धन्यवाद.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेली दोन तास आपण हिंगणघाटसारख्या निंदनीय घटनेवर या सभागृहात चर्चा करतो. हिंगणघाटची घटना, औरंगाबादची घटना या सर्व घटना निंदनीय आहेत. प्रथमत: मी या घटनेचा निषेध करतो. गेल्या दोन तासापासून मी सभागृहात ऐकतो मला असं जाणवल नाही की, प्रत्येकजण महीलेसाठी बोलतो. कुठेतरी बोलत असताना प्रत्येकजण पक्ष हा डोक्यात ठेवून बोलत होता हेही काही लक्षात नाही आल. मला सभागृहाला विनंती आहे, मला वाटत मंगलाताईनी सांगीतल, भाऊसाहेबांनी सांगीतल, अशा घटनेच राजकारण आपण करायच आणि अशा घटनेसाठी म्हणायच तू बोलू नको आणि तू बोलू नको. हे काय चालल आहे, तुमचा व्हिप आला नाही इथ आज. तुमची सभा तहकूबच आहे यासाठी या गोष्टीच तुम्ही राजकारण करणार आणि इतक्या वेळ तुम्ही चर्चा करणार. नेत्यांच ऐका, आपण या शहरातील नागरीक आहोत, सगळया पक्षाच्या अगोदर हे तरी लक्षात ठेवा.

(गोंधळ)

मा.महापौर - तुम्ही मुद्दयाच बोला. श्रध्दांजलीचा विषय चालला आहे श्रध्दांजलीवरच बोला.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एवढी वाईट घटना घडली आणि आपण इथ बसून राजकारण करतो. कुठल्याही पक्षाच सरकार असू दया निषेध कराना. तीथ वरती आमदार बसलेत ते पण त्यांच मत

मांडतीलनां. आपण आज आपल्या शहरात, आपल्या सभागृहात आपण बोलतोना. आज तुम्ही जे पक्षांच काढल तर मी आता राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाची आकडेवारी आहे ती सांगतो. म्हणजे कालचाही पेपर तुम्ही वाचला असेल, जज्ज लोकांनीही दखल घेतली आहे. म्हणजे सगळे २४२१२ गुन्हे नोंदवले. जज्ज लोकांनीही दखल घेतली आहे. काही एफआयआरच कन्व्हर्शन खटला चालू असताना पीआयमध्ये केलं आणि सगळे एकत्रीत केले. म्हणजे सगळे सेन्सीटीव्ह आहेतना या विषयावर. फक्त तुम्ही आम्ही सेन्सीटीव्ह नाहीततर या देशात राहणारा प्रत्येक नागरीक, प्रत्येक महीला सेन्सीटीव्ह आहे. हा विषयच सेन्सीटीव्ह आहे. म्हणजे सर्वोच्च न्यायालयच याप्रकरणात दखल घेत आहे. तुम्ही पाहील असेल मा.उध्दव साहेबांनी स्वत: सांगीतल की मी हे फास्ट्रॅकमध्ये करतो व उज्वल निकम यांची त्याठिकाणी नियुक्ती केली आणि त्यानंतर गृहमंत्र्यांना देखील आदेश दिले आहेत की आपण तेलंगणाच्या कायदयाचा अभ्यास करावा. म्हणजे प्रत्येकजण आपआपल्या पध्दतीने यात सेन्सीटीव्ह आहेत. तीन महीन्यातच कायदा व सुव्यवस्था बीघडली म्हणता हे कसंकाय हे राजकारण नाही करत तर काय करता. तुम्हांला तीन महीन्यात कळल कायदा आणि सुव्यवस्था बीघडली. दिल्लीत कोणाच शासन आहे, दिल्लीत कुणाकड गृह आहे.....

(गोंधळ)

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एकनाथराव तुम्हांला सवयच लागली तुम्ही जाहीर सभेत कुठतरी भारतीय जनतापार्टीच भाषण करता कधीतरी नगरसेवकांच भाषण करा. आज उत्तर प्रदेशचे आमदार आपण पाहीले कुलदीपसिंह सेंगर काय परिस्थिती आहे. माई तुम्ही काय करा तुमच एक शिष्टमंडळ घ्या आम्हांलाही बोलवा मा.मुख्यमंत्री यांची भेट घेवू सिमाताई सुध्दा आहेत. या घटना घडतात आपण कुठेतरी शिक्षणमंडळाच सुध्दा डोक ठिकाण्यावर आणा. रोज आपण खरीदया करतोना, रोज स्टॅण्डींगला ठराव येतो. कुठेतरी मुलींच्या प्रशिक्षणाचा एखादा विषय आणा. चांगला विषय आणानां. मुलीमध्ये, मुलांमध्ये ऍवेरनेस करा असे काहीतरी चांगले विषय आणाना. आपण आपल्या शहरातील लहान मुल-मुली असतील त्यांना कशा प्रकारे चांगल प्रशिक्षण देता येईल हे बघाव. आज आपल्या शहरातील मुलांवर जर चांगले संस्कार आपल्याला करता आलेतर चांगली गोष्ट आहे. ऍवरनेस टू टच त्याचेही क्लासेस आहेत, स्वसंरक्षणाचे खुप क्लासेस आहेत. आपण शहरात चांगल्या साठी काय करु शकतो त्याच्यावर एक चर्चा ठेवा. माई तुम्ही तुमच्या अध्यक्षतेखाली हे बोलून घ्या. मुलीना कस

प्रशिक्षण देता येईल, मुलांना कस प्रशिक्षण देता येईल. जेणेकरुन भविष्यात ही गुन्हेगारी वृत्ती आपल्या शहरात बळावणार नाही. या घटनेचा मी पुन्हा एकदा निषेध करतो आणि मी सगळयांना विनंती करतो की फक्त उत्तर दयायच म्हणून आम्ही तुम्हांला याठिकाणी उत्तर दिल आहे पण याच कुठेही राजकारण न करता आपल्या शहरातील लहान मुलांना आपल्याला कसं संरक्षण देता येइल हे प्रशासन म्हणून आपण बारकाईन पहाव. भविष्यात चांगल्या विचारांची मुल कशी घडतील याकडे आपण लक्ष दयाव, धन्यवाद.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राज्यात जी घटना घडली त्याचा सर्वानीच निषेध केलेला आहे, अत्यंत वाईट घटना आपल्या राज्यामध्ये घडलेली आहे. देशामध्ये आशा अनेक घटना वारंवार घडतात आणि त्या दृष्टिकोनातून आपल्या सगळयांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. सभागृहामध्ये मत मांडत असताना प्रत्येकाचीच अपेक्षा ही असायला पाहीज की या विषयाच आपण राजकारण न करता आपण आपल्या शहरामध्ये पुढच्या काळामध्ये अशा घटना घडणार नाहीत आणि त्या दृष्टिकोनातून आपण कुठली पावल उचलायची याचा विचार व्हायला पाहीजे होता. परंतु आपण नेहमीप्रमाणे जस स्टेजवर भाषण करतो त्याप्रकारे याही ठिकाणी भाषण केलं. राहूलदादा चुकीच बोलले नाहीत की तुम्ही याठिकाणी ठरवून आले होते की आपल्याला जीबी चालवायची नाही म्हणून तुम्ही अशा पध्दतीने हा विषय आणला आणि निरनिराळया पध्दतीने विषयांतर करण्याचा आपण प्रयत्न केला. माई तुम्ही अनेक वर्षे या सभागृहात नगरसेवक आहात. भाऊसाहेब आहेत, मंगलाताई आहेत. अनेक वर्षे आपण या सभागृहात काम करतो. अशा पध्दतीने सभागृह कधीही चालवल गेलं नाही, मागच्या काळामध्ये. प्रत्येक जण खाजगीत चर्चा करताना निश्चितपणे मान्य करतो की या सभागृहाचा दर्जा घसरत चाललेला आहे. पक्षीय राजाकरण कधी सभागृहात होत नव्हतं. मी गेली वीस वर्षे या सभागृहात नगरसेवक म्हणून काम करतो. विरोधी पक्षाचा नगरसेवक म्हणून पण मी या सभागृहात काम केलं. नंतर सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक म्हणून आता पुन्हा विरोधी पक्षाचा म्हणून आहे. परंतु कधीही असं घडत नव्हतं की विरोधी पक्षाचा नगरसेवक म्हणून त्याच काम होत नव्हतं, असं कधीही घडत नव्हतं. परंतु एका वेगळया दिशेला नेण्याच काम गेल्या काही वर्षापासून आपण चालवलेल आहे. कुठल्या पक्षाचा नगरसेवक आहे याचा कधीही विचार होत नव्हता. सभागृहा बाहेर पक्ष सभागृहामध्ये आल्यावर सगळे एक, खेळीमेळीच्या वातावरणामध्ये. भाऊसाहेब आणि मंगलाताई सगळयात सिनीअर आहेत. आम्ही याठिकाणी गॅलरीत बसून

पाहीलेलं आहे. ही लोक एकजीत येवून शहराच्या विकासाच्या संदर्भात निर्णय घ्यायची आणि शहरात चांगली काम करत रहायची. आज काही लोक मागच्या काळात या पक्षात होती आता त्या पक्षात आहेत. फक्त लेबल बदलेल आहे पण लेबल बदलल्यानंतर माणसाची भूमीका कशी बदलते, इतक्या टोकाला जावून तुम्ही बोलता. मला सुध्दा पहील्यांदा नगरसेवक पदाची संधी भारतीय जनता पक्षामुळे मिळाली आहे. भारतीय जनता पक्षामुळे पहीला नगरसेवक मी झालेलो आहे. अशी अनेक मंडळी राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून नगरसेवक झालेली आहेत पण इथ आल्यानंतर वेगळया पध्दतीने नेत्यां विषयी बोलायच, आम्ही तुमच्या नेत्यांची नाव कधी घेत नाहीत.

मा.महापौर- श्रध्दांजलीवर बोलावे.

(गोंधळ)

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपले अधिकारी काम करतात अधिका-यांना ख-या अर्थाने तुमच संरक्षण आहे का. अधिका-यां विषयी वेगवेगळया प्रकारच्या घटना घडतात. कमीशनर म्हणून तुमच संरक्षण आहे का त्यांना.

मा.महापौर- विषयांतर होतं, श्रध्दांजलीवर बोलावे.

(गोंधळ)

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जी वस्तुस्थिती आहे ती तुमच्या पुढ आणि समाजापुढ आली पाहीजे. पन्नास वेळा आमच्या नेत्यांच नाव घ्यायच काय कारण आहे. आणि ज्यांना राष्ट्रवादीन मोठ केल ते सुध्दा. राहूलदादानी चांगल्या सूचना केल्या आहेत. आम्ही भारतीय जनता पार्टीच्या विरोधात कधी बोलतो का, नाही, कारण तो मला अधिकार नाही. कशा बद्दल नेत्यांच नाव घ्यायच.

(गोंधळ)

मा.महापौर- विषयांतर करु नका, श्रध्दांजलीवर बोलावे.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, चुकीच्या पध्दती पाडू नका. मला एक माहीती आहे की पदामुळे माणसाची उंची वाढते आणि त्या पदाची पण उंची वाढवण्याच काम आपण सगळयानीच केल पाहीजे. पण त्या पदाची उंची कमी नाही झाली पाहीजे याचा आपण सगळयांनी भान ठेवलं पाहीजे. पद कायम नसतात,

नगरसेवक म्हणून आपण या सभागृहात आलेलो आहोत. लोकांच्या आपल्याकडन खुप अपेक्षा आहेत आणि त्या दृष्टिकोनातून आपण सभागृहात काम केल पाहीजे परंतु तसं होत नाही. अनेक नगरसेवक इथे नवीन आहेत, पहील्यांदा नगरसेवक झालेले आहेत, त्यांना काय वाटत असेल की सभागृह असंच चालतं. परंतु असं कधी सभागृह चालत नव्हतं. भाजप आणि इतर पक्ष म्हणजे भारत पाकीस्तानचा बांध आहे आणि आमची दुश्मनी सारख काम चालत इथे असं त्या नगरसेवकांना वाटत असेल.

(गोंधळ)

मा.महापौर- श्रध्दांजलीचा विषय आहे. तुम्ही बोलता तो विषय वेगळा आहे.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, याठिकाणी सगळयांनी काय बोलल पाहीजे की आपल्या शहरामध्ये ही अशी घटना होवू नये यादृष्टिकोनातून आपण काय प्रयत्न केले पाहीजेत. मुळात ही जी विकृती आहे, या विकृत लोकांना जात नसते, धर्म नसतो, नसतं. त्यामुळ ही विकृती ख-या अर्थाने थांबविण्याच्या दृष्टिने आपल्या येथील काही शाळांमध्ये, कॉलेजेस मध्ये ठिकठिकाणी आपल्याला जावून तीथ चांगले लेक्चररस ठेवले पाहीजेत. तीथ त्यांना व्याख्यान दिलं पाहीजे त्यांच्यावरती चांगले संस्कार दिले पाहीजे यादृष्टिकोनातून आपण प्रयत्न केले पाहीजेत. या गोष्टींचा विचार आपण करावा. भविष्यकाळामध्ये आपल्याला याच निश्चितपणे समाधान राहील की माई ढोरे महापौर होत्या आणि माईनी खुप चांगला निर्णय घेतला आणि पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशा पध्दतीने खुप मोठया प्रमाणात सांस्कार करण्याच्या दृष्टीने शाळा, कॉलेजेसमध्ये चांगल्या प्रशिक्षणाचे शिबीर घेतली गेली व महीलांना वेगवेगळया प्रकारच ट्रेनिंग दिले गेले अशा प्रकारच काम आपण कराव. येथून पुढच्या काळामध्ये माझी आपल्याला सर्वाना विनंती आहे की आपण सभागृहामध्ये पक्षीय राजकारण न करता विषयाला धरुन मी पण बोलणार आणि सगळयानी विषयाला धरुन बोललं पाहीजे. त्याच्यामुळे मी झालेल्या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि श्रध्दांजली वाहून थांबतो.

मा.विठ्ठल उर्फ नाना काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राज्यात जी दुर्दैवी घटना झाली त्या घटनेस मी माझ्या पक्षाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. मा.महापौर साहेब, सुरवातीलाच हा श्रध्दांजलीचा विषय घेतला. आम्हांला वाटल दहा ते पंधरा मिनीटात हा विषय संपेल पण आम्हांला कळल की सभा तहकूब होणार आहे. परंतु हा श्रध्दांजलीचा विषय भावनीक आसून देखील

याला एक वेगळ स्वरुप दिलं आणि हा आपण आताचे सत्ताधारी जे आहेत यांच्यावर ताषेरे ओढण्यासाठी हा विषय लांबवीत चाललेला आहात. मा.महापौर साहेब, आपण दुजाभाव करतात, ज्यावेळेस राहूल, अजीत बोलत होते ते बोलत असताना दुसरे सदस्य बोलतात त्यावेळेस तुम्ही यांना खाली बसायला सांगता, श्रध्दांजली वहा, विषयांतर करु नका म्हणता. ज्यावेळेस एकनाथ पवार बोलले त्यावेळेस तुम्ही त्यांना पण तसच बोलायला पाहीजे होतं. हा दुजाभाव महापौरांकडून अपेक्षीत नाही. आपण शहराचे महापौर आहात, कुठल्या पक्षाचे नाहीत. त्यामुळ ज्या पध्दतीन भाऊसाहेबांनी सांगीतल ही घटना होत असताना कोण कोणत्या पक्षाचा आहे, कोणाच सरकार आहे, तो माणूस त्याची विकृती आहे. त्या विकृतीला कोण जबाबदार आहे ज्याच्यावरती आपण सभागृह म्हणून एक चांगला निर्णय घेणं गरजेच आहे. हा निर्णय घेत असताना फक्त त्या विषयावरच बोलल पाहीजे. अजीतने सांगीतल्याप्रमाणे तुम्ही सगळयांना समान बोलू दयां. बोलत असताना तुम्ही ज्या पध्दतीने आमच्या सदस्यांना माईक जवळ घेवून आमच्या सदस्यांना खाली बसवलं तसं आपल्या सदस्यांना सुध्दा शांत बसायची वॉर्निंग देत जा. कारण सत्ताधारी असले म्हणून सगळयांनी बोलायच आणि बोलणारानी गप्प बसायचा हा विषय नाही. हे मी बोलत नाही सभागृह पाहतय, पत्रकार पाहतात सगळे पाहतात. आपण महापौर आहातना तर महापौरांप्रमाणे आपण देखील आपल्या सदस्यांना वॉर्निंग देत जा. महापौरांनी ज्यांना बोलायला सांगीतल त्यांनी बोलायच बाकीच्यांनी बोलायच काय कारण आहे.

(गोंधळ)

मा.विठ्ठल उर्फ नाना काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्हांला शिकवायला आलेलो नाही मी, तुम्ही मध्ये बोलतात मी शिकवायला आलो नाही तुम्हांला. मी आडाणी शिक्षक झालो..... मा.महापौर साहेब, विषयांतर न करता श्रध्दांजली वाहताना श्रध्दांजलीवरच बोलाव आणि आपण देखील बाकी सदस्यांना वॉर्निंग दयावी. एखादा बोलत असेलतर मध्ये बोलूं दयायच नाही. आपण राज्यशासनावरती टिका करतोय, आपण जो निर्णय घ्याल सभागृहाच्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आम्ही देखील सम्मंत करु. तरी मी श्रध्दांजली वाहून थांबतो.

(गोंधळ)

मा. नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खर म्हणजे गेल्या दोन तासापासून चर्चा चालू आहे. वर्ध्या जिल्ह्यामध्ये हिंगणघाट येथे अंकिता हीला पेट्रोल टाकून जाळण्यात आलं आणि १० फेब्रूवारीला ऑरेंजसिटी या हॉस्पिटलमध्ये उपचार चालू असताना तीचा अंत झाला. आज सभागृहात बघीतलतर प्रत्येक भगीनीनी आणि प्रत्येक बंधुनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या. प्रथमत: या अंकिताताईला या सभागृहाच्या वतीने मी याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करतो. याठिकाणी प्रत्येक नगरसेवक सहकार्यानी अंकिताच्याबद्दल भावना व्यक्त केल्या आणि अनेक आमच्या भगिनीनी राज्यशासनाच्या निष्क्रीयतेबद्दल त्यांचा निषेध केला. खर म्हणजे अंकिताताईची ३ फेब्रूवारीला ही घटना झाली आणि १० फेब्रूवारीला तीचा अंत झाला. तीच्यावरती ऍसीड टाकल त्याच्यावरती गुन्हे दाखल झाले तीचा अंत झाल्याच्यानंतर ३०२ चा गुन्हा त्याच्यावरती दाखल करण्यात आला. परंतु आज महाराष्ट्रामध्ये आपण बघीतलतर, या ठिकाणी उल्लेख झाला खर म्हणजे दुर्दैव वाटत की आमच्या प्रत्येक भगीनीनी पोटतीडकीने अंकिता बद्दलची भूमीका याठिकाणी मांडली. प्रत्येकाच्या मनामधून ती भावना होती की या भगीनीवर अत्याचार झाला तीला न्याय मिळाला पाहीजे. या न्याय भूमीकेतून आमच्या प्रत्येक भगीनी याठिकाणी भूमीका मांडत असताना, तीला आम्ही श्रध्दांजली व्यक्त करत असताना जे राज्य या महीलांच सक्षमीकरण करण्याची भाषा करतात तीच रक्षण करण्याच काम या राज्यसरकारच आहे. त्या राज्यसरकार बद्दल बोललतर आम्हांला थोडस वेगळ वाटायला लागलय. मगाशी आमच्या ताईनी सांगीतल की महाराष्ट्रामध्ये आज प्रत्येक जिल्ह्यामध्ये जवळपास एक घटना म्हणजे सिल्लोडची घटना असेल, पालघरची घटना असेल, फेब्रूवारीला वाकडमध्ये दहा वर्षाच्या मुलीवर एकाने अत्याचार केला. अशा अनेक घटनाची मालीका या महाराष्ट्र राज्यामध्ये होते. याठिकाणी मला अभिमानाने सांगावस वाटत की ख-या अर्थान केंद्र सरकारच्या बद्दल बोलल जात परंतु या राज्यसरकारच विधी खात सुध्दा तातडीचा कायदा याठिकाणी करु शकतं. मगाशी उल्लेख झाला, खर म्हणजे आम्ही राजकारण करणारे कार्यकर्ते नसून संवेदनशील कार्यकर्ते आहोत. याठिकाणी बोलल गेल, विरोधी पक्षनेत्यांनी सांगीतल की जीबी चालवायची नाही म्हणून हा विषय घेतला परंतु आम्ही संवेदनशील कार्यकर्ते आहोत. एखादया महीलेवरती अशा प्रकारचा अत्याचार होतो त्यावेळेला तीच्या माग खंबीरपणे उभा राहणं आणि तीला पाठींबा देणं, तीच्या परिवाराला पाठींबा देणं आणि अशाप्रकारच्या घटना पुन्हा होवू नयेत म्हणून सातत्याने आम्ही त्याच्यासाठी बोलणार आहोत. हे खर असताना ज्यावेळेला संवेदनशील गोष्ट या सभागृहामध्ये बोलली जाते त्याला राजकारण

म्हणता. छत्रपती शासनाच्यामध्ये तुम्ही शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणताय आणि मग छत्रपतीच शासन ज्यावेळेला चालू होतं त्यावेळेला छत्रपतीच्या शासनामध्ये जर तुम्ही आमच्या महीलेकड वाकडया नजरेनी बघीतलतर त्याला भरचौकामध्ये हत्या केली जात होती त्याला चौकामध्ये फाशी दिली जात होती. आणि आताच्या सरकारमध्ये दुर्दैव वाटत शिवछत्रपतींचा अर्शिवाद घेवून म्हणतात परंतु छत्रपतींची कालच जयंती झाली आणि या छत्रपतींच्या शासनामध्ये त्यांच नाव तुम्ही सातत्याने घेतलं त्या छत्रपतींच्या कामावरुन तुम्ही काम करतात का. त्यांच्याप्रमाणे या राज्यामध्ये काम तुम्ही करतात का. आमच्या आया-बहीणीची रक्षा तुम्ही करु शकतात का. आमच्या महीलांची रक्षा तुम्ही करु शकतात का, आमच्या तरुणीची रक्षा करु शकतात का. आज आमच्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये आमच्या भगीनी ख-या अर्थाने भयभीत झालेल्या आहेत आणि म्हणून आम्ही या सभागृहामध्ये या अंकितला ज्यावेळेला श्रध्दांजली वाहतो त्यावेळेला आम्ही सांगतोय की ही मालीका चालू झालेली आहे. पुर्ण महीनाभरामध्ये जवळपास वीस घटना या संपुर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये झालेल्या आहेत. आमच्याकडे सत्ता पण आहे परंतु जो आलेख चाललेला आहे तो कुठेतरी थांबला पाहीजे. अशा क्रूर वृत्तीला ऍसीड टाकल जात पेट्रोल टाकून जाळल जातं अशा घटना वारंवार होतात म्हणून आम्ही या सभागृहामध्ये संवेदनशील असल्यामुळे याठिकाणी भावना मांडलेल्या आहेत. आम्हांला राजाकरण करायच नाही. राजकारण करण्याच हे व्यासपीठ पण नाही सभागृह पण नाही. आम्हांला हे सुध्दा माहीती आहे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमामधुन, या आयुक्तालयाच्या माध्यमामधुन आमच्या शाळेच्या विदयार्थ्यासाठी, विदयार्थीनीसाठी असेल, आयटी सेक्टरच्या कंपनीमध्ये जाणा-या महीला असतील त्यांना सुरक्षीततेच वातावरण करण्याच काम आमच्या या सभागृहाच्या माध्यमातून आम्ही करणार आहेत. आमच्या भगीनीनी सुचना मांडलेल्या आहेत की या महीलांच्या सुरक्षिततेसाठी आयुक्तां बरोबर एक तातडीची मिटींग घ्या. ज्या पध्दतीने आम्ही महीलांच्या सक्षमीकरणासाठी महानगरपालिकेच्या माध्यमामधुन कुठल्याही प्रकारची कुठल्याही टेंडरला, कुठल्याही निधीला याठिकाणी कमतरता भासू देणार नाहीत. एक चांगल टेंडर, चांगला निधी महीलांच्या सक्षमीकरणासाठी केलेला आहे. मी पुन्हा अंकीताताईला श्रध्दांजली अर्पण करतो आणि मा.महापौर साहेब, हा जो काही संवेदनशील विषय असल्यामुळे याला कुठलही राजकारण नाही. ज्यावेळेस पन्नास टक्के महीला या सभागृहात बसल्या आहेत आणि पन्नास टक्के महीलांच्यासाठी या राज्यामध्ये काम चालल जातय. पन्नास टक्के महीला नेतृत्व करतात आणि त्या नेतृत्व करणा-या महीला, आमच्या

भगीनी जर त्यांच्या व्यथा याठिकाणी मांडत असतीलतर आणि त्याला जर कुणी राजकारण करत असेलतर ही दुर्दैवी गोष्ट आहे मी त्याचा सुध्दा याठिकाणी निषेध करतो आणि ही सभा श्रध्दांजली अर्पण करुन दि.२६/२/२०२० दुपारी २.०० पर्यंत तहकूब करावी अशी मी विनंती करतो.

मा.अॅड.मोरेश्वर शेंडगे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर – आयुक्त साहेबांना महीलांच्या दृष्टीकोनातून विनंती करते की शहरातील महीला, महाराष्ट्रातील महीलांची सुरक्षा कशी राखता येईल याबाबत पोलीस आयुक्तांना लवकरात लवकर एक पत्र दयाव. महीलांची सुरक्षा कशी राखता येईल याकडे लक्ष दयावे म्हणून. त्याच बरोबर महीला सुरक्षीत कशा राहतील त्यासाठी महानगरातील प्रत्येक शाळेला आदेश दयावा की महीलांना सुरक्षीततेसाठी कराटे प्रशिक्षण हे दिल गेल पाहीजे अशी सक्ती करावी त्याच बरोबर रिक्षा महीला चालवतात त्यांना देखील आपण आपल्या मार्फत कराटे प्रशिक्षण दयाव अशी सभागृहाच्या वतीने आयुक्तांना विनंती करते आणि ही सभा बुधवार दि.२६/२/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ४१

सभावृत्तांत

(दि.२०/०२/२०२० ची तहकूब सभा)

दिनांक – २६.०२.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी- २०२० ची तहकूब मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २६.०२.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
१२) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१४) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१५) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.लोंढे नम्रता योगेश

३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३२) मा.लांडे विक्रांत विलास

३३) मा.गीता सुशिल मंचरकर

३४) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३५) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३६) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३७) मा.अनुराधा गणपत गोरखे

३८) मा.केशव हनुमंत घोळवे

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.चिखले सचिन तुकाराम

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५३) मा.प्रमोद कुटे

५४) मा.राजू मिसाळ

५५) मा.शैलजा अविनाश मोरे

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.ढाके नामदेव जनार्दन

६२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६३) मा.करुणा शेखर चिंचवडे

६४) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६५) मा.भोईर सुरेश शिवाजी

६६) मा.अपर्णा निलेश डोके

६७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.सुलक्षणा राजू धर

७२) मा.शाम गणपतराव लांडे

७३) मा.सुजाता सुनिल पालांडे

७४) मा.योगेश मंगलसेन बहल

७५) मा.कदम निकीता अर्जुन

७६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७७) मा.नढे विनोद जयवंत

७८) मा.पाडाळे निता विलास

७९) मा.काळे उषा दिलीप

८०) मा.कोकणे संतोष अंकुश

८१) मा.पवार मनिषा प्रमोद

८२) मा.बारणे अर्चना तानाजी

८३) मा.अभिषेक गोविंद बारणे

८४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८५) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८६) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८७) मा.निलेश हिरामण बारणे

८८) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८९) मा.दर्शले रेखा राजेश

९०) मा.कलाटे राहुल तानाजी

९१) मा.कामठे तुषार गजानन

९२) मा.चोंधे आरती सुरेश

९३) मा.कस्पटे संदिप अरुण

९४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९७) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८) मा.कुटे निर्मला संजय

९९) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१००) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.मुंढे उषा अंकुश

१०२) मा.कदम शशिकांत गणपत

१०३) मा.लोखंडे चंदा राजू

१०४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१११) मा.संतोष बबन कांबळे

११२) मा.सोनवणे शारदा हिरेन

११३) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११४) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

११५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील-प्र.शहर अभियंता, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे-मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार-उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम, भालकर - सह शहर अभियंता, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.वाघमारे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहा.आयुक्त, मा.गाडेकर, मा.दांगट-प्र.सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.तांबे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.पाटील - कार्यकारी अभियंता,

मो.गोफणे-आरोग्य अधिकारी, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मा.डॉ.गोफणे-आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. महापौर- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.विलास मडिगेरी – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपल्या या सभागृहामध्ये सत्तारुढ पक्षनेता म्हणुन आमचे जुने सहकारी मित्र विद्यमान नगरसेवक नामदेवराव ढाके यांची मा.विभागीय आयुक्तांकडुन मंजुरी मिळालेली आहे. मा.महापौरांनीही मा.आयुक्तांच्या सूचनांना मान्यता दिलेली आहे. त्यांचा याठिकाणी सन्मा.सभागृहाच्या वतीनं अभिनंदनाचा ठराव याठिकाणी मांडत आहे. अभिनंदनाच्या ठरावानंतर मा.नामदेवराव ढाके यांचा याठिकाणी सन्मान करावा अशी सूचना मी याठिकाणी मांडतो.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर - आयुक्त साहेब, आणि सर्व नगरसेवक, नगरसेविका आज याठिकाणी सभागृह नेता म्हणुन नामदेव ढाके यांची निवड झालेली आहे त्यांचे मी सर्वांच्या वतीने अभिनंदन करते.

(मा.नामदेव ढाके –सभागृह नेता पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा मा.महापौर,मा.आयुक्त तसेच सर्व पक्षीय सदस्यांनी सत्कार केला.)

<u>नियुक्त्या</u>

विषय क्रमांक १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

मा.नगरसचिव – विषय क्रमांक १- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये

महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०२० रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे- १) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव २) मा.गावडे राजेंद्र तानाजी ३) मा.आंगोळकर सागर सुनिल ४) मा.ममता विनायक गायकवाड ५) मा. करुणा शेखर चिंचवडे ६) लोंढे नम्रता योगेश ७) मा.गिता सुशिल मंचरकर ८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – २, या पक्षियबलाप्रमाणे नियुक्त्या करणे करीता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गटनेते तथा सभागृहनेता मा.ढाके नामदेव जर्नादन यांनी त्यांच्या पक्षाचे ६ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटनेते तथा विरोधी पक्षनेता मा.विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी त्यांच्या पक्षाच्या २ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

त्यानंतर –

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वांसमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे श्री.आण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे-

१) मा.कदम शशिकांत गणपत - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी २) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ३) मा.संतोष बबन कांबळे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ४) मा.अभिषेक गोविंद बारणे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ५) मा.बुर्डे सुवर्णा विकास - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ६) मा.फुगे भिमाबाई पोपट - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे - पिंपरी चिंचवड

महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ८) मा.सुलक्षणा राजू धर - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

ठराव क्रमांक -५०८ विषय क्रमांक- १

दिनांक -२६/२/२०२० विभाग- मा.नगरसचिव

स्थायी समिती सदस्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.कदम शशिकांत गणपत २) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत ३) मा.संतोष बबन कांबळे ४) मा.अभिषेक गोविंद बारणे ५) मा.बुर्डे सुवर्णा विकास ६) मा.फुगे भिमाबाई पोपट ७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे ८) मा.सुलक्षणा राजू धर या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात येत आहेत.

महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सत्तारुढ पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे मा.गटनेते यांचे हस्ते नियुक्त समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देवुन सन्मान करणेत आला)

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सहाय्यक आयुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक झालेले मा.प्रशांत जोशी व मा.बाळासाहेब खांडेकर यांनी त्यांचा परिचय सभागृहास करुन आणि त्यानंतर मा.महापौर यांचे हस्ते मा.प्रशांत जोशी व मा.बाळासाहेब खांडेकर सहाय्यक आयुक्त यांचे पुष्पगुच्छ देवुन सन्मान करणेत आला)

मा.भाऊसाहेब भोईर – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह मा.स्थायी समिती सदस्य पदावर निवडुन आलेल्या सदस्यांचे मी अभिनंदन करतो. त्याच बरोबर आमचे सहकारी नामदेव ढाके यांची सभागृहाचे पक्षनेते म्हणुन निवड झालेली आहे. त्यांना एक फार मोठी जबाबदारी मिळालेली आहे. भारतीय जनता पार्टीचे माझे एक मित्र आहेत त्यांना मी विचारलं की, एवढी मोठी जबाबदारी नामदेव ढाके यांना देण्यामागचं कारण काय? ते म्हणले माणुस खुप चांगला आहे. मी म्हणले ते मी ओळखतो कारण ते आमच्या विरोधात असुन सुध्दा कधीही वार नाही. एक आदर्श असे कोणते गुण त्यांच्यामध्ये चांगले आहेत असे विचारल्यानंतर ते म्हणले प्रथम त्यांना आम्ही म्हणले महापौर होता का? तर ते म्हणे नको, त्यावर त्यांनी त्याग केला. दुस-या वेळेसही त्यांना महापौर होता का म्हणल्यानंतर त्यावरही त्यांनी त्याग केला. त्यानंतर स्थायी समिती चेअरमन होता का म्हणल्यानंतर ते म्हणले मला नको मडिगेरी साहेबांना द्या म्हणजे एवढा मोठा त्याग केल्यानंतर एवढं मोठं पद त्यांना मिळालं आहे म्हणुन मी त्यांच्या पक्षाचं देखील अभिनंदन करतो. पद हे छोटं/मोठं नसत त्या पदाची उंची वाढवण्याचं काम आपल्या कर्तृत्वामध्ये असतं आणि म्हणुन नामदेव ढाके हे माझ्या प्रभागातील असल्या कारणानं विशेषता त्यांना जी उपमा दिलेली होती की तुम्ही संताजी-धनाजी आहात. आणि ते चांगल्या अर्थानीच बोललो होतो. कारण संताजी आणि धनाजी हे सुर्याजी पिसोळकर यांच्या वंशजामधील नाहीत तर छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे मावळे आहेत त्यामुळे या सगळया परिस्थितीचा भान ठेवुन पक्षनेत्यांनी तुम्हांला तुमच्याकडे जी काही पदं नव्हती आणि जे पद तुमच्या मनात होतं तेच पद तुम्हांला मिळालं आहे. अशा पध्दतीच्या मी तुम्हांला शुभेच्छा देतो व सभागृहाच्या वतीने तुमचं अभिनंदन करतो.

मा.सचिन चिखले- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. आदरणीय नामदेवजी ढाके साहेब यांची सत्तारुढ पक्षनेतेपदी निवड झालेली आहे. त्यांचे मी माझ्या वतीने आणि सभागृहाच्या व पक्षाच्या वतीने अभिनंदन करतो.

मा.विलास मडिगेरी - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. आमचे मित्र विद्यमान नगरसेवक नामदेवराव ढाके यांची सभागृह नेता म्हणुन निवड झाली आहे. कामगार क्षेत्रामध्ये एक कामगार नेता म्हणुन आणि भारतीय जनता पक्षाचा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणुन याठिकाणी काम केलं आहे गेल्या तीन वर्षापासून जसं भाऊसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे पक्ष त्यांना काही तरी जबाबदारी देईल ही १०० टक्के खात्री आमच्या सारख्या कार्यकर्त्याला होती. मागच्या काळात काही पदासाठी ते इच्छुक होते परंतु भारतीय जनता पार्टी असा पक्ष आहे की, प्रत्येक कार्यकर्त्याची

कामाची पध्दत दखल घेणारा पक्ष आहे त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याचं काम भारतीय जनता पक्षाच्या वतीनं सर्व स्तरामध्ये राजकारण असेल, समाजकारण असेल त्यांना पदे देत असतात याठिकाणी कामगार क्षेत्रातील कामगार नेत्याची निवड सत्तारुढ पक्षनेता म्हणुन निवड केली आहे. एक चांगलं व्यक्तीमत्व आहे ते सर्वांनाच बरोबर घेऊन तो कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असो त्याला सोबत घेऊन याठिकाणी चांगल्या प्रकारचं कामकाज करतील अशी मला खात्री आहे. मा.भाऊसाहेब भोईर आणि सचिन चिखले यांनी त्यांना दोन्ही पक्षाच्या वतीने शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व सभागृहाच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देतो. त्यांची पुढील वाटचाल चांगली जावो अशी मी सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो. मा.महापौरांना विनंती आहे की,आपले मा. मुख्य उदयान अधिक्षक सुरेश साळुंके हे २९ फेब्रुवारी २०२० रोजी सेवानिवृत्त होत आहेत परंतु त्यादिवशी कार्यालयास सुट्टी असल्याने २८ फेब्रुवारी रोजीच सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा याठिकाणी सन्मान करावा. आणि स्थायी समिती सदस्य पदावर निवड झालेल्या सन्मा.सदस्य यांना शुभेच्छा देतो.आणि थांबतो.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. गेल्या २५ वर्षापासून सोबत काम करणारे तरुणपणांकडुन म्हातारपणाकडे जात असताना आमच्या सोबत बसणारे आमचे बंधु नामदेव ढाके यांची आज सभागृह नेता म्हणुन निवड झाली आहे. ख-या अर्थानं काम करत असताना कामगार नेता म्हणुन त्यांची ओळख आहे आणि ती ओळख त्यांनी कायम तशीच ठेवली आहे. भाऊसाहेबांनी मगाशी सांगितलं आहे ज्यावेळेस त्यांच महापौर पद हुकलं त्यावेळेस आम्हांला वाटलं पार्टी त्यांना कुठलं ना कुठलं पद देणार आणि दिलं. भारतीय जनता पार्टीचे या सभागृहात असणारे सर्वच नगरसेवक हे प्रामाणिक कार्यकर्ते आहेत,निष्ठावंत आहेत या निष्ठावंत कार्यकर्त्यांना ज्यांना,ज्यांना या स्थायी समितीमध्ये संधी मिळाली आहे. त्या सर्वांच मी मनापासून अभिनंदन करते. आणि नामदेवरावांना सांगायचं आहे की, आम्ही सगळे तुमच्या बरोबर आहोत काही झालं तरी सभागृह कशा प्रकारे चांगल चालेल याकडे आमचं लक्ष असणार आहे. आणि जेंव्हा आम्ही स्वप्नही पाहू शकत नव्हतो ते स्वप्न आज सत्यात उतरलं आहे. नगरसेवक झाल्यानंतरच आणि आज सभागृह नेता झाल्यानंतरच स्वप्नाचा आपण आनंद घेत आहात या त्यांच्या पुढच्या संपुर्ण राजकीय कारकीर्दीला मनापासून शुभेच्छा देते.राष्ट्रवादी काँग्रेसच्या माझ्या भगिनीची स्थायी समिती सदस्य पदावर निवड झाली आहे त्यांचेही मी याठिकाणी स्वागत करते. आणि शुभेच्छा देते.जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.सचिन चिंचवडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आजच्या या निवडी संदर्भात आमचे सहकारी भाऊसाहेब भोईर नामदेवराव ढाके यांच्या बाबतीत माहिती सांगितलेली आहे. त्याच्यामध्ये एक गोष्ट राहून गेलेली आहे. ती मी आपल्या सर्वांना सांगू इच्छितो. नामदेव ढाके यांच्या सोबत नगरसेवक म्हणुन गेली तीन वर्ष काम करीत आहोत आम्ही दोघेही एकाच प्रभागातून निवडुन आलेलो आहे. या माणसांच्या बाबतीत जबाबदारीच्या बाबतीत बोलायचं झालं तर हा माणुस पक्षाशी एकनिष्ठ आहे. हे पूर्ण शहराला परिचित आहे. त्याच बरोबर त्यांचा एक महत्वाचा गुण आहे तो गुण म्हणजे विश्वास आणि विश्वासाला कधी कुठेही तडा जाऊ न देणं हा महत्वाचा गुण आहे. नामदेव ढाके हे आमचे सहकारी आहेत आम्ही त्यांच्या बरोबर कायम सोबत आहोत यांच्या पुढील कारकीर्दीसाठी प्रभाग क्रमांक १७ च्या वतीने त्यांना शुभेच्छा देतो आणि थांबतो.

मा.अजित गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. नामदेवराव ढाके यांची सत्तारुढ पक्षनेतेपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. नामदेवराव आणि मी ब-याच वर्षापासून एकत्र काम केलेलं आहे आणि त्यांच मी काम पाहिलेलं आहे. कामगार क्षेत्रापासून यांची सुरुवात झालेली आहे. गेली अनेक वर्ष पक्षाशी एकनिष्ठपणे काम करीत असताना पक्ष जी जबाबदारी देइल ती पार पाडण्याची जबाबदारी घेतलेली आहे. आणि भाऊसाहेब नामदेव ढाके यांच्याबाबतीत सांगत होते त्यावेळेस मला आश्चर्च वाटलं की, त्यांना नेमकं काय म्हणायचं आहे. महापौर पदाचा त्याग केला, चेअरमनपदाचा त्याग केला ते खरोखर मनाने मोठे आहेत मला नेहमी वाटायचं की, त्यांच्यावर कुठं तरी अन्याय झालेला आहे. ख-या अर्थानं महापौर पदाची संधी त्यांना मिळायला पाहिजे होती. परंतु ती मिळाली नाही पण पक्षाने त्यांना ही जबाबदारी देवुन त्यांच्यावरचा अन्याय दूर केला आहे. आणि एकनाथ पवार यांनी मनाचा मोठेपणा दाखवून त्यांनी पक्षनेते पदाचा राजीनामा दिला आणि नामदेवरावांना संधी दिली त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. आणि नामदेवराव तुमच्याकडे ही महत्वाची जबाबदारी आहे. आणि आम्ही सर्वजण तुमच्या सोबत आहोत. काम करीत असताना आमची तुमच्याकडे अपेक्षा आहे की, आपण सभागृहामध्ये आल्यानंतर पिंपरी चिंचवड शहराचा विकास कसा होईल आपल्या परिसरातील नागरीकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या अपेक्षा कशा पूर्ण होतील यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावयाचा आहे. येथून पुढील दोन वर्ष महत्वाचे आहेत या दोन वर्षाच्या काळामध्ये आपल्याला पिंपरी चिंचवड शहराचा विकास अधिक चांगल्या पध्दतीने करावयाचा आहे. आणि त्या दृष्टीकोनातून तुमचा महत्वाचा रोल असणार आहे. आणि आमची विरोधी पक्षनेते म्हणुन अपेक्षा आहे

की, एकत्रितपणे काम करीत असताना सभागृहामध्ये प्रत्येक विषयावर चर्चा झाली पाहिजे. आणि सर्व नगरसेवकांना प्रत्येक विषयाची माहिती मिळाली पाहिजे. जेणेकरुन बाहेर लोक आपल्याला विचारतात की,तो विषय रितसर आहे की नाही याची माहिती आपल्याला पण पाहिजे. आणि या भूमिकेमध्येच आपण काम करावं अशा प्रकारची मी अपेक्षा करतो. आणि तुमच्या पुढील कारकीर्दीला शुभेच्छा देतो आणि थांबतो.

मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह या सभागृहातील माझे सहकारी आदरणीय नामदेवराव ढाके यांची सभागृह नेतेपदी निवड झालेली आहे त्यांना तसेच स्थायी समिती सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांना शुभेच्छा देतो. खरं तर नामदेवरावांचा आणि माझा संबंध फार दूरचाही नाही आणि जवळचाही नाही तीन वर्षापासून मी नामदेवरावांना या सभागृहात पाहतो आहे. अतिशय चांगली व्यक्ती आपल्या या सभागृहाला लाभलेले आहेत. याच्या आगोदरचे सहकारी आता या सभागृहात उपस्थित नाहीत आदरणीय एकनाथ पवार यांनीही हे सभागृह चांगल्या प्रकारे चालवलं आहे.विरोधी पक्षनेत्यांना बरोबर घेऊन त्यांनी आपली बाजु महापौरांपर्यंत मांडलेली आहे. भविष्यात नामदेवरावांकडनं सुध्दा हीच अपेक्षा आहे की, जसं सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना बरोबर घेऊन सभागृह चालवतील सभा चालवित असताना जे काही निर्णय आपल्या पार्टी मिटींगमध्ये ठरतील त्याप्रमाणे सभागृहामध्ये निर्णय व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त करतो. कारण येथून मागच्या तीन वर्षाच्या काळात पार्टी मिटींग मध्ये ज्या गोष्टी ठरायच्या त्या सभागृहात येताना थोडया चेंज होऊन यायच्या. तर यापुढे असे काही होऊ नये. मा.महापौरांना मी शुभेच्छा देतो की, आपण चांगल्या प्रकारे सभागृहाचं कामकाज चालवाल अशी आशा करतो. जसं नामदेव ढाकेवर झालेला अन्याय दूर केला तसंच इतर सगळयावर झालेला अन्याय दूर व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

मा.केशव घोळवे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आज याठिकाणी आमचे मित्र आणि कामगार मित्र नामदेवराव ढाके यांची सत्तारुढ पक्षनेतेपदी निवड झाली त्याबद्दल त्यांच्या भावी कारकीर्दीसाठी मनपुर्वक हार्दीक शुभेच्छा त्याचबरोबर स्थायी समितीमध्ये नियुक्त झालेल्या सदस्यांना मनापासून शुभेच्छा देतो. खरोखरच कामगार क्षेत्रामध्ये एक चांगल प्रेमळ आणि एक अजात शत्रु असं व्यक्तीमत्व या पिंपरी चिंचवड शहरामध्ये टाटा मोटर्स या नामवंत कंपन्यामध्ये काम करीत असताना कामगारांच्या मनामध्ये त्यांनी प्रतिमा निर्माण केली आणि या शहराचं भूषण म्हणजे टाटा मोटर्स याठिकाणी त्यांनी मनोभावे कार्य केलं. आणि म्हणुन

मला असं वाटतय कामगारांचे,कष्टक-यांचे आशीर्वाद मनापासून भरभरुन मिळाले आहेत. आणि त्या आशीर्वादामुळेच नामदेव ढाके हे सत्तारुढ पक्षनेते झालेले आहेत. नामदेवरावांनी भारतीय जनता पार्टीसाठी अनेक निदर्शनं, आंदोलने केलेली आहेत.आणि म्हणुन भारतीय जनता पार्टीच्या पक्षामध्ये वाढलेलं हे व्यक्तीमत्व आहे.आणि त्यामुळे पद हे दुय्यम असत कार्यकर्त्यांसाठी खरं तर अन्याय हे आपण म्हणण्यासाठी म्हणतो परंतु त्यासाठी योग्य वेळ लागते आणि ती नामदेवराव यांच्यासाठी आलेली आहे. त्यांनी आजपर्यंत कष्टक-यांसाठी,कामगारांसाठी जे चांगलं कार्य केलेलं आहे आणि म्हणुन त्यांना हे चांगल पद मिळालेलं आहे. आणि मला खात्री आहे की, पुढील काळामध्ये ते चांगल्या प्रकारे सभागृह सांभाळतील जे एकनाथ दादांनी मागील तीन वर्षामध्ये जे चांगल कार्य केलं पुढच्या काळात त्यांचेही सहकार्य आणि मार्गदर्शन याठिकाणी मदत होणार आहे.हे सभागृह अधिक चांगल्या प्रकारे चालवतील असं मला वाटतं. मी त्यांना पुनश्च एकदा मनपुर्वक शुभेच्छा देतो आणि थांबतो.

मा. नितीन काळजे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आज सत्तारुढ पक्षनेतेपदी आमचे मित्र नामदेवराव ढाके यांची निवड झाली ही निवड अतिशय योग्य पध्दतीने झालेली आहे. आणि ते सर्वांना बरोबर घेऊन या सभागृहाचं कामकाज करतील अशी मला खात्री आहे. एक कामगार नेता या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सत्तारुढ पक्षनेता म्हणुन निवड झालेली आहे. आणि त्याचा आम्हांला अभिमान आहे. आणि तसंही पाहिलं तर त्यांच जास्त करुन मीच आभार मानायला पाहिजे. कारण आता सगळयांनी सांगितलं आहे की, नामदेवरावावर अन्याय झालेला आहे. पण प्रामाणिकपणे काम करताना त्या व्यक्तीला कधीही न्याय मिळतो हे याठिकाणी दाखवून दिलेलं आहे. त्यांच्यावर जो अन्याय झालेला आहे हे त्यांनी समजून घेतलं पहिल्यांदा आपल्या भारतीय जनता पार्टीची सत्ता स्थापन झाली आणि मला महापौर पदाची संधी मिळाली. परंतु त्यांना माहिती होतं की, मागच्या पंचवार्षीक मध्ये माझ्यावर अन्याय झाला म्हणुन त्यांनी माझ्यावरचा अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी मला महापौर पदाची संधी दिली. अशा प्रकारे नामदेवराव ढाके हे चांगलं काम करतील अशी अशा करतो आणि थांबतो जयहिंद,जयमहाराष्ट्र.

मा.राहुल जाधव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह सभागृहामध्ये आज एक नवीन पक्षनेते म्हणुन आदरणीय नामदेवराव ढाके यांची भारतीय जनता पक्षाने निवड केली आहे. त्याच बरोबर स्थायी समिती सदस्य पदावर सदस्यांची निवड केलेली आहे. या सर्वांच मी मनापासून स्वागत करतो. त्यांच्या पुढील वाटचालीस

मी मनापासून शुभेच्छा देतो. ब-याच सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त करुन याठिकाणी शुभेच्छा दिलेल्या आहेत. त्याच बरोबर उदयान विभागामध्ये अनेक वर्षापासून काम करणारे सुरेश साळुंके साहेब हे २९ फेब्रु.२० रोजी सेवानिवृत्त होत आहेत त्यांनाही शुभेच्छा देतो. साळुंके साहेबांनी पिंपरी चिंचवड शहरासाठी जे योगदान दिलेलं आहे तसेच त्यांनी सेवानिवृत झाल्यानंतर त्यांनी आपल्या वैयक्तीक विषयांकडे आणि आपल्या परिवारासी योगदान द्यावं कारण त्यांनी या पिंपरी चिंचवड शहरासाठी अतिश्य प्रामाणिकपणाने योगदान दिलेलं आहे. याठिकाणी नामदेव ढाके यांच्याबाबतीत बोलायचं झालं तर अतिशय प्रामाणिक कार्यकर्ता म्हणुन त्यांची ओळख आहे. आणि भाऊसाहेब भोईर यांनी देखील नामदेव ढाके यांचा चांगला परिचय सांगितला आहे. नामदेवराव ढाके आता सत्तारुढ पक्षनेते झालेले आहेत. कदाचित त्यांना भाऊसाहेबांनी लवकर जर का त्यांना जवळ केलं असत तर कदाचित हेच पद त्यांना कित्येक वर्षापूर्वी आगोदरच भेटलं असतं परंतु एक मैत्रीचं नातं म्हणुन भाऊसाहेबांनी त्यांची प्रशंसा चांगली केलेली आहे. मी नामदेवरावांना शुभेच्छा देतो. ज्या पध्दतीनं एकनाथदादांनी सभागृह चालवलं तशाच पध्दतीने विरोधकांना बरोबर घेऊन त्यानंतर सत्ताधा-यांना बरोबर घेवुन हे सभागृह पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरिकांसाठी आणि विकासासाठी म्हणुन चांगल्या पध्दतीनं आपण चालवावं अशी आम्हांला अपेक्षा आहेत भविष्यामध्ये तुमच्याकडून सत्ताधारी असो अथवा विरोधी पक्षाचे सदस्य असो खूप अपेक्षा आहेत आणि त्या पुर्ण करण्यासाठी आपण कायम प्रयत्नशिल राहिलेले आहात. आणि आम्हांला देखील सहकार्य कराल अशी आशा बाळगतो. आणि पुढील कार्यासाठी बापु काटेंना देखील शुभेच्छा देतो. बापु काळजी करु नका, विरोधकांचं हेच काम असतं पण एक लक्षात ठेवा रावसाहेब दानवे हे प्रदेशाध्यक्ष होते त्यांनी देखील पिंपरी चिंचवड शहरामध्ये येऊन सांगितलं होतं की, रात्री दिड वाजता फोन करुन साबळे साहेबांना राज्यसभेसाठी उमेदवारी दिली आहे. तेंव्हा तुम्हांलाही आमच्यापेक्षा एखादं मोठं पद भेटू शकतं. याची खात्री देतो. त्यामुळे बापु अजिबात चिंता करु नका. भारतीय जनता पार्टीमध्ये सर्वांना न्याय मिळतो. आणि यासाठी मी तुम्हांला शुभेच्छा देतो.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आपल्या सर्वांचे मित्र नामदेवराव ढाके यांची सत्ताधारी पक्षनेता म्हणुन निवड झाली त्यांचे मी आमच्या पक्षातर्फे शुभेच्छा देतो. शुभेच्छा देताना नामदेवरावाकडुन एक अपेक्षा व्यक्त करतो की, ज्याप्रमाणे एकनाथरावांनी सुरुवातीच्या काळात नाही पण नंतरच्या काळात ज्याप्रमाणे खेळीमेळीच्या वातावरणात हे सभागृह चालवण्याचा जो प्रयत्न केला असा प्रयत्न आपल्याकडुन देखील केला जावा अशी अपेक्षा करतो. आणि

ज्याप्रमाणे सदस्यांनी सांगितलं आहे की, कामगार नेता, सच्चा कार्यकर्ता असा उल्लेख केला आहे. उशिरा का होईना कुठल्या ना कुठल्या माध्यमातुन तुम्हांला हे पद दिलेलं आहे त्यामुळे तुमच्या पक्षाचं देखील याठिकाणी आभार मानतो. सिमाताई जरी म्हणत असल्या की, आपण म्हातारपणाकडे झुकतोय तरी तुम्हांला हे पद आल्यानंतर तुम्हांला एक निश्चित उत्साह निर्माण होईल. आणि नामदेवराव ज्येष्ठ आहेत म्हणुन त्यांना हे पद मिळालं आहे असे सांगितले आहे पण बापु तु अजिबात काळजी करु नकोस तु डायरेक्ट खासदार होणार आहे. त्यामुळे या सगळया गोष्टी राजकारणात चालत असतात. स्थायी समिती सदस्य पदावर आलेल्या सदस्यांच देखील मी अभिनंदन करतो. आणि नामदेवरावाकडनं पुन्हा एकदा अपेक्षा व्यक्त करतो की, त्याच्यामुळे पण भाषण करताना देखील भान ठेवावं की, आपल्या समोर माईक आहे. आणि हे सभागृह चांगल्या प्रकारे चालवाल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि पार्टी मिटींगमध्ये जे निर्णय घेणार तेच या सभागृहामध्ये घ्या. फक्त सर्वांना विश्वासात घेऊन करावे. शहराच्या हिताचे विषय ठेवा. कारण आजच एक विषय व्यवसायिकांच्या हिताचा विषय आहे. तुम्ही शहराच्या विकासाचे विषय मंजुर केलेत तर आम्ही तुमच्या बरोबर आहोत. धन्यवाद जयमहाराष्ट्र.

मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह खरं तर आमचे सहकारी मित्र आदरणीय नामदेवराव ढाके यांची सत्तारुढ पक्षनेते या पदावर निवड झालेली आहे. त्याबद्दल मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. त्याच बरोबर स्थायी समिती सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांचेही मी अभिनंदन करतो. आणि शुभेच्छा देतो. शुभेच्छा देत असताना सर्वांनी सांगितलेलं आहे की, नामदेव ढाके हे कामगार नेतृत्व आहे. कारण गेली अनेक वर्ष टेल्कोचा माझा जवळचा संबंध असल्या कारणानं जेवढे लिडर त्या टेल्कोमध्ये झाले त्यांचा संबंध आला आणि गेल्या वर्षी पासून टेल्कोशी संबंध आल्यामुळे नामदेवरावांना मी जवळून पाहिलेलं आहे. आणि जास्त जवळून म्हणले तर नामदेवरावांनी आंदोलनाच्या वेळी लाठयाकाठया खाललेल्या कार्यकर्त्यांना भाजपाने त्यांना न्याय दिलेला आहे त्याबद्दल मी पुनश्च एकदा आपले अभिनंदन करतो. नामदेवरावांना मी विनंती करतो की, सभागृह चालवित असताना नागरीकांच्या हिताचा जो काही विषय असेल तो आपआपल्या परीने मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. लोकहिताच्या ज्या काही सूचना येत असतील तर त्याचा नक्कीच विचार व्हावा. त्याच बरोबर राहूल दादांनी सांगितलं की,बापू तुम्हांला आमच्या लाख,लाख शुभेच्छा तुम्हांला काही आमची मदत लागली तर आम्ही आमच्या साहेबांना सांगुन तिकडे मदत करण्यास सांगू. पण आपल्यालाही न्याय मिळावा अशी आमची इच्छा आहे. तुम्ही मनसेत

असताना सभागृहात आलेले आहात. माझं म्हणणं काय आहे ते तुम्हाला कळलंच आहे. आम्ही पक्षाशी एकनिष्ठ असणारे कार्यकर्ते आहोत. आमच्या राष्ट्रवादीत थोडं फार काही घडलं असेल पण निदान तिकडं गेल तर काही तरी न्याय मिळेल. अशी अपेक्षा होती. पण ती निराशा आज ब-याच जणांच्या चेह-यावर मी आज पहातो आहे. स्थायी समितीमध्ये राष्ट्रवादीच्या दोन सदस्यांना आणि भाजपाच्या ६ सदस्यांना संधी द्यायची होती. सगळयांना स्थायी समितीमध्ये येण्याची इच्छा असते पण सगळयांना संधी देवु शकत नाही. जे नियम असतात त्याप्रमाणे आपण केलेल आहे त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. उदयान विभागाचे मुख्य उद्यान अधिक्षक सुरेश साळुंके यांना या महापालिकेत काम करीत असताना त्यांच्याकडुन काही चुका झालेल्या असतील त्याबद्दल त्यांना त्रासही झालेला असेल असे मला वाटते. जीवनामध्ये काम करीत असताना ज्या काही चुका झालेल्या असतील त्यावेळेस आमच्या सारख्या एखादया नगरसेवकांने जरी बोलले असेल ते आम्हाला असलेल्या अधिकारामुळे बोलले असेल अशा घटना गेल्या २० वर्षाच्या काळामध्ये घडल्या असतील पण त्यांना या शेवटच्या दिवशी त्यांची दिलगीरी व्यक्त करतो आणि त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांना शुभेच्छा देतो.

मा.माधवी राजापुरे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५०९ विषय क्रमांक- २

दिनांक २६/२/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.कर/मुख्य/९/कावि/०६/२०२०, दि.०४/०१/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३२ दि.५/२/२०२० अन्वये.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. तसेच अधिनियमातील कलम 99 नुसार महापालिकेने याबाबत कराचे दर ठरविणेकामी मा.स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याचे 20 तारखेला किंवा तत्पूर्वी निश्चित केले पाहिजेत. सध्याचे करयोग्य मूल्य ठरविणेकामी प्रती चौरस दर हे सन 2015-2016 मान्य करण्यात आलेले आहेत. तसेच कराचे दरामध्ये सन 2013-2014 पासून कोणतीही दरवाढ करणेत आलेली नाही. अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार जुन्या मिळकतींचे करयोग्यमूल्याचे पुर्न:मुल्यांकन करुन त्यानुसार येणा-या नवीन करयोग्यमूल्यावर मिळकत कराचे

बिल लागू करता येईल. याकामी सन 2020-2021 करिता करयोग्यमूल्य ठरविण्यासाठी दोन पध्दतीनुसार सादरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच सोबत खालील पध्दत 1 व पध्दत 2 नुसार सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

पध्दत 1. करयोग्य मूल्य पध्दतीने (रेडी रेकनरचा आधार घेऊन पारंपारिक पध्दतीने)
पध्दत 2. भांडवलीमूल्य पध्दतीने (शासन अधिनियम क्रमांक १०/२०१० दिनांक २७ एप्रिल २०१० नुसार)

वरीलपैकी उचित पध्दतीस करयोग्यमूल्य व कराचे दरास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दसरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सिमा चौगूले – मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

मा.नगरसचिव - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. तसेच अधिनियमातील कलम 99 नुसार महापालिकेने याबाबत कराचे दर ठरविणेकामी मा.स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याचे 20 तारखेला किंवा तत्पूर्वी निश्चित केले पाहिजेत.

(गोंधळ)

मा.महापौर – सन्मा.सदस्यांनी गोंधळ करु नये सर्वांनी खाली बसुन घ्यावे. या विषयाची माहिती मा.आयुक्त साहेब देतील.

(गोंधळ)

मा.आयुक्त – मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह आता जो विषय सभागृहासमोर आणलेला होता हा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील विविध तरतुदींच्या अनुसार सभागृहासमोर आलेला होता. शहरातील इमारती व मोकळया इमारतींचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. महाराष्ट्र महानगरपालिकेचा विकसीत व अविकसीत भाग विचारात घेऊन यापुर्वी २००२ व २००३ पासून अ/ब/क/ ड या चार विभागामध्ये शहराची विभागणी करणेत आलेली होती. २०१९-२० पासून ड भाग रद्य करुन अ/ब/क या तीन भागामध्ये विभागणी करुन आपण करयोग्य मुल्यासाठी विभागणी केली होती.

सन २००२ पर्यंत करयोग्य मुल्य निर्धारणाची जी पध्दत होती ती करसंकलन विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील इमारतीची करआकारणी एमएमसी ऍक्ट मधील कलम १२७ व १२९ तरतुदीनुसार करणेत आलेली होती. करआकारणीच्या कामकाजामध्ये सुसूत्रता व पारदर्शीपणा येण्याच्या दृष्टीने महापालिका कार्यक्षेत्रामध्ये सन १९९० पासून मिळकतीचा वापर आणि बांधकामाचा दर्जा विचारात घेवुन प्रति चौरस फुटाचे करयोग्यमुल्य निश्चित केले होते. करयोग्य मुल्य निश्चित करण्यासाठी जी पध्दत होती ती वार्षीक करयोग्य मुल्य हे मिळकतीचे एकुण क्षेत्रफळ गुणिले मिळकत वापराचे प्रती चौरस फुट दर हे आपण त्यावेळेला काढलेला होता. त्यानुसार आपण कॅलक्युलेट करीत होतो.मिळकतकरासाठी हे करयोग्यमुल्य क्षेत्रफळाचा आणि त्याला त्यावेळेला कराची टक्केवारी याला गुणल्यानंतर जे ऍक्च्युल येत असे ते आपलं बील असतं या पध्दतीने आपले कराचे बील निश्चित केलं जात होत २००२ मध्ये आपण झोनिंग केलल होत त्यावेळेला अ/ब/क/ड क्षेत्रासाठी स्केअर फुटनुसार दर निश्चित केलेले होते. झोनिंग व मिळकतीच्या वापरानुसार अ/ब/क क्षेत्रानुसार आपण दोन्हीचे दर पाहिले तर त्यात ९०-९१ मध्ये पाहिले तर साधारणता ५ रु.४० पैसे घरासाठी आणि २१ रु.६० पैसे बिगर निवासी यासाठी प्रती चौरसफुट या दरापासून सुरुवात करुन २०१५-१६ मध्ये जी शेवटची सुधारणा केली त्याच्यामध्ये २९.९४ रु.निवासासाठी आणि ८९.४२ रु.बिगरनिवासी हे दर यापुर्वी करयोग्यमुल्यासाठी जाहीर केलेले आहेत. करयोग्य मुल्य निर्धारीत करीत असताना आजची परिस्थिती लक्षात घेवुन आणि यापुर्वी जी प्रक्रीया राबविण्यात आलेली होती त्यानुसार प्रस्ताव ठेवणेत आलेला होता. करयोग्यमुल्य निर्धारणाच्या प्रक्रीयेमध्ये वेळोवेळी ज्या ज्या सुधारणा करण्यात आल्या २००२ मध्ये असेल,२००७ मध्ये असेल किंवा २०१५-१६ मध्ये असेल त्यावेळेला करयोग्यमुल्य निर्धारित करीत असताना त्या निर्धारीत दिनांकानंतर निर्माण झालेल्या प्रॉपर्टीजवर करनिर्धारण करण्यात आलेलं नव्हतं जुन्या प्रॉपर्टीजचं करयोग्य मुल्य बदलण्यात आलेलं नव्हतं त्यामुळे तफावत निर्माण झालेली होती. ती तफावत दूर करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आलेला आहे. नवीन करयोग्यमुल्य निर्धारण यावेळेला करण्यात आलेलं नाही. केवळ जे प्रॉस्पेक्टीव्ह लागू करण्यात आलेलं होतं त्यामध्ये यावेळेला सुधारणा करण्यात आलेली आहे. महानगरपालिका अधिनियमातील करयोग्यमुल्याचं निर्धारण केल्यानंतर दरवर्षी फेब्रुवारीच्या २० तारखेच्या पूर्वी सर्वसाधारण सभेने करांचे दर निश्चित करणे अपेक्षीत आहे. तसेच महानगरपालिका अधिनियमामध्ये दोन तरतुदी आहेत एक

तर करयोग्यमुल्य निर्धारण पध्दतीने आकारणी करणे अथवा भांडवलीमुल्य पध्दतीने आकारणी करणे आपल्याकडे आजतागायत करयोग्य मुल्य निर्धारण पध्दतीने करआकारणी करण्यात येत आहे. सभागृहासमोर विषय आणताना दोन्ही पध्दती नमुद केलेल्या होत्या विषयपत्रामध्ये दोन्ही पध्दतीचा उल्लेख केलेला आहे. भांडवलीमुल्य पध्दतीमध्ये जी पध्दत आहे त्यामध्ये एकुण इमारतीचं भांडवलीमुल्य निश्चित करुन ते भांडवलीमुल्य निश्चित करीत असताना क्षेत्रफळ गुणिले बाजारमुल्य गुणिले बांधकामाचा दर्जा आणि वापर गुणांक यांचा गुणाकार करुन ते निश्चित करण्याची तरतुद अधिनियमामध्ये आहे. मात्र हा निर्णय सभागृहानं कुठली पध्दत अवलंबायची तो घेणं अपेक्षीत होतं जर भांडवलीमुल्य ही पध्दत अवलंबली गेली असती तर त्याच्यासाठी सुध्दा असेसमेंट करीत असताना टॅक्स रेट ० ते टक्के भांडवलीमुल्याचा अभाव ठरवण्याचा अधिकार देखील सभागृहाचा होता. आणि या निर्णयासाठी सभागृहासमोर हा विषय आलेला होता. मात्र २० फेब्रुवारी पुर्वी हा निर्णय होऊ शकला नाही. टॅक्स रेट मध्ये कुठलाही बदल सभागृहासमोर प्रस्तावित करु शकणार नाही. आणि त्याप्रमाणे आताच महापौरांनी घोषित केल्याप्रमाणे स्थायी समितीची जी शिफारस होती विषय दप्तरी दाखल करणेत यावा त्यालाच मा.महापौरांनी घोषीत केल्याप्रमाणे स्थायी समितीने जी शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे विषय मंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे. एवढंच मी निवेदन सादर करतो.अधिक काही माहिती लागल्यास ती सादर करु शकतो. मी एक गोष्टीचा खुलासा करतो की, करयोग्यमुल्यामध्ये सुधारणा व्हावी असा प्रस्तावित केलेला आहे. तो मात्र लागु करण्यात येईल करयोग्यमुल्यामध्ये आम्ही सुधार केलेला नाही. त्यामुळे अ विभागासाठी २९ रु. रेट आहे ते २९ रु.च राहणार आहेत.प्रस्तावित कार्यपध्दतीमध्ये बदल एवढाच केलेला आहे की, यापुर्वी पुनश्च सांगतो की, २००२, २००७-०८ किंवा २०१५-१६ मध्ये ज्या ज्यावेळेला करयोग्यमुल्य बदललं त्यावेळेला त्या दिनांकाच्यानंतर स्थापन झालेल्या इमारतींचच फक्त करयोग्य मुल्य बदलण्यात आलेलं आहे. त्यामुळे आज शहरामध्ये करयोग्यमुल्यामध्ये खुप मोठया प्रमाणात तफावत निर्माण झालेली आहे. ती तफावत अशी आहे की,जी ९०-९१ सालची इमारत आहे त्यांना करयोग्यमुल्याचा दर प्रती चौरसफुटाचा ५ रु.४० पैसे इतका असुन जी इमारत २०१५-१६ नंतर अस्तित्वात आलेली आहे तिचा करयोग्यमुल्याचा दर प्रती चौरसफुट तिचा रु.२९.९४ पैसे हा निवासी इमारतीसाठी आहे. म्हणजे आजच शहरामध्ये अस्तित्वात असलेल्या जुन्या आणि नवीन इमारतीमध्ये पाच पटीच्या पेक्षा जास्त फरक /तफावत आजच्या

अस्तितवातील इमारतीमध्ये आहे. आणि त्यामुळे अनेक वर्षाच्या कालावधीमध्ये जुन्या इमारतींचा कर आणि नवीन इमारतींचा कर याच्यामध्ये एकाच भागामध्ये जरी सुविधा समान असल्या तरी खुप मोठया प्रमाणामध्ये फरक आहे. दुसरी गोष्ट अशी की, करयोग्यमुल्य हे साधारणता त्या भागामध्ये मालमत्ताधारकाकडन जो रेंट आकारले जातो त्यानुसार त्या रेंटवरती निश्चित करण्याची तरतुद आहे. २००२ पासूनचा जरी आपण विचार केला गेला तरी बाजारमुल्यामध्ये सुध्दा अनेक बदल होत गेलेले आहेत. ही बाब देखील आपल्याला विचारात घेतली गेली पाहिजे. आणि त्यामुळे या संपुर्ण पध्दतीमध्ये सुसूत्रता आणण्याच्या हेतूने आपण करयोग्यमुल्याच्या कॅलक्युलेशनमध्ये सुधारणा प्रस्तावित केलेली आहे. यासाठी प्रमाण वर्ष अनेकांच्या मनामध्ये संदेह असतील प्रमाण वर्ष कुठलं धरलं जाणार तर २०२०-२१ पासून हे प्रमाण वर्ष धरलं जाणार आहे. त्यामुळे पाठीमागुन कुठलेही रिकव्हरीसाठी आपण कुणाकडेही जाणार नाही. याच्यापुढे असेसमेंट करीत असताना पर स्केअरफुटचं मुल्य हे बेस रु.२९.९४ पैसे गृहीत धरुन करणार आहे. सध्याच्या या पध्दतीत करांमध्ये त्या त्या विभागातील प्रती चौरसफुट दर प्रत्येक वर्षातील मिळकतींना लागू करण्यात येणार आहे. सध्याचे दर जुन्या मिळकतींना लागू करताना हे लक्षात घेण्याची बाब आहे. जसेच्या तसे जुन्या इमारतींना हे दर लागू करण्यात येणार नाहीत. त्याच्यामध्ये सध्याचे दर जुन्या मिळकतींना लागू करताना महाराष्ट्र शासनाच्या रेडीरेकनरच्या मिळकतींना घसारा लागु करण्याची जी पध्दत आहे ती पध्दत अवलंबण्यात येत आहे. उदा.द्यायचे झाले तर ० ते २ वर्षाच्या इमारतीला घसारा ० टक्के लागु करण्यात येईल. इमारतीचे वय ३ ते ५ वर्ष असेल तर ५ टक्के घसारा लागु राहील. अशा पध्दतीने करीत करीत २५ ते ३० वर्ष इमारतीच वय असेल तर ३० टक्के घसारा लागू करण्याची पध्दत आहे. या पध्दतीनुसार जुन्या इमारतींना ३० टक्के घसारा करयोग्यमुल्यामध्ये मिळणार आहे. यामध्ये आपल्याला उदा.द्यायचे झाले तर २०१५-१६ मध्ये २००२-२००३ ची इमारत उदा.म्हणुन घ्यायची वेळ आली तर प्रचलित करयोग्यमुल्यानुसार आज २००२-०३ च्या इमारतीसाठी करयोग्यमुल्याच्या अ विभागासाठी मिळकतीचा दर रु.८.६४ पैसे दर आहे. त्यानुसार जर आपण साधारणता १००० स्केअरफुटाची इमारत विचारात घेतली तर तिचं करयोग्यमुल्य ४३२० रु.होतं जर त्याच बील काढलं तर आजच्या कराच्या टक्केवारीनुसार रु.१७७१/- इतकं येतं. जर आजच्या २०१९-२० चे करयोग्यमुल्य लावलं तर रु.२९.९४ पैसे आहे आणि त्याला ८० टक्क्याचा घसारा लागु होईल. त्याच्या अनुषंगाने २०१९-२० च्या तुलनेत प्रत्यक्ष दर

त्याच्यावरती रु.२३.९५ पैसे होतील. आणि करयोग्यमुल्य रु.११९७५/- होईल. बील रक्कम रु. ५०३०/- होईल. त्यामुळे करयोग्यमुल्य याची तफावत आपण पाहिली तर साधारणता रु. ३२००/- ची तफावत ही २००२-०३ च्या १००० स्केअरफुटाच्या घरावरती राहील. आणि आता आपण प्रस्तावीत केलेली होती जर ती दुप्पट वाढीला केली तर रु.२५५६/- इतका बिलामागे निश्चित होईल. मात्र हा निर्णय आपल्याला २० फेबु.ला घेणं अपेक्षित होतं. त्यामुळे आजची जी परिस्थिती आहे आम्ही जो प्रस्तावित केलेला करवाढीचा प्रस्ताव आहे. तो आज लागु होईल.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आयुक्त साहेब माझा पहिला मुद्या हा आहे की, तुम्ही अनुसूची ड प्रकरण ८ नियम २० मधील तरतुदीनुसार करयोग्यमुल्य निश्चित करण्याचा अधिकार आहे परंतु ते डिटेल मध्ये वाचल्यानंतर असं लक्षात येतं की, इललिगल केस मध्ये तसा तुम्हांला अधिकार आहे. एखादा इललिगल केसमध्ये तुमच्याकडे आला तर त्याला तुम्ही तशा पध्दतीनं चेंजेस करु शकता असा त्याचा अर्थ मला यामधुन दिसतं संपुर्ण शहरासाठी तुम्हांला तसा अधिकार नाही अस मला वाटतय. आणि हा निर्णय २० फेब्रुवारीच्या आत होण अपेक्षीत आहे. खरं म्हणजे मागची जीबी तुम्ही तहकुब करायला नको होती. शहराच्या दृष्टीने एवढा महत्वाचा विषय असताना या विषयावर चर्चा व्हायला पाहिजे होती. परंतु ती झाली नाही. संपुर्ण शहरातील जुन्या मिळकतीच्या मिळकतधारकांना याचा फटका बसणार आहे. आणि आयुक्त साहेबांनी आता जो उदा.देवुन खुलासा केलेला आहे त्यामध्ये १०० टक्के वाढ होणार आहे. म्हणजे हे कुठे तरी अन्यायकारक होत आहे. आयुक्त साहेबांना जो अधिकार आहे त्याप्रमाणे त्यांनी बदल करावा. आम्ही शास्तीकर १०० टक्के माफ करणेत यावा अशी मागणी करीत होतो. परंतु तुम्ही तसं न करता त्यामध्ये स्लॅब केले. आज अशी परिस्थिती आहे की, लोक शास्तीकरही भरत नाहीत आणि रेग्युलर करही भरत नाहीत. त्यामुळे महापालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे. प्रशासनाने महापालिकेचे आर्थीक उत्पन्न वाढावे यासाठी विषय आणलेला आहे. पुर्वी २००२ ते २००६ सालापर्यंत आपले .८० पैसे हा आपला दर महिन्याचा रेट होता तो साधारणपणे ९ रु.६० पैसे होता.त्याच्यावरती आपण १० टक्के कमी करीत होतो. २००६ नंतर १९ रु.२० पैसे झाला २००८ ला २२ रु. ८० पैसे आणि त्याच्यावर १० टक्के झाला. असे टप्याटप्याने आपला आताचा दर २९ रु.९४ पैसे झाला आहे. यामध्ये जी त्रुटी आहे ती मी आपल्या

निदर्शनास आणु देवु इच्छितो. आपल्याकडे अ/ब/क असे तीन विभाग आहेत. अ विभागात जुनी जी गावे आहेत, ब विभागात नव्याने समाविष्ठ झालेली गावे आहेत मी कोणत्या गावाचं नाव घेवु इच्छित नाही पण त्या गावामध्ये असणा-या घरांना भाडं जास्त मिळतं. आता अ विभागामध्ये भोसरी आणि सांगवी हा भाग आहे याठिकाणी सारखा रेट आहे. तुम्ही काय म्हणता भाडं किती येत यावर टॅक्सची आकारणी करणार आहे. परंतु आपण अ/ब/क विभाग केलेले आहेत त्यामध्ये चुक आहे. ती ख-या अर्थाने दुरुस्त व्हायला पाहिजे. दुसरं म्हणजे एखादी बिल्डींग कर्मशियल आहे त्यामध्ये तीन मजले असतील तर त्यामध्ये फर्स्ट फलोअरला, २ फ्लोअरला आणि ३ फ्लोअरला पण तोच रेट आहे. हा अन्याय होत आहे. ग्राऊंड फ्लोअरच्या मार्केटचा आणि वरच्या मजल्याच्या मार्केटचा जर आपण विचार केला तर यामध्ये खुप मोठी तफावत आहे. ही सुध्दा यामध्ये दुरुस्ती झाली पाहिजे. तसेच आपल्याकडे इंडस्ट्रीयल झोन आहेत त्यामध्ये जे पुर्वीचे कारखाने आहेत त्यांना आपण कंन्स्ट्रक्शन कॉस्टप्रमाणे टॅक्स आकारतो. आणि आज नव्याने जे करणार आहोत त्यामध्ये प्रचंड तफावत आहे. याठिकाणीही आपण दुरुस्ती केली असती तर महापालिकेचे उत्पन्न वाढले असते. आता आपले पक्षनेते हे कामगार क्षेत्रातले आहेत या भागामध्ये अनेक कामगारांचे घरे आहेत त्यांना न्याय दिला पाहिजे. आयुक्त साहेब आपल्याला अधिकार आहेत पण आम्हांला टॅक्स डिपार्टमेंटकडनं सांगितलं जायचं की, पूर्वलक्षी प्रभावाने टॅक्सची आकारणी करता येत नाही. यामध्ये ज्या त्रुटी आहेत त्या दुरुस्त झाल्या पाहिजेत. अशी माझी विनंती आहे.

मा.संदीप वाघेरे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह वास्तविक पहाता २० तारखेच्या जीबी ला हा विषय आला होता. त्यानंतर जीबी तहकुब झाली आणि आयुक्तांच म्हणणं आहे की, हा विषय मंजुर झाला. मा.महापौर साहेब, २/३ महिन्यापुर्वी ५०० स्केअरफुटाचे ज्यांचे घर आहे त्यांचा टॅक्स माफ केलेला आहे. आणि ज्यांच्या २००६ च्या आतील प्रॉपटर्या आहेत त्यांना अडीच पट वाढ होणार आहे. साधारणपणे ही नगरपालिका १९७० साली स्थापन झाली आणि आज २०२० म्हणजे या ५० वर्षाच्या काळामध्ये काही जण १/२ गुंठा जागा घेऊन बाहेरुन या शहरात रहायला आले पूर्ण भारतातून याठिकाणी लोक येऊन स्थायिक झाले. १९७१ साली या शहराची लोकसंख्या ७१ हजार होती. आज ती २७ लाख झाली आहे. म्हणजे तुम्ही ३ महिन्यापुर्वी जो विषय केला ५०० स्केअरफुटापर्यंतचा टॅक्स माफ केलेला आहे. आज जर ६००० रु.टॅक्स येत असेल

तर त्यामध्ये अडीच पट वाढ होणार आहे. आजच्याच पेपरला बातमी आहे २००० कोटीचा टॅक्स थकीत आहे. १० लाख रु.थकबाकी असलेल्यांची संख्या जास्त आहे. आपण प्रॉपर्टी जप्त करुन त्याचा लिलाव करणार आहे का? मा.महापौर साहेब, या विषयाची माहिती सर्वांना समजुन सांगितली पाहिजे. लोकांना आपण ज्या सुविधा द्यायला पाहिजेत त्या देत नाहीत. आपल्या महापालिकेचे बजेट ६६०० कोटीच आहे हे बजेट केंद्राचे जे पैसे येणार आहेत त्यानुसार बनवले आहे. शेजारच्या महापालिकेचे बजेट हे ७२०० कोटीचे आहे. त्या महापालिकेच्या भागामध्ये जाऊन बघा त्या ठिकाणच्या सुविधा कशा आहेत ते त्याठिकाणी जाऊन बघा पिंपरी चिंचवड च-होली मधील कर्मचारी पुणे महापालिकेमध्ये आरोग्याधिकारी आहे त्यांनी त्याठिकाणी आरोग्याची कशी शिस्त लावली आहे ते बघा. ज्यांनी १/२ गुंठा जागा घेऊन घरे बांधलेली आहेत त्यांच्यावर अन्याय झाला नाही पाहिजे. २ वर्षानंतर आपल्याला याची फळं भोगावी लागतील. जसं राष्ट्रवादीच्या काळात शास्तीकर मंजुर केला त्यानंतर त्यांची सत्ता गेली.टॅक्सचा विषय अजुन मंजुर झालेला नाही. आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, या शहराला झिझिया कर लावू नका. या विषयाचा अभ्यास करुन एखादया वेळेस कायदा विभागाचे मत घेवुन यामधुन आपल्याला कसे बाहेर पडता येईल याचा विचार करावा. एवढं बोलून थांबतो.

मा.ॲड.सचिन भोसले - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरं तर हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठीचा विषय आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. अनुसूची ड मध्ये असे म्हणले आहे की, ज्या कोणत्याही जमीनीचे किंवा इमारतीचे मुल्य चुकीचे ठरविण्यात आले असेल तर किंवा तिची आकारणी लबाडीने अवैद्यपणे किंवा चुकीच्या प्रकारे झालेली असेल तर त्या जमीनीवरील किंवा इमारतीवरील आकारणी फेरफार करुन आयुक्त साहेब, सगळयात मुद्या असा आहे की, याच्यानुसार पुर्वी ज्या नोंदी झालेल्या होत्या त्या चुकीच्या झालेल्या होत्या की काय हा सर्वात पहिला मोठा विषय आहे. त्याची माहिती प्रथम दिली पाहिजे. ऍक्ट तुम्ही सविस्तर वाचुन पहा. यामध्ये आपलेकडुन चुकीचं काय व्हायला नको. आपण करआकारणी करतो परंतु नागरीकांना आपण ज्या सुविधा द्यायला पाहिजे त्या देवु शकतो का एकीकडे सुविधांचाअभाव आहे आणि दुसरीकडे तुम्ही करवाढ करता हा निर्णय चुकीचा होईल असे मला वाटतंय आणि हा विषय मंजुर करायचा असेल तर त्याला

आमचा स्पष्टपणे विरोध राहील. विषय मंजुर करुन दप्तरी दाखल करता येत नाही. त्यामुळे मा.महापौर या विषयाला आमचा विरोध आहे तो नोंदवुन घेणेत यावा.

मा. दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खर तर पिंपरी चिंचवड शहराला एक नवीन हिटलर आयुक्त मिळाला असं म्हणलं तरी वावगं ठरणार नाही आज या सभागृहामधील भाजपच्या सर्व सुज्ञ नगरसेवकांच मी अभिनंदन करतो की, त्यामध्ये एक मुकसंमती म्हणुन आपण या विषयाला मंजुरी देण्याच काम केलेलं आहे. खरं तर हा विषय आणायचा होता तर १५ फेब्रुवारीच्या आत आणणे आवश्यक होतं. १ जानेवारीची सभा झाली त्यानंतरही सभा झाली त्यावेळेस विषय आणला नाही. मा.महापौर साहेब, सत्तारुढ पक्षनेते आजी आणि माजी यांच्यावर आरोप करतो की, आम्ही पोटतिडकीने सांगत होतो की, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. या विषयावर चर्चा झाली पाहिजे. शास्तीकराचा विषय सुध्दा असाच ६ महिने ठेवला गेला. त्यानंतर तो फेटाळला गेला आणि तो शासनाकडे गेल्यानंतर तो आपल्या बोकांडी बसलेला आहे. याठिकाणी अ/ब/क विभाग केलेले आहेत. या शहरामध्ये काही ठिकाणी रस्ते नाहीत,पुरेसे पाणी नाही, आवश्यक सुविधा नाहीत, रस्त्याचे वाटोळे झालेले आहे तिथं तुम्ही कर वाढवायचे म्हणता. हीच जनरल बॉडी त्याच दिवशी श्रध्दांजली वाहून किमान ४ तास जरी चाललीअसती तरी भाजपाचे जे धुर्त नगरसेवक आहेत त्यांच्याही लक्षात यायला पाहिजे होतं की, हा विषय २० तारखेपर्यंत मंजुर केला नाही तर आयुक्त आपल्यावर त्यांचे निर्णय लादणार आहेत. हे ही आयुक्तांनी जाहीरपणे सांगितले आहे. शहरावर कर लादण्याचा आयुक्तांना अधिकार आहे आणि एखादं टेंडर चुकीचं आहे ते रद्य करा असं आपण सांगितलं म्हणतात ते मला सांगता येत नाही. म्हणजे आयुक्तांनी या शहरातील नागरीकांचा खेळ केलेला आहे. हा विषय २० फेब्रुवारीलाच का आला १५ दिवस आगोदर का आला नाही.

(गोंधळ)

मा.दत्तात्रय साने – मा.महापौर साहेब, मी बोलत असताना मध्ये कोणी बोलू नये. मी काही माझ्या घरच्यासाठी बोलत नाही. जर का कोणाला चर्चा करायची असेल तर मी बोलल्यानंतर करावी. हा विषय संपुर्ण शहराचा आहे. सर्वसामान्य नागरीकांना तुम्ही कमीत कमी २४ पट वाढ करणार आहात म्हणजे १७००

रु.च्या टॅक्सला ११०००/- रु.टॅक्स येणार आहे. आमची जुनी घरे ज्या पध्दतीची आहेत ती त्याच पध्दतीत आहेत जर का ते घर मोडलं असेल किंवा विकलं असेल आणि त्याची काही किंमत होत नसेल तर त्याला टॅक्स लादणार असाल तर हा अन्याय आहे. आयुक्त साहेब तुम्ही काय या शहरातून बदली होऊन जाणार आहात पण या शहरातील प्रत्येक नागरीक तुम्हांला शिव्या आणि शापच देणार आहे. कोणीही तुम्हांला चांगल म्हणणार नाही. आणि आयुक्त साहेब, तुमचा जो दादागीरीचा शब्द आहे हा कर आम्ही लादणारंच हा शब्द आपण माघारी घ्यावा. या सभागृहामध्ये नागरीकांनी आम्हांला यासाठीच पाठविले आहे.हा कर लादणार ही दादागीरी चालणार नाही यासाठीच आम्हांला याठिकाणी पाठविलेले आहे. कराचे दर ठरवितांना सर्व पक्षाच्या गटनेत्यांना बोलवायला पाहिजे होतं,सत्तारुढ पक्षनेत्यांना बोलवायचं होतं. त्यांना तुम्ही सांगायचं होतं. म्हणुन माझी आपल्याला विनंती आहे की, सत्तारुढ पक्षनेते आम्ही तुमचं एक कामगार नेता म्हणुन सत्कार केलेला आहे. या शहरात कामगार राहतात,सर्वसामान्य नागरीक/कामगार राहतात. या कामगारांवर तुम्ही टॅक्स लादणार असाल तर तुम्हांला हे भोगावे लागणार आहे. आणि नागरीकांना मी आव्हान करतो की, आयुक्तांनी लादलेला टॅक्स कोणीही टॅक्स भरु नका महापालिका काही घर जप्त करु शकत नाही. आयुक्तांना अशाच पध्दतीने काम करायचे असेल, नागरीकांना त्रास देण्याचं काम करायचं असेल तर हे चुकीचे आहे. आमच्या सर्व सत्तारुढ नगरसेवकांना विनंती करतो की, १/२ टक्के वाढ ठिक आहे. शहराला पाणी नाही, दिवसाआड पाणी येते आणि तरी पाणीपट्टीमध्ये वाढ करता मा.महापौर साहेब,आपण कुठल्याही करामध्ये वाढ करु नये आणि केलीच तर राष्ट्रवादीच्या वतीने आपल्याला उत्तर देणेत येईल. असे मी जाहीर आव्हान करतो आणि थांबतो.

मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह हा जो करवाढीचा विषय आहे खरं तर सभागृहातील सदस्यांचा असा भ्रम आहे की, हा विषय सत्ताधारी पक्षाने आणलेला आहे. स्थायी समितीकडुन हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठी आणलेला आहे. हे शहर सर्वांच आहे तुमचं पण आहे आणि आमचं पण आहे. खरं तर हा विषय या शहरासाठी कुठलीही करवाढ न करता जैसे थे ठेवणेत यावे अशी आमची मागणी आहे. आयुक्त साहेब, तुम्ही करवाढीचा निर्णय घेणार असाल तर आमचा सगळयांचा या गोष्टीला विरोध आहे. त्यामुळे आयुक्त साहेब ज्यावेळेस हा विषय दप्तरी दाखल करुन आपल्याकडे येईल

त्याच्यामध्ये तुम्हांला काही बदल करावयाचा असेल तर किमान आपण सर्वांना विश्वासात घ्या, सर्व पक्षाच्या गटनेत्यांना बरोबर घेऊन विषय काय आणतो त्यावर आपल्याला सूचना द्याव्या लागतील. आजपर्यंत आपण कुठल्याच गटनेत्यांची मिटींग घेतलेली नाही. खरंतर करवाढीचा मुद्या ज्यावेळेस या शहरामध्ये येतो त्यावेळेस या शहरातील जुनी आणि नवीन मिळकतकरधारकांमध्ये करांची जी तफावत असेल ती दुर करण्याचा आपण प्रयत्न करीत आहात परंतु प्रत्येक वेळेस हे सत्ताधारी पक्षाचे सदस्य होते. २००७-०८, २०१५-१६ याच्यामध्ये काहीच बदल केलेला नाही. तेंव्हा सत्ताधारी पक्षाचे सदस्य म्हणुन आम्ही या विषयाला विरोध करीत आहोत आपणही कुठलीही करवाढ करु नये जसे महापौरांनी सांगितले आहे की, हा विषय दप्तरी दाखल करुन ज्यावेळेस आपल्याकडे हा विषय येईल ज्यावेळेस आपल्याला यावर निर्णय घ्यावयाचा असेल त्यावेळेस आपण वाढ करणार असाल तर त्यावेळेस आम्ही या विषयाला विरोध करु धन्यवाद.

मा.मिनल यादव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह सर्वात प्रथम आजच्या दिवशी हा विषय होत आहे खरोखरच यावर बोलण्याची काही आवश्यकता आहे का? आम्ही सगळेजण पोटतिडकीने याठिकाणी बोलतोय पण मी कमिशनर साहेबांना विचारते की, या विषयासाठी १५ फेब्रुवारीची ही तारीख मिळाली नाही का, आता आम्हांला बोलायचे म्हणुने बोलायचे,विरोध करायचा म्हणुन करायचा आता भाजपचे नगरसेवक म्हणतात की, आम्ही हा विषय आणलेला नाही. तुम्ही वाढीव कर घेवुन शहरामध्ये नक्की कोणकोणत्या सुविधा नागरीकांना देणार आहात. ज्या सुविधा द्यायला पाहिजेत त्या तुम्हांला देता येत नाहीत. तरी तुम्ही नवीन करवाढ कशासाठी करता आहात. अडीच पट तुम्ही करवाढ केलेली आहे. आणि याचा फटका सर्वसामान्य नागरीकांना बसतो आहे. तुम्ही दिवसाआड पाणी देता आणि पाणीपट्टीमध्ये वाढ केलेली आहे.कुठल्याच सुविधा तुम्ही सर्वसामान्य नागरीकांना पुरवल्या जात नाहीत. तुम्ही एवढी मोठी करवाढ केलेली आहे ते ही कोणालाच विचारात न घेता तुम्हांला कोणाचा काही प्रेशर आहे का फक्त तुम्ही ऐकुण न ऐकल्यासारखं करीत आहात खरंच याची गरज नाही. आता वार्षीक बजेट झालेलं आहे यामध्ये माझ्या प्रभागामध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या नगरसेवकामध्ये झिरो बजेट दिलेलं आहे. काहीच तरतुद केलेली नाही. नागरीकांना तुम्ही सुविधा देत नाही तर कोणत्या अधिकाराने तुम्ही करवाढ करीत आहात. माझा आणि माझ्या पक्षाचे वतीने या करवाढीस विरोध असल्याचे जाहीर करते. आणि आमचा सगळयांचा विरोध नोंदविणेत यावा.

मा.आशा धायगुडे-शेंडगे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह ख-या अर्थानी इतका महत्वाचा विषय ज्यावेळेस आपण सभागृहा समोर आणतो. परंतु एक जबाबदार अधिकारी म्हणुन आपण एखादी वाढ करतो आणि ती वाढ अशी तशी नाही अत्यंत मोठया प्रमाणात ती वाढ आहे. तर आमचं म्हणणं आहे की, जसं बापुंनी सांगितलं आहे की, आमचा सुध्दा सत्ताधारी पक्ष म्हणुन या विषयाला विरोध आहे. कारण नागरीकांवर अन्याय होणारा विषय आहे. परंतु इतका महत्वाचा विषय असताना सुध्दा तुम्ही सगळया गटनेत्यांची बैठक घेऊन हा निर्णय सांगणे आवश्यक होते. यामध्ये ही करवाढ किती होणार आहे याच स्पष्टीकरण देणे आवश्यक होते हे आम्हांला खालनं सांगाव लागत आहे. या शहराची लोकसंख्या २५ लाख आहे आणि त्यातील आम्ही निवडक १३३ नगरसेवक आहोत तर प्रत्येक नागरीकांना त्यांना लागणा-या सुविधा देणं लागतो त्यामुळे आमचा प्रत्येक नागरीकांशी संबंध येतो. मग इतकी वाढ म्हणजेच रु.४०००/- वरुन डायरेक्ट ११००० रु.पर्यंत होणार आहे म्हणजे अडीच पट वाढ होणार आहे. आणि ही अडीच पट वाढ करीत असताना आमचे विरोधी पक्षनेते असो, सत्ताधारी पक्षनेते असो, गटनेते असो या सर्वांना विश्वासात घेवुन निर्णय घेणे आवश्यक होते. या शहरामध्ये तुम्ही नागरीकांना वेगळया अशा सुविधा काय देता आयुक्त साहेब,तुम्हाला उत्पन्न वाढवायचे असेल तर वाढवा आमचं काही म्हणणं नाही. परंतु योग्य विचार करुन वाढवा. तुम्ही उत्पन्न वाढवायचं म्हणता पण ज्यावेळेला या शहरामध्ये कोणत्याही सुख-सुविधा नव्हत्या त्यावेळेला त्यांनी जागा घेतलेल्या आहेत हे ही आपण लक्षात घेतलं पाहिजे. आणि अशा प्रकारे तुम्ही कोणालाही विचारात न घेता आयुक्तांनी स्वत:हून हा विषय आणलेला आहे आणि तो या सभागृहाच्या पटलावर आणलेला आहे. परंतु साहेब याचा अर्थ असा नाही की, तुम्ही काहीही करायचं आणि शहराच्या विकासामध्ये कोणतीही प्रगती होत नाही, उच्चांक करीत नाही मात्र याठिकाणी अडीच पटीने टॅक्स वाढविण्याचा विषय आणता त्यावेळेस आपण १३३ लोकांना विश्वासात घेणं क्रमप्राप्त आहे. या १३३ लोकांना हा विषय माहित नव्हता. मा.महापौर साहेब, आपण कोणत्याही प्रकारची करवाढ करायची नाही आणि तसं करता येत नसेल तर हा विषय पुढील सभेचे वेळी आणावा आणि यावर सारासार विचार करुन या पुढील सभेच्या कार्यपत्रिकेवर आणावा. आणि यावर सविस्तर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. ख-या अर्थानं आमच्यासाठी आणि शहरातील प्रत्येक नागरीकांसाठी आजचा हा काळा दिवस आहे. तेंव्हा मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना आदेश द्यावेत की, यामध्ये सर्वांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारची पावले उचलायची नाहीत. आणि आयुक्त

साहेब,तुम्ही जुन्या मिळकती किती आहेत, नवीन किती आहेत आणि त्यामुळे किती उत्पन्न मिळणार आहे यावर चर्चा झाल्यानंतरच विषय आणायला पाहिजे होता. परंतु कुठलीही चर्चा न करता विषय आणला त्याबद्दल मी आयुक्तांचा याठिकाणी निषेध व्यक्त करते. आणि हा विषय अजिबात करु नये. अशी विनंती करते आणि थांबते.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर हा शहरवासियांच्या वतीने हा अतिशय महत्वाचा विषय आहे या विषयावर दत्ता साने असतील, वाघेरे असतील सर्वच नगरसेवकांनी आपआपली मते मांडलेली आहेत. सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांच म्हणणं आहे की, आम्ही हा विषय आणलेला नाही. स्थायी समितीमार्फत परत एकदा हा विषय सभागृहासमोर आलेला आहे. मागच्या जीबी ला मी काही कारणास्त्व अनुपस्थित होतो त्यामुळे या विषयावर बोलता आलं नाही. आणि त्या विषयावर चर्चा सुध्दा झालेली नाही. आयुक्त साहेबांनी कोणतीही दरवाढ न करता फक्त घसारा वाढविला आहे हे सांगुन आपल्याला गोलगोल करुन सांगितलं आहे. महापौर साहेब, तुमची निवड झाल्यापासून मी तुम्हांला ३/४ वेळा भेटलो त्यानंतर आयुक्तांना अत्यंत आदराने भेटलो. सर्व विरोधी पक्षाचे गटनेते असतील, सत्तारुढ पक्षाचे गटनेते असतील सर्वांना आम्ही भेटलो. आयुक्त साहेबांनी खरं तर सत्तारुढ पक्षनेत्याच्या कानावर घालून एक बैठक घेवुन त्यावर चर्चा करणं अपेक्षीत होतं परंतु तशी कोणत्याही प्रकारची चर्चा झालेली नाही. आणि मागच्या २० तारखेला हा विषय घेतला. मा.महापौर साहेब,आमच्या काकांनी सांगितलं आहे की,काकांनी एक शब्द सांगितला आहे की, तुम्ही हसायचं आणि आम्ही रडायचं अशा पध्दतीचं वातावरण करुन पुन्हा एकदा शहरवासियांसाठी करवाढ करायची आणि शहरवासियांना संकटात टाकायचं खरंतर सत्तारुढ पक्षाच्या सदस्यांनी तुम्हांला शुभेच्छा दिल्या. सत्तारुढ पक्षनेते आणि कामगारांचे आणि कष्टक-यांचे नेते या कामगार नगरी मधील आहेत मा.महापौर साहेब,हा विषय चालू असताना सत्तारुढ पक्षाचे सदस्यांच जर आयुक्त ऐकत नसतील तर त्यांचा काय उपयोग आहे. तुमचं जर आयुक्त ऐकत नसतील तर सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक करतात तरी काय पुढे विषय येतोच कसा काय हे समजत नाही. आणि जास्त न बोलता आयुक्तांनी जी करवाढ केलेली आहे त्याचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मी याठिकाणी निषेध व्यक्त करतो. आणि सत्तारुढ पक्षनेत्याला सांगतो की या विषयाला घेवुन सदस्य आपले आहेत हा विषय सर्वांनी

विचारात घेवुन हा जो लादलेला कर आहे तो मागे घ्यावा. अन्यथा मी निषेध व्यक्त करतो. धन्यवाद,जयहिंद जयमहाराष्ट्र.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह**,** याठिकाणी खेदाने नमुद करावेसे वाटते की, हा जो कर लादलेला आहे तो गोरगरीबांच्या खिशाला कात्री लावण्याचा आहे आणि सत्ताधारी पक्ष मुग गिळुन संमती देण्याचं काम करीत आहे. स्थायी समितीमध्ये हा विषय होता म्हणजे पक्षनेत्याला हे माहित होतं. २० फेब्रुवारी पर्यंत निर्णय घ्यावयाचा होता. तर तो २० तारखेच्या आत विषय का आणला नाही. आणि या विषयाच्या बाबतीत भारतीय जनता पक्षाची पक्कड ढिली झालेली आहे. राज्यामध्ये सुध्दा काय झालेल आहे हे आपण बघत आहोत. इथं आयुक्तांच काम नागरीकांच्या खिसा कापीत आहेत. या विषयाच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली तर याला सत्तारुढ पक्षाचे नेते जबाबदार असतील. आयुक्तांनी हा निर्णय गोरगरीबांच्या माथी लादू नये. असे सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना वाटत असेल तर आपण तशा प्रकारचा निर्णय,तरतुद करता आली तर बरे होईल. अन्यथा आम्ही सुध्दा गप्प बसणार नाही. लोकांचे आंदोलन उभे करु. एका बाजुला लोकांना पाणी मिळत नाही. आणि पाणीपट्टीत वाढ होत आहे आणि दुस-या बाजुला कोणतेही आयुक्त असले तरी ते करवाढ करतील आपल्याला अधिकार आहेत पण ते चुकीच्या पध्दतीने करीत आहात. तरी आपण ते त्वरीत तपासून घेणेत यावा. मा.महापौर साहेब, आपण आणि प्रशासनाने हे तपासून घ्यावे आणि तुम्हांला ते योग्य वाटत असेल तर आम्ही ते मान्य करतो परंतु जुनी मिळकत आणि नवीन मिळकत यांच्यामध्ये टॅक्सची खुप मोठया प्रमाणात तफावत दिसून येत आहे. हे आम्हांला मान्य आहे परंतु ज्या पध्दतीने बोजा वाढणार आहे तो बोजा न पेलवणारा आहे. यासाठी चर्चा होणं गरजेचं होतं. ३ पटीपेक्षा जास्त नागरीकांवर बोजा बसणार आहे. आणि तो बोजा एकदम न पेलावणारा आहे. एका बाजुला चालू असलेली मंदी, वाढणारी महागाई, शास्तीकर यापुर्वी शास्तीकर आणि मुळ टॅक्स ही दोन्ही एकत्र केल्यामुळे नागरीक मुळ टॅक्स सुध्दा भरत नाहीत आणि शास्तीकर सुध्दा भरत नाहीत. आणि म्हणुन तुम्हांला नागरीकांचे नळकनेक्शन तोडावे लागतात, नोटीसा द्याव्या लागतात या सगळया गोष्टींचा अवलंब करावा लागतो. त्यापेक्षा सुलभ पध्दतीने पैसे भरायला कोणालाही अडचण येणार नाही गरीबांनाही पैसे भरता यावे आणि नगरसेवकांनाही त्रास होणार नाही असा आपण सुवर्ण मार्ग काढावा अशी मा.महापौरांना विनंती आहे.धन्यवाद.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आजच्या करवाढीच्या विषयाचा मी याठिकाणी निषेध करते. निषेध यासाठी करते की, आपण सगळया सदस्यांनी सांगितलं की, ही करवाढ सर्वसामान्य नागरीकांना परवडणारी नाही. हे जरी बरोबर असलं तरी त्यासाठी आपण काही अंशी जबाबदार आहोत. काका तुम्ही काही वाईट वाटून घेऊ नका पण मगाशी आपण कमिशनर साहेबांना जी उपमा दिली ती न पटणारी होती. कमिशनरसाहेबांनी त्यांच पत्र डिसेंबरच्या स्थायी समितीमध्ये दिलं होतं. आणि तो विषय जनरल बॉडीमध्ये आता आलेला आहे कारण कायदा, नियम असा आहे की, २० फेबुवारीच्या आत निर्णय घ्यायचा असतो. करआकारणीचा विषय नेहमी फेब्रुवारी महिन्यामध्ये घ्यायचा असतो. मी कमिशनरची बाजु अजिबात घेत नाही. आणि घेणार पण नाही. परंतु जनरल माणसासारखी उपमा देता ती पटत नाही एखादया उच्च विभुषीत असणा-या व्यक्तीला आपण अशा प्रकारची उपमा देवु शकत नाही. मा.महापौर साहेब, मी तुमच्या बोलण्याचा निषेध करते आणि त्यांनी जी उपमा दिलेली आहे तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकणेत यावा. मा.महापौर साहेब. दि.४/१/२०२० ला आयुक्तांच पत्र होतं ते स्थायी समितीला विषय आला स्थायी समितीने हा प्रस्ताव फेटाळला/ दप्तरी दाखल केला त्यानंतर आपल्याकडे हा प्रस्ताव आला परंतु दुर्देवाने त्या दिवशी २० तारखेच्या सभेमध्ये आपण अंकिता प्रकरणामध्ये श्रध्दांजली होती, महिलांवर अत्याचार झालेले होते आणि मग आपण सभा तहकुब केली. विषय आपल्या सगळयांना माहिती होता आणि आम्हांला माहित होतं की, हा विषय मंजुर करायचा नाही. तुम्ही काय करायचे ते करणारचं पण करविते आम्ही पण आहोत. तुम्ही म्हणता आता कायदा लागु करा आम्ही म्हणतो सभागृहामध्ये अजेंडयावर जे विषय असतील त्या दिवशी सभा तहकुब झाल्यानंतर ज्या दिवशी सभा असेल त्या सभेमध्ये त्या विषयावर निर्देश देण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. असं महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सांगत आहे. आयुक्त साहेब, तुमच्या अधिकारात हा कर लागु होत नाही. कारण ज्या नागरीकांनी आम्हांला या सभागृहात पाठविलं त्यांच्यावर करवाढ लागु व्हावी या मताचे आम्ही अजिबात नाही. २ हजार कोटी रु. टॅक्सची थकबाकी आहे. शास्तीकर धरलं तर १ लाखपासून ते ३ लाखापर्यंत आणि ३ लाखापासून ते ५ लाखापर्यंत आणि ५ लाखाच्या पुढचे आम्ही करसंकलनचे अधिकारी तुमच्या पाठीमागे बसलेले आहेत यांना माहिती मागीतलेली होती. यामध्ये ४ टाईप घ्या. वर्ष घ्या, मिळकतीची संख्या, सन २००० सालापासून लोकांनी टॅक्स भरला असेल तर २००० सालापासूनचा टॅक्स घ्या मी करसंकलनच्या मॅडमला विचारलं तर त्या म्हणाल्या माझा तो विषय नाहीच, तुमचा

विषय नाही, आमचा विषय आहे. हे सभागृह आम्ही चालवतो. निर्णय जरी तुमचे असले तरी ते खरे, खोटे, चांगले/वाईट या शहराच्या दृष्टीकोनातून महत्वाचे असतील, कसे असतील हे बघण्याचं काम सुध्दा आमचे आहे. आपल्याशी संपर्क झाला आपण म्हणले पत्र द्या जो विषय सभागृहाच्या पटलावरती असेल तुम्ही करवाढ केली. साहेब अजेंडयावर जे,जे विषय असतील त्याची माहिती सदस्यांनी मागीतली तर ती तुम्हांला उपलब्ध करुन द्यावी लागेल. आम्हांला तुम्हांला पण बरोबर घ्यायचे आहे, शहराकडेही बघायचे आहे, नागरीकांकडेही बघायचे आहे म्हणजे एका वेळेस आम्हांला चार ठिकाणी बघायचे आहे. यामध्ये मी आपल्यालाकडे स्वत: तक्रार केलेली आहे. मी करआकारणीच्या बाबतीत सांगते, माझ्या ऑफिसच्या २२०० स्केअरफुटाचे बिल आले. मी आहे पहिल्या मजल्यावर आणि ऑफिस आहे तळमजल्यावर त्यादिवशी तुमची लोक चालली होती मी घाईघाईने म्हणले जे काही बिल असेल ते घेऊन टाका. २०१४ ला प्रॉपर्टी घेतली आणि २०१८ ला करआकारणीचं पत्र आलं म्हणुन मी तक्रार केली मला असं वाटलं की, एखादया वेळेस ही माझी प्रॉपर्टी आहे माझ्या प्रॉपर्टीचा जो काही टॅक्स आहे तो आला पाहिजे. मी प्रामाणिकपणे तुम्हांला सांगितलं. असे किती लोक तुम्हांला प्रामाणिकपणे सांगतील. आयुक्त साहेब, या शहरामध्ये तुमच्या टॅक्सपेक्षा आमच्या प्रॉपर्टीला खुप महत्व आहे त्याला खुप पैसे लागतात. त्यामुळे तुम्ही असेसमेंट करताना आख्या इमारतीच्या नोंदीमध्ये चुका होत असतात. आता विषय असा आहे की, ५०० स्केअरफुटाचे खाली घर बांधले आहे वर ३ मजले आहे आणि मग त्याला पण शास्ती कर लावणार का, आणि मग ५०० स्केअरफुटापर्यंतचा शास्ती कर शासनाने माफ केलेला आहे. शासनाचे तसे पत्र आलेलं आहे. याच्यामध्ये साहेब आपल्याकडे खिचडी करुन ठेवलेली आहे. आणि या खिचडीमुळे आम्हांला काही कळतंच नाही आणि म्हणुन आपल्याला विनंती आहे की, हा जो टॅक्स आहे निश्चितपणे मोठमोठया कंपन्याकडे,इमारतीकडे टॅक्स आहे. आपण पेपरला जाहीर नोटीस दिलेली आहे. त्या कंपन्याकडुन टॅक्स वसुल करण्यासाठी आपण कोर्टात गेलो त्यांच काय म्हणणं आहे, आपलं काय म्हणणं आहे याच्यावर काथ्याकुट झालं तर काही होत नाही. मागच्या पंचवार्षीकच्या आगोदर मी स्वत: मागणी केली होती की, जे, जे टॅक्स भरत नाहीत त्यांच्यावरती जप्तीच्या कारवाईचा बडगा उगारा आता काही लोकांकडे १७ कोटी, १८ कोटी रु. थकबाकी आहे त्यांच काय करायचं तुम्ही काहीच केलं नाही तर काय होणार आहे ज्यांचा व्यवसाय छोटा आहे, त्याला काम नाही त्यांना तुम्ही हसे करुन घ्या. या महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून आम्ही सगळयांनी एक चांगला विचार करणं गरजेचं आहे. महानगरपालिका टिकली तर

आपण टिकणार आहोत आणि नागरीकांना सुविधा मिळणार आहेत. सत्ता कोणाची आहे याचा काही फरक पडत नाही. आम्ही पण सुपातुन जात्यात आलो. पण काही गोष्टीत पण सुटसुटीतपणा आणला पाहिजे. तो आपण आणत नाही. महापौर साहेब, आपल्याकडे अजुन वेळ गेलेली नाही. आपण जीबी तहकुब जरी असली तरी अजेंडयामध्ये कुठलाही फेरफार केलेला नाही. नव्याने आपण काही मंजुर करु शकणार नाही. जे की,साहेब तुम्ही आता करणार आहात यु आर रॉंग याच्यासाठी मी हायकोर्टाचं दार वाजवणार तुम्ही समजदार आहात मी काय बोलले ते तुम्हांला समजल आहे. ही सभा ५/६ महिने आधी आली असती आणि त्यामध्ये रिट्रॉस्पेक्टीव्ह विषय आणला असता तर आम्ही मंजुर केला नसता आणि करुही दिला नसता आम्ही सगळे नियम पाळतो. माझा पक्ष असो अथवा विरोधी पक्ष असो नियम पाळायचे. मा.महापौर साहेब, इथं आपल्याला कोणी आणलेल नाही कमिशनरांच जे म्हणणं आहे ते त्यांच्या ठिकाणी परफेक्ट आहेत. महापालिकेच्या हिताविरुध्द हे सभागृह किंवा आयुक्त निर्णय घेऊ शकत नाहीत पण कधी रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट आपण रिट्रॉस्पेक्टीव्ह मध्ये जात नाही त्यामुळे निर्णय घेण्याचा अधिकार हा पुर्णपणे आपला आहे. आपल्या या जीबीच्या अजेंडयावर असलेल्या विषयावर वाद असल्यामुळे आपण जो निर्णय घेतला जो दसरी दाखल करण्याचा विषय आहे तोच मान्य आहे या शहरातील नागरीकांना पत्रकार बंधुच्या माध्यमातुन आवाहन करु इच्छिते की, कोणीही खोटया अफवांना बळी पडू नका एक रु.सुध्दा करवाढ होणार नाही. आमचा शब्द आहे तुम्हांला भारतीय जनता पार्टी जे बोलते तेच करते त्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत एवढंच मी सांगते जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह करआकारणीचा विषय हा प्रशासनाने आणलेला आहे.आणि मला वाटते की,सभागृहातील कुठल्याही विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्ष हे न सांगता आपण एकमुखाने या विषयाला विरोध करणे गरजेचं आहे. प्रशासनाने ज्या पध्दतीने हा विषय आणलेला आहे. अजित गव्हाणेंनी सांगितले आहे की, भाजपाने या विषयाला मुकसंमती दिलेली आहे. अजिबात नाही, आम्ही सर्वजण या विषयाला विरोध करतो आहे. आणि जसं सिमाताईनी सांगितलं की, उद्या पीआयएल दाखल करुन कोर्टात जाण्याची वेळ आली तरी भारतीय जनता पार्टी याच्यावर पाऊल टाकणार आहे यामध्ये कुठलीही शंका घेवु नका. आणि आम्ही विरोधी पक्षाना पण हेच सांगणार आहे की, भारतीय जनता पार्टी नागरीकांना आवाहान करणार आहे

की, ही करवाढ प्रशासनाने सभागृहाला विश्वासात न घेता केली तर आम्ही कुठलीही करवाढ न भरण्याचं आवाहन करणार आहे. यामध्ये कुठलेही दुमत नाही. कुठलीही दुटप्पी भूमिका नाही. कमीशनरसाहेब, आपण नागपुर महापालिकेमध्ये एवढं चांगल काम केल्यानंतर एवढा महत्वाचा विषय असेल आणि महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा विचार आपला असेल तर तुमचं आद्यकर्तव्य होतं की, सर्व सदस्यांना विश्वासात घेवुन, चर्चा करुन हा विषय आणणं आवश्यक होतं. प्रशासनाची ही कुठली पध्दत आहे मला समजलं नाही. आणि महापौर साहेब, आपण पण कमिशनरसाहेबांना आदेश द्यायला पाहिजे की, हा विषय जनरल बॉडीमध्ये आणण्याच्या आगोदर कमिशनरसाहेबांनी प्रेस कॉन्फरन्स घेवुन सांगितलं आहे की, जर हा विषय सभागृहाने नाकारला किंवा दप्तरी दाखल केला तर प्रशासन म्हणुन आम्ही ही करवाढ करणार आहे ही कुठली पध्दत आहे. आणि मग या पध्दतीनं जर तुम्ही काम करायचं ठरवलं असेल तर कमिशनर साहेब, आम्ही पण तुम्हांला त्याच पध्दतीनं अटॅक करु आम्ही सत्ताधारी पक्ष म्हणुन ज्या पध्दतीने भारतीय जनता पार्टीचे एक जबाबदार पक्ष म्हणुन या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून आम्ही आवाहन करीत आहे की, प्रशासन चुकीच्या पध्दतीने काम करीत आहे त्याला आम्ही साथ देणार नाही. आणि मला आवाहन करायचेआहे की, सभागृहाने हा विषय दप्तरी दाखल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसं महापौर साहेब, तुमच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची एक बैठक घेवुन आणि आयुक्तांनी हा करवाढीचा विषय त्यामध्ये ठेवुन त्याठिकाणी मान्यता झाल्यानंतरच करवाढ लागु करावी एवढीच विनंती मी या निमित्ताने करतो.

मा.झामाबाई बारणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह या विषयावर ब-याच नगरसेवकांनी पोटतिडकीने या शहरातील नागरीकांच्या दृष्टीने करवाढीच्या विषयावर आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी आपल्याला सांगू इच्छिते की, या शहरामध्ये अनेक भागातून नागरीक नोकरीच्या निमित्ताने आलेले आहेत. आणि त्यांना करवाढ ही दुप्पट/तिप्पट होणार असेल तर ती त्यांना परवडणारी नाही. आणि आपल्याला सुध्दा नागरीकांच्या समोर जायला परवडणार नाही. काही भागामध्ये २ दिवसांनी ३ दिवसांनी पाणी येत आहे. लोकांना वेळेवर पाणी मिळत नाही. त्यामुळे ही करवाढ थांबली पाहिजे. ब-याच सदस्यांनी सांगितले आहे की, राष्ट्रवादीच्या काळामध्ये शास्तीकर लावला गेला आणि त्यामुळे त्यांना सत्ता गमवावी लागली. परंतु राष्ट्रवादीच्या काळामध्येच शास्ती कर माफ करणेत यावा असा ठराव झालेला आहे पण त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यावेळी

मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी शास्तीकर माफ झाला नाही म्हणुन आमदारकीचा राजीनामा दिलेला होता. शास्तीकर माफ होणार होता म्हणुन आपले अनेक कार्यकर्ते मुंबईला गेले होते. त्यावेळेस शास्तीकर माफ झाला नाही म्हणुन आमदारांनी राजीनामा दिलेला होता. त्यामुळे सर्व नागरीकांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. म्हणुन या करवाढीला माझा विरोध नोंदवावी अशी विनंती करते आणि थांबते.

मा.एकनाथ पवार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर हा विषय दप्तरी दाखल करायचा असतांनाही माझ्या या सन्मा.सदस्यांना या विषयावर चर्चा करावयाची होती. खरंतर माझ्याही पार्टीचं असंच म्हणणं होतं की, शहरवासियांना करवाढ लादली नाही पाहिजे. आणि यासाठीच या शहरवासियांना करवाढ न करता हा विषय दप्तरी दाखल केलेला आहे. पण या विषयावर चर्चा झाली आणि कधी कधी आमचा किती विरोध आहे आणि भारतीय जनता पार्टीला किंवा नगरसेवकांना असं वाटतंय की, शहरातील नागरीकांना कर लादला गेला पाहिजे असा चुकीचा समज वृत्तपत्राच्या माध्यमातून किंवा विरोधी पक्षातील काही नगरसेवक अशा प्रकारचा अपप्रचार करीत आहेत. म्हणजे शहरवासियाची काळजी राष्ट्रवादीला आहे आणि शहरवासियांची काळजी आम्हांला नाही. मला असे वाटते की, या शहरावासियांची सर्वात जास्त काळजी भारतीय जनता पार्टी म्हणुन आम्हांला आहे. आणि कधी कधी आपण मोघम बोलतो, आणि सांगतो की,जनरल डायर आणि सिमाताईंनी सांगितलं की, काका जनरल डायरनी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी ज्यांनी,ज्यांनी काम केलेले आहे त्यांना गोळया घालण्याचं काम केलेले आहे. आणि एक चांगला कमिशनर आहे तशी जर परिस्थिती असती तर आणि या राज्यामध्ये बाण कुठे गेला असं कोणी तर सांगितलं बाण राष्ट्रवादीकडे गेला, की बाण काँग्रेसकडे गेला. आणि त्याची परिणीती काय झाली त्यातल्या ५० टक्के अधिका-यांच्या बदल्या झाल्या नां म्हणजे हे जर कमिशनर चांगले नसते या जिल्ह्यांचे पालकमंत्री अजितदादा आहेत यांच एकतर्फी नेतृत्व आहे त्यामुळे त्यांनी कमिशनरची बदली केली असती नां. एखादया चांगल्या अधिका-यांच्या पाठीमागे आपण तेवढेच जबाबदारीने उभे राहील पाहिजे. आयुक्तांच पत्र डिसेंबर महिन्यातील आहे आणि स्थायी समितीने हा विषय दप्तरी दाखल केलेला आहे. तरी आपण या सभागृहाचा २/२ तास वेळ वाया घालवतोय. खरं तर आयुक्तांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर माझी अपेक्षा होती सर्व सन्मा.सदस्यांच त्यांनी विचारलेल्या प्रश्नांच उत्तर मिळालं होतं, त्यांच समाधान झालेलं होतं परंतु त्या विषयावर बोलणं आणि

बोलण्यातून खरं तर आम्ही या शहरवासियांच्या मागे किती ठामपणे उभे आहोत हे खरं तर आम्हीही सांगतो. शास्तीकराच्या संदर्भात सगळेजण बोलले खरं तर या शास्तीकराचं भूत हे तुमचं आहे काका,तुमचं आहे. आम्ही तो कायदा केला नाही आणि मागच्या महापालिका सभेमध्ये आपण १०० टक्के शास्तीकर रद्द करणेत यावा असे आपण म्हणलेले आहे. चुकीच्या विषयाला भारतीय जनता पार्टी कधीच समर्थन करणार नाही. आज आमची सत्ता आहे मला खात्री आहे या पुढच्या दोन वर्षाच्या काळामध्ये या शहरातील लोकांच्या हितासाठी लोकहित निर्णय खरं तर आम्हांला घ्यायचे आहे आणि आम्हांला सत्तेवर यायचं आहे. तेंव्हा आरोप करणं आणि भारतीय जनता पार्टीला बदनाम करणं कारण निवडणुका जसजशा जवळ येतील आंदोलनं तशाच पध्दतीनं वाढणार आहेत,आरोप तशाच पध्दतीनं करणार आहेत. पण या आरोपाचा परिणाम आमच्यावर कधीच होणार नाही. कारण आम्ही कधीच चुकीचं काम करीत नाही. त्यामुळे या शहराला अजुनही चांगल्या पध्दतीचं म्हणजे पाण्याचा विषय आहे त्या विषयावर जेंव्हा चर्चा करुन त्यावेळेस भाऊसाहेबांचा त्या विषयावर खूप अभ्यास आहे. त्याही विषयावर आपण चर्चा करु पण आता सभागृहाचा वेळ न घालवता खरं तर हा विषय दप्तरी दाखल झालेला आहे आणि हे सगळयांच्या मनासारखं होत असेल तर आणि सिमाताईंनी सांगितलं की, ही सभा कुठल्या कलमानुसार नाही पण या शहरवासियांवर कुठलीही करवाढ लादली जाणार नाही. याची जबाबदारी सुध्दा आम्ही निश्चितच घेत आहोत आणि अशा पध्दतीचं काम सुध्दा आपण १०० टक्के करु. मा.महापौरांना विनंती करतो की, खरंतर दत्ता काकांनी जनरल डायरचा जो विषय काढला तो आजच्या सभागृहाच्या कामकाजातून तो वगळावा एक चांगला अधिकारी आपल्याला मिळाला आहे. तर त्याच्या पाठीमागे आपण ताकदीने उभं राहावे एवढंच सांगतो आणि थांबतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.भिमाबाई फुगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/९९/२०२०, दि.३०/०१/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३३ दि.५/२/२०२० अन्वये.

मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७, दिनांक २८।०२।२०१८ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १८७, दिनांक २०।०४।२०१८ अन्वये पाणीपट्टी दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार पाणीपट्टी आकारण्यांत येत आहे. सद्यस्थितीत शहरात पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि प्रत्येक नळ जोडावरील पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य नाही. सबब ज्या ठिकाणी विशेषत: उतारावरील भागात जास्त पाणी उपलब्ध होते. त्यामुळे तेथे मानका पेक्षा जास्त पाणी वापर करण्याची प्रवृत्ती दिसते व उंचावरील भागात पाण्याचा तुटवडा जाणवतो. समन्यायी पाणीपुरवठा करण्यासाठी १०० LPCD पेक्षा जास्त पाणीवापर करणा-या ग्राहकांवर वचक ठेवण्याच्या दृष्टीने १०० LPCD पेक्षा जास्त पाणी वापरासाठी जास्त दर लावणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन पाणीपट्टीचे सुधारित दर प्रस्तावित करण्यांत येत आहेत, तसेच त्यानंतर दरवर्षी प्रस्तूत आदेशातील सर्व प्रकारच्या दरांमध्ये वार्षिक ५ टक्के वाढ प्रस्तावित करणेत येत आहे.

पाणीपट्टी प्रस्तावित दर

१) **निवासी वापरासाठी प्रति कुटुंब / सदनिका प्रति महिना**
(झोपडपट्ट्यांमधील व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड वगळून)

अ.क्र.	LPCD	प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर (लिटर्स मध्ये)	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०१९-२०	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०२०-२१
१	४०	१ ते ६०००	र.रु.०.००	र.रु.०.००
२	४१-१००	६००१ ते १५०००	र.रु. ४.२०	र.रु.८.००
३	१०१-१३५	१५००१ ते २००००	र.रु.४.२०	र.रु.४०.००

४	१३५ च्या पुढे	२०००१ च्या पुढे	र.रु.८.४०	र.रु.१००.००

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्स पेक्षा (१३५ LPCD) जास्त पाणी वापर करणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्स प्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागू राहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅबमधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.८.०० हा दर लागू राहील.

२) वाणिज्य वापरासाठी प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट हॉटेल्स, रेस्टॉरंटस, दुकाने, इ.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु.५२.५०
सन २०२०-२१	र.रु.५५.००

३) खाजगी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, शासकीय-निमशासकीय कार्यालये, रेल्वे स्टेशन्स, ईएसआय हॉस्पीटल, ऑटो क्लस्टर, औंध ऊरो रुग्णालय.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु.१५.७५
सन २०२०-२१	र.रु.१७.००

४) धार्मिक स्थळे, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, धर्मादाय आयुक्त यांची मान्यता असलेली ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येणारी मंडळे.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी

	सरसकट
सन २०१९-२०	र.रु.१०.५०
सन २०२०-२१	र.रु.११.००

५) स्टेडीयम.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु.२१.००
सन २०२०-२१	र.रु.२२.००

६) मनपा इमारती / मिळकतीं – Book Adjustment करिता

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु. १०.५०
सन २०२०-२१	र.रु.११.००

७) हद्दीबाहेरील निवासी इमारती – देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेरील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील निवासी इमारतींसाठी देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डास खालीलप्रमाणे सरसकट दराने पाणी देण्यात येईल.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०२०-२१	र.रु.११.००

८) झोपडपट्टीसाठी धोरण – झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी पध्दतीने दर प्रस्तावित करणेत येत आहेत.

अ) प्रस्तावित दर (मीटर बसविलेल्या झोपडपट्टी/झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड ग्राहकांसाठी निवासी वापरासाठी प्रति कुटुंब। सदनिका प्रति महिना)

अ.क्र.	LPCD	प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर (लिटर्स मध्ये)	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०१९-२०	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०२०-२१
१	४०	१ ते ६०००	र.रु.०.००	र.रु.०.००
२	४१-१००	६००१ ते १५०००	र.रु.२.१०	र.रु.४.००
३	१०१-१३५	१५००१ ते २००००	र.रु.३.१५	र.रु.४०.००
४	१३५ च्या पुढे	२०००१ च्या पुढे	र.रु.८.४०	र.रु.१००.००

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्सपेक्षा (१३५ LPCD) जास्त पाणी वापर करणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्स प्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागू राहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅबमधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.४.०० हा दर लागू राहील.

आ) मीटर न बसविलेल्या झोपडपट्टीतील/ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ग्राहक

i) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (वापर १३५ LPCD प्रमाणे)

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतींना प्रति सदनिकाप्रमाणे मासिक बिल देण्यांत यांवे.

आर्थिक वर्ष	दर प्रति महिना प्रति सदनिका
सन २०१९-२०	र.रु.३६.७५
सन २०२०-२१	र.रु.३८.६०

ii) झोपडपट्टी वैयक्तिक नळजोड (वापर ९० LPCD प्रमाणे)

झोपडपट्ट्यांमधील वैयक्तिक नळजोडाची पाणीबिले वार्षिक पध्दतीने देण्यात यावीत.

आर्थिक वर्ष	दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड
सन २०१९-२०	र.रु.१९८.००
सन २०२०-२१	र.रु.२१०.००

iii) झोपडपट्टीतील गट नळजोड (Group Connection)

१५ मिमी व्यास -५ कुटुंबे (वापर ७० LPCD प्रमाणे)

आर्थिक वर्ष	दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड
सन २०१९-२०	र.रु.५६७.००
सन २०२०-२१	र.रु.६००.००

अनधिकृत नळजोड नियमित करणे व त्यांना आकारावयाच्या पाणीदराबाबत यापूर्वीचेच धोरण कायम ठेवण्यात येत आहे. सदर धोरणाच्या अर्थनिष्पत्तीबाबत (Interpretation) अथवा अन्य कोणताही प्रासंगिक वाद उद्भवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहील. तरी उपरोक्तप्रमाणे पाणी दर बदला बाबतच्या धोरणास मान्यता देणेकामी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत यावी.

मा.माधवी राजापूरे - मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अभिषेक बारणे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ५१० विषय क्रमांक – ३
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/९९/२०२०, दि.३०/०१/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३३ दि.५/२/२०२० अन्वये.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५११ विषय क्रमांक – ४
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/शअ/ता/४/५३/२०२० दि.०४/०२/२०२०
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.६६३९ दि.५/२/२०२० अन्वये.

महानगरपालिका हद्दीमधील रस्त्यास विविध संस्था त्यांचेकडील भुमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी महापालिकेकडे रस्ता खोदाईस परवानगीची मागणी करतात.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २३९ नुसार सदर संस्थांना महानगरपालिके मार्फत रस्ता खोदण्यास परवानगी देण्यात येते. सदर रस्त्यांवर सेवा वाहिन्या साठी खोदकाम केल्यानंतर सुरळीत वाहतुकीसाठी रस्ते दुरूस्त/पुर्ववत करणे आवश्यक असते. सद्यस्थितीत बांधकाम साहित्य, यंत्रसामुग्री व मनुष्यबळ यात बाजारभावातील होत असलेली भरमसाठ वाढ व यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरच्या भांडवली खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने मनपास रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करावा लागतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २४१ नुसार सदर भांडवली खर्च हा काही प्रमाणात वसुल व्हावा या करीता अशा संस्था/कंपनी यांना रस्ता खोदाईस परवानगी देताना मा.आयुक्त यांचा दि.६/१/२०१७ च्या मान्य प्रस्तावानुसार रस्ते दुरूस्त/पुर्ववत करणेसाठी

सा.बां.विभाग पुणे यांचेकडील सन २०१६-१७ च्या दरसुची नुसार येणारे शुल्क सद्यस्थितीत वापरले जात आहे. त्यानुसार रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाच्या शुल्काबाबतचे परिपत्रक अन्वये शहर अभियंता कार्यालयाकडून दि.३/३/२०१७ रोजी निर्गत करण्यात आलेले आहे. सदर रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाचे सद्यस्थितील शुल्क ठरविताना चराची रूंदी ही रोड रोलरची १.८ मी. इतकी रूंदी गृहीत धरून ठरविणेत आले आहे.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत रस्ता खोदाई केलेनंतर रस्ते पुर्ववत करणेसाठी खाली प्रमाणे दर आकारण्यात येत आहे.

प्रपत्र अ) : रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाचे शुल्क

अ.क्र.	रस्त्याचा प्रकार	सुधारीत दर र.रू.
		(चराची रूंदी कमीतकमी १.८० मी)
१)	जमिनीमधुन खोदकाम	१९९०/- प्रति मीटर
२)	खडीमुरूम बीबीएम/एमपीएमसह	३६५९/- प्रति मीटर
३)	डांबरी रस्ता	९३३३/- प्रति मीटर
४)	डांबरी रस्ता (पुर्ण जाडी)	
५)	फुटपाथ	८१३९/- प्रति मीटर
६)	पेव्हींग ब्लॉक	६२६७/- प्रति मीटर

प्रपत्र ब) : मनपा अधिभार

अ.क्र.	रस्ता रुंदी (मीटर)	मनपा अधिभार

		रस्त्याला समांतर खोदाई असल्यास	रस्त्यावर काटकोन खोदाई असल्यास
१	१८ मी. पेक्षा कमी	रु. १५००/ प्रती मीटर	रु. ७०००/ प्रती मीटर
२	१८ मी.ते ३० मी. खालील	रु. २०००/ प्रती मीटर	रु. १०,०००/ प्रती मीटर
३	३० मी. ते ४५ मी. खालील	रु. २५००/ प्रती मीटर	रु. १२,०००/ प्रती मीटर
४	४५ मी. व त्यापुढे	रु. ३०००/ प्रती मीटर	रु. १५,०००/ प्रती मीटर

केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, एम.एन.जी.एल. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था यांना पुणे महानगरपालिका हद्दीत भूमिगत केबल टाकणेसाठी पुणे मनपाचे मान्य रस्ते खोदाई शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेबाबतचा ठराव पारित केलेला आहे. पुणे महानगरपालिकेकडून महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना रस्ता खोदाई करणेसाठी र.रू.२७७४ प्रती रनिंग मी. इतका दर आकारला जातो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात भूमिगत गॅसवाहिनी टाकण्यासाठी रस्ते खोदाईस परवानगीच्या चालू दरामध्ये सवलत मिळणेबाबत मे.महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी विनंती केलेली आहे.

<u>महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.यांचेकडील मागणीः-</u>

महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी महानगरपालिकेकडील दर जास्त असल्याने रस्ते दुरुस्तीचे दर कमी करुन पुणे महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना देण्यात येणा-या दरातील सवलतीनुसार भूमिगत गॅस पाईप लाईन टाकणेसाठी रस्ते खोदाईस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

घरगुती स्वयंपाक व इतर वापरासाठी तसेच, शहरातील वाढत असलेल्या मोठ्या प्रमाणातील प्रदुषण रोखण्यासाठी चार चाकी वाहनांसाठी नैसर्गिक वायूचा वापर करण्याचा केंद्र शासनाने महत्वकांक्षी उपक्रम हाती घेतलेला आहे. त्याचप्रमाणे, शहरी भागात सी.एन.जी. चा वापर वाढवून घरगुती वापरातील एल.पी.जी. सिलेंडर ग्रामिण भागासाठी जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे. नैसर्गिक वायू (सी.एन.जी.) हा एल.पी.जी. पेक्षा सुरक्षीत व स्वस्त असल्याने व २४ तास अखंडीत पुरवठ्याची शास्वती असल्याने शहरातील नागरिकांसाठी त्याचा उपयोग होणार आहे. शहरात अशाप्रकारच्या नैसर्गिक वायूचे (सी.एन.जी.) भुमिगत पाईपलाईन टाकणेचे व पुरवठा करण्याचे कामकाज महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.यांचे मार्फत चालू आहे.

भुमिगत गॅसवाहिनी शहरातील नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने त्यासाठी महानगरपालिकेचे देखील योगदान असणे आवश्यक वाटते. त्यासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना भुमिगत गॅसवाहिनी टाकण्यासाठी आवश्यक असणा-या रस्ता खोदाई परवानगीसाठी महापालिकेमार्फत आकारण्यात येणारे शुल्कात सवलत देऊनरस्ता खोदाई केलेनंतर रस्ता पुर्ववत करणेसाठी Lumpsum र.रू.३०००/- प्रती र.मी. इतके शुल्क आकारून मनपा अधिभार माफ करणे आवश्यक आहे. तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये मे.महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना रस्ते खोदाईच्या चालू दरामध्ये सवलत देऊन रस्ता खोदाई कलेनंतर सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या प्रकारासाठी (जमिनीतून खोदकाम, खडीमुरूम बीबीएम/एमपीएम सह, डांबरी रस्ता पुर्ण जाडी, फुटपाथ व पेव्हींग ब्लॉक) रस्ता पुर्ववत करणेकरीता Lumpsum र.रू.३०००/- प्रती र.मी. इतके शुल्क आकारून मनपा अधिभार माफ करणेसाठीच्या धोरणात्मक निर्णयासाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांची मगाणी असली तरी, MNGL कंपनीकडून मनपाचे सर्व प्रकारचे विकास कामे करतांना MNGL कंपनीच्या गॅस लाईन वरून काम करणेसाठी विविध प्रकारचे चार्जेस MNGL कंपनीस अदा करावे लागतात त्यामध्ये मनपास सवलत मिळणे आवश्यक आहे. तरी MNGL कंपनीस मनपाकडून रस्ते खादाई सवलत देताना मनपाच्या कामांसाठी MNGL कंपनीकडून विविध प्रकारचे चार्जेस माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.आशा धायगुडे-शेंडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१२ विषय क्रमांक – ५
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/१४२/२०२० दि.०४/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६४१ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड शहर हे महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहनतळ धोरणास (पार्कींग पॉलिसीस) मा.स्थायी समिती ठराव क्र. २६३९, दि.०९/०५/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.२०५, दि.२२/०६/२०१८ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्याअन्वये पिंपरी चिंचवड शहरातील पार्किंग पॉलिसी नुसार शुल्क आकारणेबाबत निविदा क्र.४८/२०१९-२०२० प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा स्विकृतीचा कालावधी तीन वेळेस वाढविणेत आला तथापि वाढविलेल्या निविदा स्विकृत कालावधी मध्ये एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे उपरोक्त मा.महापालिका सभा ठराव क्रमांक अन्वये मंजुर करणेत आलेले दर खालीलप्रमाणे सुधारीत करणे आवश्यक आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

वाहनाचा प्रकार	Zone A, Zone B, Zone C साठीचे दर र.रू.प्रति तास
दुचाकी	५/-
रिक्षा	५/-
चारचाकी	१०/-
टेम्पो/चारचाकी मिनी ट्रक	१५/-
मिनी बस	२५/-

खाजगी बस	१००/-
ट्रक/ट्रेलर	१००/-

सदर पार्किंग पॉलिसीच्या कामासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून Parking App तयार करून पार्किंगचे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३(अ)(१) नुसार सुधारित दरास मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.आशा धायगुडे-शेंडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१३ विषय क्रमांक – ६
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.राजेंद्र गावडे, मा.संतोष लोंढे यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६४९ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये निगडी-दापोडी रस्त्यावर पिंपरी ते स्वारगेट या मेट्रो मार्गिकेचे काम महामेट्रो मार्फत करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड मनपा ते स्वारगेट या मार्गिकेची लांबी १६.५९ कि.मी. असुन त्यापैकी पिंपरी ते दापोडी असा ७ कि.मी. मार्गिका व ६ स्टेशन्स पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये येत आहे. या प्रकल्पासाठी केंद्रशासन, राज्यशासन व पिंपरी चिंचवड व पुणे मनपा यांचेकडुन अर्थ सहाय्य करणेत येत आहे. भविष्यात मेट्रोचे काम निगडी पर्यंत सुमारे ५.५० कि.मी. लांबीचे करणेत येणार आहे.पिं.चिं.मनपा हद्दीमधील मेट्रो प्रकल्पाच्या खर्चाच्या १०% हिस्सा पिं.चिं.मनपास देय आहे. पिंपरी ते स्वारगेट या

मार्गिकेचे काम पुणे मेट्रो या नावाने करणेत येत आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड मनपाचा / शहराचा कुठेही समावेश करणेत आलेला नाही. पिंपरी चिंचवड मनपा देशामध्ये विकासाभिमुख मनपा म्हणुन ओळखली जाते. तरी शहरातील नागरिकांच्या भावनांचा विचार करता तसेच शहराचे अस्मितेचा विचार करता 'पुणे मेट्रो' ऐवजी 'पुणे पिंपरी चिंचवड मेट्रो' असे नामकरण करणेत यावे. तसेच मा.महापौर, उप महापौर, स्थायी समिती-अध्यक्ष सर्व गटनेते व सर्व नगरसदस्य यांनीही अशा प्रकारचे नामकरण करणेबाबत मागणी केली आहे. तसेच पिंपरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, पिंपरी येथे मेट्रो स्टेशनचे काम चालु आहे. या चौकामधील ग्रेडसेपरेटरला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विलगक तसेच चौकामधील बीआरटी बस स्टेशनला आहिल्यादेवी होळकर चौक, मोरवाडी असे नामकरण करणेत आलेले आहे. त्याच धर्तीवर या चौकामधील मेट्रो स्टेशनला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, पिंपरी असे नाव देणेबाबत मागणी आहे. तरी पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सध्या चालु असलेल्या मेट्रोस 'पुणे मेट्रो'ऐवजी 'पिंपरी चिंचवड पुणेमेट्रो' व मोरवाडी चौकातील मेट्रो स्टेशनला 'पिंपरी' ऐवजी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, पीसीएमसी पिंपरी मेट्रो स्टेशन'असे दुरुस्ती नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.आशा धायगुडे-शेंडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.झामाबाई बारणे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव –

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५४ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर ०७ रुग्णालये व २८ दवाखाने कार्यरत आहेत. सदर दवाखाना व रुग्णालयांमध्ये व वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये मनुष्यबळाअभावी

रुग्णसेवा देणेकामी अडचण होत आहे. तसेच याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे वैद्यकिय अधिकारी/ तज्ञ वैद्यकिय अधिकारी व इतर पॅरामेडिकल पदे आवश्यकतेनुसार तातडीने भरुन रुग्णसेवा सुरळीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार आज दि.०५-०२-२०२० रोजीच्या मा.स्थायी समिती सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार रुग्णालयातील आवश्यक पदे भरणेसाठी प्रशासनाने वाय.सी.एम. रुग्णालय व वैद्यकिय विभागांतर्गत आवश्यक पदे कंत्राटी पध्दतीने भरणेकामी सविस्तर पदांच्या आवश्यकतेनुसार सोबतचे प्रपत्र अ व प्रपत्र ब नुसार प्रशासनामार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(गोंधळ)

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अभिषेक बारणे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ५१४ विषय क्रमांक – ७

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.झामाबाई बारणे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव –

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५४ दि.५/२/२०२० अन्वये.

विषय क्रमांक ७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.अर्चना बारणे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१५ विषय क्रमांक – ८
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५५ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थेरगाव स.नं.९ मधील मनपा उपयोगासाठी आरक्षित जागेवर BOT तत्त्वावर व्यापारी केंद्र बांधणेस मनपा सभा ठराव क्र.४५९४, दि.२९/१०/२००१ अन्वये मान्यता मिळाली होती. याबाबत तत्कालीन नगरसदस्यांचे नुसार मनपामार्फत कामाची निविदा प्रसिध्द केली. सदर प्रकल्पाबाबत BOT कमिटी मध्ये र.रु.६.१० कोटीच्या प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर दि.१३/०७/२०१० रोजी पात्र निविदा धारक मे.ओम प्रॉपर्टीज यांचे समवेत दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत करारनामा करणेत आला. करारनामा केलेनंतर भुमी जिंदगी विभागामार्फत दि.१४/०९/२०१० रोजी मे. ओम प्रॉपर्टीज यांना जागेचा ताबा देणेत आला. तथापि, मा.नगर सदस्यांच्या मागणीनुसार भुमी जिंदगी विभागामार्फत दि.०२/१०/२०१० रोजी ताबा दिलेल्या जागेचा ताबा स्थगित करणेत आला. सदरचे जागेचा ताबा न मिळाल्याने मे.ओम प्रॉपर्टीज यांनी दि.०२/११/२०११ रोजी मा. उच्च न्यायालय मुबंई येथे दावा दाखल केला. सदर दाव्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये मनपा मार्फत मा.अति.आयुक्त यांनी सदर प्रकरणी मे.ओम प्रॉपर्टीज यांचे समवेत सुनावणी घेऊन दि.०६/०३/२०१२ रोजी मनपाने मा. उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केल्यानुसार प्रकल्प रद्द केला असलेने जागेचा ताबा देता येणे शक्य नाही असा आदेश दिला. सदरचे अति.आयुक्त यांनी दिलेला आदेश रद्द करणेबाबत मे.ओम प्रॉपर्टीज यांनी पुन:श्च मनपा विरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये दि.१३/०४/२०१२ रोजी दावा दाखल केला. सदरचे दाव्याबाबत मनपामार्फत त्यानुसार मे.ओम प्रॉपर्टीज यांना दि.२५/०३/२०१३ रोजी सदरचा प्रकल्प का रद्द करणेत येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली. त्यानुसार दि.०९/१०/२०१४ रोजी पुढील प्रमाणे आदेश निर्गत केले. यामध्ये मे.ओम प्रॉपर्टीज यांनी करारनामा कलम १२.१ नुसार सदरचे प्रकरण आर्बिट्रेशन लवादाकडे देणेत यावे. असे नमुद केले.सदरचे मा. अति. आयुक्त यांनी दि.०९/१०/२०१४ रोजी दिलेला आदेश रद्द करुन जागेचा ताबा मिळणेकामी मे.ओम प्रॉपर्टीज यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये दि.०७/०४/२०१५ रोजी दावा दाखल केला. सदर दाव्याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दि.०८/०१/२०२० रोजी सुनावणी झाली व दि.११/०१/२०२० रोजी मा.उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे आदेश दिले. सदर

प्रकरण मा. उच्च न्यायालयाने ९० वर्ष भाडे करारापोटी देय असलेली एकुण र.रु.१२.०० कोटी इतकी निश्चित करुन सदरची रक्कम मे.ओम प्रॉपर्टीज यांनी मनपास द्यावयाची आहे. तथापि, सद्यस्थितीमध्ये मनपाकडे अतिरीक्त जागा उपलब्ध नसल्याने सदर ठिकाणी मनपाचे कचरा संकलन केंद्र असुन उर्वरीत जागा ही खेळाचे मैदान म्हणुन वापरण्यात येत आहे. सदरची जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून मनपास मिळालेली आहे. त्यामुळे शासन मान्यता नसताना सदरची जागा देता येणार नाही. सदर आरक्षीत जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्याकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाली आहे. ज्या कामासाठी जागा दिली आहे. त्याच कामासाठी सदर जागेचा वापर होणे गरजेचे आहे. सदर न्यायालयीन प्रक्रीयेत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास सहभागी करुन घेणेत यावे. तसेच सदर प्रकरणी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा अभिप्राय घेणेत यावा. मनपास जागेची आवश्यकता लक्षात घेता उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मे.ओम प्रॉपर्टिज यांना जागेचा ताबा न देता या निर्णयाच्या विरूध्द मा.सर्वोच्च न्यायालयात मनपा मार्फत अपिल दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१६ विषय क्रमांक – ९

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.मनिषा पवार व मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७ दि.१७/१/२०२० अन्वये.

विद्युत विभागाच्या उप अभियंता विद्युत या पदाचे अंतिमसेवा जेष्ठता यादी दि.१८/१२/२०१२ रोजी प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सदर सेवा जेष्ठता यादी तयार करताना प्रशासन विभागामार्फत उप अभियंता घोडे व मोरे हे एकाच दिवशी उप अभियंता पदावर पदोन्नती द्वारे रुजु झाल्याने श्री.घोडे हे वयाने श्री.मोरे यांच्या पेक्षा

मोठे असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतुदी नुसार श्री.घोडे यांना सेवाजेष्ठता यादीत श्री.मोरे यांचे आधी सेवाजेष्ठता क्रमांक मंजूर करणेत आला आहे. सदर बाबीस श्री.मोरे उप अभियंता (वि) यांनी हरकत घेतली असता प्रशासनाने वरील नियमाच्या आधारे श्री.मोरे यांची हरकत फेटाळून लावलेली आहे. तसेच याच सेवा जेष्ठता यादीत दि.२८/०८/२००८ रोजी पदोन्नती होवून रुजु होणारे उप अभियंता श्री.चव्हाण एम.एम, श्री.धुमाळ दिलीप, श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर हे एकाच दिवशी रुजू झालेले असून सुद्धा वरील महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतूदीनुसार वयाने अनुक्रमे श्री.सोनवणे माधव, श्रीमती लता बाबर, श्री.दिलीप धुमाळ व श्री.चव्हाण माणीक या क्रमाने सेवा जेष्ठता क्रम देणे आवश्यक होते परंतु प्रशासन विभागाने चुकीने श्री.चव्हाण माणिक, श्री.दिलीप धुमाळ, श्री.माधव सोनवणे व श्रीमती लता बाबर असा सेवा जेष्ठता क्रम चुकविलेला आहे. त्यामुळे सेवा जेष्ठ असणारे श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर यांचेवर पुढील पदोन्नती साठी अन्याय होत आहे. त्यामुळे सदरची उप अभियंता विद्युत या पदाची सेवाजेष्ठता यादी दुरुस्त करुन श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर यांचेवर होणारा अन्याय दूर करणे अत्यावश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतुदी नुसार श्री.घोडे व श्री.मोरे यांना दिलेल्या सेवा जेष्ठतेचे नियमानुसार श्री.माधव सोनवणे व श्रीमती लता बाबर, श्री.दिलीप धुमाळ व श्री. माणिक चव्हाण या क्रमाने सेवा जेष्ठता यादी दुरुस्त करण्यास मान्यता देण्यास तसेच सद्या विद्युत विभागाचे अस्थापनेवरील कार्यकारी व उपअभियंता (वि) पदाचे दुरुस्त सेवाजेष्ठता यादी नुसार सेवाजेष्ठता ठरणारे उप अभियंता श्री.माधव सोनवणे यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(गोंधळ)

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१७ विषय क्रमांक – १०

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कमल घोलप व मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३० दि.०७/०२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ३५ लाख पेक्षा जास्त झाडे आहेत. त्यांचे जतन व संरक्षण करणे करीता महाराष्ट्र(नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अंमलात आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन तरतुदीनुसार प्रकरण ३ कलम ५(१)(२)नुसार वृक्षअधिकारी नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिका स्थायी अस्थापनेवर 'वृक्ष अधिकारी'(गट-अ) या अभिमानाचे एक पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीत एक नवीन पद (प्रपत्र अ) मनपा अस्थापनेवर निर्माण करण्यास तसेच सदर पद निर्माण करुन श्री.प्रकाश मोगल गायकवाड "उद्यान अधिक्षक"(वृक्ष) या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व अनुभव अर्हता धारण करीत पात्र असल्याने त्यांची 'वृक्षअधिकारी'(गट-अ) या पदावर पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रपत्र अ

वृक्षसंवर्धन विभागासाठी नव्याने वर्ग- १ पद निर्माण करावयाचे माहितीपत्रक

अ. क्र.	पदाचे नांव	वतेनश्रेणी	मंजुर पद	नव्याने निर्मिती करावयाची पदे अर्हता
१	वृक्षअधिकारी (वर्ग - १)	१५६०० – ३९१००- ६६००(ग्रेडवेतन)	०१	१००% पदोन्नतीने उद्यान अधिक्षक (वृक्ष) वर्ग २ या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.
(गोंधळ)

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१८ विषय क्रमांक – ११

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कैलास बारणे व मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.१६ दि.८/१/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७ /९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.०० मी. रुंद रस्ता व १२.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्या दृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै. मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. (स.नं.१५ पै.) व १२.०० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.०० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१९ विषय क्रमांक – १२

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापलिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्था/EWSप्र/७०/२०२० दि.१८/१/२०२०
२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
स्था/EWSप्र/७१/२०२० दि.१८/१/२०२०
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५०६
दि.२०/०१/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत केंद्रीय गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शन सुचनांचा अवलंब करुन ठिकठिकाणी आरक्षित जागांवर सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना राबविणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या योजनेकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ मंजूर आहे. सदर ठरावानुसार सद्यस्थिती च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्प चालू आहेत.

सदर योजनेअंतर्गत विकास आराखड्यातील EWS, HDH आरक्षित जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी २.५ चटई निर्देशांक वापरुन प्रकल्पास शासन मान्यता घेऊन बांधकाम परवानगी नियमानुसार (DCR) पर्यावरण विभागाच्या परवानगी प्राप्तीनंतर प्रकल्प राबविणेत येत आहे. त्यानुसार सद्यस्थितीत खालील प्रकल्पांचे सुरवात करणेत आली आहे. सदर प्रकल्पामध्ये १४ ते १५ मजली इमारतीमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्राच्या सदनिका बांधणेचे नियोजन आहे.

सदर योजना ही खाजगी भागीदारीद्वारे परवडणा-या घरांची निर्मिती करणे (Affordable Housing in Partnership) या घटकाचा अवलंब करुन राबविणेत येत

आहे. या घटकांतर्गत केंद्र शासनाकडून १.५ लक्ष प्रति सदनिका इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या घटकाखाली ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत. या घटकाखाली राज्य शासनामार्फत प्रति घरकुल र.रु.१ लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. त्यानुसार खालील प्रकल्पांना राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती, केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती यांचे मान्यतेने राबविणेस मान्यता घेण्यात आली आहे.

पंतप्रधान आवास योजनेचे पिंपरी चिंचवड शहरातील इच्छुक लाभार्थींना लाभ करुन देणेकामी मा.महापौर यांचे समवेत सर्व पक्षनेते यांच्या झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे प्रक्रिया पार पाडणेबाबत निर्णय घेणेत आले आहेत.

१) दिलेल्या कालावधीमध्ये इच्छुक लाभार्थीने मनपाने दिलेल्या लिंकद्वारे आवश्यक फॉर्म ऑनलाईन भरुन, सदर फॉर्मची प्रिंट काढून तो नागरी सुविधा केंद्राकडे प्रस्तृत करावयाचा आहे.

२) नव्याने फॉर्म भरणारे - ज्या लाभार्थ्यांनी यापुर्वीच्या सर्वेक्षणात भाग घेतलेला नव्हता त्यांनी स्वतःचा फॉर्म व कागदपत्रे (आधार कार्ड, रेशन कार्ड, पॅन कार्ड, वोटर कार्ड, जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, बँक पास बुक, वीजबिल, प्रति प्रकल्पासाठी रु.५,०००/- (डी.डी.) डिमांड ड्राफ्ट, २ पासपोर्ट आकाराचे फोटो) तपासणीसाठी पात्रता पडताळणी नागरी सुविधा केंद्राकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याच ठिकाणी सदर फॉर्म व कागदपत्रे व र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल.

३) यापुर्वी फॉर्म भरलेले - ज्या लाभार्थींनी यापुर्वीच्या सर्वेक्षणामध्ये भाग घेऊन अर्ज सादर केला होता त्यांनी फक्त ऑनलाईन फॉर्म भरुन त्याची प्रती सह र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल. तसेच मधील कालावधीत नियमानुसार उत्पन्नापेक्षा वाढ अथवा स्वतःचे मालकीचे घर घेतल्यामुळे पुर्वी फॉर्म भरलेल्यांपैकी सदर इच्छुक लाभार्थी सोडतीत भाग घेणेस अपात्र ठरतील.

४) क्र.२ नुसार सादर होणारे अर्ज नागरी सुविधा केंद्रामार्फत पडताळणी करावयाची झालेस सदर केंद्रांना आवश्यक प्रशिक्षण, माहिती व तंत्रज्ञान विभाग व CLTC मार्फत देणेत येईल व प्रत्यक्ष फॉर्मचे तपासणी व पडताळणी फी म्हणून नागरी सुविधा केंद्रास र.रु.२५/- प्रति फॉर्म पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत अदा करणेत येईल.

५) सदर प्रक्रियेचा कालावधी ३० दिवस राहील.

६) सर्व पात्र लाभार्थ्यांची यादी ऑनलाईन वेबसाईटवर प्रसिध्द करुन लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रत्येक प्रकल्पाकरीताचे लाभार्थी निश्चित करणेत येतील.

७) इच्छुक लाभार्थींनी भरावयाच्या फॉर्ममध्ये तीन प्रकल्पांचा विकल्प भरणेस मुभा असेल.

८) र.रु.५०००/- ही सदनिकेच्या किंमतीतून वजावट करणेत येईल व सदनिका न मिळालेल्या लाभार्थींना सदर रक्कम परत करणेत येईल.

९) प्रतिक्षा यादी ठेवणे अथवा रद्द करणेचा कायदेशीर अधिकार मनपाने राखून ठेवलेले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील खालील प्रकल्पांची सद्यस्थितीत वाटप करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे. सदर प्रकल्पांना पर्यावरण दाखला व महारेरा अंतर्गत नोंदणी देखील करण्यात आलेली आहे. या प्रत्येक प्रकल्पांचे निविदेनुसार होणा-या खर्चावर आधारीत प्रति सदनिका खर्च निश्चित केलेला आहे. प्रत्येक प्रकल्पासाठी लाभार्थी हिस्सा खालीलप्रमाणे प्रपत्र अ नुसार येत आहे.

<u>प्रपत्र अ</u>

अ.क्र.	**प्रकल्पाचे नाव**	**एकुण सदनिका**	**प्रति सदनिकेची बांधकाम किंमत (लाखात.रु.र)**	**प्रति सदनिका केंद्र शासन अनुदान (लाखात.रु.र)**	**प्रति सदनिका राज्य शासन अनुदान (लाखात.रु.र)**	**प्रति सदनिका लाभार्थी हिस्सा रू .र) (लाखात**
१	चऱ्होली	१४४२	९.१९	१.५०	१.००	६.६९
२	रावेत	९३४	९.४५	१.५०	१.००	६.९५
३	बोऱ्हाडेवाडी	१२८८	८.७१	१.५०	१.००	६.२१
	एकुण	**३६६४**				

उपरोक्त तक्त्याप्रमाणे प्रति सदनिकेसाठी केंद्रशासन र.रु.१.५० लाख, राज्य शासन र.रु.१ लाख अनुदान देणार आहे. तसेच उर्वरित रक्कम हा लाभार्थी हिस्सा राहणार असून तो ३ टप्प्यांमध्ये (४०%+४०%+२०%) लाभार्थ्यांकडून घेण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे आर्थिकदृष्ट्या अतिकार्यक्षम व अतिव्यवहार्य (Most Economical Feasiblity) वसुलीच्या पर्यायापैकी लाभार्थींकडून घरकुलच्या किंमतीपोटी वसूल करावयाचे हिश्श्याची रक्कम वरीलप्रमाणे असून सदर रक्कम बांधकामाच्या ठराविक टप्प्यानंतर घेणेत येणार आहे. हिश्श्याचे टप्पे रेरा नियमानुसार ठेवण्यात आलेले आहे. तसेच सदर प्रकल्पामधील मुलभूत सुविधा विषयक (Infra Work) कामे, भाववाढ फरक अदायगी ही पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत करण्यात येणार आहे. म्हणजेच महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग म्हणून सदर प्रकल्प मनपाचे जागांवर करणे व प्रकल्पातील सुविधा पुरविणेचा खर्च, विकास शुल्क माफी व भाववाढ खर्च, अस्थापना खर्च या स्वरुपात असणार आहे.

सदर प्रकल्पांचे एकुण ३६६४ सदनिकांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणे आवश्यक आहे. तरी च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथील प्रकल्पांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणेचा वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५२० विषय क्रमांक – १३

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील

जा.क्र.वायसीएमएच/१७/कावि/३६/२०२० दि.१८/१/२०२०

महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचार घेत असताना मृत्यु झाल्याने तसेच सदर रुग्णांची अर्थिक परिस्थिती हालाखिची

असल्याने त्यांच्यावर करण्यात आलेल्या औषधोपचाराचे एकुण बील **रक्कम रुपये ४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस)** वसुल करणे शक्य नसल्याने ते क्षमापित करणे आवश्यक आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र. ४३१ दि. ७/९/२०१९ अन्वये रुग्णांची बेताची आर्थिक परिस्थिती व मानवतेच्या दृष्टीकोनातुन महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह मनपाच्या सर्व रुग्णालयात उपचाराकरीता दाखल झालेल्या रुग्णाचा उपचार चालु असताना किंवा रुग्णालयात दाखल असताना मृत्यु झाल्यास सदर रुग्णाचे मृत्युसमयी असणारे थकीत बील माफ करणेस मान्यता दिलेली आहे.

श्री.वामन श्रीपती वाघमारे नामक रुग्णांस दिनांक ११/०२/२०१८ रोजी वाय.सी.एम.रुग्णालयात उपचाराकरीता दाखल केलेले होते. सदर रुग्णांवर वाय.सी.एम. रुग्णालयात दि.११/०२/२०१८ ते दि. २७/०३/२०१८ या कालावधीत औषध उपचार केलेले आहेत. सदर रुग्ण दिनांक २७/०३/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. सदर रुग्णांवर दिनांक २७/०३/२०१८ अखेर केलेल्या औषध उपचाराचे एकुण बील र.रु. **४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस)** झालेले आहेत. परंतु रुग्णांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने सदर बिलापैकी **र.रु. २०,०००/-(अक्षरीर.रु. वीसहजार)** मा.योगेश बहल, नगरसेवक यांचे सांगणेवरुन माफ केलेले आहे. सदर बिलापैकी उर्वरीत **र.रु. २७,९४६/-(अक्षरी र.रु. सत्तावीस हजार नऊशे शेहचाळीस)** भरणेबाबत मयत व्यक्ती वामन श्रीपती वाघमारे यांचे नातेवाईक श्री. मारुती बाबु मांजरे, ओटा स्किम, रुपीनगर, निगडी, यांना या कार्यालयाकडील पत्र क्र.वायसीएमएच/८ब/कावि/४३२/ २०१९ दि. ०२/०३/२०१९ अन्वये कळविले होते. तथापि, "**तपास लागत नाही, सबब परत**"असा पोस्टाचा शेरा नमुद करुन सदरचे पत्र परत आलेले आहे.

मयत व्यक्ती वामन श्रीपती वाघमारे यांचे उपचाराची थकीत रक्कम वसुल होणे शक्य नाही. मानवतेच्या दृष्टीकोनातुन मा.योगेश बहल, नगरसेवक यांच्या सांगणेवरुन एकुण र.रु.**४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस) पैकी र. रु.२०,०००/-(अक्षरी र. रु. वीस हजार)** माफ केलेले असले तरी सदर एकुण **रक्कम रु.४७,९४६/-(अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस)** क्षमापित करणे आवश्यक आहे. अन्यथा सदरची रक्कम लेखा परीक्षणामध्ये आक्षेपाधीन निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर रक्कम क्षमापित करणे बाबत मा.स्थायी

समितीने दि. २७/१२/२०१९ रोजी विषय क्रमांक ७३, ठराव क्रमांक ६२३८ नुसार मान्यता दिलेली आहे.

मा. मुख्य लेखापरिक्षक यांचे दि. ५/११/२०१९ चे शेराकंनानुसार सदर रक्कम क्षमापित करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५२१ विषय क्रमांक – १४

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नरवि/कावि/१२/२३/२०२० दि.२२/१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्र.पीसीसी/३०९६/१८०१/सीसर-२६१/नवि-२२, दि ११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून, शासन निर्णय क्र.टीपीएस १८९२/१६०/प्र.क्र ५८/१२/पुनर्बांधणी क्र.२७/१२/ईपी मंजुरी /नवि-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखडयातील मौजे दिघी येथील स.नं ८७ पै व ६४ पै मध्ये आरक्षण क्र.

२/१३३ टेलिकॉम सेंटर (Telecom Center) या प्रयोजनाकरिता ४० आर क्षेत्र आरक्षीत आहे.

सदर आरक्षण बाबत अर्जदार श्री प्रमोद वसंत बेलसरे यांनी म.प्रा.व नर.अधिनियम १९६६ कलम ४९ अन्वये शासनास नोटीस दिली होती. दि.०४/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना इकडील विभागामार्फत संविस्तर अहवाल पाठविण्यात आला व सदर अहवानुसार विषयांकित आरक्षण पुणे–आळंदी रस्त्यालगत असून बीआरटी रस्त्यालगत वाहनतळ व तत्सम सुविधा उपलब्ध करण्यासाठी सदर जागा मनपास उपयुक्त ठरेल व त्यामुळे उक्त आरक्षण कलम ५० अन्वये रद्द होण्याऐवजी मनपा म.प्रा.व नर.अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये उक्त आरक्षणाचे प्रयोजन बदलून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मा. महापालिका सभेच्या मान्येतेने विहित कार्यवाही पूर्ण करून सादर करेल असे कळविणेत आले होते.

त्यानुसार दि.०५/०१/२०१८ रोजी शासनाकडे सुनावणी झाली. तसेच दि. ०५/०२/२०१८ चे पत्रान्वये सहाय्यक महाव्यवस्थापक, बी.एस.एन.एल यांनी मा.उप सचिव ,नगर विकास विभाग यांना सदर उक्त आरक्षण बाबत त्यांना आवश्यकता नसून सदर आरक्षण रद्द करणे बाबत विनंती केली होती व सदर पत्राची प्रत इकडील विभागास पाठविण्यात आलेली होती.

वरील सुनावणी च्या शासनाकडील दि.२३/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उक्त आरक्षण बाबत कलम ५० अन्वये रद्द होण्याऐवजी कलम ३७ अन्वये उक्त आरक्षणाचे प्रयोजन बदलून फेररबदलाचा प्रस्ताव शासनास महापालिका सभेच्या मान्यतेने विहित कार्यवाही पूर्ण करून सादर करणेबाबत कळविणेत आले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखड्यातील मौजे दिघी येथील स.नं ८७ पै,६४ पै मधील आरक्षण क्र. २/१३३ टेलिकॉम सेंटर (Telecom Center) या प्रयोजनाकरिता ४० आर क्षेत्र पुणे – आळंदी रस्त्यालगत असून बीआरटी रस्त्यालगत **वाहनतळ व तत्सम सुविधा** उपलब्ध करण्यासाठी सदर जागा मनपास उपयुक्त ठरेल असे मत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाची जागा टेलिकॉम सेंटर ऐवजी **वाहनतळ व तत्सम सुविधा** या वापरासाठी असा बदल करणेस मान्यता मिळणे कामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्धीचे मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील स.नं ८७ व ६४ पै ४००० चौ.मी क्षेत्राचे आ.क्र.२/१३३ "टेलिकॉम सेंटर" या प्रयोजनाऐवजी " **वाहनतळ व तत्सम सुविधा** " असे प्रयोजन करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मान्यता व फेरबदलाची पुढील वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५२२ विषय क्रमांक – १५

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/२१/२०२० दिनांक ५/०२/२०२०

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन

यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,१४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र. रु १४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०१/२०२० अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र"अ"

महानगरपालिकेचे नाव		**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**	**शेरा**
जिल्हा		पुणे	
वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या		१८०५३	
केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान" च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या		१८०५३	
मंजूर अर्जांची एकूण संख्या		१५४८९	
बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या	वैयक्तिक घरगुती शौचालय	एकुण बांधकाम पुर्ण-१५४६९	मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-१०६७९ सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४७९०
बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या	सामुदायिक शौचालय	५८२ सीटस	महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण

निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता	११०३८ लाभार्थी	GOI+GOM=६६२.२८लाख	GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा
		ULB = २२०.७६ लाख	ULB =२०००/- हिस्सा
	एकुण	**८८३.०४ लाख**	
निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता	१०३९५ लाभार्थी	GOI+GOM=४१५.८०लाख	GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा
		ULB =२०७.९० लाख	ULB =२०००/- हिस्सा
	एकुण	**६२३.७ लाख**	

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२३ विषय क्रमांक – १६

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>समित्यांचे अहवाल</u>

<u>मा.विधी समिती</u>

अ) दिनांक ०३/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १७/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२४ विषय क्रमांक – १७

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>

अ) दिनांक २६/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ०९/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२५ विषय क्रमांक – १८

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.शहर सुधारणा समिती</u>

अ) दिनांक २६/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ०८/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२६ विषय क्रमांक – १९

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>

अ) दिनांक १३/१२/२०१९, १६/१२/२०१९ व २७/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २७/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२७ विषय क्रमांक – २०

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.शिक्षण समिती सभा</u>

अ) दिनांक ०२/०१/२०२० व ०४/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १६/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.महापौर- सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/४०२/२०२०
दिनांक - ७/७/२०२०

(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

.

(मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ६६५४ दि.५/२/२०२० चे लगत)

प्रपत्र 'अ'

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे ४११ ०१८

वैद्यकिय विभागांतर्गत आवश्यक मनुष्यबळ संख्या

अ. क्र.	पदनाम	पदसंख्या
१	स्त्रीरोग तज्ञ	०६
२	बालरोग तज्ञ	०७
३	भुलतज्ञ	०६
४	फिजिशियन	०६
५	रेडिओलॉजिस्ट	०१
६	नेत्ररोग तज्ञ	०१
७	वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस)	१२
८	वैद्यकिय अधिकारी (एमबीबी एस / बीएएमएस)	०९
९	निवासी वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस / बीएएमएस)	१४
१०	दंतशल्य चिकित्सक	०३
११	फार्मासिस्ट	११
१२	स्टाफनर्स	३९
१३	लॅब टेक्निशियन	०५
१४	एक्स रे टेक्निशियन	०१
१५	सफाई सेवक (महिला)	२६

प्रपत्र ‘ब’

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे ४११ ०१८

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयांतर्गत आवश्यक मनुष्यबळ संख्या

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या
१	ब्लड बँक टेक्निशियन	०२
२	ब्लड बँक कौन्सिलर	०१
३	एम.एस.डब्ल्यु.	०१
४	डाटा एन्ट्री ऑपरेटर	०५
५	डायलिसीस टेक्निशियन	०१
६	फार्मासिस्ट	०५
७	एक्स रे टेक्निशियन	०३
८	जी.एन.एम.स्टाफनर्स	६६
९	लॅब टेक्निशियन	०३
१०	पुरुष कक्ष मदतनीस	०५
११	स्त्री कक्ष मदतनीस	०५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ४१

सभावृत्तांत

दिनांक – २०.०२.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी- २०२० ची मासिक मा. महापालिका सभा गुरुवार दिनांक २०.०२.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
१२) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१४) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लौंढे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लौंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.प्रमोद कुटे

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.शैलजा अविनाश मोरे

५५) मा.बाबर शर्मिला राजू

५६) मा.अमित राजेंद्र गावडे

५७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६१) मा.ढाके नामदेव जनार्दन

६२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६३) मा.करुणा शेखर चिंचवडे

६४) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६५) मा.भोईर सुरेश शिवाजी

६६) मा.अपर्णा निलेश डोके

६७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवानी

७२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७३) मा.सुलक्षणा राजू धर

७४) मा.शाम गणपतराव लांडे

७५) मा.सुजाता सुनिल पालांडे

७६) मा.योगेश मंगलसेन बहल

७७) मा.कदम निकीता अर्जुन

७८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८१) मा.नढे विनोद जयवंत

८२) मा.पाडाळे निता विलास

८३) मा.काळे उषा दिलीप

८४) मा.कोकणे संतोष अंकुश

८५) मा.बारणे अर्चना तानाजी

८६) मा.अभिषेक गोविंद बारणे

८७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८८) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०) मा.बारणे माया संतोष

९१) मा.निलेश हिरामण बारणे

९२) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९३) मा.दर्शले रेखा राजेश

९४) मा.कलाटे राहुल तानाजी

९५) मा.ममता विनायक गायकवाड

९६) मा.कामठे तुषार गजानन

९७) मा.चोंधे आरती सुरेश

९८) मा.कस्पटे संदिप अरुण

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०१) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०४) मा.कुटे निर्मला संजय

१०५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०८) मा.मुंढे उषा अंकुश

१०९) मा.कदम शशिकांत गणपत

११०) मा.लोखंडे चंदा राजू

१११) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११७) मा.नवनाथ दत्तू जगताप

११८) मा.संतोष बबन कांबळे

११९) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२१) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२२) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१२३) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२५) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर - आयुक्त , मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार-उपसचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम, भालकर - सह

शहर अभियंता, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.गाडेकर-प्र.सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औ.प्र.केंद्र मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.गलबले, मा.घोडे, मा.भोसले, मा.देशमुख, मा.वाघुंडे- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मो.गोफणे-आरोग्य अधिकारी, मा.बहुरे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. महापौर- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.शारदा सोनवणे - मा.महापौर साहेब, हिंगणघाट जळीतकांडातील पिडीत प्राध्यापिकेचा मृत्यू, विदया बाळ- महिलांच्या अधिकारासाठी आयुष्य वेचणा-या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, संपादिका आणि लेखिका यांचे निधन, रमेश रंजन- जम्मु काश्मिरमधील श्रीनगरमध्ये दहशतवादया समवेत झालेल्या चकमकीत सीआरपीएफचा जवान शहीद, गिरीराज किशोर- पद्मश्री विजेते लेखक आणि शिक्षणतज्ञ यांचे निधन, काकासाहेब चितळे - चितळे उदयोग समुहाचे प्रमुख यांचे निधन, विलास नखाते- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कर्मचारी व कर्मचारी महासंघाचे संचालक यांचे निधन, सुरेश खांबे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मुख्य लिपीक कर्मचारी यांचे निधन, प्रभाकर जनार्दन मिरजकर- चिंचवड गावातील सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, सुशिला वसंत मिरजकर - चिंचवड गावातील यांचे निधन, अशोक दत्तात्रय सायकर- चिंचवड गावातील यांचे निधन, संगीता सुभाष बारणे- थेरगाव, राणूबाई नागूभाठ बारणे, श्रीम.चिखले यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते. हिंगणघाट येथील जळीत हात्याकांडात पिडीत असलेल्या पंचवीस वर्षीय प्राध्यापिका अंकिता हिचा मृत्यू झालेला आहे तरी तीच्या विषयी आम्हां सर्व नगरसेवीकांना श्रध्दांजली वाहायची आहे तरी त्यासाठी आम्हांला संमती दयावी.

मा.माधवी राजापुरे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे. (सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.प्रियंका बारसे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच शारदाताईनी आपल्या सर्वांसमोर हिंगणघाट जळीत प्रकरणाबद्दल त्यांनी याठिकाणी मुद्दा मांडला. खरतर कालच शिवजयंती झाली आणि या शिवरायांच्या महाराष्ट्रामध्ये

आज आम्हांला महीलांना या सभागृहामध्ये जळीत हात्याकांड विषय घेवून याठिकाणी भावना व्यक्त करण्याची तुम्ही संधी दिली, खरतर ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आपला भारततर जळतोय, जळतोय का त्याला कुणीतरी जाळतंय हा एक महीलांच्या सुरक्षिततेचा गंभीर मुद्दा आहे. आपण आज २१ व्या शतकामध्ये वाटचाल करतो आणि आजही आपला कायदा, सुरक्षा आणि महीलांच्या प्रती असलेला आदरभाव आपल्याला दिसेनासा होत चालला आहे. "कणखर देशा, महाराष्ट्र देशा, दगडांच्या रेषा असं जे महाराष्ट्राच वर्णन आपल्या जनमनाच्या हृदयावरती कोरलेल आहे आणि अशा क्षणी हा कणखर महाराष्ट्र आज रडतो. आपल्या लेकी, सुणा याठिकाणी जळत आहेत. महाराष्ट्रामध्ये आज पालघर घ्या, नवी मुंबई किंवा हिंगणघाट, परवा दिवशी झालेली लासलगावची घटना, अगदीच लांबची नाहीतर आपल्या पुण्यातली सुध्दा घटना. अशा अनेक घटना आहेत की त्या घटना आपल्या हृदयाला चटका लावून जातात. परंतु जोपर्यंत आपल्या रक्ताच नातं कुणीतरी याठिकाणी जळतं नाही तोपर्यंत त्या घटनेची गंभीरता आपण घ्यायला पाहीजे ती गंभीरता याठिकाणी निर्माण होत नाही. आपल गृह खातं, आपल राज्यसरकार त्याशिवाय जागृत होत नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. एवढे चांगले चांगले आपल्याकड कायदे असताना त्या कायदयाचा वापर आपण का करत नाहीत. हा मोठा गंभीर प्रश्न आमच्या सारख्या सुशिक्षीत महीलांच्या मनामध्ये निश्चितच आहे. ही जी घटना झाली, पेट्रोल बाटलीमध्ये मिळते म्हणजे केवढी ही गंभीर गोष्ट आहे. त्याचप्रमाणे ऍसीड सारख्या गोष्टी, केमीकल मेडीकलमध्ये ईझीली मिळतात याच्यावरती गंभीर कायदे का बरं होत नसतील. मी आज महाराष्ट्र सरकारला आवाहन करते की जे सुट पेट्रोल किंवा ऍसीड सारख केमीकल या गोष्टी सुट्टया स्वरुपामध्ये नागरीकांना मिळणार नाहीत यासाठी जास्तीत जास्त प्रखर आणि कठोर असे निर्णय घेतले पाहीजेत. हैद्राबादमध्ये आपण बघीतल की एका महीन्याच्या आत त्याठिकाणी निकाल लगेच, पण आपला महाराष्ट्र का बरं असे निर्णय घेत नाही. या एक महीन्याच्या काळातच एवढया घटना का वाढलेल्या आहेत. एवढी असुरक्षितता महीलांच्या मनामध्ये का बरं निर्माण झाली. का एवढी महीलांना अंदोलन करावी लागत आहेत. आपण फास्ट्रॅगवरती एखादी केस घेतो पण त्याचा निर्णय लागत नाही. आज निर्भया सारखी दिल्लीतली घटना आहे. जेलमध्ये वर्षानुवर्ष हे खातात, त्यांना आपण पोसतोय परंतु आपण त्यांना शिक्षा करत नाहीत. त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहीजे. त्यांना ती वेदना सलग करायला लागली पाहीजे. आज निर्भयाची आई जेलच्या बाहेर अंदोलनाला बसते की माझ्या मुलीला न्याय मिळावा म्हणून. अशा कितीतरी निर्भयाच्या आई आहेत की ज्या

आपल्या न्यायाच्या प्रतीक्षेमध्ये याठिकाणी महाराष्ट्रामध्ये वाट बघतोय पण महाराष्ट्र सरकार मात्र कशाची वाट बघतय. हा खुप मोठा गहण प्रश्न सर्वांच्या समोर निर्माण झाला आहे. अशा नामर्द, निष्ठूर असे समाजामध्ये जे काही समाजकंटक आहेत जे की समाजामधली महीलांमध्ये असुरक्षितता निर्माण करत आहेत. खरच यांच्यासाठी कठोरात कठोर निर्णय त्यांनी घेतले पाहीजेत आणि जर कठोरात कठोर निर्णय घेतले नाहीततर आम्हां महीलांना असेच अंदोलनाला उभ रहाव लागेल. यासाठी अधिकाधिक महाराष्ट्र सरकारने प्रबोधन करणारे काहीतरी याठिकाणी निर्माण केल पाहीजे. लोकप्रतिनिधीना काहीना काहीतरी काम सूचवून दिली पाहीजेत की समाजामध्ये या विचाराना आळा बसेल अशाप्रकारचे काहीतरी वर्ग पण चालू केले पाहीजेत. संस्कार वर्गामधून सुध्दा समाज घडत असतो. या सभागृहातर्फे परत महाराष्ट्र सरकारला आवाहन करेन की पेट्रोल आणि ऍसीड सारख्या वस्तू आहेत या वस्तू सुट्या परिस्थितीमध्ये नागरीकांना मिळायला नाही पाहीजेत आणि तुम्ही जरी एखादा कोर्टामध्ये निर्णय घेतलातर तो निर्णय एक महीन्याच्या आत कसा लागला जाईल याच दृष्टिने अधिकाअधिक कडक पावल उचलली पाहीजेत किंवा कायदयामध्ये सुध्दा आपल्याला आता बदल करता येतात, कायदयामध्ये बदल करण्याचे अधिकारी जर तुमच्याकडे आहेत तर त्या अधिकाराचा वापरही तुम्ही केला पाहीजे आणि यासाठी महाराष्ट्र सरकारला मी आवाहन करते यामध्ये बदल नाही झालातर आमचे आंदोलन आम्ही करतच राहणार आहोत आणि आम्ही आमची मागणी पाठवतच राहणार आहोत. पण या सगळयामध्ये आपल्या महीला मात्र दुर्दैवाने याच्यामध्ये जळत राहणार आहेत आणि हे जळणं जर थांबवायच असेलतर महाराष्ट्र सरकारन कठोर पावल ही उचललीच पाहीजेत. सभागृहामध्ये आज हा विषय मांडला आणि आम्हां सर्वांना दोन शब्द का होईना आमच्या भावना व्यक्त करण्याची, महाराष्ट्र सरकार पर्यंत पोहचवण्याची संधी दिलेली आहे त्याबद्दल मी आपली आभारी आहे पण खरच हे म्हणण आहे ते आपण सरकारतर्फे अधिक कठोरतेनी अधिक तीव्रतेनी त्यांच्या पर्यंत नेण्याची आज गरज आहे हे मी सभागृहातल्या सर्व लोकप्रतिनिधीना सांगू इच्छिते, धन्यवाद.

मा.माया बारणे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर ही हिंगणघाटची घटना घडली आणि आपल्या सगळयांच्या अंगावर शहारे उमटले. अतीशय लाजीरवाणी गोष्ट राजमाता जिजाऊ, क्रांतीसुर्य सावित्रीबाई फुले यांच्या पद्स्पर्षाने पावन झालेल्या या महाराष्ट्रामध्ये महीलांवर होणा-या अत्याचाराच्या या घटनामुळ संपुर्ण महाराष्ट्राची मान लाजेनी खाली गेली. ३ फेब्रूवारीला हिंगणघाटची घटना घडली संपुर्ण देशान त्याच्या विरोधात आंदोलन केली. परंतु या महीलांच्या

बाबतीत जी घटना घडली तीचा दोष काय होता. ज्या नराधमाने हे कृत्य केलं त्याची पत्नी, मुलगी असूनही त्यानी अशाप्रकारच कृत्य केलं, खरतर ही मनोविकृतीच म्हणाव लागेल. त्याच दिवशी दुसरी एक घटना घडली ती औरंगाबाद जिल्हयातली सिल्लोड तालुक्यातील अंधारी याठिकाणी बिअरबारच्या मालकानी घरात जावून महिलेवर पेट्रोल ओतून तीला जाळले. ही घटना ताजी असतानाच ५ फेब्रूवारीला तीचाही मृत्यू झाला. हिंगणघाटच्या त्या महीलेचाही आठ दिवसानी मृत्यू झाला. या घटना ताज्या असतानाच पुन्हा ६ फेब्रूवारीला दुसरी घटना घडली पनवेलमध्ये जोंधारी गावातील ५५ वर्षाची बाई. खरतर केवळ मंगळसुत्राच्या चोरीचा संशय, पुरावाही नव्हता की ही तीनेच कृत्य केल आहे म्हणून. केवळ संशया खाली तीन पुरुष आणि दोन महीला, अतीशय लाजीरवाणी गोष्ट आहे की महीला असुनही ती या कृत्यामध्ये सामील झाली. खरतर अशा महीलाना चप्पलने मारल्या शिवाय पर्याय नाही. हे घडल्यानंतर पुन्हा १३ फेब्रूवारीला अशाचप्रकारची घटना नागपूर जिल्हयातील सावनेर येथील प्राध्यापिका जी डॉक्टर आहे तीच्या बाबतीत घडली तीच्या वरती ऍसीड हाल्ला करण्यात आला परंतु ती यामध्ये बचावली तीने स्वत:ला यामध्ये वाचवण्याचा प्रयत्न केला परंतु तीच्या बरोबर जी महीला होती तीच्या चेह-यावरती आणि तीच्या बरोबर जी विदयार्थीनी होती तीच्या हातावरती ऍसीड पडलं. म्हणजे यांचा काहीही दोष नसताना केवळ मनोविकृती, या एका गोष्टीमुळ त्यांना या गोष्टी फेस कराव्या लागल्या. कुठेतरी या घटनांचा आपण केवळ मेनबत्या पेटवून किंवा निदर्शन करुन या घटना संपणार नाहीत. यासाठी शासनावरती कुठतरी आपल्याला दबाव आणावा लागणार आहे. या गोष्टींचा आपण विचार केलातर आपल्यालाही प्रश्न पडतो की खरच राज्यात कायदा आणि सुव्यवस्था योग्य प्रकारे आहे का. हे प्रश्नचिन्ह तेव्हाच दुर होईल जेव्हा आपल्या कायदयात बदल होतील. ३०२ सारख कलम आपण याठिकाणी लागू केलं परंतु त्याचीही भीती अशाप्रकारच्या नराधमाला राहीलेली नाही. जितक्या कायदयामध्ये आपण बदल करतो, जितक्या वाटा काढतो तीतक्याच पळवाटाही निघतात आणि त्यालाही सर्वस्वी जबाबदार आपणच आहोत. कारण ज्यावेळेस हायकोर्टात, सुप्रिम कोर्टात या केसेस चालतात त्यावेळेस त्यांना मध्ये पिरीएड भरपूर मिळतो ते त्यातन पळवाटा काढण्याचा प्रयत्न करतात. माझी मनापासूनची इच्छा आहे की अशाप्रकारची जी काही प्रकरण आहेत ती फास्टॅग कोर्टामध्ये चालवण्यात यावी. खुप गंभीर प्रकारची याठिकाणी त्यांना शिक्षा देण्यात यावी. या घटना मी आता पंधरा दिवसाच्याच सांगीतल्या याच्या आदि तेलंगणामध्ये जी घटना घडली त्याच जगाने कौतूक केलं. का कौतूक केल, तर ते जे आरोपी होते त्यांना एन्कांऊटरमध्ये मारण्यात आलं,

दाखवल त्यांनी पण त्यांना ताबडतोब शिक्षा झाली. अशाप्रकारची कौतूकाची बाब सगळया देशानी उचलून धरली. महाराष्ट्रामध्ये काय होत की वर्षानुवर्ष यांना निकाल दयायला वेळ लागतो. तरी हा कुठेतरी आपलाही नाकर्तेपणा आहे अशाप्रकारच्या घटना आताच घडतात अशातला भाग नाही, काल आपण शिवजयंती साजरी केली ज्यांचे आपण स्वत:ला अनुयायी समजतो, कधी आपण त्यांच्या विचारांचा आदर केला का कधी आत्मसात करण्याचा विचार तरी केला का. नाही केला, कारण आपण फक्त त्यांचे वारस बनवतो आपल्याला, परंतु आपल्या कृतीमध्ये ते प्रत्यक्षात दिसत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्री मातेसमान मानली. म्हणूनच पररा‌ज्यातल्या स्त्रिया देखील त्यांच्या पुढे नतमस्तक झाल्या, एवढ मोठ विशाल हृदय महाराजांचच होतं. आज वस्तुस्थिती राहीलेली नाही. त्यांच्या काळातही महिलांवर अत्याचार होत होतें परंतु महाराज त्यावेळेस कठोर शिक्षा करत होते. हातपाय तोडून त्यांना भीक्षा मागायला चौकामध्ये ठेवायचे आणि येणा-या जाणा-या लोकांना त्यांना दगड मारा म्हणून सांगायचे. मृत्यू नाही झालातर बाकीच्या लोकांना चपराक होती की अशाप्रकारच जर आपण कृत्य केलतर आपलीही स्थिती त्याच पध्दतीने होणार आहे. मग हे जर महाराज करु शकतात तर आपण का नाही करु शकत. आपल्याकड संविधान आहे, आपल्याकडे कायदे आहेत. जर आपण परदेशामध्ये पाहीलतर तीथही अशाप्रकारच्या दूषकृत्याना अतीशय कठोर कायदे आहेत. मान्य आहे आपल्याकडे लोकशाही आहे परंतु लोकशाहीमध्येही आपण जर त्या कायदयामध्ये बदल केलेतर नक्कीच आपल्याला यामध्येही परिणाम जाणवायला लागेल. खरतर अतीशय निंदनीय गोष्टी या घडतात आणि राज्यशासन याची दखल घेत नाही यासारख दुसर कुठलही कृत्य याठिकाणी नाही. आपण लोकप्रतिनिधी आहोत, आपलही काम आहे की महीलां विषयी समाजामध्ये एक आदर निर्माण करण्यात यावा. केवळ उपभोगाची वस्तू म्हणून या महिलांकड पाहील नाही पाहीजे. आज आपण लाख म्हणतो की महीला पुरुष समान आहेत पण वस्तुस्थिती आहे का हो, नाही. आजही महीलांना दुय्यम स्थान दिलं जातं. कुठल्याही प्रकारच्या निर्णयप्रक्रीयेमध्ये तीच्या विचाराचा आदर केला जातो का, नाही. आजही आपल्याकड पुरुषप्रधान सांस्कृती मानली जाते, जपली जाते. तर कुठेतरी या गोष्टी बदलल्या पाहीजेत. आपली मानसीकता आपली बौध्दीकता बदलली पाहीजे आणि लोकप्रतिनिधी म्हणून ती आपली ही नैतीक जबाबदारी आहे. आपल्या ज्या महानगरपालिकेच्या शाळा आहेत त्या शाळांच्या मार्फत महीलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात यावेत, पाठयपुस्तकामध्ये जसे आपले विषय असतात तशाचप्रकारचा हाही एक विषय त्यांना देवून स्वसंरक्षणाचे धडे त्याठिकाणी देण्यात यावे असं मला

स्वत:ला मनापासून वाटत. या राज्यशासनाचा याठिकाणी मी निषेध करते, या ज्या घटना घडलेल्या आहेत या नराधमाचाही या सभागृहात निषेध करते आणि याठिकाणी थांबते, धन्यवाद.

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज पुन्हा एकदा एका मुलीवर पेट्रोल टाकून तीच्यावर प्राणघातक हाल्ला त्यामध्ये तीचा मृत्यू. मला वाटत रोजच पेपर वाचायला सुरवात केली की पहील्यांदी अंगावर काटाच येतो की आज पुन्हा कुठल्या महीलेवर ऍसीड फेकलं, कुठल्या मुलीवर पेट्रोल टाकल किंवा कुठल्या महीलेवर अत्याचार झाला, कुणावर बलात्कार झाला. या नराधमानी इतकी पातळी ओलांडली की अगदी नऊ महीन्याच्या चिमुरडी मुलीला सुध्दा या लोकांनी सोडलेलं नाही की अगदी ऐंशी वर्षाच्या म्हातारी पर्यंत. आज पुन्हा एकदा हिंगणघाट येथील भर रस्त्यावर प्राध्यापिका अंकिता हीच्या अंगावर पेट्रोल टाकून तीला जाळण्यात आलं. एवढ झालतरी राज्य सरकार झोपलेलं आहे का. पेट्रोल आणि रॉकेल एवढी स्वस्त, मला राज्यसरकारला प्रश्न विचारायचा आहे की तुम्ही आतापर्यंत कुठली ठोस अशी पावल उचलली आहेत आणि याच्या पुढे तुम्ही उचलणार आहात. रोज आम्ही महीलांवर झालेले आत्याचारच ऐकत बसणार आहोत आणि त्याच्यावर आम्ही आंदोलन करत राहणार आहोत का. म्हणजे आमच्या महीलांच्या हातामध्ये पन्नास टक्के आरक्षण देताना या सरकारन आम्हांला ही गोष्ट दिली का की रोज तुमच्यावर आत्याचार होणार आणि रोज तुम्ही आंदोलनासाठी रस्त्यावर उभे राहणार. राज्यसरकारचा मी निषेध करते. आतापर्यंत याच्यावर ठोस पावल राज्यसरकारने उचलायला पाहीजे होती. कारण मुलींच फक्त नाव बदलल जात पण जात मात्र एकच, स्त्रि. महीला वर्गाला संताप आलाय की आम्ही नेहमी कुठल्या पध्दतीने कुठल्या सरकारवर, ज्या सरकारला आम्ही मायबाप समजतो त्या मायबापाला आम्हांला रोज सांगाव लागतं का, की आमच्या सुरक्षिततेचा प्रश्न तुम्ही कुठल्या पध्दतीन सोडवणार आहात म्हणून. आताच माझ्या सहकारी मायाताईनी सांगीतल की महाराजांच्या काळामध्ये, हो महाराजांच्या काळामध्ये आपल्या महीलेला खरोखर आदरभाव होता पण आता तो आदरभाव या सरकारमध्ये राहीलाय का हा मुळात खुप मोठा प्रश्न आहे. मला वाटत त्यासाठी माझ्या महीला वर्गाला एक माझ सांगण आहे "लाट उसळली संतापाची विचार आता काय, लाट उसळली संतापाची विचार आता काय, कापून टाका नराधमांचे हात आणखी पाय, वखवखलेले विकृत आता दिसतील जेथे जेथे, ठेचून टाकू हीच शपथ मग करू या खरीच तेथे, षंढ कायदा गेंडा शासन म्हणुनी गुन्हा पुन्हा हा, भीती घालतो रोजच हल्ली रस्ता सुना सुना हा, रोजच निघती हल्ली

मोर्चे घेऊन हाती दिवे, दात विचकती मोर्चालाही नराधमांचे थवे, किती प्रियांका किती निर्भया या देशी मेलेल्या, किती अनामिक कळ्या बिचा-या शिकार मग केलेल्या, सन्मानाच्या रोज घोषणा वाचून महिला हसते, गल्ली, दिल्ली, शाळा, रस्ता सर्वत्रच ती फसते, तूच हो आता झाशीवाली करण्यासाठी वार, नराधमांना दाव तळपत्या समशेरीची धार" मला वाटत आता या शासनाच्या विरोधात मग कुठल्याही पक्षाची ती महीला असो त्या सर्व पक्षाच्या महीलांनी एकत्र येवून एक वेगळया पध्दतीने आंदोलन करुन या शासनाला जाग कराव लागेल की याच्यामुळे कुठल्याही महीलेवर झालेला अन्याय आम्ही खपवून घेणार नाहीत आणि त्यासाठी महापौर ताई तुम्हांला आमची विनंती असेल की पिंपरी चिंचवडमध्ये कायदा व सुव्यवस्था जी आता ठजाड होते त्याच्यासाठी तुम्ही सुध्दा सगळया आमच्या नगरसेवीकांना मिटींगला बोलवा, आपल्या प्रत्येक वॉर्डामधले जे प्रश्न आहेत ते मांडण्याची तुम्ही संधी दया. कारण ज्यावेळेला प्रथम नागरीक म्हणून आम्ही आमच्या वॉर्डात काम करत असतो तेव्हा आम्हांलाही काम करणं सोप जाईल. मला वाटत सर्व महीलांनी यासाठी सक्षम व्हायला पाहीजे. राज्यशासनान यासाठी जागृत होण्याची खरोखरच प्रचंड गरज आहे एवढच बोलते आणि इथेच थांबते.

मा.वैशाली घोडेकर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी आताच माझ्या सहकारी मैत्रिणीनी अतीशय चांगला मुद्दा मांडला. ख-या अर्थाने हे आज विचारायची गरज आली की महीलांना नुसत तुम्ही लक्ष्मी म्हणता, देवठिकाणी पुजता पण त्याठिकाणी खरच तीचा आदर करता का हा विचार करण्याची गरज आहे. आज मग हिंगणघाटची घटना असेल, नाशिकची घटना असेल आणि मी इथेही दाखवून देते की निर्भयाच्या आरोपीना अजून फाशी झाली नाही, याची देखील केंद्राने दखल घेतली नाही. याचा देखील याठिकाणी निषेध करते. केंद्राने याची दखल घेवून त्याठिकाणी फाशी दिलीच पाहीजे होती. जर तीथ इतकी वर्षे झाल ठशिर होतो तर आम्ही महीलांनी काय म्हणून अपेक्षा पकडायची हाच याठिकाणी मला प्रश्न पडला आहे. पुन्हा एकदा याठिकाणी मी केंद्रसरकारचा निषेध करुन आज जे काही महीलांसाठी होतय ते झाल नाही पाहीजे. मा.महापौर याठिकाणी आताच सुजाताताईनी अतीशय चांगला मुद्दा मांडला आहे की आपण एक मिटींग बोलवली पाहीजे कारण की अशा घटनाची वाढ ही पिंपरी चिंचवडमध्ये पण वाढलेली आहे. त्याची पण नैतीक जबाबदारी ही आपल्यावरच आहे. याठिकाणी अतीशय चांगला मुद्दा त्यांनी दिलेला आहे तरी आपण मिटींग लावावी आणि पिंपरी

चिंचवडमध्ये वाढती गुन्हेगारी आहे त्याला देखील आळा बसवावा आणि पुन्हा एकदा मी या घटनेचा निषेध करते आणि याठिकाणी थांबते.

मा.बाळासाहेब ओव्हाळ - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हिंगणघाटसारखी घटना त्यानंतर लगेचच नाशिकची घटना. मा.महापौर साहेब, गेल्या आठ पंधरा दिवस झाल कन्टीन्यू एकएक बातमी दिवसाआड चालू आहे. कुठेतरी अत्याचार होतो, कुठेतरी अन्याय होतो, कुठेतरी बलत्कार होतो. याच कारण काय, मी तुम्हांला आज या सभागृहाला आठवण करुन देवू इच्छितो की २०१६ साली कोपर्डी याठिकाणी बलात्कार झाला आणि त्या बीचारीचा त्या बहीणीचा घात केला गेला तीला ठार केल गेलं. परंतु त्यावेळेला काही राज्यकर्त्यानी, तुम्हांला आठवण करुन दयायची मुद्दाम की तोच मुद्दा जातीवाचक राजकारण केल गेलं. त्यावेळेस पुर्ण महाराष्ट्रामध्ये कायदा आणि सुव्यवस्था बीघडवायच काम केलं, त्यावेळेसच्या विरोधकानी हे काम केल आणि आज जे कोणी विरोधक असतील त्यांना का आज जाणीव होवू नये. हा माझा खुप मोठा प्रश्न आहे मी सभागृहाच्या माध्यमातून सरकारला हा प्रश्न विचारु शकतो. जे गेल्या पंचवार्षीकमध्ये संविधाना विषयी विचारत होते, संविधान कुठतरी तोडल जातय, बुडवल जातय म्हणजे संविधान आज त्यांच्या हातात नाही का. आज राज्यसरकारच्या हातात संविधान नाही का, त्यांच्याकडे तो मुद्दा नाही का. का ते वापर करु शकत नाहीत, का त्यांचा प्रशासनावरती वचक राहीलेला नाही. नेमक काय राहीलय. आजच्या पेपरला सुध्दा सिल्लोड याठिकाणी गरीब महीलेवरती आणि तीच्या मुलावरती आत्याचार करुन तीला विहीरीमध्ये फेकून दिल जातय. परवाची नाशिकची घटना आहे, बसस्टॉपवरती महीलेंवरती पेट्रोल टाकून जाळल जातंय. म्हणजे आज हा गेल्या सहा महीन्यापासून चढता आलेख आहे. जस नवीन राज्यसरकार सत्तेत आल्यापासून एखादा तोहफा दिला जातो तसा आपल्या नागरीकांना खुप मोठा तोहफा दिला जातो. याबद्दल त्यांच अभिनंदन करायच का निषेध करायचा हे नागरीकांनी ठरवायचं. मला पुन्हा एकदा आठवण करुन दयायची आहे की प्रत्येकवेळेस यांनी राजकारण केलय. त्यावेळेस या छोटया गोष्टी म्हणल्या गेल पंरतु ज्याप्रमाणे बॉम्ब हाल्ल्यामध्ये त्यावेळेसचे उपमुख्यमंत्री आर.आर.पाटीलांनी राजीनामा दिला होता त्याचप्रमाणे आजचीही जबाबदारी स्विकारुन आजचे उपमुख्यमंत्री यांनी का राजीनामा देवू नये असा मला प्रश्न विचारायचा आहे. आज जर महाराष्ट्रामध्ये कायदा आणि सुव्यवस्था जर ढासळत असेलतर हे राज्यसरकार खरोखर षंढ आहे का, आता सुजाता ताईनी सांगीतल त्यांच्या कवीतेमधुन. कायदा तर जागेवरती आहे परंतु कायदयाच पालन

करणारे, कायदयाच अवलंबन करणारे जर योग्य नसतीलतर कायदा कितीही चांगला बनवला, कितीही परखड बनवलातर तो कायदा योग्य ठरणार नाही कारण शासनाच काम आहे, राज्यकर्त्याच काम आहे त्यांनी तो कायदा आणि सुव्यवस्था पाळली गेली पाहीज, त्यांनी प्रशासनावरती वचक ठेवला पाहीजे. परंतु हा वचक दिसून येत नाही म्हणून मी आज या राज्यसरकारचा निषेध करतो आणि त्याच बरोबर आज खुद उपमुख्यमंत्री यांनी ती जबाबदारी स्विकारुन कुठेतरी आपल्या मनामध्ये दाद देवून त्यांनी राजीनामा दिला पाहीजे. त्याच बरोबर मी या माझ्या बहीणीना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

मा.मंगला कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला असं वाटत की आज आपण महीलां विषयी जर बोलत असूतर, राजकारणाचे आपण अंदोलन करतो, यांनी का केल नाही मागच्यावेळेस आम्ही केल आता तुम्ही करायच असं आमच म्हणण नाही पण कमीत कमी ही माहिती घ्या की कुठल खात कुणाकडे आहे आणि मग राजीनामा कुठल्या मंञ्यानी कसा दिला पाहीजे. उगीच आपल्याला काहीतरी बोलायच म्हणून बोलून विषयांतर करणं योग्य नाही, कारण सभागृहामध्ये सर्वपक्षीय लोक आहेत. उगीचच तुम्ही बोलले म्हणून आम्ही बोलायच महीलांचा विषय परत कुठेतरी फाटयावर नेऊन सोडणार. शंभर टक्के मागणी करा परंतु त्या खात्याची जबाबदारी कुणाची आहे. आज जे महीलांच्या बाबतीत एवढ घडतयनां तरी सगळया आपल्या बांधवानी हिंगणघाटच्या कुठल्या जेलमध्ये त्याला ठेवलाय तीथ आपण जाऊ मी पण तुमच्या बरोबर असेल अशी डोक्यात भावना ठेवा. आज तेलंगणामध्ये ज्यावेळेस झाल आणि त्यांना तेथे मारल, त्यांचे एन्काऊंटर करण्यात आले. पब्लिकनी त्या पोलीसांच अभिनंदन केलं. परंतु त्यावेळेला अशी सुध्दा बाजू मांडण्यात आली की यांनी जाणुनबूजुन मारलं. यांच्यावर गुन्हे दाखल करा. दोन्ही बाजूनी आपल्याला अभ्यास करावा लागतो. कायदयाच्या बाबीनुसार सुध्दा अभ्यास करावा लागतो म्हणून आमच्यासारख्या सिनीअर महीलांनी असंजर काहीतरी वेगळ बोलायच ठरवलतर आम्ही काही इतरांची बाजू घेतो का अंस होईल म्हणून बोलताना, नक्कीच सरकारच्या विरोधात बोला मी सुध्दा म्हणते की सरकारला जाग आली पाहीजे. कायदे कडक केले गेले पाहीजे. फास्टॅग कोर्ट चालल पाहीजे. यासाठी कशाला आठ दिवस, दहा दिवस लागतात. पुरावे मिळालेत नक्की त्याना फाशीची शिक्षा दया. जास्तीत जास्त दिवस न लावता त्यांना चौकात फाशीची शिक्षा दया असं मी म्हणते. परंतु वेगळ वळण देवू नका. काही भगीनी बोलल्या सगळयांच्या मनामध्ये तेच आहे. परंतु याच्यापेक्षा

सुध्दा मन सळसळतं. आमच्याकडेही सुना आहेत, मुली आहेत, नातवंड आहेत. आज समाजात जी घटना घडते ती छोटयातल्या छोटयात अगदी वृध्द महीलांपर्यंत अत्याचार चाललेले आहेत आणि हे अत्याचार आपण नेहमी डोळयानी बघत असतो, प्रत्येक स्त्रिला आणि पुरुषाला सुध्दा अंतकरण आहे त्या प्रत्येकला असं वाटत असतं की अशी घटना घडल्यानंतर आपण तीथे जाव आणि आपण या नराधमाना काहीतरी वचक म्हणून काहीतरी केल गेलं पाहीजे असं प्रत्येकाला वाटत असंत. कारण आपण जीवंत माणस आहोत. प्रत्येकाला असं वाटत असतं माझी घरात बायको आहे, माझी मुलगी आहे, माझी बहीण आहे असं प्रत्येकाला वाटत असतं. त्यादृष्टीकोनातून प्रत्येकाच्या मनामध्ये ही भावना आहे. सभागृहाच्या वतीने मा.महापौर हे राज्यसरकारला पाठवा, केंद्रसरकारला पाठवा. मग राज्यसरकारनी केल नाहीतर मग केंद्र सरकारन निर्भयाबाबतीत का केल नाही. कुठल सरकार आहे त्याच काही घेणंदेण नाही. महीलांची सुरक्षा पहीली महत्वाची असं मला याप्रसंगी वाटतं. मा.महापौर आपल्या महापालिकेच्या शाळा असतील तुम्ही शिक्षणमंत्री यांना पण पाठवा प्रत्येक शाळेमध्ये मुलीला परसेन्टेज चांगले नाही मिळालेतरी चालतील परंतु ती स्वावलंबी झाली पाहीजे. तीला चांगल कराटयाच प्रशिक्षण दिलं गेल पाहीजे. तीला स्वसंरक्षणाच्या सगळया गोष्टी दिल्या पाहीजेत. प्रत्येक विदयार्थ्याला पाच वर्ष मेन्टेन केलं पाहीजे. प्रत्येक व्यक्तीन पाच वर्षे मिलीटरीमध्ये काम करुन यायला पाहीजे म्हणजे त्याला समाजाच आणि सगळया गोष्टीच भान राहील. आणि त्या कायदयानुसार आणि त्या तत्वावनुसार चालण्यासाठी माणस तयार राहतील, महीला तयार राहतील, मुल तयार होतील. जी अंकिता म्हणून मुलगी होती ती इतकी देखणी होती की काय तीची चुक होती. त्या मुलीकड बघीतल्यानंतर सभागृहामध्ये बोलायला शब्द सुध्दा नाहीत. ज्या माणसाच लग्न झालेल होत त्याला स्वत:ला मुलगी आहे, आपल्या मुलीच्या बाबतीत एक सेंकद सुध्दा त्याच्या मनामध्ये विचार आला नाही की माझ्या मुलीच्या बाबतीत जर अंस काही घडल असतंतर का होईल. अंकिता तर गेलीच गेली परंतु त्या बाईला आणि तीच्या मुलीला आज ज्यावेळेला जगायच आहे त्यावेळेला तुझा बाप असां होता, हे त्या मुलीच्या मनामध्ये आयुष्यभर गाठ होवून राहणार आहे की तुझे वडील असे होते. तुझ्या वडीलांनी हे कृत्य केल आहे. आणि म्हणून केंद्रसरकार असो किंवा राज्यसरकार असो तुम्ही सगळया बरोबर या मी पण तुमच्याबरोबर अंदोलनाला आहे. केंद्रसरकारकड पण अंदोलनाला आहे आणि राज्यसरकारड पण अंदोलनला आहे. आंदोलन करायलाच पाहीजे, सरकारने दोन्ही गोष्टीला जबाबदार धरुन या लोकांना लवकरात लवकर शिक्षा झाली पाहीजे. आपण जेवढया भागात आहोत

तेवढया भागातला पहील्यांदा विचार करावा. आपण आपल्या लोकांना आपल्या ऐरीयामध्ये जसं मगाशी मी सांगीतल की माई तुम्ही सगळया नगरसेवीकानंची बैठक बोलवा. कमीत कमी आपण चांगल केल गेलं पाहीजे. त्या दृष्टीकोनातून आपण प्रयत्न केले गेले पाहीजेत. आपल्या इथे सुध्दा कितीतरी घटना घडल्या जातात. आज टीव्हीवर दाखवत होते की वर्षाला २२ हजार, २५ हजार मुली, महीला बेपत्ता होतात. बेपत्ता झालेल्या महीला सापडत नाहीत. म्हणजे हीतर त्याच्यापेक्षा वाईट घटना आहे. परवाच्या दिवशी एक आकरा वर्षाची मुलगी बेपत्ता झाली. रोज टिव्हीवर दाखवल जातं. मग या मुली जातात कुठं. बेपत्ता होण्याची संख्या पण भयंकर आहे. आज समाज विकृतीन भरलेला आहे. याच्यासाठी आपण काय केलं गेलं पाहीजे. हे सुध्दा आपण बघीतल पाहीजे. आपण समाजामध्ये काम करतो, राजकारणापेक्षा आपण समाजकारण करतो असं आपण म्हणतो तर मग आपण काय केल गेल पाहीजे. समाजकारण जर आपल्याला करायच असेलतर आपण मग काय केल गेल पाहीजे याचा सुध्दा आपण विचार केला गेला पाहीजे. कॉलेजमधली मुल असतील, सातवीचे, आठवीचे, नववीचे, दहावीचे मुल असतील या सगळयाना सगळया गोष्टीच स्पष्टीकरण हे सगळ शाळेतून दिल गेल पाहीजे. आणि म्हणून आपण हाळू हाळू समाज बदली केला पाहीजे. आपण राज्यसरकारला अगदी ठणकावून विचारु की तुम्ही त्या नराधमाला किती दिवसानी फाशी देणार आहात हे सांगा. उज्जवल निकम यांच्याकड केस गेलेली आहे. आपण उज्ज्वल निकम यांना सुध्दा सगळेजण पत्र पाठवू शकतो. विचारु शकातो की आज कितवा दिवस आहे आणि किती दिवसात तुम्ही केस उभी करणार आहात. तरी आज याला वेगळ वळण न देता ओव्हाळ यांच्या बोलण्याचा उद्देश वाईट आहे असं मला म्हणायच नाही माणुस ओघाने बोलून जातो. उपमुख्यमंत्री यांच नाव घेतल म्हणून मला त्रास होणार नाही हे लक्षात ठेवा. चुकी असेलतर शंभर टक्के आजीतदादा राजीनामा देतील हेही तुम्हांला आतापासून सांगते. पण त्यांच्याकडे ते खातं असलं पाहीजे. आज आम्हांला सुध्दा ते असं सांगतात की मी आताशी उपमुख्यमंत्री आहे. तुमच्या सगळया कामासाठी नाही झालो. मला बाकीचे पण काम आहेत. म्हणून जबाबदारीपुर्वक बोलावं इतकच आमच म्हणण आहे. इतर गोष्टी बाजूला राहतात आणि तुम्ही आणि आम्हीच भांडत बसतो. बाकी ठिकाणी वर केंद्र राज्य सगळ अलबेल चाललेल आहे. तुम्ही आम्ही इथ का वाद घालायचा आणि चांगल्या पध्दतीने सभागृहामध्ये विषय झाले पाहीजेत. आपण ठराव करा, सगळया नगरसेवकांच्या सहया घ्या आणि केंद्रसरकारला, राज्यसरकारला हे पाठवा की आमची ही भावना आहे की यांना लवकरात लवकर फाशी झाली पाहीजे. पोलीस

यंत्रणा वाढली पाहीजे. मा.महापौर साहेब आपण हे केल गेल पाहीजे की पोलीस आयुक्तालय इथे आहे. आपल्याकडे पेट्रोलींगच्या सुध्दा गाडया नाहीत. १०० नंबरला फोन केला तर गाडी येवू शकत नाही. कारण पोलीस स्टेशनवाले सांगतात की पेट्रोलींगवाल्याकड गाडयाच नाहीत. मग आता महापालिकेनी त्यांना गाडया पुरवायच्या का. आपण काय केल पाहीजे, आपण मोर्चे काढले पाहीजे, आपण आंदोलन केले पाहीजे, आपण पोलीस आयुक्ताना जावून बोलल पाहीजे. आमच्या इथ आमच्याकडे सुरक्षावाले चांगल्या पध्दतीने वाढले पाहीजे. आपण याच्यावर उपाययोजना सुध्दा चांगल्या पध्दतीने शोधल्या पाहीजेत. मला तर बोलायची इच्छा

नव्हती कारण बोलायला शब्द नाहीत. इतकी सुंदर देखणी मुलगी ज्या घरातली गेलेली आहे त्या आई वडीलाच काळीज कस फाटत असेंल आणि आज आपण या विषयावर जर चर्चा करतो तर ते आईवडील म्हणतील तुम्ही आमच्या विषयी काही चर्चा करु नका. निर्भयाच्या आईला बघीतलना तर ती ओरडून ओरडून सांगते, त्या लोकांची फाशी दरवेळेला पुढे पुढे जाते. आपणही एक आई आहोत त्यावेळेला असं वाटत की अस कोण बोलू शकतं. बोलायची सुध्दा हिम्मत नाही आणि बोलायची सुध्दा ताकद माझ्यासारखीत नाही की अशा विषयावर सभागृहात बोलाव. लवकरात लवकर फास्टॅग कोर्टात जावुन त्या नराधमाना लकवरात लवकर फाशीची शिक्षा देता येईल. आपल आयुक्तालय, आपली पिंपरी चिंचवडची यंत्रणा आपल पुर्ण पिंपरी चिंचवड शहर, आजूबाजूचा परिसर याच्यामध्ये पोलीस यंत्रणा असेल वेळ आलीतर आपण नक्की देवू आपण इतके करोडो रुपये खर्च करतो. एखादा पुल करु नका किंवा आणखीन काही एक दोन गोष्टी करु नका पण कॅमेरा बसवा हे पण मी मागे सांगीतले होते. शहरामध्ये सगळीकडे कॅमेरे बसवले गेले पाहीजेत. सगळीकडे सगळया यंत्रणा सुरळीत चालल्या पाहीजेत. स्मार्ट सिटीच्या तुम्ही केबल टाकताय त्याच्यातन काय काय गेल काय तुम्हाला माहिती आहे. नाहीतर कॅमेरेसाठी परत खोदून ठेवा. म्हणून सगळया शहरामध्ये कॅमेरे हे चांगल्या पध्दतीने बसले गेले पाहीजेत. सगळा ऐरीया कव्हर झाला पाहीजेत. यंत्रणा इतकी फास्ट असली पाहीजे की कुठल्याही ठिकाणी कुठली गोष्ट घडली तरी पोलीस चौकीला किंवा पोलीस स्टेशनमध्ये जिथे जिथे आपण कॅमेरे बसवलेत एक त्यांच्याकडे कॉपी असली पाहीजे आणि एक माझ्याकडे कॉपी असली पाहीजे. याचीही यंत्रणा पाहीजे तरच या चिमुरडीना या महीलांना श्रध्दांजली वाहील्यासारखी वाट्टेल नाहीतर उगाचच ओरडायच, उठायच, बसायच, तुम्ही बोलतात म्हणून आम्ही बोलायच आम्ही बोलतोत म्हणून तुम्ही बोलायच हे करण्यात काही अर्थ आहे अस मला वाटत नाही.

मनापासून माझ्याकडून माझ्या कुटूंबीयाकडून, पक्षाकडून सगळयाकडून मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहते आणि थांबते.

मा.मीनल यादव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम जे असे कृत्ये करतात ते नराधम कुठल्या जातीचे, कुठल्या पातीचे किंवा कुठल्या पक्षाचे किंवा कुठल्या केंद्रशासनाच्या काळातले किंवा राज्यशासनाच्या काळातले हे नसतात. त्यांची ही वृत्ती ठेचली गेली पाहीजे. आजच्या या घडीला कोणीही या बाबतीत राजकारण न करता, याला त्याला दोष देण्यापेक्षा प्रत्येकानी केंद्रशासनाने आणि राज्यशासनाने त्यांची त्यांची कर्तव्य लवकरात लवकर पुर्ण करुन अशा नराधमाना शिक्षा होणं महत्वाच आहे. कारण अशा गोष्टी ज्या कुटूंबावर होतात त्याचेसारख दु:ख आपण फक्त बोलून होत नाही, ज्या कुटूंबाला भोगाव लागतं त्यानांच हे कळतं त्याच्यामुळे हे फक्त चर्चा करणं आणि याला त्याला दोष देणं याच्यात वेळ न वाया घालवता मा.महापौरांना मी विनंती करते की तुम्ही राज्यशासनाकड, केंद्रशासनाकडे पिंपरी चिंचवडच्या वतीने लवकरात लवकर कारवाई व्हावी, प्रत्यक्ष शिक्षा व्हावी अशी विनंती करते त्याच बरोबर आपण पिंपरी चिंचवडच्या प्रथम नागरीक या नात्याने काय करु शकतो. इथेही भरपूर महीला आहेत त्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत आपण काय करु शकतो. आपण महीला महापौर म्हणून लाभलेला आहात त्याच्यामुळे नवीन नवीन योजना आखाव्यात. महीलांना स्वसंरक्षणाचे धडे या गोष्टी आपण करणारच आहोत. त्याच बरोबर महापौरांचा किंवा आयुक्तांचा ऑनलाईन नंबर महीलांसाठी जो चोवीस तास उपलब्ध राहू शकतो की पिंपरी चिंचवडमध्ये काहीजर घडलतर इथे एक सुरक्षा कक्ष वेगळ तयार करा की फक्त महीलांच्यासाठी. कुठली जर महीलाच्या बाबतीत अघटीत घटना घडत असेल, राञी, चोवीस तास दिवस रात्र कधीहीतर आपल्या वतीने, पोलीसांच्या वतीने तर ते संरक्षण करतीलच कमीशनर साहेब आणि तुम्ही तुमच्या वतीने काय करता येवू शकतं किंवा नवीन काही योजना महीलांसाठी करता येवू शकतात याचा आपण विचार करावा. आणि निर्भयाच्या बाबतीत जो प्रकार मागील काळात घडला त्याचा अजून निकाल लागला नाही त्याच्यामुळे या घटना वरच्या वर घडत चाललेल्या आहेत. मी विनंती करते की पक्षाच राजकारण, केंद्राच, राज्याच असं न करता अशा वृत्तीला ठेचल गेल पाहीजे अशी विनंती करते, धन्यवाद.

मा.आशा धायगुडे- शेंडगे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर १० फेब्रूवारीला जी घटना घडली, ज्या तरुणीचा शेवट त्या दिवशी झाला १० फेब्रूवारीला सकाळी ६.५५ मिनीटांनी. सर्वाच हृदय पिळवटून टाकणारी, मनाला दु:ख

देणारी अत्यंत वाईट, दुर्दैवी घटना ३ फेब्रूवारीला जो काही अन्याय, अत्याचार झाला त्या अत्याचारातून ती वाचेल ही आशा ती अपेक्षा प्रत्येकाच्या मनामध्ये होती आणि ती वाचली पाहीजे. तीच्या समोर त्या नराधमास शिक्षा देण्याची संधी या राज्याला देता आली असती. परंतु दुर्दैवाने मृत्यूशी झुंज देत देत ती सात आठ दिवस मृत्यूशी खेळत होती. १० फेब्रूवारीला तीचा मात्र शेवट झाला. मला आठवल की अगदी आजपासून वीस वर्षापुर्वी रिंकू पाटील नावाच एक प्रकरण १९९० साली, मी त्यावेळेला नववी किंवा दहावीला असेल, ती पहीली घटना आपल्या सगळयांना ज्ञात असणारी, पेपरला आलेली खुप ती गाजली, गाजली या कारणांन की अत्यंत वाईट असं वाटत की त्यावेळेला तो जो कोण नराधम होता त्या नराधमाला चौकात फाशी झाली असती, त्याला चौकात मारल असतंतर पुन्हा या माझ्या देशामध्ये, या जिजाऊच्या राज्यामध्ये, या शिवाजी महाराजांच्या भूमीमध्ये पुन्हा कोणत्याही नराधमाने ही चुक करण्याची पुनरावृत्ती केली नसती. कुठतरी कायदा आहे, न्याय आहे, सुव्यवस्था आहे याच्या आशा अपेक्षावरती आपण सगळेजण राहतो. परंतु परवाची घटना झाली आणि रिंकू पाटील माझ्या डोळयासमोर उभी राहीली. कारण आपल ते आठवी नववीत तरुण असल्याच वय आणि त्या वयात अशी घटना, कालपर्यंत एखादया माणसाने एखादया मुलीला छेडलं काहीतरी बोलले इथपर्यंत व्हायचं परंतु त्यावेळेला रिंकु पाटीलची घटना घडली होती मला वाटत सगळयांना ती आठवत असेल. आज सभागृहामध्ये पक्षीय राजकारण करायच नाही असे आपण कितीही म्हणलोतरी त्याचवेळेला जर आपण त्या नराधमाला सगळयांच्या दबावाने, आज इथे असलेल्या सगळया माझ्या भगीनी, बंधु असतील जे प्रत्येक प्रभागातून प्रतिनीधीत्व करतात. जर माझ्या घरात माझ्या मुलीला, माझ्या सुनेला असेल, माझ्या पत्नीला असेल असा जर कुणावरती अन्याय झालातर आपण गप्प बसूत का. या भावना या सभागृहामध्ये प्रत्येकाच्या बोलण्यात नक्कीच येतात. प्रत्येकाचा हेतू एकच आहे. मला तर असं वाटतय की १९९० साली त्याला आपण झापल असंततर या शहरामध्ये, या राज्यामध्ये पुनरावृत्ती झालीच नसती. त्या नराधमाला अशी शिक्षा दयायला पाहीजे होती की पुन्हा अशी घटना घडायला नाही पाहीजे. त्यावेळेला आपण चुकलोत. अशा चुका करत करत आज तीस वर्षे जवळपास उलटल्यानंतर सुध्दा त्या घटना कमी होण्याच्या ऐवजी दिवसांदिवस वाढतात. कधीतरी दोन-चार- सहा महीन्यातून एखादी घटना घडायची, दुर्दैवाने आज मात्र रोजच वृत्तपत्र उघडल्यानंतर फक्त नाव बदलतात मात्र जी काही मानहानी होते ती रोजचीच झाली, नित्याची झाली. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते की या राज्याचे गृहमंत्री असतील त्यांच्यावर जबाबदारी येते, आता ताईनी बोलण्याच्या

ओघात आमचा शेखर म्हणाला की उपमुख्यमंत्री हे काही पक्षाचे नाहीत, जबाबदारीचा विषय होता आणि ज्यांची जबाबदारी सन्मा.महापौर साहेब विनंती करते की त्यांना आपण सगळयांनी, आपल्या सगळया नगरसेवकांची १३३ नगरसेवक स्विकृत सहीत या सगळयांनी एका पत्रावर लिहील पाहीजे की आमच्या शहरात सुध्दा तीच, वेगळी अवस्था नाही आम्हांला आमच्या शहरात नवीन रिंकु पाटील नको, आमच्या शहरामध्ये एकही हत्याकांड या पुढच्या काळात आम्ही सहन करणार नाहीत. कोणत्यां नां कोणत्या मुलीवर अन्याय होतो, अत्याचार होतो आणि ती बळी जाते, तीच्या बरोबर तीच कुटूंब आयुष्यभराच उध्दवस्त होतं. आज निर्भया हत्याकांडाचा प्रकार सगळयांना माहीती आहे. निर्भया काही एकच चेहरा नाही फोटोत बघीतला, फोटोत बघतो, दुर्दैवाने आपण समोर पाहीलतर आपण निश्चितपणे आपल्या भावनाना आपण आवर पण घालू शकणार नाहीत. त्या लोकांना शिक्षा झालीच पाहीजे. का इतक्या वर्ष तीला मागणी करावी लागते. तीच्या नंतर अशा अनेक निर्भया या देशामध्ये या राज्यामध्ये घडत असतात. परंतु मला वाटते की या राज्यातील एक घटक म्हणून असणा-या गृहमंञ्यांनी त्यांचा राजीनामा दयायचा का तर निश्चितपणे दिला पाहीजे. आणि या पुढच्या काळामध्ये जे काही अशा दुर्दैवी घटना घडणार नाहीत या दृष्टिकोनातून आपल्या सगळयांचे १३३ लोकांची पाऊल उचलली गेली पाहीजेत. जसं आपण राज्याबद्दल बोलतो त्या दृष्टीकोनातून आपण हया शहराबद्दल सुध्दा बोलल पाहीजे. आज हाकेच्या अंतरावरती पोलीस आयुक्तालय आहे. त्या आयुक्तालयात सुध्दा आपल्या सगळयांची एकदा भेट झाली पाहीजे. १३३ नगरसेवक कोणत्याना कोणत्या प्रभागाचे प्रतिनीधीत्व करतात त्यांच्या प्रभागात एक ना अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतीलतर त्या वेळीच रोखल्या पाहीजेत. इथ यायच या सभागृहात उभ रहायच आणि कुणालातरी श्रध्दांजली अर्पण करायची या कामासाठी, या गोष्टीसाठी या वाईट घटनेसाठी ही दुर्दैवी वेळ पुन्हा या सभागृहावरती येवू नये या दृष्टिकोनातून निश्चित आपण प्रयत्न केले पाहीजेत. इथ यायच सभागृहात उभा रहायच, कुणावरती टिका करायची नाही परंतु त्याच बरोबर ती माझी जबाबदारी आहे, माझ कर्तव्य आहे अद्य कर्तव्य आहे या भावनेतून सुध्दा आपण सगळयांनी बघीतल पाहीजे. म्हणजे जर का त्याचवेळेला रिंकु पाटीलच्या घटनेला आपण थांबवू शकलो असतोतर निर्भयाच प्रकरण झाल नसतं, हैद्राबादच प्रकरण झाल नसतं नव्हेतर आजच्या अंकिताच प्रकरण झाल नसतं. आज शासनाकडून जो वचक जी कायदा सुव्यवस्था असते ती आज त्यांच्यात राहीलेली नाही. आज आपण वृत्तपत्र उघडलतर अनेक घटना आपल्याला दिसतात. फसवणूकीच्या असतील, लुबाडणूकीच्या असतील त्याच बरोबर महीलांवरती अन्याय,

अत्याचार घडणा-या घटना असतील मा.महापौर साहेब, अशा घटना घडतातच का. आज एकीकडे ५० टक्के आरक्षण आहे, सभागृहामध्ये आम्ही सगळया महीला भगीनी पुरुषाच्या खांदयाला खांदा लावून काम करतो. आज सभागृहातच नव्हेतर आज आपण म्हणतोय एकवीसाव्या शतकाकडे वाटचाल करतो. आज महीलांना उच्चस्थान आहे. पुजा असेल की महीलांनी पुढे यायच हाळदी-कुंकू वहायच आणि हाळदी-कुंकू वाहून नमस्कार करायचा इतक्या पुरतीच आमची महीला मर्यादीत नाहीहो. आमच्या महीलेमध्ये सुध्दा ताकद आहे परंतु ती ताकद आपण सगळयांनी एकवटली तर निश्चितपणे आपण येथून पुढच्या काळामध्ये होणा-या चुकीच्या घटना ज्या असतात त्या थांबवण्यासाठी आपण सगळेजण तीतकेच जबाबदार असलो पाहीजे. सन्मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते की आपल्या सभागृहाच्या वतीने आपल्या पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने खरतर या मुलीचा इतका देखणा फोटो पेपरला पहील्यांदा पाहीला तो डोळयासमोरुन फोटो जात नाही. इतकी देखणी मुलगी होण सुध्दा माझ्यासारख्या आईला पाप असेल, असं वाटत की येथून पुढ इतकी सुंदर मुलगीच नको माझ्या पोटी, इतक दु:ख त्या मुलीच्या आईला झालेल असणार आहे. परंतु मा.महापौर साहेब आपण सगळया १३३ जणांनी सांगीतल पाहीजे की अंकीताला न्याय दिलाच पाहीजे आणि न्याय देण्याची परंपरा जी आहे की त्यांना फाशी दयायची ही सगळी परंपरा आता बंद करा. भर चौकात या लोकांना मारल पाहीजे, त्याची भीती, दहशत बसली पाहीजे. चुकीच्या लोकांच्या आपल्याला दहशती होतात, आपण गुंडाना घाबरतो आपण त्याला घाबरतो. का प्रशासनावरती सुध्दा, का शासनावरती सुध्दा या नराधमाने घाबरल नाही पाहीजे. मला वाटत हैद्राबादच्या हात्याकांडामध्ये जो आरोपी मुलगा होता त्याच्या आईची वृत्तपत्रामध्ये मुलाखत होती तीच म्हणण वाचल होतं. ती म्हणाली की माझ्या मुलाने ज्या मुलीला मारलं, त्या मुलीला जर जाळल असेलतर त्याच प्रकारच मरण माझ्या मुलाला सुध्दा याव अशी त्या मुलाला जन्म देणारी माता सुध्दा म्हणते. ती म्हणते की मी जरी एका मुलाला जन्म दिलेला असेलतर दुर्दैव माझ की मी अशा मुलाला जन्म दिला. मी सुध्दा आई आहे, मी सुध्दा महीला आहे आणि जर माझ्या पोटी असा राक्षस जन्माला आला असेलतर या राक्षसाला त्याच प्रकारचा मृत्यू दयावा असं जर ती माता म्हणतेतर निश्चितपणे सभागृह म्हणून आपण सगळया महीला भगीनी असतील आपण सगळे माझे बांधव असतील की जे प्रत्येक प्रभागाच प्रतिनीधीत्व करतात त्या सगळयांना विनंती आहे की आपल्याकडन सुध्दा मा.महापौर साहेब, एक पत्र गेल पाहीजे राज्यशासनाला आणि सांगीतल पाहीजे की आता येथून पुढे फास्टॅगमध्ये त्या मुलीला न्याय दिला जाईल का, फास्टॅगमध्ये

किती दिवस, किती वर्षे याच्यावर सुध्दा कालमर्यादा घातली पाहीजे. फास्टॅगचा अर्थ काय, किती दिवसात, किती तासात. खरतर तासामध्येच बोलल पाहीजे. त्या माणसाने ते कृत्य केलेल आहे हे आपल्या सगळयांना माहीती आहे. कसला शोध आणि कसला पर्याय त्याच म्हणण ऐकूण घेतो आपण. याठिकाणी आपल्या सगळयांना दु:ख होतय त्याप्रमाणे आपण सगळयांनी सांगीतल पाहीजे की येत्या आठ दिवसामध्ये त्या मुलाचा ज्यांनी हे वाईट कृत्य केलेलं आहे त्या मुलाला ताबडतोब शिक्षा झाली पाहीजे आणि ती कोणत्याही पारंपारीक पध्दतीने नाही त्याला वरती फासावर लटकून वगैरे नको तर ती शिक्षा भर चौकामध्ये झाली पाहीजे. पुन्हा एखादयाच्या डोक्यात जर आल की आपण अस काही करु यात का तर त्याला तो व्यक्ती, ती घटना समोर दिसली पाहीजे आणि त्यान त्यापासून लांब गेल पाहीजे. आपल्या शहरामध्ये, आपल्या राज्यामध्ये अशा गोष्टीची पुनरावृत्ती होवू नये याच अपेक्षेनी या अंकीताला मी माझ्या कुटूंबीयाच्या वतीने आपल्या सभागृहाच्या वतीने मनापासून भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि मा.महापौर साहेब, याबाबतीत आपण आपल्या सभागृहाच्या वतीने कठोर पावल उचलावीत अशी आपल्याकडे अपेक्षा व्यक्त करते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

मा.स्विनल म्हेत्रे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता महीला बाहेर पडतात ही काळाची गरज आहे. समाजाची गरज आहे, शिक्षण घेतल पाहीजे कुटूंबाला हातभार म्हणून महीलांना नोकरी करावी लागते. परंतु हे सर्व करत असताना, कुटूंबाला साथ देत असताना खरच ही महीला सुरक्षीत आहे का. ज्यावेळेस ती ऑफिसमधुन, कॉलेजमधुन घरी परत येईल त्यावेळेस ती घरी परत येताना कशी येईल ही माझ्या सारख्या आईला आणि निर्भयाच्या सारख्या आईला ती खंत असणार आहे. ज्याप्रमाणे आपला महाराष्ट्र घडला आणि जिजाऊनी शिवाजी महाराजांना जी शिकवणूक दिली की राजे तुमचा जन्म हा बायका नाचवण्यासाठी नाहीतर बायका वाचवण्यासाठी झालेला आहे. अशा या महाराष्ट्राच्या सांस्कृती वसा, वारसा जपणा-या आपण भूमीत ज्यावेळेस जन्म घेतो त्या भूमीत महिलांवर अत्याचार होणारी संख्या जास्त आहे, ज्या नराधमाना शिक्षा होती त्यांची शिक्षा कमी, असं का. मला राज्यशासनाला विचारायच किंवा प्रत्येक अधिका-याना विचारायच की महीलांची अत्याचाराची संख्या जास्त पाहीजे का शिक्षा झालेल्यांची संख्या जास्त पाहीजे. कुठे हा न्याय न्यायचा. ज्यावेळेस निर्भया जळते, प्रियंका जळते त्यावेळेस आम्ही इथे बसलेली प्रत्येक महीला जळत असतो. कारण ती देखील एक माय मावली आहे. आम्ही देखील कुणाच्यातरी आई आहोत. जी घटना

घडायला अगदी दहा मिनीटाचा काळ लागतो, जी घटना घडायला अगदी दहा मिनीटाचा काळ लागतो त्या घटनेचा न्याय दयायला दहा वर्षे लागतात. हे कुठले न्यायपीठ, हे कुठले व्यासपीठ किंवा हे कुठले सभागृह, हे कुठले शहर आणि हा कुठला महाराष्ट्र. ज्या महाराष्ट्रात एवढे संत, सज्जन ज्या सांस्कृतीचा वारसा आपण जपतो त्या महाराष्ट्रात असं कृत्य होणं पार दुर्दैवी घटना या महाराष्ट्रात घडतात. मान्य आहे महाराष्ट्रात या घटना घडतात. आंध्रातही आपण पाहीलेल आहे की एन्काऊंटर केलं, अभिनंदन झालं. पण मला असं वाटत की आपल्याला ताटात काय वाढल ते आपण पहील्यांदा पाहील पाहीजे. आपल्या शहरात काय होतय, आपल्या महाराष्ट्रात काय होतय ते पहील्यांदा आपण पाहू या आणि त्याच्यावर आपण कारवाई करु यात. जर महीलांसाठी स्वतंत्र पोलीसचौकी झाली त्याठिकाणी सर्व महीला पोलीस असतील तर नक्कीच ती जी महीला पोलीस असेल तीला अंतकरण असेल, त्या महीलाचे पाठपुरावे, पुरावे पाहते. म्हणून मला असं वाटत की स्वतंत्र महीला पोलीस चौकी आपल्या शहरात व्हावी आणि याचा जो काही पाठपुरावा करायला लागेल तो पाठपुरावा करणेसाठी इथे बसलेली आजची प्रत्येक नगरसेवीका महीला ही माई तुमच्या पाठीशी आहे. एवढच बोलते आणि थांबते.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या तासभर आपण याठिकाणी हिंगणघाटमधील जळीत हात्याकांडाच्या संदर्भात माझ्या महीला भगीनी निषेध नोदवताना असं दिसतात त्यामध्ये आमचे बंधु सुध्दा कमी नाहीत. त्यांनी सुध्दा याठिकाणी दाखवून दिल की उदया जर काही एखादा अत्याचार एखादया महीला भगीनीवर होत असेलतर आम्ही तुमच्या रक्षणासाठी असणार आहोत. ज्यांनी ज्यांनी याठिकाणी भावना व्यक्त केल्या त्या सगळया भावांच मी मनापासून आभार मानते. कारण तुम्ही सगळेजण आमच्या बरोबरीन थांबणार याच्याबद्दल आमच्या मनामध्ये अजीबात शंका नाही. बोलत असताना माझ्या मैत्रिनीनं सांगीतल की राज्यसरकारच काम आहे, राज्यसरकारच कर्तव्य आहे, राज्यसरकारचा निषेध झाला पाहीजे. झाला पाहीजे का तर शंभर टक्के निषेध झाला पाहीजे. सरकार कुणाच आहे याच्याशी काही काडीच घेणंदेणं नाही. एखादा कोवळा जीव जातो, एखादी तरुण मुलगी भर रस्त्यावर पेट्रोल टाकून पेटवली जाते आणि मग एखाद सरकारवर असेल, एखादा जबाबदार अधिकारी असेल, मंत्री असेल, पोलीस अधिकारी असेल, कमीशनर असेल जो कोण असेल त्यांनी जबाबदारी उचललीच पाहीजे या मताची मी सुध्दा आहे. आणि त्यासंबंधी कुठल्याच महिलाच दुमत असण्याच कारण नाही. या सभागृहातल्या कुठल्याही सभासदाच दुमत

असण्याच कारण नाही. आणि म्हणून तीव्र शब्दात याठिकाणी मी राज्यसरकारचा कडाडुन निषेध करते. कारण त्याठिकाणी वारंवार मी बघीतल गृहराज्य मंत्री असतील, होम मिनीस्टर म्हणून अनिलजी देशमुख आहेत. मला फार त्यांच्या बद्दल आदर वाटला होता. पुण्यामध्ये ते आले आणि त्यांनी पुण्याच्या शिवाजीनगरच्या कार्यालयाच उद्घाटन करताना त्यांनी फोनवरुन एका माणसाला पासपोर्टच्या संदर्भात फोन केला की हॅलो मी अनिल देशमुख बोलतो, तुमची इन्क्वॉयरी झाली का, तुम्ही आलात का, तुम्ही येणार असालतर तुमची कागदपत्र तयार आहेत. जितक्या तत्परतेन एखादया गोष्टीचा तुम्ही फोन केला तीतक्या तत्परतेन तुम्ही हिंगणघाटला गेलात का. त्यांच्या घरापासून किती दुर होतं. राज्य सरकारमधले किती मंत्री त्याठिकाणी गेलेत? गुगल आहे सगळयांच्याकडे, मोबाईल आहे, सर्च करा वाचा बघा तुम्ही आणि मग सांगा आम्हीं निषेध करायचा का नाही करायचा. मा.महापौर साहेब, याठिकाणी राज्य कोणाचही असो निषेध झाला पाहीजे कारण की मी जळालेली आहे. माझी मैत्रीण आहे, माझी बहीण आहे, माझी मैत्रीण जळाली, पुढच्या पिढीतली एक कन्या जळालेली आहे. का निषेध करायचा नाही यांचा. मगाशी आमचे ओव्हाळदादा चुकले, त्यांना असं वाटल की पुण्यात ज्या घटना घडतात त्याची जबाबदारी म्हणून पालकमंञ्यांनी राजिनामा दयावा. बोलताना चुकला असेल माणुस, भावनेच्या भरात होणार इकडे तीकडे. आम्ही राज्यसरकारवर टिका केली म्हणजे आम्ही विरोधक आहोत का. जर तुम्ही न्याय देणार नसालतर शंभर टक्के तुमच्या विरोधात दंड थोपटून रस्त्यावर उतरणार आहोत आम्ही. किती वर्षे आम्ही न्याय मागायचा. कधी घरातन, काधी रस्त्यातन, कधी ऑफिसमध्ये सगळीकडे आमच्या जीवाला भीती निर्माण झालेली आहे. आणि अशाच एखादया प्रकरणातन नागपूरच प्रकरण घडत. ज्यावेळेस निराशा येतेना त्याचवेळेस हे कृत्य आमच्या हातून घडतात आणि तशा एखादया कृत्याची राज्यशासन याठिकाणी वाट बघतय का. आमच्या न्याय मागण्यासाठी आम्हांला जर का शस्त्र हातात घ्यावे लागत असतीलतर आम्हांला गरज नाही कुठल्याही राज्यशासनाची आणि कुठल्याही शासनाची. निर्भया हात्याकांडामध्ये शंभर टक्के तिथे विलंब होतो, सुप्रिम कोर्टामध्ये केस चालू आहे, आम्हांला रोज वाटतय की आज फाशी झालीतरी चालेल, उदया फाशी झालीतरी चालेल, आता या क्षणात झालीतरी चालेल, चौकात फाशी दया, तुकडे करा काय करायच ते करा पण एकदा संपवा ते. मा.महापौर साहेब, संताप होतो. राजकारण म्हणून बोलत नाही आणि सिमा सावळे एवढया खालच्या दर्जाची निश्चितच नाही. अनेक घटना आम्ही या शहरामध्ये बघतो. क्राईमचे रिपोर्टर आहेत संदीप भिसे, लेख लिहीतात. मी त्यांच एकटयांचच नाव यामध्ये घेते कारण की

त्यांची एक बातमी त्यांनी टॅंक केली होती. १८० गुन्हे पिंपरी चिंचवड शहरात या दोन वर्षात झालेले आहेत. त्यात अनेक मुलीवरच्या अत्याचाराच्या घटना आहेत. संघटन गुन्हेगारी आहे. रोडरोमिओ आहेत. शाळांच्या पुढे पोलीसकाका होते ते बंद केलेले आहेत. शाळेच्या बाहेर पोलीसकाकाची डयूटी होती तीही बंद आहे. अरे, भावानो, बहिणीनो आमची सगळयांची जबाबदारी आहे. आमच्या वॉर्डामध्ये शाळा आहेत. आपण याठिकाणी आयुक्तालय केल कशासाठी केलं. ज्या शाळेच्या बाहेर पोलीसच नाहीत तर आयुक्तालय काय करायच आम्हांला. का पोलीसकाका बंद केले तेथे. एखादया वृत्तपत्रामध्ये आल्यानंतर धावपळ करुन करुन अर्धवट बातमी टाकायची किंवा बातमीसाठी म्हणून पोलीसांनी ते प्रयत्न करायचे. चालणार नाही मा.महापौर साहेब. आज तुम्ही कुठल्याही कॉलेजच्या बाहेर जा, अगदी तुम्ही जा, कमीशनरनी जाऊ देत, तुम्ही सकाळीच ज्यांना कुणाला वाटेल त्यांनी जा. शाळा सुटण्याच्यावेळेस आणि भरण्याच्यावेळेस तुम्ही जाऊन बघा. किती रोडरोमीओ पोर असतात, अरे, ती सातवीची मुलगी, पाचवीची मुलगी तीला कळत सुध्दा नाही. तीला रस्ता ओलंडता येत नाही तीची सुध्दा छेड काढल्या जाते. दुर्दैव आहे की अशाप्रकारच्या कामाला एकही युवक पुढ येत नाही. दुर्दैव आहे या शहराच. आज या शहराची जिल्हयाकड वाटचाल आहे. इथ कुठ आमच्या भगिनी सुरक्षीत आहेत. हिंजवडी याठिकाणी जाण्या-येण्यासाठी साहेब, आपण चांगला प्रयोग केला होता. महिलांना प्रशिक्षण दिलं काय झाल पुढ त्याचं. ओला, उबरशी आपल बोलण झाल होतं. गाडीत बसायची भीती वाटते, एखादया टॅक्सीमध्ये बसायची भीती वाटते. रिक्षात बसलतरी भिती वाटते. काल एका रिक्षावाल्यांनी खुप चांगल काम केलं. बेंगलोर वरुन आलेल्या दोन शाळकरी मुलीनां त्या रिक्षात बसल्या, मुंबईला उतरल्यानंतर रिक्षावाल्यांनी त्यांना विचारल कुठ जायच आहे. त्यांनी एका ठिकाणचा पत्ता सांगीतला तीथ नेऊन सोडलं. रिक्षावाल्याच्या लक्षात आल की या पोरी घरुन पळून आलेल्या आहेत. दरडाऊन विचारल की सांगीतल की हो आम्हांला पिक्चरमध्ये हिरोईन व्हायच म्हणून आम्ही पळून आलोत. त्यानी स्वत:च्या खिशातले पैसे काढले, त्यांच तीकीट काढल पोलीसांच्या हवाली सुपूर्द केलं आणि परत गावाला पाठवलं. असेही रिक्षावाले आहेत असेही टॅक्सीवाले आहेत की जे खुप मदत करतात. एखादी दुसरी कुठेतरी घटना घडते म्हणून त्या सगळयांना बदनाम करण योग्य नाही. पण चांगली माणुसकी सुध्दा या शहरामध्ये या देशामध्ये आहे आणि चांगली लोक जी आहेत ती त्यांचा चांगलेपणा दाखवायला कुठ कमी पडत नाहीत. आपण अशाप्रकारचा जो एक उपक्रम हाती घेतला होता त्या उपक्रमाच पुढे काय झालं मा.आयुक्त साहेब. ज्या दिवशी बजेट असेल त्यादिवशी तुम्ही उत्तर

दयायच आहे आम्हांला. त्या टॅक्सी आमच्या भागातील महीलांच्या सुरक्षीततेसाठी, तीने चांगल्याप्रकारे कामावर जाव आणि महीला कर्मचारी जर ती टॅक्सी चालवत असेलतर तीच स्वागत होईल किंवा तीला भीती वाटणार नाही. सहज ती जाण येण करेल. आता यांच्या भीतीन घराबाहेर पडायच नाही. घरात राहीलतर नातेवाईकांची भीती. काही ठिकाणी स्वत:च्या जन्मदात्या बापाकडन अत्याचार होतात, काही ठिकाणी काका मामांकडून अत्याचार आहे. सुरक्षीत रहायच का नाही रहायच असा विचार येतो. आता असं वाटायला लागलेल आहे की पोरगी आली की या सगळया गोष्टीला मला सामोर जाव लागेल. आम्हीतर ठिक आहे हो आम्ही खमक्या आहोत. मगाशी आमच्या ताई बोलल्या की महीलांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळते. शंभर टक्के मिळते, नाही कोण म्हणतय. पण अधिकार आम्ही मागणा-यातले अजीबात नाही तर या सभागृहात बसुन आम्हांला हिसकावून कसं घ्यायच तेही आम्हांला माहिती आहे. कोण आपल्याला काय म्हणेल ज्याच त्याच्यापशी. त्याच्या बोलण्यानी आपल घर काही चालत नाही. आपला संसार चालत नाही त्यामुळ समोरचा काय म्हणतो याच्याकड न लक्ष देता आपण ज्या कर्तबगार महीला आहेत, ज्या समाजापुढे आयडॉल होवून तुम्ही याठिकाणी या संपुर्ण शहरामध्ये, पंचवीस लाख लोकसंख्येच्या शहरामध्ये या शहरातल्या या सभागृहात बसलेल्या या ज्या महीला भगीनी आहे त्या आयडॉल आहेत. आपण असे जर बोललातर बाकीच्याना काय हो त्यांनातर तेवढचय, की काय लईच बोलतेय. त्या खुप चांगल्या स्टाईल्सन बोलतात, त्या काहीच बोलत नाहीत तुम्हांला काय चांगल वाटतं. कारण बोलणारे सारखे टोकतात आणि म्हणून आपल खच्चीकरण होत असतं आपण फार काही त्याच्याकडे लक्ष दयायच नाही. मा.महापौर साहेब, हिंगणघाट असु देत, सिल्लोड असु देत, पनवेल असु देत पिंपरी चिंचवड शहरातल्या २०८ गुन्हे पास्को अंतर्गत झालेल आहेत. म्हणजे लहान मुलांवरती झालेले अत्याचार. आयुक्त साहेब आपली महानगरपालिका आहे आपण शिक्षणमंडळावर प्रचंड खर्च करतो. आता तुम्ही कॅमेरे लावलेत, फेस रिडींग आहे. कुठला ऍप लावला तुम्ही सांगीतल खुष असेलतर कसा दिसेल, दु:खी असेलतर कसा दिसेल. तीच्या बरोबर जर अत्याचार होत असेलतर त्याच काय. कालच कासारवाडीमध्ये एक घटना घडलेली आहे ती तुमच्या कानावरती आहे. खर का खोट मला माहिती नाही. पण आपण व्हिजीटला गेलात का. आणि गेलेला नसालतर तीथ तुमच्या पाठीमागे बसलेले अजीत पवार आहेत, संतोष पाटील आहेत तुमच्याकडच आहेना शिक्षणमंडळ. संतोष पाटील सुट्टीवर गेले की तुम्ही बील एकदम फास्ट करता, तुमची लगेच सही होते. त्यामुळे जवाबदारी घ्यायला पण शिका. खर किती आहे खोट किती आहे हे तपासायला किती लोक

गेलेत. आपली महानगरपलिका आहे, कोटयावधी रुपये खर्च करत असुतर महापालिकेमध्ये येणारी कुठलीही व्यक्ती असु देत तीच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही आपल्या शिक्षकांची आणि आपली आहे. मा.महापौर साहेब, आपण सुध्दा कमीशनराना कडक भाषेत समस दिली पाहीजे. शहरामध्ये आपण कॅमेरे बसवणार, वेगवेगळया चौकात बसवतो आनंद आहे आम्हांला. आमच संपुर्ण शहर जर कॅमेराच्या अंतर्गत येणार असेलतर आणि तीथ होणा-या हालचाली जर का टिपून एखादया गुन्हयांच प्रमाण जर का कमी होणार असेलतर आम्हांला खुप आनंद आहे. पण ते चालविण्याच ऑफिस तुम्ही ज्याठिकाणी निगडीला महीलांसाठीच अस्तित्व मॉल होता त्याठिकाणी तुम्ही नेलं. त्याच्यावर कंट्रोल कुणाचा असणार आहे. तुम्ही तीथ गेला होता का. आम्ही तीथ जावुन सांगायच का. तो जो डेटा आहे तो ईझीली शेअर होणार. ते कार्यालय आपल्या महानगरपालिकेच्या बिल्डींगमध्ये कराव म्हणून वारंवार म्हणजे मी ज्या दिवशी स्टॅण्डींग कमिटीची चेअरमन असताना स्मार्ट सिटीन विचारलं त्यावेळेस तुम्ही आम्हांला सांगीतल होत ते कार्यालय दुसरीकडे कुठे हलवू नका. ते ऑफिस आपल्याच बिल्डींगमध्ये पाहीजे. आपल त्यावरती नियंत्रण पाहीजे. ते आपण त्याठिकाणी नेलेल आहे. कॅमेरे बसवताना तुमच्या त्या कॅमे-याची फ्रिक्वेन्सी काय आहे. किती मेगाफिक्सलचा आहे. किती दुरवरुन कॅच होणार आहे. आम्ही आडाणी आहोत, फार काही शिक्षण नाही सगळयांच. आम्हांला दाखवा किती मेगाफिक्सलचा आहे. दोन आणि चार मेगाफिक्सलचा कॅमेरा शाळेत बसवणार असूतर आणि त्यातन जर तुमची फेस रिडींग होत असेलतर आश्चर्य वाटत मला. तुम्ही आम्हांला एकदा दाखवातरी. तुम्ही बसवतातर चांगल्या क्वालीटीच का नाही करत. आपल्या महानगरपालिकेच्या बिल्डींगचे कॅमेरे बघा तुम्ही काय परिस्थितीचे आहेत. संपुर्ण शहरभरामध्ये चांगल्या क्वालीटीचे बसवा. जेणेकरुन दुरवरुन माणुस गेलातरी तो दिसला पाहीजे. गुगलमॅपवरती तुमची सगळे कॅमेरे दिसले पाहीजे. विदेशामध्ये पाचशे मीटरवर हजार मीटरवर आहे असा सांगीतल तसे इथे इतक्या इतक्या किलो मीटरवरती कॅमेरा लागलेला आहे अस दिसल पाहीजे. हे सगळ करत असताना सुरक्षीततेची जी साधन आहेत त्या साधनावरती जास्तीत जास्त लक्ष दया. महानगरपालिकेच्या शाळेमध्ये विदयार्थी नसल्यामुळे आपण आता वर्ग एकत्रीकरण केलेलं होतं आणि त्या वर्गामध्ये आता सातवी, आठवी, नववी, दहावीचे विदयार्थी जे आहेत त्या शाळांची परिस्थिती खरंच जावुन बघा तुम्ही. तीथ किती टवाळखोर असतात काय काय शेरेबाजी होते. गोरगरीबांची लेकर शिकायला येतात त्यांच्याकडे कुणाचच लक्ष नसतं. त्याच बरोबर या शहरातल्या सगळया शाळांच्या बाहेर जावुन बघा, कॉलेजच्या बाहेर जावुन बघा तीच परिस्थिती आहे. मुलींना घरी

सांगायची सोय नाही, सांगीतलतर शिक्षण बंद होईल का. सहन करण्यासारखी परिस्थिती नाही. मागच्यावेळेस वृत्तपत्रामध्ये वाचल की शाळेच्या बस मध्येच मुलीसोबत वेगळे प्रकार घडतात. पेपर वाचायला लागल की अंगाची आग होते. असं वाटत की आता हे हाताबाहेर जायला लागलं. काय कराव, कुणाला जावुन सांगाव, जे मायबाप म्हणून सरकार बसलेल आहे त्यांच्याकडे लडायची सोय नाही. कारण लडायला लागलोतर हे म्हणतात लडू नका, त्यांना दोष देवू नका. आता ज्यांनी मायबाप म्हणून स्विकारल त्यांच्याकडच जावून रडाव लागेल. आणि लडलतर काही हरकत नाही हे त्यांनी सुध्दा मोठया मनाने मान्य केल पाहीजे. इथ पोलीस कमीशनर ऑफिस आणलेल आहे. इथ भटक्या, सोडून गेलेल्यांच्या ज्या गाडया आहेत त्यांच्याकरीता सुध्दा मशिन पुरवायचा विषय केला, आनंद आहे आम्हांला. त्यांच्या कडे गाडया नाहीततर विकत घ्या, दया, पुरवा. काय पाहीजे ते दया पण आम्हांला सुरक्षिततर करा. जबाबदारी घेणार कोण. या पुणे जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून आमची मागणी निश्चितपणे मा.अजितदादा पवारांकडे असणार आहे. आमच्या बहीणीची, तुमच्या मुलीची, तुमच्या नातीची सुरक्षिततेची जबाबदारी दादा तुम्हीच घेतली पाहीजे कारण तुमच्या नावात पण दादा आहे. त्यामुळे आम्ही त्यांना तशी मागणी घालू शकतो, तशी आम्ही त्यांच्यावर टिका पण करु शकतो आणि तो अधिकार निश्चितपणे ज्यादिवशी आम्ही त्यांना दादा म्हणतो त्यादिवशी आम्हांला ऍटोमॅटीक आलेला आहे त्यासाठी कुणी वाईट वाटून घ्यायच काही कारण नाही. मा.महापौर साहेब, आपण सगळया घटनांवरती किती जरी बोललात किती जरी आगपाखड केलीतर एक समाजाची मानसीकता बदलवण्याच जे काम आहे त्याच्यामध्ये आपल्याला ज्या शाळा असतील किंवा इतर शाळा असतील या सगळया शाळांना आपल शिक्षणमंडळ परवानग्या देते, अनेक शाळांमध्ये आपण व्हिजीट करतो, आरटीईची योजना राबवतो त्या त्या शाळामध्ये कौन्सिलर नेमा. विदयार्थ्याला विचारा काय त्रास आहे, आत-बाहेर काय आहे, घरी काही त्रास आहे का. हे जोपर्यंत तुम्ही करणार नाही तोपर्यंत अशाप्रकारच्या घटना उघडकीस येणार नाहीत. अनेक माझ्या मुली, छोटे बालक असतील अनेकवेळा अत्याचाराला बळी पडतात. कळतच नाही, समजत नाही, आई-वडीलांना सांगायची लाज वाटते आणि मग असे प्रकार घडल्यानंतर, म्हणजे हिंगणघाटचीतरी मोठी होती अनेक बालीका सुध्दा आहेत. मागच्यावेळेस निगडीला अगदी छोटया बालीकेवर झालेला अत्याचार पण आम्ही वाचलेला आहे. त्यावेळेस आम्ही शिवसेनेत होतो हे सभागृह आम्ही डोक्यावर घेतलं. महीलांच्या बाबतीत कुठल सरकार, कुठल काय आम्ही बघत नाहीत. त्यावेळेस आम्ही सभागृह डोक्यावर घेतलं होतं तसं आजही तुम्हांला हात

जोडून विनंती आहे मा.कमीशनर साहेब, मा.महापौर साहेब, की आपण राज्यशासनाला तातडीने पत्रव्यवहार करावा, शासनाला सांगाव की नवीन अशा अनेक प्रकरणामध्ये जे काही गुन्हे घडतात त्या गुन्हेगाराना जलदगतीच न्यायलय उपलब्ध करुन दयाव किंवा त्यांना म्हणजे आता पास्कोच्या अंतर्गत असेल किंवा एखादयाचा विनयभंग झाला किंवा एखादयावरती अत्याचार झाला आणि तो जर निष्पन्न झाला तर त्याच्यात जामिनच होत नाही. तरी असे जे कायदे आहेत ते विधी मंडळात होतात आणि विधी मंडळाला कायदे करण्याचे अधिकार आहेत. एखादा कायदा जर का सक्षम नसेलतर नवीन कायदा ते करु शकतात आणि ती जबाबदारी आम्ही सरकारमध्ये असतो तर ढकलली नसती. म्हणून आम्ही मागणी करतो की तो कायदा सक्षम करा. तुमच्या घरच्या सहीत इतर ज्या महीलां आहेत यांचीही सुरक्षीततेची जबाबदारी सरकार मायबाप म्हणून तुमचीच आहे. आणि म्हणून सरकारने जर त्याच्याकडे लक्ष नाही दिलंतर येत्या काही दिवसात निश्चितपणे आंदोलनाला सरकारला सामोर जाव लागेल. कारण कुठल्या आई-बहीणीची ईज्जत रस्त्यावर पडलेली नाही. आज पास्कोचे गुन्हे दाखल होतात, लहान मुलांवरचे अत्याचाराचे गुन्हे दाखल होतात. त्या गुन्हयांच काय होत त्याचा आपण कधी विचार केला. पोलीस कमीशनरांची बैठक लावली पाहीजे, त्यांना विचारल पाहीजे की या गुन्हयामध्ये किती अटक केले. आताची कंडीशन काय आहे. ज्या घरात मुलींवरती बापाकडुन अत्याचार झाला असेल, ज्या घरात काका-मामंकडून अत्याचार झाला असेल त्यांची अवस्था काय आहे. कुणाकड बघायच. रोज उठून तोंडावर तोंड पडणार आहे. पन्नास टक्के आरक्षण आम्हांला मिळाल राजकारणात, म्हणून किमान इथ येवून बोलू तरी शकतो. म्हणजे ख-या अर्थान आमच जे स्वातंञ्य आहे, आमच जे स्त्रित्व आहे ते जोपासण्यासाठी जोपर्यंत आम्हांला स्वातंञ्य मिळत नाही तोपर्यंत या स्वातंञ्याला या पन्नास टक्क्याला पण काही अर्थ उरत नाही. इथ यायच, भाषण करायची, वृत्तपत्र आहेत म्हणून लीहीतील पण किती महीला भगीनी जागेवर जातात याचा पण विचार झाला पाहीजे. या शहरात घडणा-या घटनांसाठी किती जणी एकञ येतात याचा पण विचार झाला पाहीजे. मा.महापौर साहेब, आपल्याला या सगळया घटनांच्या अनुषंगाने एक विनंती करत आहे. आपण पोलीस कमीशनरांना भेटून जितके पास्कोचे गुन्हे झाले असतील, जेवढे मुलींवरती शारीरीक अत्याचार झालेले असतील आणि त्या संदर्भातल्या आपल्या वायसीएम हॉस्पिटलला, साहेब आपल्याकडे पुर्वी आपण करत नव्हतो आता आपण करतो शारीरीक तपासणी. तरी त्या संदर्भातली आपल्याकडे अत्यंत गोपनीय अशी पध्दत असली पाहीजे. एन्ट्रन्स एकच आहे आत मध्ये

गेल्यानंतर व्यक्ती कोण आहे लगेच कळून येतं. दबावतंत्र वापरल्या जातं. तो एक जो विभाग आहे तो पुर्णपणे स्पेशल विभाग असला पाहीजे. त्याच्यासाठी आपल्याकड कौन्सिलर असलं पाहीजे. काल झाला तो प्रकार खरा, खोटा माहिती नाही पण कोण कौन्सिलर गेले तेथे. आपले शिक्षक गेले, आपले पुरुष कर्मचारी गेले. आता तुम्ही सांगा एखादया पुरुषानी एखादया मुलीला विचारल असं झाल का तर ती काय सांगणार आहे. विचारण्याच्या पध्दती असतात. स्पेशल अशी लोक तुम्ही नेमा. जेणेकरुन असे अन्याय, अत्याचार कमी होतील. मा.महापौर साहेब, पुढील आठ ते दहा दिवसाच्या आतमध्ये आपण पोलीस कमीशनराची भेट घेवून या संदर्भात तातडीने कठोर पावल उचलण्याची अत्यंत गरज आहे. हे थांबणार की नाही हे मला माहित नाही. मग कोपर्डीची घटना असेल, जेवढया कुठल्या घटना झालेल्या असतील मग त्या कुठल्या जातीच्या, समाजाच्या कोण श्रीमंत, गरीब हा विषय ही किडलेली, सडलेली माणसीकता आहे. तीथ कोण कोणाची जात बघुन काही अत्याचार होत नाही. त्यामुळे या अत्याचारीत मुलींच्या बाजूने उभे रहाण्याची, त्याना ताकद देण्याची ही वेळ आलेली आहे आणि ती वेळ योग्य वेळी आपण आता हातात घेतली पाहीजे, त्यावेळेचा सद्पयोग केला पाहीजे म्हणून आपण पोलीस कमीशनरांना भेटून त्यांना आपल्याकडन काय हाव आहे, आपण काय केल पाहीजे. याच बरोबर या जिल्हयाचे पालकमंत्री आहेत मा.अजीतदादा यांची सुध्दा आपण भेट घेतली पाहीजे. जे होम मिनीस्टर आहेत यांना सुध्दा भेटल पाहीजे. ते जितक्या तातडीन फोन करतात पास्पोर्टवाल्यांसाठी तीतक्या तातडीन आमच्या आत्याचारीत झालेल्या बहीणीसाठी फोन केला का आणि नसेल केला तर का नाही केला, विचारल पाहीजे. आणि या विचारण्यासाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरायला लागलतरी चालेल पण निश्चितपणे आपण सगळयाजणी एकत्र येवू यात. परत एकदा सांगते पक्षीय राजकारण जरी नाही म्हणलतरी ज्यांना विधी मंडळात कायदे करण्याचा अधिकार आहे, सक्षम कायदे करण्याचा अधिकार आहे त्यांच्याकडे निश्चितच कोणी बोट दाखवण्याचा अधिकार सर्वसामान्य जनता म्हणून मला आहे. याठिकाणी या सगळया माझ्या मुलीना मी मनापासून श्रध्दांजली वाहते, देव त्यांच्या आत्म्यास शांती देओ. त्या दिवशी हिंगणघाटच्या मुलीच डॉक्टरांच पहील बुलेटीन आल आणि त्यांनी सांगीतल तीच डोक, जिभ, दात पुर्ण जळालेल आहे. मी देवाला प्रार्थना केली की देवा या यातनेतून तीला सोडव. कारण वाचलीतरी काहीच होणार नाही. ज्यांना जिवंत जाळल्या जातं ज्याच्या यातना त्यालाच माहीती. त्या शरीरालाच माहीती त्या मनालाच माहीती आहेत. त्या बीचारीची सुटका झालेली आहे पण तो नराधम सुटता कामा नये म्हणून आपण निश्चितपणे चांगली पावल उचलली पाहीजेत

त्यासाठी आपण पोलीस कमीशनरांची वेळ घ्यावी. याठिकाणी सर्व या माझ्या मुलींना मी मनापासून श्रध्दांजली वाहते, थांबते.

मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरंतर निर्भया प्रकरण असेल, हिंगणघाटच असेल याबाबत आज आपल्या सभागृहामध्ये सर्वचजणानी आपआपल्या भावना व्यक्त करत आहेत, निषेध व्यक्त करत आहेत. आम्हीही या विषयाचा तीव्र शब्दात निषेध करतो. ब-याच भगीनींनी सांगीतल एक अशी तरुण सुंदर मुलगी तीच्यावर असे अत्याचार होणं हे खरेतर एक मनोवृत्तीचाच भाग म्हणलतर वावग ठरणार नाही. ब-याच जणांनी आपआपल्या पक्षावर ताषेरे ओढण्याच काम केलं. ब-याच जणांनी पक्षाची खिल्ली उडवण्याच काम केलं. शेवटी सत्ता ज्याच्या हातात असते त्यामुळे त्याच्यावर आरोप-प्रत्यारोप होत असतात त्याचा साहजीकच आम्हांला अनुभव आहे. पण खरतर शेवटी काही घटना घडल्यानंतर जस मंगलाताईनी सांगीतलं की एखादा गुन्हा घडल्यानंतर त्या गुन्हयाला त्यावर शिक्षा दयायची असते, त्यावर त्याला आपल्या मनातल्या भावना तीव्र शब्दात व्यक्त करायच्या असतात की असं आपल्यालाही ते बघुण वाटणार आहे. त्याठिकाणी कुणीही उभा राहीला असता आणि ते त्यांनी पाहील असतंतर त्याच्याही डोक्यात आलं असतं आणि तो म्हणाला असता याला आपल्या हातात जे असेल त्यांन पहील्यांदा ठोकाव किंवा याला खलास कराव. अशी निर्दई भावना आपल्याही कुणाच्याही मनात नक्कीच आली असती. कारण की ती घटनाही त्या पध्दतीने तशी झालेली होती. काही लोक म्हणतात, आमच्यासारखाही एखादा कार्यकर्ता म्हणतो की आंध्रामध्ये जे प्रकरण घडल त्या प्रकरणामध्ये अतीशय आनंदोत्स्व साजरा केला त्या भागामध्ये. ज्याठिकाणी ही घटना घडली तेथे त्या नराधमाना त्या स्पॉटवर जावुन पहाटे चार वाजता त्याना त्याठिकाणी गोळया घालण्याचा प्रयत्न केला किंवा त्यांना गोळया घालून सांपवण्याचा प्रयत्न केला. जशास तशी शिक्षा देण्याचा त्याठिकाणी प्रयत्न केला गेला आहे. साहजीकच आहे आख्ख सरकार त्याच्या पाठीमाग होतं, आख्खा नागरीक त्याच्या पाठीमाग होता, आख्खा कायदा त्याच्या पाठीमागे होता पोलीस यंत्रणा त्या अधिका-याच्या पाठीमागे होती. आपल्या इकडे तशी घटना घडण्यासाठी तसा कायदा करण्यासाठी आपल्यालाही पाऊल उचलणं गरजेच आहे. खरतर काय सगळाच राज्याचा भाग नाही, यामध्ये केंद्राचीही गरज आहे. केंद्रामध्ये आदरणीय नरेंद्रजी मोदींच सरकार आहे, राज्यामध्ये आघाडीच सरकार जरी असलतरी आणि राज्यानी जरी तो कायदा पारीत केलातरी त्याला केंद्राची मंजूरी ही लागतच असते. तेवढ ज्ञान आपल्याला

असाव असं मला वाटतं. कोण काय म्हणत, कोण काय म्हणत आता मी तर म्हणेल की मागे एका आमदारांनी भाजपचे एक आमदार म्हणाले की एखादी मुलगी पटली की तीला आणा आणि मी तीच्या बरोबर लग्न लावून देतो. आता ही पण मनोवृत्ती आहेनां आपल्यामध्ये. या मनोवृत्तीचे सुध्दा आमदार आहेत. आमदार सुध्दा आपल्या पक्षात या मनोवृत्तीचे आहेतनां. ठिक आहे त्यांची ती भावना असेल, त्यांचा भेजा फिरला असेल एखादया मुलीच्या भावनेबाबतीत त्यांच्याबद्दल काहीतरी निर्णय वेगळा घडला असेल. ठिक आहे ही घटना वाईट आहे, या घटनेच कोणीही समर्थन करणार नाही. ही घटना चांगली केली असं कोणीही म्हणणार नाही. कुठल्या पक्षाच आहे, कोण आहे काय आहे याच आम्हांला काही घेणंदेण नाही. पण याबाबतीत बोलत असताना, निषेध करत असताना हे सभागृह एक आहे, या सभागृहामध्ये एक शब्दता, एकवाक्यता निषेधाच्या निमीत्ताने तरी व्हावी असं मला वाटतं. मला माहित नाही ती मुलगी कुठल्या पक्षाची आहे किंवा तो कुठल्या पक्षाचा आहे का त्याला कुठल्या पक्षानी सुपारी दिली नव्हती की जा बाबा, अस अस त्या आमक्या तमक्याच कर म्हणून असं पण कोणी काही केलेलं नव्हतं. ठिक आहे त्याची ती मनोवृत्ती असणार आहे, तो त्या वृत्तीचा असणार आहे. त्याच्या आई-बापानी काय शिकवल हे माहीत नसणार. आई-बापानी चांगली शिकवण दिलेली असेल पण त्याच्यावर काय परिणाम झाला हे माहीत नाही. पण त्यानी ते कृत्य केल आहे या केलेल्या कृत्याला अजीबात कुणी माफी देणार नाही किंवा माफ होणार नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की या शहराचा आपला विचार करु. उदया घटना तीकड झाली, राज्याच्या कुठल्या कानाकोप-यात झाली, उदया हीच घटना आपल्या शहरात घडलेली आहे, चिमुकल्या मुलीवर झालेला अन्याय आहे. एका मुलीला आपण सगळयांनी डोळयानी बघीतलेल आहे. छोटया मुलीवर अन्याय झालेला आहे. हे सगळ असताना आपण काय करणार आहात. त्यावेळेस तर तुमचे पालकमंत्री गिरीषभाऊ बापट होते. त्यावेळेस सुध्दा तुम्ही असे पोटतीडकीने बोलला असतालतर आम्ही तुमचा आदर केला असता, सन्मान केला असता. ठिक आहे आज दादांची जबाबदारी आहे, शंभर टक्के जबाबदारी आहे. आपण सगळेजण त्यांच्याकडे जावु की हा निर्णय घेणं गरजेच आहे. चांगले कायदे करणं गरजेचे आहे. कायदा व सुरक्षीतता राखण्याची गरज ही शहराची आहे. म्हणून मा.महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की महीला व बालकल्याणच्या माध्यमातून एक निर्णय घ्यावा, उदयाच बजेट आपल आहे महापालिकेच्या शाळा आणि खाजगी ज्या शाळा आहेत त्याठिकाणी मुलीना सुरक्षिततेसाठी आपण आपल्या महानगरपालिकेच्या वतीने एक तास का होईना तीथ

प्रशिक्षण देणं गरजेच आहे आज ती काळाची गरज आहे. ते या बजेट मध्ये करा. ज्या ज्या वेळेस बजेट आले त्या त्या वेळेस हे विषय काढलेले आहेत. बजेट झाल्यानंतर आम्ही बोललेल सगळ विसरुन जाता. उदया कोणीही त्या मुलीच्या अंगावर आलातर तीला स्वत:ला सेफ राहण्यासाठी काहीतरी कायदा करणं गरजेच आहे असं मला वाटत. तीच्यासाठी एखाद प्रशिक्षण महापालिकेच्या वतीने देणं गरजेच आहे. आतापर्यंत आपण खुप काही केलं आहे. मुलांना शिक्षण देतो, फ्रूट देतो सगळ देतो मग यासाठी जर थोडाफार खर्च झालातर मला वाटत नाही सभागृहामध्ये याबद्दल कुणाच दुमत असेल. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की यामध्ये आपण लक्ष घालावं. आता अनिलजी देशमुख साहेबांच गृहमंञ्यांच कुणी काही बोललं. त्यांनी एक व्हिजीट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आंध्र प्रदेशमध्ये जी घटना घडली आहे ती "दिशा" कायदयाची माहीती घेण्यासाठी राज्याचे गृहमंञी, आंध्र प्रदेशचे गृहमंञी, मुख्यमंञी, पोलीस महासंचालकांची भेट घेणार आहेत. महिलांवर अत्याचार करणा-या नराधमांना चाप बसविण्यासाठी राज्यात कठोर कायदा आणण्यात येणार आहे. राज्यशासन त्यासाठी सातत्याने प्रयत्नशिल असून याबाबत आंध्र प्रदेश सरकारने केलेल्या "दिशा" कायदयाची माहिती घेण्यासाठी गृहमंञी अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्ठमंडळ आंध्र प्रदेशात दाखल झालेले आहे. विजयवाडा येथे गृहमंञी आणि शिष्ट मंडळाचे स्वागत आंध्र प्रदेशचे अप्पर पोलीस महासंचालक ए.रविशंकर यांनी केले. हिंगणघाट येथील जळीतकांडावर अवघा महाराष्ट्र पेटउन उठला. महिलावरील अत्याचारात जी गंभीर दखल घेत राज्यसरकारने हे पाऊल उचललेले आहे. हे शिष्टमंडळ आंध्र प्रदेशचे मुख्यमंञी जगनमोहन रेड्डी, मोकाथोटी, गृहमंञी व आंध्रचे पोलीस महासंचालक यांच्यासोबत "दिशा" कायदयाची चर्चा करणार आहेत. शिष्ठमंडळात गृहमंञ्यांचे अप्पर मुख्य सचिव संजय कुमार, पोलीस महासंचालक सुबोध जयस्वाल, विशेष पोलीस महानिरीक्षक प्रताप दिघावकर, अश्वती दोरजे हे वरिष्ठ अधिकारी त्याठिकाणी पोहचलेले आहेत. आता आपली चर्चा चालली त्या माध्यमातून आदरनीय आपले गृहमंञी त्याठिकाणी पोहचलेले आहेत. त्याठिकाणी तो कायदा कशा पध्दतीने केला गेला. आंध्राची जी घटना घडली त्याला त्यांनी कस त्या कायदयाच्या चौकटीत बसवून त्या पोलीसांना किंवा ज्यांनी केलेल्या घटनेला वाचवणेचा किंवा त्या अधिका-यांना सेफ करण्याचा जो काही माणस त्यांनी केला त्या घटनेची माहिती घेण्यासाठी गेलेले आहेत. जे कोण आता राजीनामा कोणाचा मागतात, कोण काय करतय त्यांना मी हे वाचून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना हे सांगण्यासाठी केल आहे की यंत्रणा ही कुठलही सरकार अशा घटनेच्या बाबतीत, तीथ उदया

भाजप जरी असलतरी सुध्दा त्यांनी हेच केल असतं. जे आज आमच राष्ट्रवादी किंवा महाविकास आघाडी सरकार करतय त्यामध्ये कुणीही तीथ पक्षाच कुणी काही काम करायच कारण नाही. तरी माझी आपल्याला विनंती आहे की या घटना घडत असताना, महीलावर अत्याचार घडत असताना महापालिकेमध्ये आपल्या महिला व बालकल्याणच्या माध्यमातून, शिक्षणमंडळाच्या माध्यमातून जर आपल्याला काही करता आलतर त्या माध्यमातून करावं असं या निमीत्तान सांगतो. या मुलीवर जो अत्याचार घडलेला आहे त्याचा मी जाहीर शब्दात निषेध करतो आणि माझी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो, धन्यवाद.

मा.भाऊसाहेब भोईर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. साहजीकच आहे की देशामध्ये अशाप्रकारच्या निदंनीय घटना घडल्यानंतर त्याचे पडसाद प्रत्येक ठिकाणी तीव्र स्वरुपात निघत असतात. या घटना प्रथवी मानवनिर्मीत झाली तेव्हापासून या घटना अशा पध्दतीने विकृत झाल्या. राम जरी होता तरी रावण होताच. या सगळया घटना घडत असताना विकृती आणि अतिरेकी हे दोन प्रकार असे आहेत ते गव्हर्मेंट बघुन हाल्ला करत नाहीत. सत्ता कोणाची आहे ही प्रवृत्ती आजपासून नाहीतर पुरातन काळापासून देव लोकांमध्ये सुध्दा अशा प्रवृत्ती होत्या. मग यावर उपाय काय आपण चर्चा कशासाठी करायची. तर हे होवू नये यासाठी कोणत्याही ठरावाच्या रुपान किंवा आपल्या सर्व भगिनीनी जे काही वक्तव्य केलं त्याच एक शहानिशा करुन, आज गव्हर्मेंट कोणतही असु दयात, कोणत्या गव्हर्मेंटला वाटतय की माझ्या कालखंडात माझ्या राज्यामध्ये मी गृहमंत्री असताना, मी पालकमंत्री असताना अशी घटना घडावी. पण सभागृहाच्या माध्यमातून आपली तीव्र भावना कोणती आहे ही भावना पोहचवणं म्हणजेच सभागृहात मत व्यक्त करणं. कोणताही विषय दिशाहीन न होवू देता त्याच्यातल गांभीर्य कमी न होवू देता आपण जे तीव्रतेने आपल शहर कस सुरक्षीत ठेवायच, अशा घटना परत घडता कामा नये याच्यासाठी आपण कोणत्या उपाययोजना प्रशासनाला सुचवायच्या यावर विचारांच अवलोकन होणं अत्यंत गरजेच आहे आणि म्हणून मा.महापौरांना मी विनंती करतो की मी शिंदे मॅडमला पहीला प्रश्न दिला होता की आपल्या शाळेच्या ज्या मुली आहेत त्या मुलींची तुम्ही प्रत्येकांची जावुन भेट घ्या. कशाप्रकारच विदारक चित्र कदाचित येवू शकतं कारण की अशा घटना फार घडत चाललेल्या आहेत. त्यावर आपल्यापासून आपण जर सुरवात केलीतर, उपाययोजना जर केल्यातर किंवा आताच सांगीतल सीसी कॅमेरेच्या संदर्भात किंवा या संदर्भात ज्यांनी सांगीतल हे सर्व मुद्दे हायलाईट करुन त्यावर मार्ग काढायचा

त्यावरही विचार होणं, चर्चा होणं तर त्या आपल्या भगीनीनां श्रध्दांजली अर्पण आहे. नाहीतर बाकीची क्षेत्र आहेतच आपली एकमेकांवर कशा पध्दतीनी आरोप-प्रत्यारोप करुन तो राजकारणाचा भागच असतो परंतु मला असं वाटत की खुप चर्चा झालेली आहे. मा.महापौर साहेब, आपल्यातल्या सर्वानी मुद्दे मांडलेले आहेत त्याची शहानिशा करुन आपल्याला काय अपेक्षीत आहे आणि आपल शहर किती सुरक्षीत राहील कारण का पोलीस जरी आलेतरी पोलीसांच पहील असतं की शहराची लोकसंख्या २७ लाख आणि आमची लोकसंख्या किती आहे. या सगळया परिस्थितीच भान ठेवून किंवा अवलोकन करुन आणि चिंतन करुन मा.महापौर साहेब योगायोगाने तुम्ही स्त्रि महापौर आणि एक माई आहेत तुमच्यामध्ये आई पण आहे म्हणून एक सर्वपक्षीय शिष्ठमंडळ, सरकार कोणतही असू दयात त्यांना जाब विचारण्यासाठी परंतु ते सरकार आहे म्हणून या घटना घडतात किंवा मागच सरकार होतं म्हणून घटना घडल्याच नाहीत किंवा केंद्रात सरकार आहे असं काहीच नसतं. निर्भयाच एवढ खतरनाक प्रकरण घडलेल असतांना त्याला फाशी होणार आहे हे समजत असताना देखील लाखो घटना या देशात त्यानंतर घडलेल्या आहेत. खरतर पवार साहेबांचे मानावे तेवढे आभार थोडे आहेत की पन्नास टक्के महीलांना आरक्षण दिलं असल्यान तुमची भूमीका मांडता येण्याच हे स्वातंत्र देखील त्यामुळ मिळालं. एक एक महीला मुलींच्या एका एका शाळेत जावुन आठवडयातून एक तास जरी दिलातर तुमच्या समोर हे चित्र येइल हीच सुरक्षीतता आहे. त्या चर्चेतन हे उत्तर आहे की पुढ काय होवू नये यासाठी आपण आपल्या उपाययोजना करणं अत्यंत गरजेच आहे. सर्वानी आपल्या भावना व्यक्त करत असताना, हे न होण्यासाठी जे जे काय आपल्याला करता येईल म्हणून आपला एक संपुर्ण सभागृहाचा ठराव राज्यशासनाकडे जावु दया, केंद्रशासनाकडे पण जाऊ दया. अशा पध्दतीने मी भावना व्यक्त करतो.

मा.सुवर्णा बुर्डे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हिंगणघाटमध्ये घडलेली घटना, औरंगाबादमध्ये घडलेली घटना, महाराष्ट्रात महीला व मुली या सुरक्षीत नाहीत, असुरक्षीत आहेत. या दोन्ही खुपच अनिंदनीय घटना घडलेल्या आहेत. त्या मुलीला दिवसा जीवंतपणे जाळण्यात आले. ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे त्याचा मी निषेध करते. महाराष्ट्र शासनाला व पोलीस प्रशासनाला विनंती करते, कारण की विनंती करण्या इतपतच आमच्या हातात आता राहीलेले आहे. आतापर्यंत ज्या घटना घडल्या त्यामध्ये फक्त मेणबत्या जाळून निषेध करणं एवढच आमच्या हातात आहे. आता प्रशासनाला मी विनंती करते की लवकरात

लवकर या घटनेचा निकाल लावावा व जे आरोपी आहेत त्या आरोपीना लवकरात लवकर त्यांना शिक्षा देण्यात यावी. आता आपले विरोधी पक्षनेते जे बोलले त्याच्यावरती मी थोडस बोलेल की बाजू मांडतांना, विरोधी पक्षनेत्यांनी जी बाजू मांडली त्यांनी महीलांच्या अत्याचारावरती निर्मुलनासाठी काय योजना करायच्या हे बोलायला पाहीजे होते, काय करायला पाहीजे न करायला पाहीजे याच्यावरती त्यांनी बोलायला नव्हतं पाहीजे. गरीब गाय आपल्या बछडयावरती संकट आलं की तर ती शिंगावर घेते तसं आम्ही महीलानी कोणावरही संकट आलतर शिंगावर घेण्यास कमी राहणार नाहीत. मी महीला आहे महीलेच्या बाबतीत घडलतर मी प्रयत्न करुन बोलणारच. आज कोणी इथ माझ्या बाबतीत बोलत असेल की हीला बोलता येत नाहीतरी बोलायचा प्रयत्न करते तर असं समजू नका. वेळ आलीतर ही महीला कमी पडणार नाही हे लक्षात ठेवा. मृत्यू म्हणजे काय, मृत्यू म्हणजे काय तरुण हाईल, मी तरुण होईल, आई होईल, आजी होईल पण असा मृत्यू येतो त्यावेळी खुप दु:ख होतं. प्रियंका, निर्भया, अंकिता जळत नाही. इथे बसलेली प्रत्येक महीला जळते. टिव्ही पेपरमध्ये बातम्या वचताना काळीज फाटते, आश्रूचा बाण फुटतो. खरंतर महाराष्ट्र प्रशासनाला व पोलीस आयुक्ताला माझ कळकळीच सांगण आहे की खरचच तुम्ही मुली, महीला यांच्यावरती जे अत्याचार घडतात त्याच्यावरती लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि त्यांना कडक शासन व्हाव, त्याला शिक्षा मिळावी अशी विनंती करते व माझ्या परिवाराच्या तर्फे तीला श्रध्दांजली वाहते, धन्यवाद.

मा.एकनाथ पवार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर या विषयावर मी बोलणार नव्हतो. परंतु माझे परमस्नेही पुरुष नगरसेवकांनाही, नेत्यांनाही याठिकाणी बोलाव लागतं. मंगलाताईनी बोलता बोलता सांगीतल की अशा एखादया विषयामध्ये शंभर टक्के राजकारण नाही झाल पाहीजे. पण एक गोष्ट निश्चित सत्य आहे. अकिंताची किंवा सिल्लोडची घटना असेल, नाशिकची घटना असेल, पनवेलची घटना असेल, आपल्या शहरामधल्या काही घटना असतील. गेल्या तीन महीन्यामध्ये या राज्यामध्ये जी परिस्थिती खरतर महीलांच्या संदर्भामधली असेल, शेतक-यांच्या संदर्भामधली असेल अत्यंत वाईट परिस्थिती कायदा आणि सुव्यवस्थेची या सरकारमध्ये या राज्यामध्ये झालेली आहे. आणि कधी कधी भाऊसाहेब तुम्ही खरच म्हणालात की अशा पध्दतीच्या प्रवृत्ती ठेचून काढल्या पाहीजेत. हे नाही झाल पाहीजे याच्यासाठी अपण काय केल पाहीजे. खरतर सरकार हे त्याच्याचसाठी असतं. दत्ताकाका तुम्ही सांगीतल की आमचे गृहमंत्री, या राज्याच्या सन्मा.गृहमंत्र्यांना अंध्रामध्ये जायला वेळ मिळाला आणि नागपुरपासून

हिंगणघाट मला असं वाटत की जवळपास पंचवीस ते तीस मिनीटाच अंतर आहे तीथ जायला वेळ मिळाला नाही. ही दुर्दैवी घटना आहे राज्याच्या दृष्टीने लक्षात ठेवा. ज्यावेळेस छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवनेरीवर या राज्याचे मुख्यमंत्री येवून या राज्याला कायदा, सुव्यवस्था आम्ही किती चांगल्या पध्दतीची करतोय अशा पध्दतीची भावना व्यक्त करतात. मला खेदान वाटतय की छत्रपती शिवाजी महाराजांच राज्य आहे त्यांच नाव घेवून केलेल असेल, सन्मा.बाळासाहेब ठाकरे आजजर असते आणि अशा पध्दतीची घटना घडली असतीतर त्यांनी सांगीतल असतं की अशा प्रवृत्तीला जागेवर ठेचून काढल पाहीजे. दुर्दैवान याठिकाणी ज्या पध्दतीन सरकार या राज्यामध्ये राज्य करतय आणि मला असं वाटतय की एखादी घटना म्हणजे पोलीसांच्या संदर्भातील असेल, शेतक-यांच्या संदर्भातली असेल म्हणजे ज्या पध्दतीने सरकार या राज्यामध्ये काम करतय, आम्ही राजकारण करत नाहीत तुम्ही राजकारणावर बोलले. कुणीतरी सांगीतल की अजीतदादा नेते आहेत, पालकमंत्री आहेत सरकारच्या विरोधामध्ये विरोधीपक्षाच्या लोकांना बोलण्याचा नैतीक अधिकार असतो. तुम्ही ज्यावेळेस बोलत होते त्यावेळेस बरोबर होत आणि आम्ही ज्यावेळेस या सभागृहामध्ये सरकारच्या नाकर्तेपणाबद्दल आवाज उठवितो खरतर वाईट वाटायच काहीच कारण नाही. मला असं वाटतय की या राज्यामधली परिस्थिती अत्यंत दयनीय झालेली आहे. तुम्ही सगळयांनी सांगीतल मा.महापौरांच्या नेतृत्वामध्ये याठिकाणी या शहराची परिस्थिती बघीतली, गेली तीन महीने आपण बघतोय या तीन महीन्यामध्ये महीलांवर अत्याचार या शहरामध्ये होतात.

(गोंधळ)

मा.महापौर- काका साहेब, पक्षनेते बोलतात त्यांना जे मांडायच आहे ते मांडू दयात.

(गोंधळ)

मा.एकनाथ पवार- मा.महापौर साहेब, माझ्या बोलण्याचा राग खरतर तुम्हांला यायला नको होता. मी आता पक्षनेता आहे परंतु एक लक्षात ठेवा मी माझ्या पार्टीचा अत्यंत प्रामाणिक कार्यकर्ता आहे. तेव्हा माझी तुम्हांला विनंती आहे की हे सरकार या राज्यामधल आताच सरकार हे .....

(गोंधळ)

मा.महापौर- पक्षनेते बोलतात आपण सर्वांनी शांत रहावे.

(गोंधळ)

मा.एकनाथ पवार- मा.महापौर साहेब, शिवनेरीवर जावून ज्या पध्दतीने भाषण करताय आणि छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेल सरकार नाही हे लक्षात ठेवा. हे औरंगजेबला अभिप्रेत असलेल सरकार आहे. या निमीत्तान मा.महापौर आपल्याला विनंती आहे की ज्या पध्दतीन या राज्यामधल्या सरकारनं कायदा आणि सुव्यवस्थेचा खेळखंडोबा मांडलेला आहे. हे सरकार अधोगतीला येतंय. हे सर्व सरकार माझ्या सगळया भगीनींची अब्रू वाचवण्यास यशस्वी होत नाही. खरतर मान खाली घालावी अशाप्रकारच्या घटना अंकिता असेल, सिल्लोडची घटना असेल, पनवेलची घटना असेल हे ऐकूण आपल्याला काय वाटतय. मी या सरकारचा जाहीर शब्दामध्ये निषेध करतो आणि या सरकारच डोक आतातरी पुढच्या काळामध्ये ठिकाण्यावर येईल की नाही अशा पध्दतीची भावना व्यक्त करतो आणि थांबतो, धन्यवाद.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेली दोन तास आपण हिंगणघाटसारख्या निंदनीय घटनेवर या सभागृहात चर्चा करतो. हिंगणघाटची घटना, औरंगाबादची घटना या सर्व घटना निंदनीय आहेत. प्रथमत: मी या घटनेचा निषेध करतो. गेल्या दोन तासापासून मी सभागृहात ऐकतो मला असं जाणवल नाही की, प्रत्येकजण महीलेसाठी बोलतो. कुठेतरी बोलत असताना प्रत्येकजण पक्ष हा डोक्यात ठेवून बोलत होता हेही काही लक्षात नाही आल. मला सभागृहाला विनंती आहे, मला वाटत मंगलाताईनी सांगीतल, भाऊसाहेबांनी सांगीतल, अशा घटनेच राजकारण आपण करायच आणि अशा घटनेसाठी म्हणायच तू बोलू नको आणि तू बोलू नको. हे काय चालल आहे, तुमचा व्हिप आला नाही इथ आज. तुमची सभा तहकूबच आहे यासाठी या गोष्टीच तुम्ही राजकारण करणार आणि इतक्या वेळ तुम्ही चर्चा करणार. नेत्यांच ऐका, आपण या शहरातील नागरीक आहोत, सगळया पक्षाच्या अगोदर हे तरी लक्षात ठेवा.

(गोंधळ)

मा.महापौर - तुम्ही मुद्दयाच बोला. श्रध्दांजलीचा विषय चालला आहे श्रध्दांजलीवरच बोला.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एवढी वाईट घटना घडली आणि आपण इथ बसून राजकारण करतो. कुठल्याही पक्षाच सरकार असू दया निषेध कराना. तीथ वरती आमदार बसलेत ते पण त्यांच मत

मांडतीलनां. आपण आज आपल्या शहरात, आपल्या सभागृहात आपण बोलतोना. आज तुम्ही जे पक्षांच काढल तर मी आता राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाची आकडेवारी आहे ती सांगतो. म्हणजे कालचाही पेपर तुम्ही वाचला असेल, जज्ज लोकांनीही दखल घेतली आहे. म्हणजे सगळे २४२१२ गुन्हे नोंदवले. जज्ज लोकांनीही दखल घेतली आहे. काही एफआयआरच कन्व्हर्शन खटला चालू असताना पीआयमध्ये केलं आणि सगळे एकत्रीत केले. म्हणजे सगळे सेन्सीटीव्ह आहेतना या विषयावर. फक्त तुम्ही आम्ही सेन्सीटीव्ह नाहीततर या देशात राहणारा प्रत्येक नागरीक, प्रत्येक महीला सेन्सीटीव्ह आहे. हा विषयच सेन्सीटीव्ह आहे. म्हणजे सर्वोच्च न्यायालयच याप्रकरणात दखल घेत आहे. तुम्ही पाहील असेल मा.उध्दव साहेबांनी स्वत: सांगीतल की मी हे फास्ट्रॅकमध्ये करतो व उज्वल निकम यांची त्याठिकाणी नियुक्ती केली आणि त्यानंतर गृहमंत्र्यांना देखील आदेश दिले आहेत की आपण तेलंगणाच्या कायदयाचा अभ्यास करावा. म्हणजे प्रत्येकजण आपआपल्या पध्दतीने यात सेन्सीटीव्ह आहेत. तीन महीन्यातच कायदा व सुव्यवस्था बीघडली म्हणता हे कसंकाय हे राजकारण नाही करत तर काय करता. तुम्हांला तीन महीन्यात कळल कायदा आणि सुव्यवस्था बीघडली. दिल्लीत कोणाच शासन आहे, दिल्लीत कुणाकड गृह आहे.....

(गोंधळ)

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एकनाथराव तुम्हांला सवयच लागली तुम्ही जाहीर सभेत कुठतरी भारतीय जनतापार्टीच भाषण करता कधीतरी नगरसेवकांच भाषण करा. आज उत्तर प्रदेशचे आमदार आपण पाहीले कुलदीपसिंह सेंगर काय परिस्थिती आहे. माई तुम्ही काय करा तुमच एक शिष्टमंडळ घ्या आम्हांलाही बोलवा मा.मुख्यमंत्री यांची भेट घेवू सिमाताई सुध्दा आहेत. या घटना घडतात आपण कुठेतरी शिक्षणमंडळाच सुध्दा डोक ठिकाण्यावर आणा. रोज आपण खरीदया करतोना, रोज स्टॅण्डींगला ठराव येतो. कुठेतरी मुलींच्या प्रशिक्षणाचा एखादा विषय आणा. चांगला विषय आणानां. मुलीमध्ये, मुलांमध्ये ऍवेरनेस करा असे काहीतरी चांगले विषय आणाना. आपण आपल्या शहरातील लहान मुल-मुली असतील त्यांना कशा प्रकारे चांगल प्रशिक्षण देता येईल हे बघाव. आज आपल्या शहरातील मुलांवर जर चांगले संस्कार आपल्याला करता आलेतर चांगली गोष्ट आहे. ऍवरनेस टू टच त्याचेही क्लासेस आहेत, स्वसंरक्षणाचे खुप क्लासेस आहेत. आपण शहरात चांगल्या साठी काय करु शकतो त्याच्यावर एक चर्चा ठेवा. माई तुम्ही तुमच्या अध्यक्षतेखाली हे बोलून घ्या. मुलीना कस

प्रशिक्षण देता येईल, मुलांना कस प्रशिक्षण देता येईल. जेणेकरुन भविष्यात ही गुन्हेगारी वृत्ती आपल्या शहरात बळावणार नाही. या घटनेचा मी पुन्हा एकदा निषेध करतो आणि मी सगळयांना विनंती करतो की फक्त उत्तर दयायच म्हणून आम्ही तुम्हांला याठिकाणी उत्तर दिल आहे पण याच कुठेही राजकारण न करता आपल्या शहरातील लहान मुलांना आपल्याला कसं संरक्षण देता येइल हे प्रशासन म्हणून आपण बारकाईन पहाव. भविष्यात चांगल्या विचारांची मुल कशी घडतील याकडे आपण लक्ष दयाव, धन्यवाद.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राज्यात जी घटना घडली त्याचा सर्वानीच निषेध केलेला आहे, अत्यंत वाईट घटना आपल्या राज्यामध्ये घडलेली आहे. देशामध्ये आशा अनेक घटना वारंवार घडतात आणि त्या दृष्टिकोनातून आपल्या सगळयांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. सभागृहामध्ये मत मांडत असताना प्रत्येकाचीच अपेक्षा ही असायला पाहीज की या विषयाच आपण राजकारण न करता आपण आपल्या शहरामध्ये पुढच्या काळामध्ये अशा घटना घडणार नाहीत आणि त्या दृष्टिकोनातून आपण कुठली पावल उचलायची याचा विचार व्हायला पाहीजे होता. परंतु आपण नेहमीप्रमाणे जस स्टेजवर भाषण करतो त्याप्रकारे याही ठिकाणी भाषण केलं. राहूलदादा चुकीच बोलले नाहीत की तुम्ही याठिकाणी ठरवून आले होते की आपल्याला जीबी चालवायची नाही म्हणून तुम्ही अशा पध्दतीने हा विषय आणला आणि निरनिराळया पध्दतीने विषयांतर करण्याचा आपण प्रयत्न केला. माई तुम्ही अनेक वर्षे या सभागृहात नगरसेवक आहात. भाऊसाहेब आहेत, मंगलाताई आहेत. अनेक वर्षे आपण या सभागृहात काम करतो. अशा पध्दतीने सभागृह कधीही चालवल गेलं नाही, मागच्या काळामध्ये. प्रत्येक जण खाजगीत चर्चा करताना निश्चितपणे मान्य करतो की या सभागृहाचा दर्जा घसरत चाललेला आहे. पक्षीय राजाकरण कधी सभागृहात होत नव्हतं. मी गेली वीस वर्षे या सभागृहात नगरसेवक म्हणून काम करतो. विरोधी पक्षाचा नगरसेवक म्हणून पण मी या सभागृहात काम केलं. नंतर सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक म्हणून आता पुन्हा विरोधी पक्षाचा म्हणून आहे. परंतु कधीही असं घडत नव्हतं की विरोधी पक्षाचा नगरसेवक म्हणून त्याच काम होत नव्हतं, असं कधीही घडत नव्हतं. परंतु एका वेगळया दिशेला नेण्याच काम गेल्या काही वर्षापासून आपण चालवलेल आहे. कुठल्या पक्षाचा नगरसेवक आहे याचा कधीही विचार होत नव्हता. सभागृहा बाहेर पक्ष सभागृहामध्ये आल्यावर सगळे एक, खेळीमेळीच्या वातावरणामध्ये. भाऊसाहेब आणि मंगलाताई सगळयात सिनीअर आहेत. आम्ही याठिकाणी गॅलरीत बसून

पाहीलेलं आहे. ही लोक एकजीत येवून शहराच्या विकासाच्या संदर्भात निर्णय घ्यायची आणि शहरात चांगली काम करत रहायची. आज काही लोक मागच्या काळात या पक्षात होती आता त्या पक्षात आहेत. फक्त लेबल बदलेल आहे पण लेबल बदलल्यानंतर माणसाची भूमीका कशी बदलते, इतक्या टोकाला जावून तुम्ही बोलता. मला सुध्दा पहील्यांदा नगरसेवक पदाची संधी भारतीय जनता पक्षामुळे मिळाली आहे. भारतीय जनता पक्षामुळे पहीला नगरसेवक मी झालेलो आहे. अशी अनेक मंडळी राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून नगरसेवक झालेली आहेत पण इथ आल्यानंतर वेगळया पध्दतीने नेत्यां विषयी बोलायच, आम्ही तुमच्या नेत्यांची नाव कधी घेत नाहीत.

मा.महापौर- श्रध्दांजलीवर बोलावे.

(गोंधळ)

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपले अधिकारी काम करतात अधिका-यांना ख-या अर्थाने तुमच संरक्षण आहे का. अधिका-यां विषयी वेगवेगळया प्रकारच्या घटना घडतात. कमीशनर म्हणून तुमच संरक्षण आहे का त्यांना.

मा.महापौर- विषयांतर होतं, श्रध्दांजलीवर बोलावे.

(गोंधळ)

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जी वस्तुस्थिती आहे ती तुमच्या पुढ आणि समाजापुढ आली पाहीजे. पन्नास वेळा आमच्या नेत्यांच नाव घ्यायच काय कारण आहे. आणि ज्यांना राष्ट्रवादीन मोठ केल ते सुध्दा. राहूलदादानी चांगल्या सूचना केल्या आहेत. आम्ही भारतीय जनता पार्टीच्या विरोधात कधी बोलतो का, नाही, कारण तो मला अधिकार नाही. कशा बद्दल नेत्यांच नाव घ्यायच.

(गोंधळ)

मा.महापौर- विषयांतर करु नका, श्रध्दांजलीवर बोलावे.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, चुकीच्या पध्दती पाडू नका. मला एक माहीती आहे की पदामुळे माणसाची उंची वाढते आणि त्या पदाची पण उंची वाढवण्याच काम आपण सगळयानीच केल पाहीजे. पण त्या पदाची उंची कमी नाही झाली पाहीजे याचा आपण सगळयांनी भान ठेवलं पाहीजे. पद कायम नसतात,

नगरसेवक म्हणून आपण या सभागृहात आलेलो आहोत. लोकांच्या आपल्याकडन खुप अपेक्षा आहेत आणि त्या दृष्टिकोनातून आपण सभागृहात काम केल पाहीजे परंतु तसं होत नाही. अनेक नगरसेवक इथे नवीन आहेत, पहील्यांदा नगरसेवक झालेले आहेत, त्यांना काय वाटत असेल की सभागृह असंच चालतं. परंतु असं कधी सभागृह चालत नव्हतं. भाजप आणि इतर पक्ष म्हणजे भारत पाकीस्तानचा बांध आहे आणि आमची दुश्मनी सारख काम चालत इथे असं त्या नगरसेवकांना वाटत असेल.

(गोंधळ)

मा.महापौर- श्रध्दांजलीचा विषय आहे. तुम्ही बोलता तो विषय वेगळा आहे.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, याठिकाणी सगळयांनी काय बोलल पाहीजे की आपल्या शहरामध्ये ही अशी घटना होवू नये यादृष्टिकोनातून आपण काय प्रयत्न केले पाहीजेत. मुळात ही जी विकृती आहे, या विकृत लोकांना जात नसते, धर्म नसतो, नसतं. त्यामुळ ही विकृती ख-या अर्थाने थांबविण्याच्या दृष्टिने आपल्या येथील काही शाळांमध्ये, कॉलेजेस मध्ये ठिकठिकाणी आपल्याला जावून तीथ चांगले लेक्चररस ठेवले पाहीजेत. तीथ त्यांना व्याख्यान दिलं पाहीजे त्यांच्यावरती चांगले संस्कार दिले पाहीजे यादृष्टिकोनातून आपण प्रयत्न केले पाहीजेत. या गोष्टींचा विचार आपण करावा. भविष्यकाळामध्ये आपल्याला याच निश्चितपणे समाधान राहील की माई ढोरे महापौर होत्या आणि माईनी खुप चांगला निर्णय घेतला आणि पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशा पध्दतीने खुप मोठया प्रमाणात सांस्कार करण्याच्या दृष्टीने शाळा, कॉलेजेसमध्ये चांगल्या प्रशिक्षणाचे शिबीर घेतली गेली व महीलांना वेगवेगळया प्रकारच ट्रेनिंग दिले गेले अशा प्रकारच काम आपण कराव. येथून पुढच्या काळामध्ये माझी आपल्याला सर्वाना विनंती आहे की आपण सभागृहामध्ये पक्षीय राजकारण न करता विषयाला धरुन मी पण बोलणार आणि सगळयानी विषयाला धरुन बोललं पाहीजे. त्याच्यामुळे मी झालेल्या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि श्रध्दांजली वाहून थांबतो.

मा.विठ्ठल उर्फ नाना काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राज्यात जी दुर्दैवी घटना झाली त्या घटनेस मी माझ्या पक्षाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. मा.महापौर साहेब, सुरवातीलाच हा श्रध्दांजलीचा विषय घेतला. आम्हांला वाटल दहा ते पंधरा मिनीटात हा विषय संपेल पण आम्हांला कळल की सभा तहकूब होणार आहे. परंतु हा श्रध्दांजलीचा विषय भावनीक आसून देखील

याला एक वेगळ स्वरुप दिलं आणि हा आपण आताचे सत्ताधारी जे आहेत यांच्यावर ताषेरे ओढण्यासाठी हा विषय लांबवीत चाललेला आहात. मा.महापौर साहेब, आपण दुजाभाव करतात, ज्यावेळेस राहूल, अजीत बोलत होते ते बोलत असताना दुसरे सदस्य बोलतात त्यावेळेस तुम्ही यांना खाली बसायला सांगता, श्रध्दांजली वहा, विषयांतर करु नका म्हणता. ज्यावेळेस एकनाथ पवार बोलले त्यावेळेस तुम्ही त्यांना पण तसच बोलायला पाहीजे होतं. हा दुजाभाव महापौरांकडून अपेक्षीत नाही. आपण शहराचे महापौर आहात, कुठल्या पक्षाचे नाहीत. त्यामुळ ज्या पध्दतीन भाऊसाहेबांनी सांगीतल ही घटना होत असताना कोण कोणत्या पक्षाचा आहे, कोणाच सरकार आहे, तो माणूस त्याची विकृती आहे. त्या विकृतीला कोण जबाबदार आहे ज्याच्यावरती आपण सभागृह म्हणून एक चांगला निर्णय घेणं गरजेच आहे. हा निर्णय घेत असताना फक्त त्या विषयावरच बोलल पाहीजे. अजीतने सांगीतल्याप्रमाणे तुम्ही सगळयांना समान बोलू दयां. बोलत असताना तुम्ही ज्या पध्दतीने आमच्या सदस्यांना माईक जवळ घेवून आमच्या सदस्यांना खाली बसवलं तसं आपल्या सदस्यांना सुध्दा शांत बसायची वॉर्निंग देत जा. कारण सत्ताधारी असले म्हणून सगळयांनी बोलायच आणि बोलणारानी गप्प बसायचा हा विषय नाही. हे मी बोलत नाही सभागृह पाहतय, पत्रकार पाहतात सगळे पाहतात. आपण महापौर आहातना तर महापौरांप्रमाणे आपण देखील आपल्या सदस्यांना वॉर्निंग देत जा. महापौरांनी ज्यांना बोलायला सांगीतल त्यांनी बोलायच बाकीच्यांनी बोलायच काय कारण आहे.

(गोंधळ)

मा.विठ्ठल उर्फ नाना काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्हांला शिकवायला आलेलो नाही मी, तुम्ही मध्ये बोलतात मी शिकवायला आलो नाही तुम्हांला. मी आडाणी शिक्षक झालो..... मा.महापौर साहेब, विषयांतर न करता श्रध्दांजली वाहताना श्रध्दांजलीवरच बोलाव आणि आपण देखील बाकी सदस्यांना वॉर्निंग दयावी. एखादा बोलत असेलतर मध्ये बोलूं दयायच नाही. आपण राज्यशासनावरती टिका करतोय, आपण जो निर्णय घ्याल सभागृहाच्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आम्ही देखील सम्मंत करु. तरी मी श्रध्दांजली वाहून थांबतो.

(गोंधळ)

मा. नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खर म्हणजे गेल्या दोन तासापासून चर्चा चालू आहे. वर्ध्या जिल्ह्यामध्ये हिंगणघाट येथे अंकिता हीला पेट्रोल टाकून जाळण्यात आलं आणि १० फेब्रूवारीला ऑरेंजसिटी या हॉस्पिटलमध्ये उपचार चालू असताना तीचा अंत झाला. आज सभागृहात बघीतलतर प्रत्येक भगीनीनी आणि प्रत्येक बंधुनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या. प्रथमत: या अंकिताताईला या सभागृहाच्या वतीने मी याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करतो. याठिकाणी प्रत्येक नगरसेवक सहकार्यानी अंकिताच्याबद्दल भावना व्यक्त केल्या आणि अनेक आमच्या भगिनीनी राज्यशासनाच्या निष्क्रीयतेबद्दल त्यांचा निषेध केला. खर म्हणजे अंकिताताईची ३ फेब्रूवारीला ही घटना झाली आणि १० फेब्रूवारीला तीचा अंत झाला. तीच्यावरती ऍसीड टाकल त्याच्यावरती गुन्हे दाखल झाले तीचा अंत झाल्याच्यानंतर ३०२ चा गुन्हा त्याच्यावरती दाखल करण्यात आला. परंतु आज महाराष्ट्रामध्ये आपण बघीतलतर, या ठिकाणी उल्लेख झाला खर म्हणजे दुर्दैव वाटत की आमच्या प्रत्येक भगीनीनी पोटतीडकीने अंकिता बद्दलची भूमीका याठिकाणी मांडली. प्रत्येकाच्या मनामधून ती भावना होती की या भगीनीवर अत्याचार झाला तीला न्याय मिळाला पाहीजे. या न्याय भूमीकेतून आमच्या प्रत्येक भगीनी याठिकाणी भूमीका मांडत असताना, तीला आम्ही श्रध्दांजली व्यक्त करत असताना जे राज्य या महीलांच सक्षमीकरण करण्याची भाषा करतात तीच रक्षण करण्याच काम या राज्यसरकारच आहे. त्या राज्यसरकार बद्दल बोललतर आम्हांला थोडस वेगळ वाटायला लागलय. मगाशी आमच्या ताईनी सांगीतल की महाराष्ट्रामध्ये आज प्रत्येक जिल्ह्यामध्ये जवळपास एक घटना म्हणजे सिल्लोडची घटना असेल, पालघरची घटना असेल, फेब्रूवारीला वाकडमध्ये दहा वर्षाच्या मुलीवर एकाने अत्याचार केला. अशा अनेक घटनाची मालीका या महाराष्ट्र राज्यामध्ये होते. याठिकाणी मला अभिमानाने सांगावस वाटत की ख-या अर्थान केंद्र सरकारच्या बद्दल बोलल जात परंतु या राज्यसरकारच विधी खात सुध्दा तातडीचा कायदा याठिकाणी करु शकतं. मगाशी उल्लेख झाला, खर म्हणजे आम्ही राजकारण करणारे कार्यकर्ते नसून संवेदनशील कार्यकर्ते आहोत. याठिकाणी बोलल गेल, विरोधी पक्षनेत्यांनी सांगीतल की जीबी चालवायची नाही म्हणून हा विषय घेतला परंतु आम्ही संवेदनशील कार्यकर्ते आहोत. एखादया महीलेवरती अशा प्रकारचा अत्याचार होतो त्यावेळेला तीच्या माग खंबीरपणे उभा राहणं आणि तीला पाठींबा देणं, तीच्या परिवाराला पाठींबा देणं आणि अशाप्रकारच्या घटना पुन्हा होवू नयेत म्हणून सातत्याने आम्ही त्याच्यासाठी बोलणार आहोत. हे खर असताना ज्यावेळेला संवेदनशील गोष्ट या सभागृहामध्ये बोलली जाते त्याला राजकारण

म्हणता. छत्रपती शासनाच्यामध्ये तुम्ही शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणताय आणि मग छत्रपतीच शासन ज्यावेळेला चालू होतं त्यावेळेला छत्रपतीच्या शासनामध्ये जर तुम्ही आमच्या महीलेकड वाकडया नजरेनी बघीतलतर त्याला भरचौकामध्ये हत्या केली जात होती त्याला चौकामध्ये फाशी दिली जात होती. आणि आताच्या सरकारमध्ये दुर्दैव वाटत शिवछत्रपतींचा अर्शिवाद घेवून म्हणतात परंतु छत्रपतींची कालच जयंती झाली आणि या छत्रपतींच्या शासनामध्ये त्यांच नाव तुम्ही सातत्याने घेतलं त्या छत्रपतींच्या कामावरुन तुम्ही काम करतात का. त्यांच्याप्रमाणे या राज्यामध्ये काम तुम्ही करतात का. आमच्या आया-बहीणीची रक्षा तुम्ही करु शकतात का. आमच्या महीलांची रक्षा तुम्ही करु शकतात का, आमच्या तरुणीची रक्षा करु शकतात का. आज आमच्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये आमच्या भगीनी ख-या अर्थाने भयभीत झालेल्या आहेत आणि म्हणून आम्ही या सभागृहामध्ये या अंकितला ज्यावेळेला श्रध्दांजली वाहतो त्यावेळेला आम्ही सांगतोय की ही मालीका चालू झालेली आहे. पुर्ण महीनाभरामध्ये जवळपास वीस घटना या संपुर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये झालेल्या आहेत. आमच्याकडे सत्ता पण आहे परंतु जो आलेख चाललेला आहे तो कुठेतरी थांबला पाहीजे. अशा क्रूर वृत्तीला ऍसीड टाकल जात पेट्रोल टाकून जाळल जातं अशा घटना वारंवार होतात म्हणून आम्ही या सभागृहामध्ये संवेदनशील असल्यामुळे याठिकाणी भावना मांडलेल्या आहेत. आम्हांला राजाकरण करायच नाही. राजकारण करण्याच हे व्यासपीठ पण नाही सभागृह पण नाही. आम्हांला हे सुध्दा माहीती आहे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमामधुन, या आयुक्तालयाच्या माध्यमामधुन आमच्या शाळेच्या विदयार्थ्यासाठी, विदयार्थीनीसाठी असेल, आयटी सेक्टरच्या कंपनीमध्ये जाणा-या महीला असतील त्यांना सुरक्षीततेच वातावरण करण्याच काम आमच्या या सभागृहाच्या माध्यमातून आम्ही करणार आहेत. आमच्या भगीनीनी सुचना मांडलेल्या आहेत की या महीलांच्या सुरक्षिततेसाठी आयुक्तां बरोबर एक तातडीची मिटींग घ्या. ज्या पध्दतीने आम्ही महीलांच्या सक्षमीकरणासाठी महानगरपालिकेच्या माध्यमामधुन कुठल्याही प्रकारची कुठल्याही टेंडरला, कुठल्याही निधीला याठिकाणी कमतरता भासू देणार नाहीत. एक चांगल टेंडर, चांगला निधी महीलांच्या सक्षमीकरणासाठी केलेला आहे. मी पुन्हा अंकीताताईला श्रध्दांजली अर्पण करतो आणि मा.महापौर साहेब, हा जो काही संवेदनशील विषय असल्यामुळे याला कुठलही राजकारण नाही. ज्यावेळेस पन्नास टक्के महीला या सभागृहात बसल्या आहेत आणि पन्नास टक्के महीलांच्यासाठी या राज्यामध्ये काम चालल जातय. पन्नास टक्के महीला नेतृत्व करतात आणि त्या नेतृत्व करणा-या महीला, आमच्या

भगीनी जर त्यांच्या व्यथा याठिकाणी मांडत असतीलतर आणि त्याला जर कुणी राजकारण करत असेलतर ही दुर्दैवी गोष्ट आहे मी त्याचा सुध्दा याठिकाणी निषेध करतो आणि ही सभा श्रध्दांजली अर्पण करुन दि.२६/२/२०२० दुपारी २.०० पर्यंत तहकूब करावी अशी मी विनंती करतो.

मा.अॅड.मोरेश्वर शेंडगे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर – आयुक्त साहेबांना महीलांच्या दृष्टीकोनातून विनंती करते की शहरातील महीला, महाराष्ट्रातील महीलांची सुरक्षा कशी राखता येईल याबाबत पोलीस आयुक्तांना लवकरात लवकर एक पत्र दयाव. महीलांची सुरक्षा कशी राखता येईल याकडे लक्ष दयावे म्हणून. त्याच बरोबर महीला सुरक्षीत कशा राहतील त्यासाठी महानगरातील प्रत्येक शाळेला आदेश दयावा की महीलांना सुरक्षीततेसाठी कराटे प्रशिक्षण हे दिल गेल पाहीजे अशी सक्ती करावी त्याच बरोबर रिक्षा महीला चालवतात त्यांना देखील आपण आपल्या मार्फत कराटे प्रशिक्षण दयाव अशी सभागृहाच्या वतीने आयुक्तांना विनंती करते आणि ही सभा बुधवार दि.२६/२/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ४१

सभावृत्तांत

(दि.२०/०२/२०२० ची तहकूब सभा)

दिनांक – २६.०२.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी- २०२० ची तहकूब मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २६.०२.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
१२) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१४) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१५) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.लोंढे नम्रता योगेश

३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३२) मा.लांडे विक्रांत विलास

३३) मा.गीता सुशिल मंचरकर

३४) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३५) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३६) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३७) मा.अनुराधा गणपत गोरखे

३८) मा.केशव हनुमंत घोळवे

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.चिखले सचिन तुकाराम

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५३) मा.प्रमोद कुटे

५४) मा.राजू मिसाळ

५५) मा.शैलजा अविनाश मोरे

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.ढाके नामदेव जनार्दन

६२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६३) मा.करुणा शेखर चिंचवडे

६४) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६५) मा.भोईर सुरेश शिवाजी

६६) मा.अपर्णा निलेश डोके

६७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.सुलक्षणा राजू धर

७२) मा.शाम गणपतराव लांडे

७३) मा.सुजाता सुनिल पालांडे

७४) मा.योगेश मंगलसेन बहल

७५) मा.कदम निकीता अर्जुन

७६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७७) मा.नढे विनोद जयवंत

७८) मा.पाडाळे निता विलास

७९) मा.काळे उषा दिलीप

८०) मा.कोकणे संतोष अंकुश

८१) मा.पवार मनिषा प्रमोद

८२) मा.बारणे अर्चना तानाजी

८३) मा.अभिषेक गोविंद बारणे

८४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८५) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८६) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८७) मा.निलेश हिरामण बारणे

८८) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८९) मा.दर्शले रेखा राजेश

९०) मा.कलाटे राहुल तानाजी

९१) मा.कामठे तुषार गजानन

९२) मा.चोंधे आरती सुरेश

९३) मा.कस्पटे संदिप अरुण

९४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९७) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८) मा.कुटे निर्मला संजय

९९) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१००) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.मुंढे उषा अंकुश

१०२) मा.कदम शशिकांत गणपत

१०३) मा.लोखंडे चंदा राजू

१०४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१११) मा.संतोष बबन कांबळे

११२) मा.सोनवणे शारदा हिरेन

११३) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११४) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

११५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील-प्र.शहर अभियंता, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे-मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार-उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम, भालकर - सह शहर अभियंता, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.वाघमारे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहा.आयुक्त, मा.गाडेकर, मा.दांगट-प्र.सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.तांबे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.पाटील - कार्यकारी अभियंता,

मो.गोफणे-आरोग्य अधिकारी, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मा.डॉ.गोफणे-आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. महापौर- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.विलास मडिगेरी – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपल्या या सभागृहामध्ये सत्तारुढ पक्षनेता म्हणुन आमचे जुने सहकारी मित्र विद्यमान नगरसेवक नामदेवराव ढाके यांची मा.विभागीय आयुक्तांकडुन मंजुरी मिळालेली आहे. मा.महापौरांनीही मा.आयुक्तांच्या सूचनांना मान्यता दिलेली आहे. त्यांचा याठिकाणी सन्मा.सभागृहाच्या वतीनं अभिनंदनाचा ठराव याठिकाणी मांडत आहे. अभिनंदनाच्या ठरावानंतर मा.नामदेवराव ढाके यांचा याठिकाणी सन्मान करावा अशी सूचना मी याठिकाणी मांडतो.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर - आयुक्त साहेब, आणि सर्व नगरसेवक, नगरसेविका आज याठिकाणी सभागृह नेता म्हणुन नामदेव ढाके यांची निवड झालेली आहे त्यांचे मी सर्वांच्या वतीने अभिनंदन करते.

(मा.नामदेव ढाके –सभागृह नेता पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा मा.महापौर,मा.आयुक्त तसेच सर्व पक्षीय सदस्यांनी सत्कार केला.)

<u>नियुक्त्या</u>

विषय क्रमांक १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

मा.नगरसचिव – विषय क्रमांक १- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये

महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०२० रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे- १) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव २) मा.गावडे राजेंद्र तानाजी ३) मा.आंगोळकर सागर सुनिल ४) मा.ममता विनायक गायकवाड ५) मा. करुणा शेखर चिंचवडे ६) लोंढे नम्रता योगेश ७) मा.गिता सुशिल मंचरकर ८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – २, या पक्षियबलाप्रमाणे नियुक्त्या करणे करीता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गटनेते तथा सभागृहनेता मा.ढाके नामदेव जर्नादन यांनी त्यांच्या पक्षाचे ६ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटनेते तथा विरोधी पक्षनेता मा.विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी त्यांच्या पक्षाच्या २ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

त्यानंतर –

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वांसमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे श्री.आण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे-

१) मा.कदम शशिकांत गणपत - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी २) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ३) मा.संतोष बबन कांबळे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ४) मा.अभिषेक गोविंद बारणे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ५) मा.बुर्डे सुवर्णा विकास - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ६) मा.फुगे भिमाबाई पोपट - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे - पिंपरी चिंचवड

महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ८) मा.सुलक्षणा राजू धर - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

ठराव क्रमांक -५०८ विषय क्रमांक- १

दिनांक -२६/२/२०२० विभाग- मा.नगरसचिव

स्थायी समिती सदस्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.कदम शशिकांत गणपत २) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत ३) मा.संतोष बबन कांबळे ४) मा.अभिषेक गोविंद बारणे ५) मा.बुर्डे सुवर्णा विकास ६) मा.फुगे भिमाबाई पोपट ७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे ८) मा.सुलक्षणा राजू धर या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात येत आहेत.

महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सत्तारुढ पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे मा.गटनेते यांचे हस्ते नियुक्त समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देवुन सन्मान करणेत आला)

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सहाय्यक आयुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक झालेले मा.प्रशांत जोशी व मा.बाळासाहेब खांडेकर यांनी त्यांचा परिचय सभागृहास करुन आणि त्यानंतर मा.महापौर यांचे हस्ते मा.प्रशांत जोशी व मा.बाळासाहेब खांडेकर सहाय्यक आयुक्त यांचे पुष्पगुच्छ देवुन सन्मान करणेत आला)

मा.भाऊसाहेब भोईर – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह मा.स्थायी समिती सदस्य पदावर निवडुन आलेल्या सदस्यांचे मी अभिनंदन करतो. त्याच बरोबर आमचे सहकारी नामदेव ढाके यांची सभागृहाचे पक्षनेते म्हणुन निवड झालेली आहे. त्यांना एक फार मोठी जबाबदारी मिळालेली आहे. भारतीय जनता पार्टीचे माझे एक मित्र आहेत त्यांना मी विचारलं की, एवढी मोठी जबाबदारी नामदेव ढाके यांना देण्यामागचं कारण काय? ते म्हणले माणुस खुप चांगला आहे. मी म्हणले ते मी ओळखतो कारण ते आमच्या विरोधात असुन सुध्दा कधीही वार नाही. एक आदर्श असे कोणते गुण त्यांच्यामध्ये चांगले आहेत असे विचारल्यानंतर ते म्हणले प्रथम त्यांना आम्ही म्हणले महापौर होता का? तर ते म्हणे नको, त्यावर त्यांनी त्याग केला. दुस-या वेळेसही त्यांना महापौर होता का म्हणल्यानंतर त्यावरही त्यांनी त्याग केला. त्यानंतर स्थायी समिती चेअरमन होता का म्हणल्यानंतर ते म्हणले मला नको मडिगेरी साहेबांना द्या म्हणजे एवढा मोठा त्याग केल्यानंतर एवढं मोठं पद त्यांना मिळालं आहे म्हणुन मी त्यांच्या पक्षाचं देखील अभिनंदन करतो. पद हे छोटं/मोठं नसत त्या पदाची उंची वाढवण्याचं काम आपल्या कर्तृत्वामध्ये असतं आणि म्हणुन नामदेव ढाके हे माझ्या प्रभागातील असल्या कारणानं विशेषता त्यांना जी उपमा दिलेली होती की तुम्ही संताजी-धनाजी आहात. आणि ते चांगल्या अर्थानीच बोललो होतो. कारण संताजी आणि धनाजी हे सुर्याजी पिसोळकर यांच्या वंशजामधील नाहीत तर छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे मावळे आहेत त्यामुळे या सगळया परिस्थितीचा भान ठेवुन पक्षनेत्यांनी तुम्हांला तुमच्याकडे जी काही पदं नव्हती आणि जे पद तुमच्या मनात होतं तेच पद तुम्हांला मिळालं आहे. अशा पध्दतीच्या मी तुम्हांला शुभेच्छा देतो व सभागृहाच्या वतीने तुमचं अभिनंदन करतो.

मा.सचिन चिखले- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. आदरणीय नामदेवजी ढाके साहेब यांची सत्तारुढ पक्षनेतेपदी निवड झालेली आहे. त्यांचे मी माझ्या वतीने आणि सभागृहाच्या व पक्षाच्या वतीने अभिनंदन करतो.

मा.विलास मडिगेरी - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. आमचे मित्र विद्यमान नगरसेवक नामदेवराव ढाके यांची सभागृह नेता म्हणुन निवड झाली आहे. कामगार क्षेत्रामध्ये एक कामगार नेता म्हणुन आणि भारतीय जनता पक्षाचा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणुन याठिकाणी काम केलं आहे गेल्या तीन वर्षापासून जसं भाऊसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे पक्ष त्यांना काही तरी जबाबदारी देईल ही १०० टक्के खात्री आमच्या सारख्या कार्यकर्त्याला होती. मागच्या काळात काही पदासाठी ते इच्छुक होते परंतु भारतीय जनता पार्टी असा पक्ष आहे की, प्रत्येक कार्यकर्त्याची

कामाची पध्दत दखल घेणारा पक्ष आहे त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याचं काम भारतीय जनता पक्षाच्या वतीनं सर्व स्तरामध्ये राजकारण असेल, समाजकारण असेल त्यांना पदे देत असतात याठिकाणी कामगार क्षेत्रातील कामगार नेत्याची निवड सत्तारुढ पक्षनेता म्हणुन निवड केली आहे. एक चांगलं व्यक्तीमत्व आहे ते सर्वांनाच बरोबर घेऊन तो कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असो त्याला सोबत घेऊन याठिकाणी चांगल्या प्रकारचं कामकाज करतील अशी मला खात्री आहे. मा.भाऊसाहेब भोईर आणि सचिन चिखले यांनी त्यांना दोन्ही पक्षाच्या वतीने शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व सभागृहाच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देतो. त्यांची पुढील वाटचाल चांगली जावो अशी मी सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो. मा.महापौरांना विनंती आहे की,आपले मा. मुख्य उदयान अधिक्षक सुरेश साळुंके हे २९ फेब्रुवारी २०२० रोजी सेवानिवृत्त होत आहेत परंतु त्यादिवशी कार्यालयास सुट्टी असल्याने २८ फेब्रुवारी रोजीच सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा याठिकाणी सन्मान करावा. आणि स्थायी समिती सदस्य पदावर निवड झालेल्या सन्मा.सदस्य यांना शुभेच्छा देतो.आणि थांबतो.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. गेल्या २५ वर्षापासून सोबत काम करणारे तरुणपणांकडुन म्हातारपणाकडे जात असताना आमच्या सोबत बसणारे आमचे बंधु नामदेव ढाके यांची आज सभागृह नेता म्हणुन निवड झाली आहे. ख-या अर्थानं काम करत असताना कामगार नेता म्हणुन त्यांची ओळख आहे आणि ती ओळख त्यांनी कायम तशीच ठेवली आहे. भाऊसाहेबांनी मगाशी सांगितलं आहे ज्यावेळेस त्यांच महापौर पद हुकलं त्यावेळेस आम्हांला वाटलं पार्टी त्यांना कुठलं ना कुठलं पद देणार आणि दिलं. भारतीय जनता पार्टीचे या सभागृहात असणारे सर्वच नगरसेवक हे प्रामाणिक कार्यकर्ते आहेत,निष्ठावंत आहेत या निष्ठावंत कार्यकर्त्यांना ज्यांना,ज्यांना या स्थायी समितीमध्ये संधी मिळाली आहे. त्या सर्वांच मी मनापासून अभिनंदन करते. आणि नामदेवरावांना सांगायचं आहे की, आम्ही सगळे तुमच्या बरोबर आहोत काही झालं तरी सभागृह कशा प्रकारे चांगल चालेल याकडे आमचं लक्ष असणार आहे. आणि जेंव्हा आम्ही स्वप्नही पाहू शकत नव्हतो ते स्वप्न आज सत्यात उतरलं आहे. नगरसेवक झाल्यानंतरच आणि आज सभागृह नेता झाल्यानंतरच स्वप्नाचा आपण आनंद घेत आहात या त्यांच्या पुढच्या संपुर्ण राजकीय कारकीर्दीला मनापासून शुभेच्छा देते.राष्ट्रवादी काँग्रेसच्या माझ्या भगिनीची स्थायी समिती सदस्य पदावर निवड झाली आहे त्यांचेही मी याठिकाणी स्वागत करते. आणि शुभेच्छा देते.जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.सचिन चिंचवडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आजच्या या निवडी संदर्भात आमचे सहकारी भाऊसाहेब भोईर नामदेवराव ढाके यांच्या बाबतीत माहिती सांगितलेली आहे. त्याच्यामध्ये एक गोष्ट राहून गेलेली आहे. ती मी आपल्या सर्वांना सांगू इच्छितो. नामदेव ढाके यांच्या सोबत नगरसेवक म्हणुन गेली तीन वर्ष काम करीत आहोत आम्ही दोघेही एकाच प्रभागातून निवडुन आलेलो आहे. या माणसांच्या बाबतीत जबाबदारीच्या बाबतीत बोलायचं झालं तर हा माणुस पक्षाशी एकनिष्ठ आहे. हे पूर्ण शहराला परिचित आहे. त्याच बरोबर त्यांचा एक महत्वाचा गुण आहे तो गुण म्हणजे विश्वास आणि विश्वासाला कधी कुठेही तडा जाऊ न देणं हा महत्वाचा गुण आहे. नामदेव ढाके हे आमचे सहकारी आहेत आम्ही त्यांच्या बरोबर कायम सोबत आहोत यांच्या पुढील कारकीर्दीसाठी प्रभाग क्रमांक १७ च्या वतीने त्यांना शुभेच्छा देतो आणि थांबतो.

मा.अजित गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. नामदेवराव ढाके यांची सत्तारुढ पक्षनेतेपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. नामदेवराव आणि मी ब-याच वर्षापासून एकत्र काम केलेलं आहे आणि त्यांच मी काम पाहिलेलं आहे. कामगार क्षेत्रापासून यांची सुरुवात झालेली आहे. गेली अनेक वर्ष पक्षाशी एकनिष्ठपणे काम करीत असताना पक्ष जी जबाबदारी देइल ती पार पाडण्याची जबाबदारी घेतलेली आहे. आणि भाऊसाहेब नामदेव ढाके यांच्याबाबतीत सांगत होते त्यावेळेस मला आश्चर्च वाटलं की, त्यांना नेमकं काय म्हणायचं आहे. महापौर पदाचा त्याग केला, चेअरमनपदाचा त्याग केला ते खरोखर मनाने मोठे आहेत मला नेहमी वाटायचं की, त्यांच्यावर कुठं तरी अन्याय झालेला आहे. ख-या अर्थानं महापौर पदाची संधी त्यांना मिळायला पाहिजे होती. परंतु ती मिळाली नाही पण पक्षाने त्यांना ही जबाबदारी देवुन त्यांच्यावरचा अन्याय दूर केला आहे. आणि एकनाथ पवार यांनी मनाचा मोठेपणा दाखवून त्यांनी पक्षनेते पदाचा राजीनामा दिला आणि नामदेवरावांना संधी दिली त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. आणि नामदेवराव तुमच्याकडे ही महत्वाची जबाबदारी आहे. आणि आम्ही सर्वजण तुमच्या सोबत आहोत. काम करीत असताना आमची तुमच्याकडे अपेक्षा आहे की, आपण सभागृहामध्ये आल्यानंतर पिंपरी चिंचवड शहराचा विकास कसा होईल आपल्या परिसरातील नागरीकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या अपेक्षा कशा पूर्ण होतील यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावयाचा आहे. येथून पुढील दोन वर्ष महत्वाचे आहेत या दोन वर्षाच्या काळामध्ये आपल्याला पिंपरी चिंचवड शहराचा विकास अधिक चांगल्या पध्दतीने करावयाचा आहे. आणि त्या दृष्टीकोनातून तुमचा महत्वाचा रोल असणार आहे. आणि आमची विरोधी पक्षनेते म्हणुन अपेक्षा आहे

की, एकत्रितपणे काम करीत असताना सभागृहामध्ये प्रत्येक विषयावर चर्चा झाली पाहिजे. आणि सर्व नगरसेवकांना प्रत्येक विषयाची माहिती मिळाली पाहिजे. जेणेकरुन बाहेर लोक आपल्याला विचारतात की,तो विषय रितसर आहे की नाही याची माहिती आपल्याला पण पाहिजे. आणि या भूमिकेमध्येच आपण काम करावं अशा प्रकारची मी अपेक्षा करतो. आणि तुमच्या पुढील कारकीर्दीला शुभेच्छा देतो आणि थांबतो.

मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह या सभागृहातील माझे सहकारी आदरणीय नामदेवराव ढाके यांची सभागृह नेतेपदी निवड झालेली आहे त्यांना तसेच स्थायी समिती सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांना शुभेच्छा देतो. खरं तर नामदेवरावांचा आणि माझा संबंध फार दूरचाही नाही आणि जवळचाही नाही तीन वर्षापासून मी नामदेवरावांना या सभागृहात पाहतो आहे. अतिशय चांगली व्यक्ती आपल्या या सभागृहाला लाभलेले आहेत. याच्या आगोदरचे सहकारी आता या सभागृहात उपस्थित नाहीत आदरणीय एकनाथ पवार यांनीही हे सभागृह चांगल्या प्रकारे चालवलं आहे.विरोधी पक्षनेत्यांना बरोबर घेऊन त्यांनी आपली बाजु महापौरांपर्यंत मांडलेली आहे. भविष्यात नामदेवरावांकडनं सुध्दा हीच अपेक्षा आहे की, जसं सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना बरोबर घेऊन सभागृह चालवतील सभा चालवित असताना जे काही निर्णय आपल्या पार्टी मिटींगमध्ये ठरतील त्याप्रमाणे सभागृहामध्ये निर्णय व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त करतो. कारण येथून मागच्या तीन वर्षाच्या काळात पार्टी मिटींग मध्ये ज्या गोष्टी ठरायच्या त्या सभागृहात येताना थोडया चेंज होऊन यायच्या. तर यापुढे असे काही होऊ नये. मा.महापौरांना मी शुभेच्छा देतो की, आपण चांगल्या प्रकारे सभागृहाचं कामकाज चालवाल अशी आशा करतो. जसं नामदेव ढाकेवर झालेला अन्याय दूर केला तसंच इतर सगळयावर झालेला अन्याय दूर व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

मा.केशव घोळवे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आज याठिकाणी आमचे मित्र आणि कामगार मित्र नामदेवराव ढाके यांची सत्तारुढ पक्षनेतेपदी निवड झाली त्याबद्दल त्यांच्या भावी कारकीर्दीसाठी मनपुर्वक हार्दीक शुभेच्छा त्याचबरोबर स्थायी समितीमध्ये नियुक्त झालेल्या सदस्यांना मनापासून शुभेच्छा देतो. खरोखरच कामगार क्षेत्रामध्ये एक चांगल प्रेमळ आणि एक अजात शत्रु असं व्यक्तीमत्व या पिंपरी चिंचवड शहरामध्ये टाटा मोटर्स या नामवंत कंपन्यामध्ये काम करीत असताना कामगारांच्या मनामध्ये त्यांनी प्रतिमा निर्माण केली आणि या शहराचं भूषण म्हणजे टाटा मोटर्स याठिकाणी त्यांनी मनोभावे कार्य केलं. आणि म्हणुन

मला असं वाटतय कामगारांचे,कष्टक-यांचे आशीर्वाद मनापासून भरभरुन मिळाले आहेत. आणि त्या आशीर्वादामुळेच नामदेव ढाके हे सत्तारुढ पक्षनेते झालेले आहेत. नामदेवरावांनी भारतीय जनता पार्टीसाठी अनेक निदर्शनं, आंदोलने केलेली आहेत.आणि म्हणुन भारतीय जनता पार्टीच्या पक्षामध्ये वाढलेलं हे व्यक्तीमत्व आहे.आणि त्यामुळे पद हे दुय्यम असत कार्यकर्त्यांसाठी खरं तर अन्याय हे आपण म्हणण्यासाठी म्हणतो परंतु त्यासाठी योग्य वेळ लागते आणि ती नामदेवराव यांच्यासाठी आलेली आहे. त्यांनी आजपर्यंत कष्टक-यांसाठी,कामगारांसाठी जे चांगलं कार्य केलेलं आहे आणि म्हणुन त्यांना हे चांगल पद मिळालेलं आहे. आणि मला खात्री आहे की, पुढील काळामध्ये ते चांगल्या प्रकारे सभागृह सांभाळतील जे एकनाथ दादांनी मागील तीन वर्षामध्ये जे चांगल कार्य केलं पुढच्या काळात त्यांचेही सहकार्य आणि मार्गदर्शन याठिकाणी मदत होणार आहे.हे सभागृह अधिक चांगल्या प्रकारे चालवतील असं मला वाटतं. मी त्यांना पुनश्च एकदा मनपुर्वक शुभेच्छा देतो आणि थांबतो.

मा. नितीन काळजे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आज सत्तारुढ पक्षनेतेपदी आमचे मित्र नामदेवराव ढाके यांची निवड झाली ही निवड अतिशय योग्य पध्दतीने झालेली आहे. आणि ते सर्वांना बरोबर घेऊन या सभागृहाचं कामकाज करतील अशी मला खात्री आहे. एक कामगार नेता या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सत्तारुढ पक्षनेता म्हणुन निवड झालेली आहे. आणि त्याचा आम्हांला अभिमान आहे. आणि तसंही पाहिलं तर त्यांच जास्त करुन मीच आभार मानायला पाहिजे. कारण आता सगळयांनी सांगितलं आहे की, नामदेवरावावर अन्याय झालेला आहे. पण प्रामाणिकपणे काम करताना त्या व्यक्तीला कधीही न्याय मिळतो हे याठिकाणी दाखवून दिलेलं आहे. त्यांच्यावर जो अन्याय झालेला आहे हे त्यांनी समजून घेतलं पहिल्यांदा आपल्या भारतीय जनता पार्टीची सत्ता स्थापन झाली आणि मला महापौर पदाची संधी मिळाली. परंतु त्यांना माहिती होतं की, मागच्या पंचवार्षीक मध्ये माझ्यावर अन्याय झाला म्हणुन त्यांनी माझ्यावरचा अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी मला महापौर पदाची संधी दिली. अशा प्रकारे नामदेवराव ढाके हे चांगलं काम करतील अशी अशा करतो आणि थांबतो जयहिंद,जयमहाराष्ट्र.

मा.राहुल जाधव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह सभागृहामध्ये आज एक नवीन पक्षनेते म्हणुन आदरणीय नामदेवराव ढाके यांची भारतीय जनता पक्षाने निवड केली आहे. त्याच बरोबर स्थायी समिती सदस्य पदावर सदस्यांची निवड केलेली आहे. या सर्वांच मी मनापासून स्वागत करतो. त्यांच्या पुढील वाटचालीस

मी मनापासून शुभेच्छा देतो. ब-याच सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त करुन याठिकाणी शुभेच्छा दिलेल्या आहेत. त्याच बरोबर उदयान विभागामध्ये अनेक वर्षापासून काम करणारे सुरेश साळुंके साहेब हे २९ फेब्रु.२० रोजी सेवानिवृत्त होत आहेत त्यांनाही शुभेच्छा देतो. साळुंके साहेबांनी पिंपरी चिंचवड शहरासाठी जे योगदान दिलेलं आहे तसेच त्यांनी सेवानिवृत झाल्यानंतर त्यांनी आपल्या वैयक्तीक विषयांकडे आणि आपल्या परिवारासी योगदान द्यावं कारण त्यांनी या पिंपरी चिंचवड शहरासाठी अतिश्य प्रामाणिकपणाने योगदान दिलेलं आहे. याठिकाणी नामदेव ढाके यांच्याबाबतीत बोलायचं झालं तर अतिशय प्रामाणिक कार्यकर्ता म्हणुन त्यांची ओळख आहे. आणि भाऊसाहेब भोईर यांनी देखील नामदेव ढाके यांचा चांगला परिचय सांगितला आहे. नामदेवराव ढाके आता सत्तारुढ पक्षनेते झालेले आहेत. कदाचित त्यांना भाऊसाहेबांनी लवकर जर का त्यांना जवळ केलं असत तर कदाचित हेच पद त्यांना कित्येक वर्षापूर्वी आगोदरच भेटलं असतं परंतु एक मैत्रीचं नातं म्हणुन भाऊसाहेबांनी त्यांची प्रशंसा चांगली केलेली आहे. मी नामदेवरावांना शुभेच्छा देतो. ज्या पध्दतीनं एकनाथदादांनी सभागृह चालवलं तशाच पध्दतीने विरोधकांना बरोबर घेऊन त्यानंतर सत्ताधा-यांना बरोबर घेवुन हे सभागृह पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरिकांसाठी आणि विकासासाठी म्हणुन चांगल्या पध्दतीनं आपण चालवावं अशी आम्हांला अपेक्षा आहेत भविष्यामध्ये तुमच्याकडून सत्ताधारी असो अथवा विरोधी पक्षाचे सदस्य असो खूप अपेक्षा आहेत आणि त्या पुर्ण करण्यासाठी आपण कायम प्रयत्नशिल राहिलेले आहात. आणि आम्हांला देखील सहकार्य कराल अशी आशा बाळगतो. आणि पुढील कार्यासाठी बापु काटेंना देखील शुभेच्छा देतो. बापु काळजी करु नका, विरोधकांचं हेच काम असतं पण एक लक्षात ठेवा रावसाहेब दानवे हे प्रदेशाध्यक्ष होते त्यांनी देखील पिंपरी चिंचवड शहरामध्ये येऊन सांगितलं होतं की, रात्री दिड वाजता फोन करुन साबळे साहेबांना राज्यसभेसाठी उमेदवारी दिली आहे. तेंव्हा तुम्हांलाही आमच्यापेक्षा एखादं मोठं पद भेटू शकतं. याची खात्री देतो. त्यामुळे बापु अजिबात चिंता करु नका. भारतीय जनता पार्टीमध्ये सर्वांना न्याय मिळतो. आणि यासाठी मी तुम्हांला शुभेच्छा देतो.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आपल्या सर्वांचे मित्र नामदेवराव ढाके यांची सत्ताधारी पक्षनेता म्हणुन निवड झाली त्यांचे मी आमच्या पक्षातर्फे शुभेच्छा देतो. शुभेच्छा देताना नामदेवरावाकडुन एक अपेक्षा व्यक्त करतो की, ज्याप्रमाणे एकनाथरावांनी सुरुवातीच्या काळात नाही पण नंतरच्या काळात ज्याप्रमाणे खेळीमेळीच्या वातावरणात हे सभागृह चालवण्याचा जो प्रयत्न केला असा प्रयत्न आपल्याकडुन देखील केला जावा अशी अपेक्षा करतो. आणि

ज्याप्रमाणे सदस्यांनी सांगितलं आहे की, कामगार नेता, सच्चा कार्यकर्ता असा उल्लेख केला आहे. उशिरा का होईना कुठल्या ना कुठल्या माध्यमातुन तुम्हांला हे पद दिलेलं आहे त्यामुळे तुमच्या पक्षाचं देखील याठिकाणी आभार मानतो. सिमाताई जरी म्हणत असल्या की, आपण म्हातारपणाकडे झुकतोय तरी तुम्हांला हे पद आल्यानंतर तुम्हांला एक निश्चित उत्साह निर्माण होईल. आणि नामदेवराव ज्येष्ठ आहेत म्हणुन त्यांना हे पद मिळालं आहे असे सांगितले आहे पण बापु तु अजिबात काळजी करु नकोस तु डायरेक्ट खासदार होणार आहे. त्यामुळे या सगळया गोष्टी राजकारणात चालत असतात. स्थायी समिती सदस्य पदावर आलेल्या सदस्यांच देखील मी अभिनंदन करतो. आणि नामदेवरावाकडनं पुन्हा एकदा अपेक्षा व्यक्त करतो की, त्याच्यामुळे पण भाषण करताना देखील भान ठेवावं की, आपल्या समोर माईक आहे. आणि हे सभागृह चांगल्या प्रकारे चालवाल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि पार्टी मिटींगमध्ये जे निर्णय घेणार तेच या सभागृहामध्ये घ्या. फक्त सर्वांना विश्वासात घेऊन करावे. शहराच्या हिताचे विषय ठेवा. कारण आजच एक विषय व्यवसायिकांच्या हिताचा विषय आहे. तुम्ही शहराच्या विकासाचे विषय मंजुर केलेत तर आम्ही तुमच्या बरोबर आहोत. धन्यवाद जयमहाराष्ट्र.

मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह खरं तर आमचे सहकारी मित्र आदरणीय नामदेवराव ढाके यांची सत्तारुढ पक्षनेते या पदावर निवड झालेली आहे. त्याबद्दल मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. त्याच बरोबर स्थायी समिती सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांचेही मी अभिनंदन करतो. आणि शुभेच्छा देतो. शुभेच्छा देत असताना सर्वांनी सांगितलेलं आहे की, नामदेव ढाके हे कामगार नेतृत्व आहे. कारण गेली अनेक वर्ष टेल्कोचा माझा जवळचा संबंध असल्या कारणानं जेवढे लिडर त्या टेल्कोमध्ये झाले त्यांचा संबंध आला आणि गेल्या वर्षी पासून टेल्कोशी संबंध आल्यामुळे नामदेवरावांना मी जवळून पाहिलेलं आहे. आणि जास्त जवळून म्हणले तर नामदेवरावांनी आंदोलनाच्या वेळी लाठयाकाठया खाललेल्या कार्यकर्त्यांना भाजपाने त्यांना न्याय दिलेला आहे त्याबद्दल मी पुनश्च एकदा आपले अभिनंदन करतो. नामदेवरावांना मी विनंती करतो की, सभागृह चालवित असताना नागरीकांच्या हिताचा जो काही विषय असेल तो आपआपल्या परीने मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. लोकहिताच्या ज्या काही सूचना येत असतील तर त्याचा नक्कीच विचार व्हावा. त्याच बरोबर राहूल दादांनी सांगितलं की,बापू तुम्हांला आमच्या लाख,लाख शुभेच्छा तुम्हांला काही आमची मदत लागली तर आम्ही आमच्या साहेबांना सांगुन तिकडे मदत करण्यास सांगू. पण आपल्यालाही न्याय मिळावा अशी आमची इच्छा आहे. तुम्ही मनसेत

असताना सभागृहात आलेले आहात. माझं म्हणणं काय आहे ते तुम्हाला कळलंच आहे. आम्ही पक्षाशी एकनिष्ठ असणारे कार्यकर्ते आहोत. आमच्या राष्ट्रवादीत थोडं फार काही घडलं असेल पण निदान तिकडं गेल तर काही तरी न्याय मिळेल. अशी अपेक्षा होती. पण ती निराशा आज ब-याच जणांच्या चेह-यावर मी आज पहातो आहे. स्थायी समितीमध्ये राष्ट्रवादीच्या दोन सदस्यांना आणि भाजपाच्या ६ सदस्यांना संधी द्यायची होती. सगळयांना स्थायी समितीमध्ये येण्याची इच्छा असते पण सगळयांना संधी देवु शकत नाही. जे नियम असतात त्याप्रमाणे आपण केलेल आहे त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. उदयान विभागाचे मुख्य उद्यान अधिक्षक सुरेश साळुंके यांना या महापालिकेत काम करीत असताना त्यांच्याकडुन काही चुका झालेल्या असतील त्याबद्दल त्यांना त्रासही झालेला असेल असे मला वाटते. जीवनामध्ये काम करीत असताना ज्या काही चुका झालेल्या असतील त्यावेळेस आमच्या सारख्या एखादया नगरसेवकांने जरी बोलले असेल ते आम्हाला असलेल्या अधिकारामुळे बोलले असेल अशा घटना गेल्या २० वर्षाच्या काळामध्ये घडल्या असतील पण त्यांना या शेवटच्या दिवशी त्यांची दिलगीरी व्यक्त करतो आणि त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांना शुभेच्छा देतो.

मा.माधवी राजापुरे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५०९ विषय क्रमांक- २

दिनांक २६/२/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.कर/मुख्य/९/कावि/०६/२०२०, दि.०४/०१/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३२ दि.५/२/२०२० अन्वये.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. तसेच अधिनियमातील कलम 99 नुसार महापालिकेने याबाबत कराचे दर ठरविणेकामी मा.स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याचे 20 तारखेला किंवा तत्पूर्वी निश्चित केले पाहिजेत. सध्याचे करयोग्य मूल्य ठरविणेकामी प्रती चौरस दर हे सन 2015-2016 मान्य करण्यात आलेले आहेत. तसेच कराचे दरामध्ये सन 2013-2014 पासून कोणतीही दरवाढ करणेत आलेली नाही. अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार जुन्या मिळकतींचे करयोग्यमूल्याचे पुर्न:मुल्यांकन करुन त्यानुसार येणा-या नवीन करयोग्यमूल्यावर मिळकत कराचे

बिल लागू करता येईल. याकामी सन 2020-2021 करिता करयोग्यमूल्य ठरविण्यासाठी दोन पध्दतीनुसार सादरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच सोबत खालील पध्दत 1 व पध्दत 2 नुसार सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

पध्दत 1. करयोग्य मूल्य पध्दतीने (रेडी रेकनरचा आधार घेऊन पारंपारिक पध्दतीने)
पध्दत 2. भांडवलीमूल्य पध्दतीने (शासन अधिनियम क्रमांक १०/२०१० दिनांक २७ एप्रिल २०१० नुसार)

वरीलपैकी उचित पध्दतीस करयोग्यमूल्य व कराचे दरास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दसरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सिमा चौगूले – मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

मा.नगरसचिव - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. तसेच अधिनियमातील कलम 99 नुसार महापालिकेने याबाबत कराचे दर ठरविणेकामी मा.स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याचे 20 तारखेला किंवा तत्पूर्वी निश्चित केले पाहिजेत.

(गोंधळ)

मा.महापौर – सन्मा.सदस्यांनी गोंधळ करु नये सर्वांनी खाली बसुन घ्यावे. या विषयाची माहिती मा.आयुक्त साहेब देतील.

(गोंधळ)

मा.आयुक्त – मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह आता जो विषय सभागृहासमोर आणलेला होता हा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील विविध तरतुदींच्या अनुसार सभागृहासमोर आलेला होता. शहरातील इमारती व मोकळया इमारतींचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. महाराष्ट्र महानगरपालिकेचा विकसीत व अविकसीत भाग विचारात घेऊन यापुर्वी २००२ व २००३ पासून अ/ब/क/ ड या चार विभागामध्ये शहराची विभागणी करणेत आलेली होती. २०१९-२० पासून ड भाग रद्य करुन अ/ब/क या तीन भागामध्ये विभागणी करुन आपण करयोग्य मुल्यासाठी विभागणी केली होती.

सन २००२ पर्यंत करयोग्य मुल्य निर्धारणाची जी पध्दत होती ती करसंकलन विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील इमारतीची करआकारणी एमएमसी ऍक्ट मधील कलम १२७ व १२९ तरतुदीनुसार करणेत आलेली होती. करआकारणीच्या कामकाजामध्ये सुसूत्रता व पारदर्शीपणा येण्याच्या दृष्टीने महापालिका कार्यक्षेत्रामध्ये सन १९९० पासून मिळकतीचा वापर आणि बांधकामाचा दर्जा विचारात घेवुन प्रति चौरस फुटाचे करयोग्यमुल्य निश्चित केले होते. करयोग्य मुल्य निश्चित करण्यासाठी जी पध्दत होती ती वार्षीक करयोग्य मुल्य हे मिळकतीचे एकुण क्षेत्रफळ गुणिले मिळकत वापराचे प्रती चौरस फुट दर हे आपण त्यावेळेला काढलेला होता. त्यानुसार आपण कॅलक्युलेट करीत होतो.मिळकतकरासाठी हे करयोग्यमुल्य क्षेत्रफळाचा आणि त्याला त्यावेळेला कराची टक्केवारी याला गुणल्यानंतर जे ऍक्च्युल येत असे ते आपलं बील असतं या पध्दतीने आपले कराचे बील निश्चित केलं जात होत २००२ मध्ये आपण झोनिंग केलल होत त्यावेळेला अ/ब/क/ड क्षेत्रासाठी स्केअर फुटनुसार दर निश्चित केलेले होते. झोनिंग व मिळकतीच्या वापरानुसार अ/ब/क क्षेत्रानुसार आपण दोन्हीचे दर पाहिले तर त्यात ९०-९१ मध्ये पाहिले तर साधारणता ५ रु.४० पैसे घरासाठी आणि २१ रु.६० पैसे बिगर निवासी यासाठी प्रती चौरसफुट या दरापासून सुरुवात करुन २०१५-१६ मध्ये जी शेवटची सुधारणा केली त्याच्यामध्ये २९.९४ रु.निवासासाठी आणि ८९.४२ रु.बिगरनिवासी हे दर यापुर्वी करयोग्यमुल्यासाठी जाहीर केलेले आहेत. करयोग्य मुल्य निर्धारीत करीत असताना आजची परिस्थिती लक्षात घेवुन आणि यापुर्वी जी प्रक्रीया राबविण्यात आलेली होती त्यानुसार प्रस्ताव ठेवणेत आलेला होता. करयोग्यमुल्य निर्धारणाच्या प्रक्रीयेमध्ये वेळोवेळी ज्या ज्या सुधारणा करण्यात आल्या २००२ मध्ये असेल,२००७ मध्ये असेल किंवा २०१५-१६ मध्ये असेल त्यावेळेला करयोग्यमुल्य निर्धारित करीत असताना त्या निर्धारीत दिनांकानंतर निर्माण झालेल्या प्रॉपर्टीजवर करनिर्धारण करण्यात आलेलं नव्हतं जुन्या प्रॉपर्टीजचं करयोग्य मुल्य बदलण्यात आलेलं नव्हतं त्यामुळे तफावत निर्माण झालेली होती. ती तफावत दूर करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आलेला आहे. नवीन करयोग्यमुल्य निर्धारण यावेळेला करण्यात आलेलं नाही. केवळ जे प्रॉस्पेक्टीव्ह लागू करण्यात आलेलं होतं त्यामध्ये यावेळेला सुधारणा करण्यात आलेली आहे. महानगरपालिका अधिनियमातील करयोग्यमुल्याचं निर्धारण केल्यानंतर दरवर्षी फेब्रुवारीच्या २० तारखेच्या पूर्वी सर्वसाधारण सभेने करांचे दर निश्चित करणे अपेक्षीत आहे. तसेच महानगरपालिका अधिनियमामध्ये दोन तरतुदी आहेत एक

तर करयोग्यमुल्य निर्धारण पध्दतीने आकारणी करणे अथवा भांडवलीमुल्य पध्दतीने आकारणी करणे आपल्याकडे आजतागायत करयोग्य मुल्य निर्धारण पध्दतीने करआकारणी करण्यात येत आहे. सभागृहासमोर विषय आणताना दोन्ही पध्दती नमुद केलेल्या होत्या विषयपत्रामध्ये दोन्ही पध्दतीचा उल्लेख केलेला आहे. भांडवलीमुल्य पध्दतीमध्ये जी पध्दत आहे त्यामध्ये एकुण इमारतीचं भांडवलीमुल्य निश्चित करुन ते भांडवलीमुल्य निश्चित करीत असताना क्षेत्रफळ गुणिले बाजारमुल्य गुणिले बांधकामाचा दर्जा आणि वापर गुणांक यांचा गुणाकार करुन ते निश्चित करण्याची तरतुद अधिनियमामध्ये आहे. मात्र हा निर्णय सभागृहानं कुठली पध्दत अवलंबायची तो घेणं अपेक्षीत होतं जर भांडवलीमुल्य ही पध्दत अवलंबली गेली असती तर त्याच्यासाठी सुध्दा असेसमेंट करीत असताना टॅक्स रेट ० ते टक्के भांडवलीमुल्याचा अभाव ठरवण्याचा अधिकार देखील सभागृहाचा होता. आणि या निर्णयासाठी सभागृहासमोर हा विषय आलेला होता. मात्र २० फेब्रुवारी पुर्वी हा निर्णय होऊ शकला नाही. टॅक्स रेट मध्ये कुठलाही बदल सभागृहासमोर प्रस्तावित करु शकणार नाही. आणि त्याप्रमाणे आताच महापौरांनी घोषित केल्याप्रमाणे स्थायी समितीची जी शिफारस होती विषय दप्तरी दाखल करणेत यावा त्यालाच मा.महापौरांनी घोषीत केल्याप्रमाणे स्थायी समितीने जी शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे विषय मंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे. एवढंच मी निवेदन सादर करतो.अधिक काही माहिती लागल्यास ती सादर करु शकतो. मी एक गोष्टीचा खुलासा करतो की, करयोग्यमुल्यामध्ये सुधारणा व्हावी असा प्रस्तावित केलेला आहे. तो मात्र लागु करण्यात येईल करयोग्यमुल्यामध्ये आम्ही सुधार केलेला नाही. त्यामुळे अ विभागासाठी २९ रु. रेट आहे ते २९ रु.च राहणार आहेत.प्रस्तावित कार्यपध्दतीमध्ये बदल एवढाच केलेला आहे की, यापुर्वी पुनश्च सांगतो की, २००२, २००७-०८ किंवा २०१५-१६ मध्ये ज्या ज्यावेळेला करयोग्यमुल्य बदललं त्यावेळेला त्या दिनांकाच्यानंतर स्थापन झालेल्या इमारतींचच फक्त करयोग्य मुल्य बदलण्यात आलेलं आहे. त्यामुळे आज शहरामध्ये करयोग्यमुल्यामध्ये खुप मोठया प्रमाणात तफावत निर्माण झालेली आहे. ती तफावत अशी आहे की,जी ९०-९१ सालची इमारत आहे त्यांना करयोग्यमुल्याचा दर प्रती चौरसफुटाचा ५ रु.४० पैसे इतका असुन जी इमारत २०१५-१६ नंतर अस्तित्वात आलेली आहे तिचा करयोग्यमुल्याचा दर प्रती चौरसफुट तिचा रु.२९.९४ पैसे हा निवासी इमारतीसाठी आहे. म्हणजे आजच शहरामध्ये अस्तित्वात असलेल्या जुन्या आणि नवीन इमारतीमध्ये पाच पटीच्या पेक्षा जास्त फरक /तफावत आजच्या

अस्तितवातील इमारतीमध्ये आहे. आणि त्यामुळे अनेक वर्षाच्या कालावधीमध्ये जुन्या इमारतींचा कर आणि नवीन इमारतींचा कर याच्यामध्ये एकाच भागामध्ये जरी सुविधा समान असल्या तरी खुप मोठया प्रमाणामध्ये फरक आहे. दुसरी गोष्ट अशी की, करयोग्यमुल्य हे साधारणता त्या भागामध्ये मालमत्ताधारकाकडन जो रेंट आकारले जातो त्यानुसार त्या रेंटवरती निश्चित करण्याची तरतुद आहे. २००२ पासूनचा जरी आपण विचार केला गेला तरी बाजारमुल्यामध्ये सुध्दा अनेक बदल होत गेलेले आहेत. ही बाब देखील आपल्याला विचारात घेतली गेली पाहिजे. आणि त्यामुळे या संपुर्ण पध्दतीमध्ये सुसूत्रता आणण्याच्या हेतूने आपण करयोग्यमुल्याच्या कॅलक्युलेशनमध्ये सुधारणा प्रस्तावित केलेली आहे. यासाठी प्रमाण वर्ष अनेकांच्या मनामध्ये संदेह असतील प्रमाण वर्ष कुठलं धरलं जाणार तर २०२०-२१ पासून हे प्रमाण वर्ष धरलं जाणार आहे. त्यामुळे पाठीमागुन कुठलेही रिकव्हरीसाठी आपण कुणाकडेही जाणार नाही. याच्यापुढे असेसमेंट करीत असताना पर स्केअरफुटचं मुल्य हे बेस रु.२९.९४ पैसे गृहीत धरुन करणार आहे. सध्याच्या या पध्दतीत करांमध्ये त्या त्या विभागातील प्रती चौरसफुट दर प्रत्येक वर्षातील मिळकतींना लागू करण्यात येणार आहे. सध्याचे दर जुन्या मिळकतींना लागू करताना हे लक्षात घेण्याची बाब आहे. जसेच्या तसे जुन्या इमारतींना हे दर लागू करण्यात येणार नाहीत. त्याच्यामध्ये सध्याचे दर जुन्या मिळकतींना लागू करताना महाराष्ट्र शासनाच्या रेडीरेकनरच्या मिळकतींना घसारा लागु करण्याची जी पध्दत आहे ती पध्दत अवलंबण्यात येत आहे. उदा.द्यायचे झाले तर ० ते २ वर्षाच्या इमारतीला घसारा ० टक्के लागु करण्यात येईल. इमारतीचे वय ३ ते ५ वर्ष असेल तर ५ टक्के घसारा लागु राहील. अशा पध्दतीने करीत करीत २५ ते ३० वर्ष इमारतीच वय असेल तर ३० टक्के घसारा लागू करण्याची पध्दत आहे. या पध्दतीनुसार जुन्या इमारतींना ३० टक्के घसारा करयोग्यमुल्यामध्ये मिळणार आहे. यामध्ये आपल्याला उदा.द्यायचे झाले तर २०१५-१६ मध्ये २००२-२००३ ची इमारत उदा.म्हणुन घ्यायची वेळ आली तर प्रचलित करयोग्यमुल्यानुसार आज २००२-०३ च्या इमारतीसाठी करयोग्यमुल्याच्या अ विभागासाठी मिळकतीचा दर रु.८.६४ पैसे दर आहे. त्यानुसार जर आपण साधारणता १००० स्केअरफुटाची इमारत विचारात घेतली तर तिचं करयोग्यमुल्य ४३२० रु.होतं जर त्याच बील काढलं तर आजच्या कराच्या टक्केवारीनुसार रु.१७७१/- इतकं येतं. जर आजच्या २०१९-२० चे करयोग्यमुल्य लावलं तर रु.२९.९४ पैसे आहे आणि त्याला ८० टक्क्याचा घसारा लागु होईल. त्याच्या अनुषंगाने २०१९-२० च्या तुलनेत प्रत्यक्ष दर

त्याच्यावरती रु.२३.९५ पैसे होतील. आणि करयोग्यमुल्य रु.११९७५/- होईल. बील रक्कम रु. ५०३०/- होईल. त्यामुळे करयोग्यमुल्य याची तफावत आपण पाहिली तर साधारणता रु. ३२००/- ची तफावत ही २००२-०३ च्या १००० स्केअरफुटाच्या घरावरती राहील. आणि आता आपण प्रस्तावीत केलेली होती जर ती दुप्पट वाढीला केली तर रु.२५५६/- इतका बिलामागे निश्चित होईल. मात्र हा निर्णय आपल्याला २० फेबु.ला घेणं अपेक्षित होतं. त्यामुळे आजची जी परिस्थिती आहे आम्ही जो प्रस्तावित केलेला करवाढीचा प्रस्ताव आहे. तो आज लागु होईल.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आयुक्त साहेब माझा पहिला मुद्या हा आहे की, तुम्ही अनुसूची ड प्रकरण ८ नियम २० मधील तरतुदीनुसार करयोग्यमुल्य निश्चित करण्याचा अधिकार आहे परंतु ते डिटेल मध्ये वाचल्यानंतर असं लक्षात येतं की, इललिगल केस मध्ये तसा तुम्हांला अधिकार आहे. एखादा इललिगल केसमध्ये तुमच्याकडे आला तर त्याला तुम्ही तशा पध्दतीनं चेंजेस करु शकता असा त्याचा अर्थ मला यामधुन दिसतं संपुर्ण शहरासाठी तुम्हांला तसा अधिकार नाही अस मला वाटतय. आणि हा निर्णय २० फेब्रुवारीच्या आत होण अपेक्षीत आहे. खरं म्हणजे मागची जीबी तुम्ही तहकुब करायला नको होती. शहराच्या दृष्टीने एवढा महत्वाचा विषय असताना या विषयावर चर्चा व्हायला पाहिजे होती. परंतु ती झाली नाही. संपुर्ण शहरातील जुन्या मिळकतीच्या मिळकतधारकांना याचा फटका बसणार आहे. आणि आयुक्त साहेबांनी आता जो उदा.देवुन खुलासा केलेला आहे त्यामध्ये १०० टक्के वाढ होणार आहे. म्हणजे हे कुठे तरी अन्यायकारक होत आहे. आयुक्त साहेबांना जो अधिकार आहे त्याप्रमाणे त्यांनी बदल करावा. आम्ही शास्तीकर १०० टक्के माफ करणेत यावा अशी मागणी करीत होतो. परंतु तुम्ही तसं न करता त्यामध्ये स्लॅब केले. आज अशी परिस्थिती आहे की, लोक शास्तीकरही भरत नाहीत आणि रेग्युलर करही भरत नाहीत. त्यामुळे महापालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे. प्रशासनाने महापालिकेचे आर्थीक उत्पन्न वाढावे यासाठी विषय आणलेला आहे. पुर्वी २००२ ते २००६ सालापर्यंत आपले .८० पैसे हा आपला दर महिन्याचा रेट होता तो साधारणपणे ९ रु.६० पैसे होता.त्याच्यावरती आपण १० टक्के कमी करीत होतो. २००६ नंतर १९ रु.२० पैसे झाला २००८ ला २२ रु. ८० पैसे आणि त्याच्यावर १० टक्के झाला. असे टप्याटप्याने आपला आताचा दर २९ रु.९४ पैसे झाला आहे. यामध्ये जी त्रुटी आहे ती मी आपल्या

निदर्शनास आणु देवु इच्छितो. आपल्याकडे अ/ब/क असे तीन विभाग आहेत. अ विभागात जुनी जी गावे आहेत, ब विभागात नव्याने समाविष्ठ झालेली गावे आहेत मी कोणत्या गावाचं नाव घेवु इच्छित नाही पण त्या गावामध्ये असणा-या घरांना भाडं जास्त मिळतं. आता अ विभागामध्ये भोसरी आणि सांगवी हा भाग आहे याठिकाणी सारखा रेट आहे. तुम्ही काय म्हणता भाडं किती येत यावर टॅक्सची आकारणी करणार आहे. परंतु आपण अ/ब/क विभाग केलेले आहेत त्यामध्ये चुक आहे. ती ख-या अर्थाने दुरुस्त व्हायला पाहिजे. दुसरं म्हणजे एखादी बिल्डींग कर्मशियल आहे त्यामध्ये तीन मजले असतील तर त्यामध्ये फर्स्ट फलोअरला, २ फ्लोअरला आणि ३ फ्लोअरला पण तोच रेट आहे. हा अन्याय होत आहे. ग्राऊंड फ्लोअरच्या मार्केटचा आणि वरच्या मजल्याच्या मार्केटचा जर आपण विचार केला तर यामध्ये खुप मोठी तफावत आहे. ही सुध्दा यामध्ये दुरुस्ती झाली पाहिजे. तसेच आपल्याकडे इंडस्ट्रीयल झोन आहेत त्यामध्ये जे पुर्वीचे कारखाने आहेत त्यांना आपण कंन्स्ट्रक्शन कॉस्टप्रमाणे टॅक्स आकारतो. आणि आज नव्याने जे करणार आहोत त्यामध्ये प्रचंड तफावत आहे. याठिकाणीही आपण दुरुस्ती केली असती तर महापालिकेचे उत्पन्न वाढले असते. आता आपले पक्षनेते हे कामगार क्षेत्रातले आहेत या भागामध्ये अनेक कामगारांचे घरे आहेत त्यांना न्याय दिला पाहिजे. आयुक्त साहेब आपल्याला अधिकार आहेत पण आम्हांला टॅक्स डिपार्टमेंटकडनं सांगितलं जायचं की, पूर्वलक्षी प्रभावाने टॅक्सची आकारणी करता येत नाही. यामध्ये ज्या त्रुटी आहेत त्या दुरुस्त झाल्या पाहिजेत. अशी माझी विनंती आहे.

मा.संदीप वाघेरे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह वास्तविक पहाता २० तारखेच्या जीबी ला हा विषय आला होता. त्यानंतर जीबी तहकुब झाली आणि आयुक्तांच म्हणणं आहे की, हा विषय मंजुर झाला. मा.महापौर साहेब, २/३ महिन्यापुर्वी ५०० स्केअरफुटाचे ज्यांचे घर आहे त्यांचा टॅक्स माफ केलेला आहे. आणि ज्यांच्या २००६ च्या आतील प्रॉपटर्या आहेत त्यांना अडीच पट वाढ होणार आहे. साधारणपणे ही नगरपालिका १९७० साली स्थापन झाली आणि आज २०२० म्हणजे या ५० वर्षाच्या काळामध्ये काही जण १/२ गुंठा जागा घेऊन बाहेरुन या शहरात रहायला आले पूर्ण भारतातून याठिकाणी लोक येऊन स्थायिक झाले. १९७१ साली या शहराची लोकसंख्या ७१ हजार होती. आज ती २७ लाख झाली आहे. म्हणजे तुम्ही ३ महिन्यापुर्वी जो विषय केला ५०० स्केअरफुटापर्यंतचा टॅक्स माफ केलेला आहे. आज जर ६००० रु.टॅक्स येत असेल

तर त्यामध्ये अडीच पट वाढ होणार आहे. आजच्याच पेपरला बातमी आहे २००० कोटीचा टॅक्स थकीत आहे. १० लाख रु.थकबाकी असलेल्यांची संख्या जास्त आहे. आपण प्रॉपर्टी जप्त करुन त्याचा लिलाव करणार आहे का? मा.महापौर साहेब, या विषयाची माहिती सर्वांना समजुन सांगितली पाहिजे. लोकांना आपण ज्या सुविधा द्यायला पाहिजेत त्या देत नाहीत. आपल्या महापालिकेचे बजेट ६६०० कोटीच आहे हे बजेट केंद्राचे जे पैसे येणार आहेत त्यानुसार बनवले आहे. शेजारच्या महापालिकेचे बजेट हे ७२०० कोटीचे आहे. त्या महापालिकेच्या भागामध्ये जाऊन बघा त्या ठिकाणच्या सुविधा कशा आहेत ते त्याठिकाणी जाऊन बघा पिंपरी चिंचवड च-होली मधील कर्मचारी पुणे महापालिकेमध्ये आरोग्याधिकारी आहे त्यांनी त्याठिकाणी आरोग्याची कशी शिस्त लावली आहे ते बघा. ज्यांनी १/२ गुंठा जागा घेऊन घरे बांधलेली आहेत त्यांच्यावर अन्याय झाला नाही पाहिजे. २ वर्षानंतर आपल्याला याची फळं भोगावी लागतील. जसं राष्ट्रवादीच्या काळात शास्तीकर मंजुर केला त्यानंतर त्यांची सत्ता गेली.टॅक्सचा विषय अजुन मंजुर झालेला नाही. आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, या शहराला झिझिया कर लावू नका. या विषयाचा अभ्यास करुन एखादया वेळेस कायदा विभागाचे मत घेवुन यामधुन आपल्याला कसे बाहेर पडता येईल याचा विचार करावा. एवढं बोलून थांबतो.

मा.ॲड.सचिन भोसले - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरं तर हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठीचा विषय आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. अनुसूची ड मध्ये असे म्हणले आहे की, ज्या कोणत्याही जमीनीचे किंवा इमारतीचे मुल्य चुकीचे ठरविण्यात आले असेल तर किंवा तिची आकारणी लबाडीने अवैद्यपणे किंवा चुकीच्या प्रकारे झालेली असेल तर त्या जमीनीवरील किंवा इमारतीवरील आकारणी फेरफार करुन आयुक्त साहेब, सगळयात मुद्या असा आहे की, याच्यानुसार पुर्वी ज्या नोंदी झालेल्या होत्या त्या चुकीच्या झालेल्या होत्या की काय हा सर्वात पहिला मोठा विषय आहे. त्याची माहिती प्रथम दिली पाहिजे. ऍक्ट तुम्ही सविस्तर वाचुन पहा. यामध्ये आपलेकडुन चुकीचं काय व्हायला नको. आपण करआकारणी करतो परंतु नागरीकांना आपण ज्या सुविधा द्यायला पाहिजे त्या देवु शकतो का एकीकडे सुविधांचाअभाव आहे आणि दुसरीकडे तुम्ही करवाढ करता हा निर्णय चुकीचा होईल असे मला वाटतंय आणि हा विषय मंजुर करायचा असेल तर त्याला

आमचा स्पष्टपणे विरोध राहील. विषय मंजुर करुन दप्तरी दाखल करता येत नाही. त्यामुळे मा.महापौर या विषयाला आमचा विरोध आहे तो नोंदवुन घेणेत यावा.

मा. दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खर तर पिंपरी चिंचवड शहराला एक नवीन हिटलर आयुक्त मिळाला असं म्हणलं तरी वावगं ठरणार नाही आज या सभागृहामधील भाजपच्या सर्व सुज्ञ नगरसेवकांच मी अभिनंदन करतो की, त्यामध्ये एक मुकसंमती म्हणुन आपण या विषयाला मंजुरी देण्याच काम केलेलं आहे. खरं तर हा विषय आणायचा होता तर १५ फेब्रुवारीच्या आत आणणे आवश्यक होतं. १ जानेवारीची सभा झाली त्यानंतरही सभा झाली त्यावेळेस विषय आणला नाही. मा.महापौर साहेब, सत्तारुढ पक्षनेते आजी आणि माजी यांच्यावर आरोप करतो की, आम्ही पोटतिडकीने सांगत होतो की, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. या विषयावर चर्चा झाली पाहिजे. शास्तीकराचा विषय सुध्दा असाच ६ महिने ठेवला गेला. त्यानंतर तो फेटाळला गेला आणि तो शासनाकडे गेल्यानंतर तो आपल्या बोकांडी बसलेला आहे. याठिकाणी अ/ब/क विभाग केलेले आहेत. या शहरामध्ये काही ठिकाणी रस्ते नाहीत,पुरेसे पाणी नाही, आवश्यक सुविधा नाहीत, रस्त्याचे वाटोळे झालेले आहे तिथं तुम्ही कर वाढवायचे म्हणता. हीच जनरल बॉडी त्याच दिवशी श्रध्दांजली वाहून किमान ४ तास जरी चाललीअसती तरी भाजपाचे जे धुर्त नगरसेवक आहेत त्यांच्याही लक्षात यायला पाहिजे होतं की, हा विषय २० तारखेपर्यंत मंजुर केला नाही तर आयुक्त आपल्यावर त्यांचे निर्णय लादणार आहेत. हे ही आयुक्तांनी जाहीरपणे सांगितले आहे. शहरावर कर लादण्याचा आयुक्तांना अधिकार आहे आणि एखादं टेंडर चुकीचं आहे ते रद्य करा असं आपण सांगितलं म्हणतात ते मला सांगता येत नाही. म्हणजे आयुक्तांनी या शहरातील नागरीकांचा खेळ केलेला आहे. हा विषय २० फेब्रुवारीलाच का आला १५ दिवस आगोदर का आला नाही.

(गोंधळ)

मा.दत्तात्रय साने – मा.महापौर साहेब, मी बोलत असताना मध्ये कोणी बोलू नये. मी काही माझ्या घरच्यासाठी बोलत नाही. जर का कोणाला चर्चा करायची असेल तर मी बोलल्यानंतर करावी. हा विषय संपुर्ण शहराचा आहे. सर्वसामान्य नागरीकांना तुम्ही कमीत कमी २४ पट वाढ करणार आहात म्हणजे १७००

रु.च्या टॅक्सला ११०००/- रु.टॅक्स येणार आहे. आमची जुनी घरे ज्या पध्दतीची आहेत ती त्याच पध्दतीत आहेत जर का ते घर मोडलं असेल किंवा विकलं असेल आणि त्याची काही किंमत होत नसेल तर त्याला टॅक्स लादणार असाल तर हा अन्याय आहे. आयुक्त साहेब तुम्ही काय या शहरातून बदली होऊन जाणार आहात पण या शहरातील प्रत्येक नागरीक तुम्हांला शिव्या आणि शापच देणार आहे. कोणीही तुम्हांला चांगल म्हणणार नाही. आणि आयुक्त साहेब, तुमचा जो दादागीरीचा शब्द आहे हा कर आम्ही लादणारंच हा शब्द आपण माघारी घ्यावा. या सभागृहामध्ये नागरीकांनी आम्हांला यासाठीच पाठविले आहे.हा कर लादणार ही दादागीरी चालणार नाही यासाठीच आम्हांला याठिकाणी पाठविलेले आहे. कराचे दर ठरवितांना सर्व पक्षाच्या गटनेत्यांना बोलवायला पाहिजे होतं,सत्तारुढ पक्षनेत्यांना बोलवायचं होतं. त्यांना तुम्ही सांगायचं होतं. म्हणुन माझी आपल्याला विनंती आहे की, सत्तारुढ पक्षनेते आम्ही तुमचं एक कामगार नेता म्हणुन सत्कार केलेला आहे. या शहरात कामगार राहतात,सर्वसामान्य नागरीक/कामगार राहतात. या कामगारांवर तुम्ही टॅक्स लादणार असाल तर तुम्हांला हे भोगावे लागणार आहे. आणि नागरीकांना मी आव्हान करतो की, आयुक्तांनी लादलेला टॅक्स कोणीही टॅक्स भरु नका महापालिका काही घर जप्त करु शकत नाही. आयुक्तांना अशाच पध्दतीने काम करायचे असेल, नागरीकांना त्रास देण्याचं काम करायचं असेल तर हे चुकीचे आहे. आमच्या सर्व सत्तारुढ नगरसेवकांना विनंती करतो की, १/२ टक्के वाढ ठिक आहे. शहराला पाणी नाही, दिवसाआड पाणी येते आणि तरी पाणीपट्टीमध्ये वाढ करता मा.महापौर साहेब,आपण कुठल्याही करामध्ये वाढ करु नये आणि केलीच तर राष्ट्रवादीच्या वतीने आपल्याला उत्तर देणेत येईल. असे मी जाहीर आव्हान करतो आणि थांबतो.

मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह हा जो करवाढीचा विषय आहे खरं तर सभागृहातील सदस्यांचा असा भ्रम आहे की, हा विषय सत्ताधारी पक्षाने आणलेला आहे. स्थायी समितीकडुन हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठी आणलेला आहे. हे शहर सर्वांच आहे तुमचं पण आहे आणि आमचं पण आहे. खरं तर हा विषय या शहरासाठी कुठलीही करवाढ न करता जैसे थे ठेवणेत यावे अशी आमची मागणी आहे. आयुक्त साहेब, तुम्ही करवाढीचा निर्णय घेणार असाल तर आमचा सगळयांचा या गोष्टीला विरोध आहे. त्यामुळे आयुक्त साहेब ज्यावेळेस हा विषय दप्तरी दाखल करुन आपल्याकडे येईल

त्याच्यामध्ये तुम्हांला काही बदल करावयाचा असेल तर किमान आपण सर्वांना विश्वासात घ्या, सर्व पक्षाच्या गटनेत्यांना बरोबर घेऊन विषय काय आणतो त्यावर आपल्याला सूचना द्याव्या लागतील. आजपर्यंत आपण कुठल्याच गटनेत्यांची मिटींग घेतलेली नाही. खरंतर करवाढीचा मुद्या ज्यावेळेस या शहरामध्ये येतो त्यावेळेस या शहरातील जुनी आणि नवीन मिळकतकरधारकांमध्ये करांची जी तफावत असेल ती दुर करण्याचा आपण प्रयत्न करीत आहात परंतु प्रत्येक वेळेस हे सत्ताधारी पक्षाचे सदस्य होते. २००७-०८, २०१५-१६ याच्यामध्ये काहीच बदल केलेला नाही. तेंव्हा सत्ताधारी पक्षाचे सदस्य म्हणुन आम्ही या विषयाला विरोध करीत आहोत आपणही कुठलीही करवाढ करु नये जसे महापौरांनी सांगितले आहे की, हा विषय दप्तरी दाखल करुन ज्यावेळेस आपल्याकडे हा विषय येईल ज्यावेळेस आपल्याला यावर निर्णय घ्यावयाचा असेल त्यावेळेस आपण वाढ करणार असाल तर त्यावेळेस आम्ही या विषयाला विरोध करु धन्यवाद.

मा.मिनल यादव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह सर्वात प्रथम आजच्या दिवशी हा विषय होत आहे खरोखरच यावर बोलण्याची काही आवश्यकता आहे का? आम्ही सगळेजण पोटतिडकीने याठिकाणी बोलतोय पण मी कमिशनर साहेबांना विचारते की, या विषयासाठी १५ फेब्रुवारीची ही तारीख मिळाली नाही का, आता आम्हांला बोलायचे म्हणुने बोलायचे,विरोध करायचा म्हणुन करायचा आता भाजपचे नगरसेवक म्हणतात की, आम्ही हा विषय आणलेला नाही. तुम्ही वाढीव कर घेवुन शहरामध्ये नक्की कोणकोणत्या सुविधा नागरीकांना देणार आहात. ज्या सुविधा द्यायला पाहिजेत त्या तुम्हांला देता येत नाहीत. तरी तुम्ही नवीन करवाढ कशासाठी करता आहात. अडीच पट तुम्ही करवाढ केलेली आहे. आणि याचा फटका सर्वसामान्य नागरीकांना बसतो आहे. तुम्ही दिवसाआड पाणी देता आणि पाणीपट्टीमध्ये वाढ केलेली आहे.कुठल्याच सुविधा तुम्ही सर्वसामान्य नागरीकांना पुरवल्या जात नाहीत. तुम्ही एवढी मोठी करवाढ केलेली आहे ते ही कोणालाच विचारात न घेता तुम्हांला कोणाचा काही प्रेशर आहे का फक्त तुम्ही ऐकुण न ऐकल्यासारखं करीत आहात खरंच याची गरज नाही. आता वार्षीक बजेट झालेलं आहे यामध्ये माझ्या प्रभागामध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या नगरसेवकामध्ये झिरो बजेट दिलेलं आहे. काहीच तरतुद केलेली नाही. नागरीकांना तुम्ही सुविधा देत नाही तर कोणत्या अधिकाराने तुम्ही करवाढ करीत आहात. माझा आणि माझ्या पक्षाचे वतीने या करवाढीस विरोध असल्याचे जाहीर करते. आणि आमचा सगळयांचा विरोध नोंदविणेत यावा.

मा.आशा धायगुडे-शेंडगे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह ख-या अर्थानी इतका महत्वाचा विषय ज्यावेळेस आपण सभागृहा समोर आणतो. परंतु एक जबाबदार अधिकारी म्हणुन आपण एखादी वाढ करतो आणि ती वाढ अशी तशी नाही अत्यंत मोठया प्रमाणात ती वाढ आहे. तर आमचं म्हणणं आहे की, जसं बापुंनी सांगितलं आहे की, आमचा सुध्दा सत्ताधारी पक्ष म्हणुन या विषयाला विरोध आहे. कारण नागरीकांवर अन्याय होणारा विषय आहे. परंतु इतका महत्वाचा विषय असताना सुध्दा तुम्ही सगळया गटनेत्यांची बैठक घेऊन हा निर्णय सांगणे आवश्यक होते. यामध्ये ही करवाढ किती होणार आहे याच स्पष्टीकरण देणे आवश्यक होते हे आम्हांला खालनं सांगाव लागत आहे. या शहराची लोकसंख्या २५ लाख आहे आणि त्यातील आम्ही निवडक १३३ नगरसेवक आहोत तर प्रत्येक नागरीकांना त्यांना लागणा-या सुविधा देणं लागतो त्यामुळे आमचा प्रत्येक नागरीकांशी संबंध येतो. मग इतकी वाढ म्हणजेच रु.४०००/- वरुन डायरेक्ट ११००० रु.पर्यंत होणार आहे म्हणजे अडीच पट वाढ होणार आहे. आणि ही अडीच पट वाढ करीत असताना आमचे विरोधी पक्षनेते असो, सत्ताधारी पक्षनेते असो, गटनेते असो या सर्वांना विश्वासात घेवुन निर्णय घेणे आवश्यक होते. या शहरामध्ये तुम्ही नागरीकांना वेगळया अशा सुविधा काय देता आयुक्त साहेब,तुम्हाला उत्पन्न वाढवायचे असेल तर वाढवा आमचं काही म्हणणं नाही. परंतु योग्य विचार करुन वाढवा. तुम्ही उत्पन्न वाढवायचं म्हणता पण ज्यावेळेला या शहरामध्ये कोणत्याही सुख-सुविधा नव्हत्या त्यावेळेला त्यांनी जागा घेतलेल्या आहेत हे ही आपण लक्षात घेतलं पाहिजे. आणि अशा प्रकारे तुम्ही कोणालाही विचारात न घेता आयुक्तांनी स्वत:हून हा विषय आणलेला आहे आणि तो या सभागृहाच्या पटलावर आणलेला आहे. परंतु साहेब याचा अर्थ असा नाही की, तुम्ही काहीही करायचं आणि शहराच्या विकासामध्ये कोणतीही प्रगती होत नाही, उच्चांक करीत नाही मात्र याठिकाणी अडीच पटीने टॅक्स वाढविण्याचा विषय आणता त्यावेळेस आपण १३३ लोकांना विश्वासात घेणं क्रमप्राप्त आहे. या १३३ लोकांना हा विषय माहित नव्हता. मा.महापौर साहेब, आपण कोणत्याही प्रकारची करवाढ करायची नाही आणि तसं करता येत नसेल तर हा विषय पुढील सभेचे वेळी आणावा आणि यावर सारासार विचार करुन या पुढील सभेच्या कार्यपत्रिकेवर आणावा. आणि यावर सविस्तर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. ख-या अर्थानं आमच्यासाठी आणि शहरातील प्रत्येक नागरीकांसाठी आजचा हा काळा दिवस आहे. तेंव्हा मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना आदेश द्यावेत की, यामध्ये सर्वांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारची पावले उचलायची नाहीत. आणि आयुक्त

साहेब,तुम्ही जुन्या मिळकती किती आहेत, नवीन किती आहेत आणि त्यामुळे किती उत्पन्न मिळणार आहे यावर चर्चा झाल्यानंतरच विषय आणायला पाहिजे होता. परंतु कुठलीही चर्चा न करता विषय आणला त्याबद्दल मी आयुक्तांचा याठिकाणी निषेध व्यक्त करते. आणि हा विषय अजिबात करु नये. अशी विनंती करते आणि थांबते.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर हा शहरवासियांच्या वतीने हा अतिशय महत्वाचा विषय आहे या विषयावर दत्ता साने असतील, वाघेरे असतील सर्वच नगरसेवकांनी आपआपली मते मांडलेली आहेत. सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांच म्हणणं आहे की, आम्ही हा विषय आणलेला नाही. स्थायी समितीमार्फत परत एकदा हा विषय सभागृहासमोर आलेला आहे. मागच्या जीबी ला मी काही कारणास्त्व अनुपस्थित होतो त्यामुळे या विषयावर बोलता आलं नाही. आणि त्या विषयावर चर्चा सुध्दा झालेली नाही. आयुक्त साहेबांनी कोणतीही दरवाढ न करता फक्त घसारा वाढविला आहे हे सांगुन आपल्याला गोलगोल करुन सांगितलं आहे. महापौर साहेब, तुमची निवड झाल्यापासून मी तुम्हांला ३/४ वेळा भेटलो त्यानंतर आयुक्तांना अत्यंत आदराने भेटलो. सर्व विरोधी पक्षाचे गटनेते असतील, सत्तारुढ पक्षाचे गटनेते असतील सर्वांना आम्ही भेटलो. आयुक्त साहेबांनी खरं तर सत्तारुढ पक्षनेत्याच्या कानावर घालून एक बैठक घेवुन त्यावर चर्चा करणं अपेक्षीत होतं परंतु तशी कोणत्याही प्रकारची चर्चा झालेली नाही. आणि मागच्या २० तारखेला हा विषय घेतला. मा.महापौर साहेब,आमच्या काकांनी सांगितलं आहे की,काकांनी एक शब्द सांगितला आहे की, तुम्ही हसायचं आणि आम्ही रडायचं अशा पध्दतीचं वातावरण करुन पुन्हा एकदा शहरवासियांसाठी करवाढ करायची आणि शहरवासियांना संकटात टाकायचं खरंतर सत्तारुढ पक्षाच्या सदस्यांनी तुम्हांला शुभेच्छा दिल्या. सत्तारुढ पक्षनेते आणि कामगारांचे आणि कष्टक-यांचे नेते या कामगार नगरी मधील आहेत मा.महापौर साहेब,हा विषय चालू असताना सत्तारुढ पक्षाचे सदस्यांच जर आयुक्त ऐकत नसतील तर त्यांचा काय उपयोग आहे. तुमचं जर आयुक्त ऐकत नसतील तर सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक करतात तरी काय पुढे विषय येतोच कसा काय हे समजत नाही. आणि जास्त न बोलता आयुक्तांनी जी करवाढ केलेली आहे त्याचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मी याठिकाणी निषेध व्यक्त करतो. आणि सत्तारुढ पक्षनेत्याला सांगतो की या विषयाला घेवुन सदस्य आपले आहेत हा विषय सर्वांनी

विचारात घेवुन हा जो लादलेला कर आहे तो मागे घ्यावा. अन्यथा मी निषेध व्यक्त करतो. धन्यवाद,जयहिंद जयमहाराष्ट्र.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह**,** याठिकाणी खेदाने नमुद करावेसे वाटते की, हा जो कर लादलेला आहे तो गोरगरीबांच्या खिशाला कात्री लावण्याचा आहे आणि सत्ताधारी पक्ष मुग गिळुन संमती देण्याचं काम करीत आहे. स्थायी समितीमध्ये हा विषय होता म्हणजे पक्षनेत्याला हे माहित होतं. २० फेब्रुवारी पर्यंत निर्णय घ्यावयाचा होता. तर तो २० तारखेच्या आत विषय का आणला नाही. आणि या विषयाच्या बाबतीत भारतीय जनता पक्षाची पक्कड ढिली झालेली आहे. राज्यामध्ये सुध्दा काय झालेल आहे हे आपण बघत आहोत. इथं आयुक्तांच काम नागरीकांच्या खिसा कापीत आहेत. या विषयाच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली तर याला सत्तारुढ पक्षाचे नेते जबाबदार असतील. आयुक्तांनी हा निर्णय गोरगरीबांच्या माथी लादू नये. असे सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना वाटत असेल तर आपण तशा प्रकारचा निर्णय,तरतुद करता आली तर बरे होईल. अन्यथा आम्ही सुध्दा गप्प बसणार नाही. लोकांचे आंदोलन उभे करु. एका बाजुला लोकांना पाणी मिळत नाही. आणि पाणीपट्टीत वाढ होत आहे आणि दुस-या बाजुला कोणतेही आयुक्त असले तरी ते करवाढ करतील आपल्याला अधिकार आहेत पण ते चुकीच्या पध्दतीने करीत आहात. तरी आपण ते त्वरीत तपासून घेणेत यावा. मा.महापौर साहेब, आपण आणि प्रशासनाने हे तपासून घ्यावे आणि तुम्हांला ते योग्य वाटत असेल तर आम्ही ते मान्य करतो परंतु जुनी मिळकत आणि नवीन मिळकत यांच्यामध्ये टॅक्सची खुप मोठया प्रमाणात तफावत दिसून येत आहे. हे आम्हांला मान्य आहे परंतु ज्या पध्दतीने बोजा वाढणार आहे तो बोजा न पेलवणारा आहे. यासाठी चर्चा होणं गरजेचं होतं. ३ पटीपेक्षा जास्त नागरीकांवर बोजा बसणार आहे. आणि तो बोजा एकदम न पेलावणारा आहे. एका बाजुला चालू असलेली मंदी, वाढणारी महागाई, शास्तीकर यापुर्वी शास्तीकर आणि मुळ टॅक्स ही दोन्ही एकत्र केल्यामुळे नागरीक मुळ टॅक्स सुध्दा भरत नाहीत आणि शास्तीकर सुध्दा भरत नाहीत. आणि म्हणुन तुम्हांला नागरीकांचे नळकनेक्शन तोडावे लागतात, नोटीसा द्याव्या लागतात या सगळया गोष्टींचा अवलंब करावा लागतो. त्यापेक्षा सुलभ पध्दतीने पैसे भरायला कोणालाही अडचण येणार नाही गरीबांनाही पैसे भरता यावे आणि नगरसेवकांनाही त्रास होणार नाही असा आपण सुवर्ण मार्ग काढावा अशी मा.महापौरांना विनंती आहे.धन्यवाद.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आजच्या करवाढीच्या विषयाचा मी याठिकाणी निषेध करते. निषेध यासाठी करते की, आपण सगळया सदस्यांनी सांगितलं की, ही करवाढ सर्वसामान्य नागरीकांना परवडणारी नाही. हे जरी बरोबर असलं तरी त्यासाठी आपण काही अंशी जबाबदार आहोत. काका तुम्ही काही वाईट वाटून घेऊ नका पण मगाशी आपण कमिशनर साहेबांना जी उपमा दिली ती न पटणारी होती. कमिशनरसाहेबांनी त्यांच पत्र डिसेंबरच्या स्थायी समितीमध्ये दिलं होतं. आणि तो विषय जनरल बॉडीमध्ये आता आलेला आहे कारण कायदा, नियम असा आहे की, २० फेबुवारीच्या आत निर्णय घ्यायचा असतो. करआकारणीचा विषय नेहमी फेब्रुवारी महिन्यामध्ये घ्यायचा असतो. मी कमिशनरची बाजु अजिबात घेत नाही. आणि घेणार पण नाही. परंतु जनरल माणसासारखी उपमा देता ती पटत नाही एखादया उच्च विभुषीत असणा-या व्यक्तीला आपण अशा प्रकारची उपमा देवु शकत नाही. मा.महापौर साहेब, मी तुमच्या बोलण्याचा निषेध करते आणि त्यांनी जी उपमा दिलेली आहे तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकणेत यावा. मा.महापौर साहेब. दि.४/१/२०२० ला आयुक्तांच पत्र होतं ते स्थायी समितीला विषय आला स्थायी समितीने हा प्रस्ताव फेटाळला/ दप्तरी दाखल केला त्यानंतर आपल्याकडे हा प्रस्ताव आला परंतु दुर्देवाने त्या दिवशी २० तारखेच्या सभेमध्ये आपण अंकिता प्रकरणामध्ये श्रध्दांजली होती, महिलांवर अत्याचार झालेले होते आणि मग आपण सभा तहकुब केली. विषय आपल्या सगळयांना माहिती होता आणि आम्हांला माहित होतं की, हा विषय मंजुर करायचा नाही. तुम्ही काय करायचे ते करणारचं पण करविते आम्ही पण आहोत. तुम्ही म्हणता आता कायदा लागु करा आम्ही म्हणतो सभागृहामध्ये अजेंडयावर जे विषय असतील त्या दिवशी सभा तहकुब झाल्यानंतर ज्या दिवशी सभा असेल त्या सभेमध्ये त्या विषयावर निर्देश देण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. असं महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सांगत आहे. आयुक्त साहेब, तुमच्या अधिकारात हा कर लागु होत नाही. कारण ज्या नागरीकांनी आम्हांला या सभागृहात पाठविलं त्यांच्यावर करवाढ लागु व्हावी या मताचे आम्ही अजिबात नाही. २ हजार कोटी रु. टॅक्सची थकबाकी आहे. शास्तीकर धरलं तर १ लाखपासून ते ३ लाखापर्यंत आणि ३ लाखापासून ते ५ लाखापर्यंत आणि ५ लाखाच्या पुढचे आम्ही करसंकलनचे अधिकारी तुमच्या पाठीमागे बसलेले आहेत यांना माहिती मागीतलेली होती. यामध्ये ४ टाईप घ्या. वर्ष घ्या, मिळकतीची संख्या, सन २००० सालापासून लोकांनी टॅक्स भरला असेल तर २००० सालापासूनचा टॅक्स घ्या मी करसंकलनच्या मॅडमला विचारलं तर त्या म्हणाल्या माझा तो विषय नाहीच, तुमचा

विषय नाही, आमचा विषय आहे. हे सभागृह आम्ही चालवतो. निर्णय जरी तुमचे असले तरी ते खरे, खोटे, चांगले/वाईट या शहराच्या दृष्टीकोनातून महत्वाचे असतील, कसे असतील हे बघण्याचं काम सुध्दा आमचे आहे. आपल्याशी संपर्क झाला आपण म्हणले पत्र द्या जो विषय सभागृहाच्या पटलावरती असेल तुम्ही करवाढ केली. साहेब अजेंडयावर जे,जे विषय असतील त्याची माहिती सदस्यांनी मागीतली तर ती तुम्हांला उपलब्ध करुन द्यावी लागेल. आम्हांला तुम्हांला पण बरोबर घ्यायचे आहे, शहराकडेही बघायचे आहे, नागरीकांकडेही बघायचे आहे म्हणजे एका वेळेस आम्हांला चार ठिकाणी बघायचे आहे. यामध्ये मी आपल्यालाकडे स्वत: तक्रार केलेली आहे. मी करआकारणीच्या बाबतीत सांगते, माझ्या ऑफिसच्या २२०० स्केअरफुटाचे बिल आले. मी आहे पहिल्या मजल्यावर आणि ऑफिस आहे तळमजल्यावर त्यादिवशी तुमची लोक चालली होती मी घाईघाईने म्हणले जे काही बिल असेल ते घेऊन टाका. २०१४ ला प्रॉपर्टी घेतली आणि २०१८ ला करआकारणीचं पत्र आलं म्हणुन मी तक्रार केली मला असं वाटलं की, एखादया वेळेस ही माझी प्रॉपर्टी आहे माझ्या प्रॉपर्टीचा जो काही टॅक्स आहे तो आला पाहिजे. मी प्रामाणिकपणे तुम्हांला सांगितलं. असे किती लोक तुम्हांला प्रामाणिकपणे सांगतील. आयुक्त साहेब, या शहरामध्ये तुमच्या टॅक्सपेक्षा आमच्या प्रॉपर्टीला खुप महत्व आहे त्याला खुप पैसे लागतात. त्यामुळे तुम्ही असेसमेंट करताना आख्या इमारतीच्या नोंदीमध्ये चुका होत असतात. आता विषय असा आहे की, ५०० स्केअरफुटाचे खाली घर बांधले आहे वर ३ मजले आहे आणि मग त्याला पण शास्ती कर लावणार का, आणि मग ५०० स्केअरफुटापर्यंतचा शास्ती कर शासनाने माफ केलेला आहे. शासनाचे तसे पत्र आलेलं आहे. याच्यामध्ये साहेब आपल्याकडे खिचडी करुन ठेवलेली आहे. आणि या खिचडीमुळे आम्हांला काही कळतंच नाही आणि म्हणुन आपल्याला विनंती आहे की, हा जो टॅक्स आहे निश्चितपणे मोठमोठया कंपन्याकडे,इमारतीकडे टॅक्स आहे. आपण पेपरला जाहीर नोटीस दिलेली आहे. त्या कंपन्याकडुन टॅक्स वसुल करण्यासाठी आपण कोर्टात गेलो त्यांच काय म्हणणं आहे, आपलं काय म्हणणं आहे याच्यावर काथ्याकुट झालं तर काही होत नाही. मागच्या पंचवार्षीकच्या आगोदर मी स्वत: मागणी केली होती की, जे, जे टॅक्स भरत नाहीत त्यांच्यावरती जप्तीच्या कारवाईचा बडगा उगारा आता काही लोकांकडे १७ कोटी, १८ कोटी रु. थकबाकी आहे त्यांच काय करायचं तुम्ही काहीच केलं नाही तर काय होणार आहे ज्यांचा व्यवसाय छोटा आहे, त्याला काम नाही त्यांना तुम्ही हसे करुन घ्या. या महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून आम्ही सगळयांनी एक चांगला विचार करणं गरजेचं आहे. महानगरपालिका टिकली तर

आपण टिकणार आहोत आणि नागरीकांना सुविधा मिळणार आहेत. सत्ता कोणाची आहे याचा काही फरक पडत नाही. आम्ही पण सुपातुन जात्यात आलो. पण काही गोष्टीत पण सुटसुटीतपणा आणला पाहिजे. तो आपण आणत नाही. महापौर साहेब, आपल्याकडे अजुन वेळ गेलेली नाही. आपण जीबी तहकुब जरी असली तरी अजेंडयामध्ये कुठलाही फेरफार केलेला नाही. नव्याने आपण काही मंजुर करु शकणार नाही. जे की,साहेब तुम्ही आता करणार आहात यु आर रॉंग याच्यासाठी मी हायकोर्टाचं दार वाजवणार तुम्ही समजदार आहात मी काय बोलले ते तुम्हांला समजल आहे. ही सभा ५/६ महिने आधी आली असती आणि त्यामध्ये रिट्रॉस्पेक्टीव्ह विषय आणला असता तर आम्ही मंजुर केला नसता आणि करुही दिला नसता आम्ही सगळे नियम पाळतो. माझा पक्ष असो अथवा विरोधी पक्ष असो नियम पाळायचे. मा.महापौर साहेब, इथं आपल्याला कोणी आणलेल नाही कमिशनरांच जे म्हणणं आहे ते त्यांच्या ठिकाणी परफेक्ट आहेत. महापालिकेच्या हिताविरुध्द हे सभागृह किंवा आयुक्त निर्णय घेऊ शकत नाहीत पण कधी रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट आपण रिट्रॉस्पेक्टीव्ह मध्ये जात नाही त्यामुळे निर्णय घेण्याचा अधिकार हा पुर्णपणे आपला आहे. आपल्या या जीबीच्या अजेंडयावर असलेल्या विषयावर वाद असल्यामुळे आपण जो निर्णय घेतला जो दसरी दाखल करण्याचा विषय आहे तोच मान्य आहे या शहरातील नागरीकांना पत्रकार बंधुच्या माध्यमातुन आवाहन करु इच्छिते की, कोणीही खोटया अफवांना बळी पडू नका एक रु.सुध्दा करवाढ होणार नाही. आमचा शब्द आहे तुम्हांला भारतीय जनता पार्टी जे बोलते तेच करते त्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत एवढंच मी सांगते जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह करआकारणीचा विषय हा प्रशासनाने आणलेला आहे.आणि मला वाटते की,सभागृहातील कुठल्याही विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्ष हे न सांगता आपण एकमुखाने या विषयाला विरोध करणे गरजेचं आहे. प्रशासनाने ज्या पध्दतीने हा विषय आणलेला आहे. अजित गव्हाणेंनी सांगितले आहे की, भाजपाने या विषयाला मुकसंमती दिलेली आहे. अजिबात नाही, आम्ही सर्वजण या विषयाला विरोध करतो आहे. आणि जसं सिमाताईनी सांगितलं की, उद्या पीआयएल दाखल करुन कोर्टात जाण्याची वेळ आली तरी भारतीय जनता पार्टी याच्यावर पाऊल टाकणार आहे यामध्ये कुठलीही शंका घेवु नका. आणि आम्ही विरोधी पक्षाना पण हेच सांगणार आहे की, भारतीय जनता पार्टी नागरीकांना आवाहान करणार आहे

की, ही करवाढ प्रशासनाने सभागृहाला विश्वासात न घेता केली तर आम्ही कुठलीही करवाढ न भरण्याचं आवाहन करणार आहे. यामध्ये कुठलेही दुमत नाही. कुठलीही दुटप्पी भूमिका नाही. कमीशनरसाहेब, आपण नागपुर महापालिकेमध्ये एवढं चांगल काम केल्यानंतर एवढा महत्वाचा विषय असेल आणि महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा विचार आपला असेल तर तुमचं आद्यकर्तव्य होतं की, सर्व सदस्यांना विश्वासात घेवुन, चर्चा करुन हा विषय आणणं आवश्यक होतं. प्रशासनाची ही कुठली पध्दत आहे मला समजलं नाही. आणि महापौर साहेब, आपण पण कमिशनरसाहेबांना आदेश द्यायला पाहिजे की, हा विषय जनरल बॉडीमध्ये आणण्याच्या आगोदर कमिशनरसाहेबांनी प्रेस कॉन्फरन्स घेवुन सांगितलं आहे की, जर हा विषय सभागृहाने नाकारला किंवा दप्तरी दाखल केला तर प्रशासन म्हणुन आम्ही ही करवाढ करणार आहे ही कुठली पध्दत आहे. आणि मग या पध्दतीनं जर तुम्ही काम करायचं ठरवलं असेल तर कमिशनर साहेब, आम्ही पण तुम्हांला त्याच पध्दतीनं अटॅक करु आम्ही सत्ताधारी पक्ष म्हणुन ज्या पध्दतीने भारतीय जनता पार्टीचे एक जबाबदार पक्ष म्हणुन या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून आम्ही आवाहन करीत आहे की, प्रशासन चुकीच्या पध्दतीने काम करीत आहे त्याला आम्ही साथ देणार नाही. आणि मला आवाहन करायचेआहे की, सभागृहाने हा विषय दप्तरी दाखल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसं महापौर साहेब, तुमच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची एक बैठक घेवुन आणि आयुक्तांनी हा करवाढीचा विषय त्यामध्ये ठेवुन त्याठिकाणी मान्यता झाल्यानंतरच करवाढ लागु करावी एवढीच विनंती मी या निमित्ताने करतो.

मा.झामाबाई बारणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह या विषयावर ब-याच नगरसेवकांनी पोटतिडकीने या शहरातील नागरीकांच्या दृष्टीने करवाढीच्या विषयावर आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी आपल्याला सांगू इच्छिते की, या शहरामध्ये अनेक भागातून नागरीक नोकरीच्या निमित्ताने आलेले आहेत. आणि त्यांना करवाढ ही दुप्पट/तिप्पट होणार असेल तर ती त्यांना परवडणारी नाही. आणि आपल्याला सुध्दा नागरीकांच्या समोर जायला परवडणार नाही. काही भागामध्ये २ दिवसांनी ३ दिवसांनी पाणी येत आहे. लोकांना वेळेवर पाणी मिळत नाही. त्यामुळे ही करवाढ थांबली पाहिजे. ब-याच सदस्यांनी सांगितले आहे की, राष्ट्रवादीच्या काळामध्ये शास्तीकर लावला गेला आणि त्यामुळे त्यांना सत्ता गमवावी लागली. परंतु राष्ट्रवादीच्या काळामध्येच शास्ती कर माफ करणेत यावा असा ठराव झालेला आहे पण त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यावेळी

मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी शास्तीकर माफ झाला नाही म्हणुन आमदारकीचा राजीनामा दिलेला होता. शास्तीकर माफ होणार होता म्हणुन आपले अनेक कार्यकर्ते मुंबईला गेले होते. त्यावेळेस शास्तीकर माफ झाला नाही म्हणुन आमदारांनी राजीनामा दिलेला होता. त्यामुळे सर्व नागरीकांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. म्हणुन या करवाढीला माझा विरोध नोंदवावी अशी विनंती करते आणि थांबते.

मा.एकनाथ पवार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर हा विषय दप्तरी दाखल करायचा असतांनाही माझ्या या सन्मा.सदस्यांना या विषयावर चर्चा करावयाची होती. खरंतर माझ्याही पार्टीचं असंच म्हणणं होतं की, शहरवासियांना करवाढ लादली नाही पाहिजे. आणि यासाठीच या शहरवासियांना करवाढ न करता हा विषय दप्तरी दाखल केलेला आहे. पण या विषयावर चर्चा झाली आणि कधी कधी आमचा किती विरोध आहे आणि भारतीय जनता पार्टीला किंवा नगरसेवकांना असं वाटतंय की, शहरातील नागरीकांना कर लादला गेला पाहिजे असा चुकीचा समज वृत्तपत्राच्या माध्यमातून किंवा विरोधी पक्षातील काही नगरसेवक अशा प्रकारचा अपप्रचार करीत आहेत. म्हणजे शहरवासियाची काळजी राष्ट्रवादीला आहे आणि शहरवासियांची काळजी आम्हांला नाही. मला असे वाटते की, या शहरावासियांची सर्वात जास्त काळजी भारतीय जनता पार्टी म्हणुन आम्हांला आहे. आणि कधी कधी आपण मोघम बोलतो, आणि सांगतो की,जनरल डायर आणि सिमाताईंनी सांगितलं की, काका जनरल डायरनी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी ज्यांनी,ज्यांनी काम केलेले आहे त्यांना गोळया घालण्याचं काम केलेले आहे. आणि एक चांगला कमिशनर आहे तशी जर परिस्थिती असती तर आणि या राज्यामध्ये बाण कुठे गेला असं कोणी तर सांगितलं बाण राष्ट्रवादीकडे गेला, की बाण काँग्रेसकडे गेला. आणि त्याची परिणीती काय झाली त्यातल्या ५० टक्के अधिका-यांच्या बदल्या झाल्या नां म्हणजे हे जर कमिशनर चांगले नसते या जिल्ह्यांचे पालकमंत्री अजितदादा आहेत यांच एकतर्फी नेतृत्व आहे त्यामुळे त्यांनी कमिशनरची बदली केली असती नां. एखादया चांगल्या अधिका-यांच्या पाठीमागे आपण तेवढेच जबाबदारीने उभे राहील पाहिजे. आयुक्तांच पत्र डिसेंबर महिन्यातील आहे आणि स्थायी समितीने हा विषय दप्तरी दाखल केलेला आहे. तरी आपण या सभागृहाचा २/२ तास वेळ वाया घालवतोय. खरं तर आयुक्तांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर माझी अपेक्षा होती सर्व सन्मा.सदस्यांच त्यांनी विचारलेल्या प्रश्नांच उत्तर मिळालं होतं, त्यांच समाधान झालेलं होतं परंतु त्या विषयावर बोलणं आणि

बोलण्यातून खरं तर आम्ही या शहरवासियांच्या मागे किती ठामपणे उभे आहोत हे खरं तर आम्हीही सांगतो. शास्तीकराच्या संदर्भात सगळेजण बोलले खरं तर या शास्तीकराचं भूत हे तुमचं आहे काका,तुमचं आहे. आम्ही तो कायदा केला नाही आणि मागच्या महापालिका सभेमध्ये आपण १०० टक्के शास्तीकर रद्द करणेत यावा असे आपण म्हणलेले आहे. चुकीच्या विषयाला भारतीय जनता पार्टी कधीच समर्थन करणार नाही. आज आमची सत्ता आहे मला खात्री आहे या पुढच्या दोन वर्षाच्या काळामध्ये या शहरातील लोकांच्या हितासाठी लोकहित निर्णय खरं तर आम्हांला घ्यायचे आहे आणि आम्हांला सत्तेवर यायचं आहे. तेंव्हा आरोप करणं आणि भारतीय जनता पार्टीला बदनाम करणं कारण निवडणुका जसजशा जवळ येतील आंदोलनं तशाच पध्दतीनं वाढणार आहेत,आरोप तशाच पध्दतीनं करणार आहेत. पण या आरोपाचा परिणाम आमच्यावर कधीच होणार नाही. कारण आम्ही कधीच चुकीचं काम करीत नाही. त्यामुळे या शहराला अजुनही चांगल्या पध्दतीचं म्हणजे पाण्याचा विषय आहे त्या विषयावर जेंव्हा चर्चा करुन त्यावेळेस भाऊसाहेबांचा त्या विषयावर खूप अभ्यास आहे. त्याही विषयावर आपण चर्चा करु पण आता सभागृहाचा वेळ न घालवता खरं तर हा विषय दप्तरी दाखल झालेला आहे आणि हे सगळयांच्या मनासारखं होत असेल तर आणि सिमाताईंनी सांगितलं की, ही सभा कुठल्या कलमानुसार नाही पण या शहरवासियांवर कुठलीही करवाढ लादली जाणार नाही. याची जबाबदारी सुध्दा आम्ही निश्चितच घेत आहोत आणि अशा पध्दतीचं काम सुध्दा आपण १०० टक्के करु. मा.महापौरांना विनंती करतो की, खरंतर दत्ता काकांनी जनरल डायरचा जो विषय काढला तो आजच्या सभागृहाच्या कामकाजातून तो वगळावा एक चांगला अधिकारी आपल्याला मिळाला आहे. तर त्याच्या पाठीमागे आपण ताकदीने उभं राहावे एवढंच सांगतो आणि थांबतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.भिमाबाई फुगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/९९/२०२०, दि.३०/०१/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३३ दि.५/२/२०२० अन्वये.

मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७, दिनांक २८।०२।२०१८ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १८७, दिनांक २०।०४।२०१८ अन्वये पाणीपट्टी दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार पाणीपट्टी आकारण्यांत येत आहे. सद्यस्थितीत शहरात पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि प्रत्येक नळ जोडावरील पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य नाही. सबब ज्या ठिकाणी विशेषत: उतारावरील भागात जास्त पाणी उपलब्ध होते. त्यामुळे तेथे मानका पेक्षा जास्त पाणी वापर करण्याची प्रवृत्ती दिसते व उंचावरील भागात पाण्याचा तुटवडा जाणवतो. समन्यायी पाणीपुरवठा करण्यासाठी १०० LPCD पेक्षा जास्त पाणीवापर करणा-या ग्राहकांवर वचक ठेवण्याच्या दृष्टीने १०० LPCD पेक्षा जास्त पाणी वापरासाठी जास्त दर लावणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन पाणीपट्टीचे सुधारित दर प्रस्तावित करण्यांत येत आहेत, तसेच त्यानंतर दरवर्षी प्रस्तूत आदेशातील सर्व प्रकारच्या दरांमध्ये वार्षिक ५ टक्के वाढ प्रस्तावित करणेत येत आहे.

पाणीपट्टी प्रस्तावित दर

१) **निवासी वापरासाठी प्रति कुटुंब / सदनिका प्रति महिना**
(झोपडपट्ट्यांमधील व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड वगळून)

अ.क्र.	LPCD	प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर (लिटर्स मध्ये)	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०१९-२०	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०२०-२१
१	४०	१ ते ६०००	र.रु.०.००	र.रु.०.००
२	४१-१००	६००१ ते १५०००	र.रु. ४.२०	र.रु.८.००
३	१०१-१३५	१५००१ ते २००००	र.रु.४.२०	र.रु.४०.००

४	१३५ च्या पुढे	२०००१ च्या पुढे	र.रु.८.४०	र.रु.१००.००

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्स पेक्षा (१३५ LPCD) जास्त पाणी वापर करणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्स प्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागू राहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅबमधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.८.०० हा दर लागू राहील.

२) वाणिज्य वापरासाठी प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट हॉटेल्स, रेस्टॉरंटस, दुकाने, इ.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु.५२.५०
सन २०२०-२१	र.रु.५५.००

३) खाजगी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, शासकीय-निमशासकीय कार्यालये, रेल्वे स्टेशन्स, ईएसआय हॉस्पीटल, ऑटो क्लस्टर, औंध ऊरो रुग्णालय.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु.१५.७५
सन २०२०-२१	र.रु.१७.००

४) धार्मिक स्थळे, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, धर्मादाय आयुक्त यांची मान्यता असलेली ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येणारी मंडळे.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी

	सरसकट
सन २०१९-२०	र.रु.१०.५०
सन २०२०-२१	र.रु.११.००

५) स्टेडीयम.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु.२१.००
सन २०२०-२१	र.रु.२२.००

६) मनपा इमारती / मिळकतीं – Book Adjustment करिता

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०१९-२०	र.रु. १०.५०
सन २०२०-२१	र.रु.११.००

७) हद्दीबाहेरील निवासी इमारती – देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेरील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील निवासी इमारतींसाठी देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डास खालीलप्रमाणे सरसकट दराने पाणी देण्यात येईल.

आर्थिक वर्ष	दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट
सन २०२०-२१	र.रु.११.००

८) झोपडपट्टीसाठी धोरण – झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी पध्दतीने दर प्रस्तावित करणेत येत आहेत.

अ) प्रस्तावित दर (मीटर बसविलेल्या झोपडपट्टी/झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड ग्राहकांसाठी निवासी वापरासाठी प्रति कुटुंब। सदनिका प्रति महिना)

अ.क्र.	LPCD	प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर (लिटर्स मध्ये)	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०१९-२०	पाणीदर (प्रति १००० लिटर्स साठी) सन २०२०-२१
१	४०	१ ते ६०००	र.रु.०.००	र.रु.०.००
२	४१-१००	६००१ ते १५०००	र.रु.२.१०	र.रु.४.००
३	१०१-१३५	१५००१ ते २००००	र.रु.३.१५	र.रु.४०.००
४	१३५ च्या पुढे	२०००१ च्या पुढे	र.रु.८.४०	र.रु.१००.००

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्सपेक्षा (१३५ LPCD) जास्त पाणी वापर करणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्स प्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागू राहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅबमधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.४.०० हा दर लागू राहील.

आ) मीटर न बसविलेल्या झोपडपट्टीतील/ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ग्राहक

i) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (वापर १३५ LPCD प्रमाणे)

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतींना प्रति सदनिकाप्रमाणे मासिक बिल देण्यांत यांवे.

आर्थिक वर्ष	दर प्रति महिना प्रति सदनिका
सन २०१९-२०	र.रु.३६.७५
सन २०२०-२१	र.रु.३८.६०

ii) झोपडपट्टी वैयक्तिक नळजोड (वापर ९० LPCD प्रमाणे)

झोपडपट्ट्यांमधील वैयक्तिक नळजोडाची पाणीबिले वार्षिक पध्दतीने देण्यात यावीत.

आर्थिक वर्ष	दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड
सन २०१९-२०	र.रु.१९८.००
सन २०२०-२१	र.रु.२१०.००

iii) झोपडपट्टीतील गट नळजोड (Group Connection)

१५ मिमी व्यास -५ कुटुंबे (वापर ७० LPCD प्रमाणे)

आर्थिक वर्ष	दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड
सन २०१९-२०	र.रु.५६७.००
सन २०२०-२१	र.रु.६००.००

अनधिकृत नळजोड नियमित करणे व त्यांना आकारावयाच्या पाणीदराबाबत यापूर्वीचेच धोरण कायम ठेवण्यात येत आहे. सदर धोरणाच्या अर्थनिष्पत्तीबाबत (Interpretation) अथवा अन्य कोणताही प्रासंगिक वाद उद्भवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहील. तरी उपरोक्तप्रमाणे पाणी दर बदला बाबतच्या धोरणास मान्यता देणेकामी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत यावी.

मा.माधवी राजापूरे - मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अभिषेक बारणे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ५१० विषय क्रमांक – ३
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/९९/२०२०, दि.३०/०१/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३३ दि.५/२/२०२० अन्वये.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५११ विषय क्रमांक – ४
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/शअ/ता/४/५३/२०२० दि.०४/०२/२०२०
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.६६३९ दि.५/२/२०२० अन्वये.

महानगरपालिका हद्दीमधील रस्त्यास विविध संस्था त्यांचेकडील भुमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी महापालिकेकडे रस्ता खोदाईस परवानगीची मागणी करतात.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २३९ नुसार सदर संस्थांना महानगरपालिके मार्फत रस्ता खोदण्यास परवानगी देण्यात येते. सदर रस्त्यांवर सेवा वाहिन्या साठी खोदकाम केल्यानंतर सुरळीत वाहतुकीसाठी रस्ते दुरूस्त/पुर्ववत करणे आवश्यक असते. सद्यस्थितीत बांधकाम साहित्य, यंत्रसामुग्री व मनुष्यबळ यात बाजारभावातील होत असलेली भरमसाठ वाढ व यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरच्या भांडवली खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने मनपास रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करावा लागतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २४१ नुसार सदर भांडवली खर्च हा काही प्रमाणात वसुल व्हावा या करीता अशा संस्था/कंपनी यांना रस्ता खोदाईस परवानगी देताना मा.आयुक्त यांचा दि.६/१/२०१७ च्या मान्य प्रस्तावानुसार रस्ते दुरूस्त/पुर्ववत करणेसाठी

सा.बां.विभाग पुणे यांचेकडील सन २०१६-१७ च्या दरसुची नुसार येणारे शुल्क सद्यस्थितीत वापरले जात आहे. त्यानुसार रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाच्या शुल्काबाबतचे परिपत्रक अन्वये शहर अभियंता कार्यालयाकडून दि.३/३/२०१७ रोजी निर्गत करण्यात आलेले आहे. सदर रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाचे सद्यस्थितील शुल्क ठरविताना चराची रूंदी ही रोड रोलरची १.८ मी. इतकी रूंदी गृहीत धरून ठरविणेत आले आहे.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत रस्ता खोदाई केलेनंतर रस्ते पुर्ववत करणेसाठी खाली प्रमाणे दर आकारण्यात येत आहे.

प्रपत्र अ) : रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाचे शुल्क

अ.क्र.	रस्त्याचा प्रकार	सुधारीत दर र.रू.
		(चराची रूंदी कमीतकमी १.८० मी)
१)	जमिनीमधुन खोदकाम	१९९०/- प्रति मीटर
२)	खडीमुरूम बीबीएम/एमपीएमसह	३६५९/- प्रति मीटर
३)	डांबरी रस्ता	९३३३/- प्रति मीटर
४)	डांबरी रस्ता (पुर्ण जाडी)	
५)	फुटपाथ	८१३९/- प्रति मीटर
६)	पेव्हींग ब्लॉक	६२६७/- प्रति मीटर

प्रपत्र ब) : मनपा अधिभार

अ.क्र.	रस्ता रुंदी (मीटर)	मनपा अधिभार

		रस्त्याला समांतर खोदाई असल्यास	रस्त्यावर काटकोन खोदाई असल्यास
१	१८ मी. पेक्षा कमी	रु. १५००/ प्रती मीटर	रु. ७०००/ प्रती मीटर
२	१८ मी.ते ३० मी. खालील	रु. २०००/ प्रती मीटर	रु. १०,०००/ प्रती मीटर
३	३० मी. ते ४५ मी. खालील	रु. २५००/ प्रती मीटर	रु. १२,०००/ प्रती मीटर
४	४५ मी. व त्यापुढे	रु. ३०००/ प्रती मीटर	रु. १५,०००/ प्रती मीटर

केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, एम.एन.जी.एल. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था यांना पुणे महानगरपालिका हद्दीत भूमिगत केबल टाकणेसाठी पुणे मनपाचे मान्य रस्ते खोदाई शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेबाबतचा ठराव पारित केलेला आहे. पुणे महानगरपालिकेकडून महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना रस्ता खोदाई करणेसाठी र.रू.२७७४ प्रती रनिंग मी. इतका दर आकारला जातो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात भूमिगत गॅसवाहिनी टाकण्यासाठी रस्ते खोदाईस परवानगीच्या चालू दरामध्ये सवलत मिळणेबाबत मे.महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी विनंती केलेली आहे.

<u>महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.यांचेकडील मागणीः-</u>

महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी महानगरपालिकेकडील दर जास्त असल्याने रस्ते दुरुस्तीचे दर कमी करुन पुणे महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना देण्यात येणा-या दरातील सवलतीनुसार भूमिगत गॅस पाईप लाईन टाकणेसाठी रस्ते खोदाईस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

घरगुती स्वयंपाक व इतर वापरासाठी तसेच, शहरातील वाढत असलेल्या मोठ्या प्रमाणातील प्रदुषण रोखण्यासाठी चार चाकी वाहनांसाठी नैसर्गिक वायूचा वापर करण्याचा केंद्र शासनाने महत्वकांक्षी उपक्रम हाती घेतलेला आहे. त्याचप्रमाणे, शहरी भागात सी.एन.जी. चा वापर वाढवून घरगुती वापरातील एल.पी.जी. सिलेंडर ग्रामिण भागासाठी जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे. नैसर्गिक वायू (सी.एन.जी.) हा एल.पी.जी. पेक्षा सुरक्षीत व स्वस्त असल्याने व २४ तास अखंडीत पुरवठ्याची शास्वती असल्याने शहरातील नागरिकांसाठी त्याचा उपयोग होणार आहे. शहरात अशाप्रकारच्या नैसर्गिक वायूचे (सी.एन.जी.) भुमिगत पाईपलाईन टाकणेचे व पुरवठा करण्याचे कामकाज महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.यांचे मार्फत चालू आहे.

भुमिगत गॅसवाहिनी शहरातील नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने त्यासाठी महानगरपालिकेचे देखील योगदान असणे आवश्यक वाटते. त्यासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना भुमिगत गॅसवाहिनी टाकण्यासाठी आवश्यक असणा-या रस्ता खोदाई परवानगीसाठी महापालिकेमार्फत आकारण्यात येणारे शुल्कात सवलत देऊनरस्ता खोदाई केलेनंतर रस्ता पुर्ववत करणेसाठी Lumpsum र.रू.३०००/- प्रती र.मी. इतके शुल्क आकारून मनपा अधिभार माफ करणे आवश्यक आहे. तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये मे.महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना रस्ते खोदाईच्या चालू दरामध्ये सवलत देऊन रस्ता खोदाई कलेनंतर सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या प्रकारासाठी (जमिनीतून खोदकाम, खडीमुरूम बीबीएम/एमपीएम सह, डांबरी रस्ता पुर्ण जाडी, फुटपाथ व पेव्हींग ब्लॉक) रस्ता पुर्ववत करणेकरीता Lumpsum र.रू.३०००/- प्रती र.मी. इतके शुल्क आकारून मनपा अधिभार माफ करणेसाठीच्या धोरणात्मक निर्णयासाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांची मगाणी असली तरी, MNGL कंपनीकडून मनपाचे सर्व प्रकारचे विकास कामे करतांना MNGL कंपनीच्या गॅस लाईन वरून काम करणेसाठी विविध प्रकारचे चार्जेस MNGL कंपनीस अदा करावे लागतात त्यामध्ये मनपास सवलत मिळणे आवश्यक आहे. तरी MNGL कंपनीस मनपाकडून रस्ते खादाई सवलत देताना मनपाच्या कामांसाठी MNGL कंपनीकडून विविध प्रकारचे चार्जेस माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.आशा धायगुडे-शेंडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१२ विषय क्रमांक – ५
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/१४२/२०२० दि.०४/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६४१ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड शहर हे महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहनतळ धोरणास (पार्कींग पॉलिसीस) मा.स्थायी समिती ठराव क्र. २६३९, दि.०९/०५/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.२०५, दि.२२/०६/२०१८ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्याअन्वये पिंपरी चिंचवड शहरातील पार्किंग पॉलिसी नुसार शुल्क आकारणेबाबत निविदा क्र.४८/२०१९-२०२० प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा स्विकृतीचा कालावधी तीन वेळेस वाढविणेत आला तथापि वाढविलेल्या निविदा स्विकृत कालावधी मध्ये एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे उपरोक्त मा.महापालिका सभा ठराव क्रमांक अन्वये मंजुर करणेत आलेले दर खालीलप्रमाणे सुधारीत करणे आवश्यक आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

वाहनाचा प्रकार	Zone A, Zone B, Zone C साठीचे दर र.रू.प्रति तास
दुचाकी	५/-
रिक्षा	५/-
चारचाकी	१०/-
टेम्पो/चारचाकी मिनी ट्रक	१५/-
मिनी बस	२५/-

खाजगी बस	१००/-
ट्रक/ट्रेलर	१००/-

सदर पार्किंग पॉलिसीच्या कामासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून Parking App तयार करून पार्किंगचे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३(अ)(१) नुसार सुधारित दरास मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.आशा धायगुडे-शेंडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१३ विषय क्रमांक – ६
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.राजेंद्र गावडे, मा.संतोष लोंढे यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६४९ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये निगडी-दापोडी रस्त्यावर पिंपरी ते स्वारगेट या मेट्रो मार्गिकेचे काम महामेट्रो मार्फत करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड मनपा ते स्वारगेट या मार्गिकेची लांबी १६.५९ कि.मी. असुन त्यापैकी पिंपरी ते दापोडी असा ७ कि.मी. मार्गिका व ६ स्टेशन्स पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये येत आहे. या प्रकल्पासाठी केंद्रशासन, राज्यशासन व पिंपरी चिंचवड व पुणे मनपा यांचेकडुन अर्थ सहाय्य करणेत येत आहे. भविष्यात मेट्रोचे काम निगडी पर्यंत सुमारे ५.५० कि.मी. लांबीचे करणेत येणार आहे.पिं.चिं.मनपा हद्दीमधील मेट्रो प्रकल्पाच्या खर्चाच्या १०% हिस्सा पिं.चिं.मनपास देय आहे. पिंपरी ते स्वारगेट या

मार्गिकेचे काम पुणे मेट्रो या नावाने करणेत येत आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड मनपाचा / शहराचा कुठेही समावेश करणेत आलेला नाही. पिंपरी चिंचवड मनपा देशामध्ये विकासाभिमुख मनपा म्हणुन ओळखली जाते. तरी शहरातील नागरिकांच्या भावनांचा विचार करता तसेच शहराचे अस्मितेचा विचार करता 'पुणे मेट्रो' ऐवजी 'पुणे पिंपरी चिंचवड मेट्रो' असे नामकरण करणेत यावे. तसेच मा.महापौर, उप महापौर, स्थायी समिती-अध्यक्ष सर्व गटनेते व सर्व नगरसदस्य यांनीही अशा प्रकारचे नामकरण करणेबाबत मागणी केली आहे. तसेच पिंपरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, पिंपरी येथे मेट्रो स्टेशनचे काम चालु आहे. या चौकामधील ग्रेडसेपरेटरला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विलगक तसेच चौकामधील बीआरटी बस स्टेशनला आहिल्यादेवी होळकर चौक, मोरवाडी असे नामकरण करणेत आलेले आहे. त्याच धर्तीवर या चौकामधील मेट्रो स्टेशनला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, पिंपरी असे नाव देणेबाबत मागणी आहे. तरी पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सध्या चालु असलेल्या मेट्रोस 'पुणे मेट्रो'ऐवजी 'पिंपरी चिंचवड पुणेमेट्रो' व मोरवाडी चौकातील मेट्रो स्टेशनला 'पिंपरी' ऐवजी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, पीसीएमसी पिंपरी मेट्रो स्टेशन'असे दुरुस्ती नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.आशा धायगुडे-शेंडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.झामाबाई बारणे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव –

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५४ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर ०७ रुग्णालये व २८ दवाखाने कार्यरत आहेत. सदर दवाखाना व रुग्णालयांमध्ये व वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये मनुष्यबळाअभावी

रुग्णसेवा देणेकामी अडचण होत आहे. तसेच याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे वैद्यकिय अधिकारी/ तज्ञ वैद्यकिय अधिकारी व इतर पॅरामेडिकल पदे आवश्यकतेनुसार तातडीने भरुन रुग्णसेवा सुरळीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार आज दि.०५-०२-२०२० रोजीच्या मा.स्थायी समिती सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार रुग्णालयातील आवश्यक पदे भरणेसाठी प्रशासनाने वाय.सी.एम. रुग्णालय व वैद्यकिय विभागांतर्गत आवश्यक पदे कंत्राटी पध्दतीने भरणेकामी सविस्तर पदांच्या आवश्यकतेनुसार सोबतचे प्रपत्र अ व प्रपत्र ब नुसार प्रशासनामार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(गोंधळ)

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अभिषेक बारणे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ५१४ विषय क्रमांक – ७

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.झामाबाई बारणे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव –

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५४ दि.५/२/२०२० अन्वये.

विषय क्रमांक ७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.अर्चना बारणे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१५ विषय क्रमांक – ८
दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५५ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थेरगाव स.नं.९ मधील मनपा उपयोगासाठी आरक्षित जागेवर BOT तत्त्वावर व्यापारी केंद्र बांधणेस मनपा सभा ठराव क्र.४५९४, दि.२९/१०/२००१ अन्वये मान्यता मिळाली होती. याबाबत तत्कालीन नगरसदस्यांचे नुसार मनपामार्फत कामाची निविदा प्रसिध्द केली. सदर प्रकल्पाबाबत BOT कमिटी मध्ये र.रु.६.१० कोटीच्या प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर दि.१३/०७/२०१० रोजी पात्र निविदा धारक मे.ओम प्रॉपर्टीज यांचे समवेत दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत करारनामा करणेत आला. करारनामा केलेनंतर भुमी जिंदगी विभागामार्फत दि.१४/०९/२०१० रोजी मे. ओम प्रॉपर्टीज यांना जागेचा ताबा देणेत आला. तथापि, मा.नगर सदस्यांच्या मागणीनुसार भुमी जिंदगी विभागामार्फत दि.०२/१०/२०१० रोजी ताबा दिलेल्या जागेचा ताबा स्थगित करणेत आला. सदरचे जागेचा ताबा न मिळाल्याने मे.ओम प्रॉपर्टीज यांनी दि.०२/११/२०११ रोजी मा. उच्च न्यायालय मुबंई येथे दावा दाखल केला. सदर दाव्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये मनपा मार्फत मा.अति.आयुक्त यांनी सदर प्रकरणी मे.ओम प्रॉपर्टीज यांचे समवेत सुनावणी घेऊन दि.०६/०३/२०१२ रोजी मनपाने मा. उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केल्यानुसार प्रकल्प रद्द केला असलेने जागेचा ताबा देता येणे शक्य नाही असा आदेश दिला. सदरचे अति.आयुक्त यांनी दिलेला आदेश रद्द करणेबाबत मे.ओम प्रॉपर्टीज यांनी पुन:श्च मनपा विरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये दि.१३/०४/२०१२ रोजी दावा दाखल केला. सदरचे दाव्याबाबत मनपामार्फत त्यानुसार मे.ओम प्रॉपर्टीज यांना दि.२५/०३/२०१३ रोजी सदरचा प्रकल्प का रद्द करणेत येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली. त्यानुसार दि.०९/१०/२०१४ रोजी पुढील प्रमाणे आदेश निर्गत केले. यामध्ये मे.ओम प्रॉपर्टीज यांनी करारनामा कलम १२.१ नुसार सदरचे प्रकरण आर्बिट्रेशन लवादाकडे देणेत यावे. असे नमुद केले.सदरचे मा. अति. आयुक्त यांनी दि.०९/१०/२०१४ रोजी दिलेला आदेश रद्द करुन जागेचा ताबा मिळणेकामी मे.ओम प्रॉपर्टीज यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये दि.०७/०४/२०१५ रोजी दावा दाखल केला. सदर दाव्याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दि.०८/०१/२०२० रोजी सुनावणी झाली व दि.११/०१/२०२० रोजी मा.उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे आदेश दिले. सदर

प्रकरण मा. उच्च न्यायालयाने ९० वर्ष भाडे करारापोटी देय असलेली एकुण र.रु.१२.०० कोटी इतकी निश्चित करुन सदरची रक्कम मे.ओम प्रॉपर्टीज यांनी मनपास द्यावयाची आहे. तथापि, सद्यस्थितीमध्ये मनपाकडे अतिरीक्त जागा उपलब्ध नसल्याने सदर ठिकाणी मनपाचे कचरा संकलन केंद्र असुन उर्वरीत जागा ही खेळाचे मैदान म्हणुन वापरण्यात येत आहे. सदरची जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून मनपास मिळालेली आहे. त्यामुळे शासन मान्यता नसताना सदरची जागा देता येणार नाही. सदर आरक्षीत जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्याकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाली आहे. ज्या कामासाठी जागा दिली आहे. त्याच कामासाठी सदर जागेचा वापर होणे गरजेचे आहे. सदर न्यायालयीन प्रक्रीयेत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास सहभागी करुन घेणेत यावे. तसेच सदर प्रकरणी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा अभिप्राय घेणेत यावा. मनपास जागेची आवश्यकता लक्षात घेता उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मे.ओम प्रॉपर्टिज यांना जागेचा ताबा न देता या निर्णयाच्या विरूध्द मा.सर्वोच्च न्यायालयात मनपा मार्फत अपिल दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१६ विषय क्रमांक – ९

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.मनिषा पवार व मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७ दि.१७/१/२०२० अन्वये.

विद्युत विभागाच्या उप अभियंता विद्युत या पदाचे अंतिमसेवा जेष्ठता यादी दि.१८/१२/२०१२ रोजी प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सदर सेवा जेष्ठता यादी तयार करताना प्रशासन विभागामार्फत उप अभियंता घोडे व मोरे हे एकाच दिवशी उप अभियंता पदावर पदोन्नती द्वारे रुजु झाल्याने श्री.घोडे हे वयाने श्री.मोरे यांच्या पेक्षा

मोठे असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतुदी नुसार श्री.घोडे यांना सेवाजेष्ठता यादीत श्री.मोरे यांचे आधी सेवाजेष्ठता क्रमांक मंजूर करणेत आला आहे. सदर बाबीस श्री.मोरे उप अभियंता (वि) यांनी हरकत घेतली असता प्रशासनाने वरील नियमाच्या आधारे श्री.मोरे यांची हरकत फेटाळून लावलेली आहे. तसेच याच सेवा जेष्ठता यादीत दि.२८/०८/२००८ रोजी पदोन्नती होवून रुजु होणारे उप अभियंता श्री.चव्हाण एम.एम, श्री.धुमाळ दिलीप, श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर हे एकाच दिवशी रुजू झालेले असून सुद्धा वरील महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतूदीनुसार वयाने अनुक्रमे श्री.सोनवणे माधव, श्रीमती लता बाबर, श्री.दिलीप धुमाळ व श्री.चव्हाण माणीक या क्रमाने सेवा जेष्ठता क्रम देणे आवश्यक होते परंतु प्रशासन विभागाने चुकीने श्री.चव्हाण माणिक, श्री.दिलीप धुमाळ, श्री.माधव सोनवणे व श्रीमती लता बाबर असा सेवा जेष्ठता क्रम चुकविलेला आहे. त्यामुळे सेवा जेष्ठ असणारे श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर यांचेवर पुढील पदोन्नती साठी अन्याय होत आहे. त्यामुळे सदरची उप अभियंता विद्युत या पदाची सेवाजेष्ठता यादी दुरुस्त करुन श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर यांचेवर होणारा अन्याय दूर करणे अत्यावश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतुदी नुसार श्री.घोडे व श्री.मोरे यांना दिलेल्या सेवा जेष्ठतेचे नियमानुसार श्री.माधव सोनवणे व श्रीमती लता बाबर, श्री.दिलीप धुमाळ व श्री. माणिक चव्हाण या क्रमाने सेवा जेष्ठता यादी दुरुस्त करण्यास मान्यता देण्यास तसेच सद्या विद्युत विभागाचे अस्थापनेवरील कार्यकारी व उपअभियंता (वि) पदाचे दुरुस्त सेवाजेष्ठता यादी नुसार सेवाजेष्ठता ठरणारे उप अभियंता श्री.माधव सोनवणे यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(गोंधळ)

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१७ विषय क्रमांक – १०

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कमल घोलप व मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३० दि.०७/०२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ३५ लाख पेक्षा जास्त झाडे आहेत. त्यांचे जतन व संरक्षण करणे करीता महाराष्ट्र(नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अंमलात आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन तरतुदीनुसार प्रकरण ३ कलम ५(१)(२)नुसार वृक्षअधिकारी नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिका स्थायी अस्थापनेवर 'वृक्ष अधिकारी'(गट-अ) या अभिमानाचे एक पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीत एक नवीन पद (प्रपत्र अ) मनपा अस्थापनेवर निर्माण करण्यास तसेच सदर पद निर्माण करुन श्री.प्रकाश मोगल गायकवाड "उद्यान अधिक्षक"(वृक्ष) या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व अनुभव अर्हता धारण करीत पात्र असल्याने त्यांची 'वृक्षअधिकारी'(गट-अ) या पदावर पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रपत्र अ

वृक्षसंवर्धन विभागासाठी नव्याने वर्ग- १ पद निर्माण करावयाचे माहितीपत्रक

अ. क्र.	पदाचे नांव	वतेनश्रेणी	मंजुर पद	नव्याने निर्मिती करावयाची पदे अर्हता
१	वृक्षअधिकारी (वर्ग - १)	१५६०० – ३९१००- ६६००(ग्रेडवेतन)	०१	१००% पदोन्नतीने उद्यान अधिक्षक (वृक्ष) वर्ग २ या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.
(गोंधळ)

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१८ विषय क्रमांक – ११

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कैलास बारणे व मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.१६ दि.८/१/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७ /९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.०० मी. रुंद रस्ता व १२.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्या दृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै. मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. (स.नं.१५ पै.) व १२.०० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.०० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५१९ विषय क्रमांक – १२

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापलिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्था/EWSप्र/७०/२०२० दि.१८/१/२०२०
२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
स्था/EWSप्र/७१/२०२० दि.१८/१/२०२०
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५०६
दि.२०/०१/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत केंद्रीय गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शन सुचनांचा अवलंब करुन ठिकठिकाणी आरक्षित जागांवर सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना राबविणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या योजनेकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ मंजूर आहे. सदर ठरावानुसार सद्यस्थिती च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्प चालू आहेत.

सदर योजनेअंतर्गत विकास आराखड्यातील EWS, HDH आरक्षित जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी २.५ चटई निर्देशांक वापरुन प्रकल्पास शासन मान्यता घेऊन बांधकाम परवानगी नियमानुसार (DCR) पर्यावरण विभागाच्या परवानगी प्राप्तीनंतर प्रकल्प राबविणेत येत आहे. त्यानुसार सद्यस्थितीत खालील प्रकल्पांचे सुरवात करणेत आली आहे. सदर प्रकल्पामध्ये १४ ते १५ मजली इमारतीमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्राच्या सदनिका बांधणेचे नियोजन आहे.

सदर योजना ही खाजगी भागीदारीद्वारे परवडणा-या घरांची निर्मिती करणे (Affordable Housing in Partnership) या घटकाचा अवलंब करुन राबविणेत येत

आहे. या घटकांतर्गत केंद्र शासनाकडून १.५ लक्ष प्रति सदनिका इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या घटकाखाली ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत. या घटकाखाली राज्य शासनामार्फत प्रति घरकुल र.रु.१ लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. त्यानुसार खालील प्रकल्पांना राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती, केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती यांचे मान्यतेने राबविणेस मान्यता घेण्यात आली आहे.

पंतप्रधान आवास योजनेचे पिंपरी चिंचवड शहरातील इच्छुक लाभार्थींना लाभ करुन देणेकामी मा.महापौर यांचे समवेत सर्व पक्षनेते यांच्या झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे प्रक्रिया पार पाडणेबाबत निर्णय घेणेत आले आहेत.

१) दिलेल्या कालावधीमध्ये इच्छुक लाभार्थीने मनपाने दिलेल्या लिंकद्वारे आवश्यक फॉर्म ऑनलाईन भरुन, सदर फॉर्मची प्रिंट काढून तो नागरी सुविधा केंद्राकडे प्रस्तृत करावयाचा आहे.

२) नव्याने फॉर्म भरणारे - ज्या लाभार्थ्यांनी यापुर्वीच्या सर्वेक्षणात भाग घेतलेला नव्हता त्यांनी स्वतःचा फॉर्म व कागदपत्रे (आधार कार्ड, रेशन कार्ड, पॅन कार्ड, वोटर कार्ड, जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, बँक पास बुक, वीजबिल, प्रति प्रकल्पासाठी रु.५,०००/- (डी.डी.) डिमांड ड्राफ्ट, २ पासपोर्ट आकाराचे फोटो) तपासणीसाठी पात्रता पडताळणी नागरी सुविधा केंद्राकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याच ठिकाणी सदर फॉर्म व कागदपत्रे व र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल.

३) यापुर्वी फॉर्म भरलेले - ज्या लाभार्थींनी यापुर्वीच्या सर्वेक्षणामध्ये भाग घेऊन अर्ज सादर केला होता त्यांनी फक्त ऑनलाईन फॉर्म भरुन त्याची प्रती सह र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल. तसेच मधील कालावधीत नियमानुसार उत्पन्नापेक्षा वाढ अथवा स्वतःचे मालकीचे घर घेतल्यामुळे पुर्वी फॉर्म भरलेल्यांपैकी सदर इच्छुक लाभार्थी सोडतीत भाग घेणेस अपात्र ठरतील.

४) क्र.२ नुसार सादर होणारे अर्ज नागरी सुविधा केंद्रामार्फत पडताळणी करावयाची झालेस सदर केंद्रांना आवश्यक प्रशिक्षण, माहिती व तंत्रज्ञान विभाग व CLTC मार्फत देणेत येईल व प्रत्यक्ष फॉर्मचे तपासणी व पडताळणी फी म्हणून नागरी सुविधा केंद्रास र.रु.२५/- प्रति फॉर्म पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत अदा करणेत येईल.

५) सदर प्रक्रियेचा कालावधी ३० दिवस राहील.

६) सर्व पात्र लाभार्थ्यांची यादी ऑनलाईन वेबसाईटवर प्रसिध्द करुन लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रत्येक प्रकल्पाकरीताचे लाभार्थी निश्चित करणेत येतील.

७) इच्छुक लाभार्थींनी भरावयाच्या फॉर्ममध्ये तीन प्रकल्पांचा विकल्प भरणेस मुभा असेल.

८) र.रु.५०००/- ही सदनिकेच्या किंमतीतून वजावट करणेत येईल व सदनिका न मिळालेल्या लाभार्थींना सदर रक्कम परत करणेत येईल.

९) प्रतिक्षा यादी ठेवणे अथवा रद्द करणेचा कायदेशीर अधिकार मनपाने राखून ठेवलेले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील खालील प्रकल्पांची सद्यस्थितीत वाटप करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे. सदर प्रकल्पांना पर्यावरण दाखला व महारेरा अंतर्गत नोंदणी देखील करण्यात आलेली आहे. या प्रत्येक प्रकल्पांचे निविदेनुसार होणा-या खर्चावर आधारीत प्रति सदनिका खर्च निश्चित केलेला आहे. प्रत्येक प्रकल्पासाठी लाभार्थी हिस्सा खालीलप्रमाणे प्रपत्र अ नुसार येत आहे.

<u>प्रपत्र अ</u>

अ.क्र.	**प्रकल्पाचे नाव**	**एकुण सदनिका**	**प्रति सदनिकेची बांधकाम किंमत (लाखात.रु.र)**	**प्रति सदनिका केंद्र शासन अनुदान (लाखात.रु.र)**	**प्रति सदनिका राज्य शासन अनुदान (लाखात.रु.र)**	**प्रति सदनिका लाभार्थी हिस्सा रू .र) (लाखात**
१	चऱ्होली	१४४२	९.१९	१.५०	१.००	६.६९
२	रावेत	९३४	९.४५	१.५०	१.००	६.९५
३	बोऱ्हाडेवाडी	१२८८	८.७१	१.५०	१.००	६.२१
	एकुण	**३६६४**				

उपरोक्त तक्त्याप्रमाणे प्रति सदनिकेसाठी केंद्रशासन र.रु.१.५० लाख, राज्य शासन र.रु.१ लाख अनुदान देणार आहे. तसेच उर्वरित रक्कम हा लाभार्थी हिस्सा राहणार असून तो ३ टप्प्यांमध्ये (४०%+४०%+२०%) लाभार्थ्यांकडून घेण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे आर्थिकदृष्ट्या अतिकार्यक्षम व अतिव्यवहार्य (Most Economical Feasiblity) वसुलीच्या पर्यायापैकी लाभार्थींकडून घरकुलच्या किंमतीपोटी वसूल करावयाचे हिश्श्याची रक्कम वरीलप्रमाणे असून सदर रक्कम बांधकामाच्या ठराविक टप्प्यानंतर घेणेत येणार आहे. हिश्श्याचे टप्पे रेरा नियमानुसार ठेवण्यात आलेले आहे. तसेच सदर प्रकल्पामधील मुलभूत सुविधा विषयक (Infra Work) कामे, भाववाढ फरक अदायगी ही पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत करण्यात येणार आहे. म्हणजेच महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग म्हणून सदर प्रकल्प मनपाचे जागांवर करणे व प्रकल्पातील सुविधा पुरविणेचा खर्च, विकास शुल्क माफी व भाववाढ खर्च, अस्थापना खर्च या स्वरुपात असणार आहे.

सदर प्रकल्पांचे एकुण ३६६४ सदनिकांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणे आवश्यक आहे. तरी च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथील प्रकल्पांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणेचा वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५२० विषय क्रमांक – १३

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील

जा.क्र.वायसीएमएच/१७/कावि/३६/२०२० दि.१८/१/२०२०

महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचार घेत असताना मृत्यु झाल्याने तसेच सदर रुग्णांची अर्थिक परिस्थिती हालाखिची

असल्याने त्यांच्यावर करण्यात आलेल्या औषधोपचाराचे एकुण बील **रक्कम रुपये ४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस)** वसुल करणे शक्य नसल्याने ते क्षमापित करणे आवश्यक आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र. ४३१ दि. ७/९/२०१९ अन्वये रुग्णांची बेताची आर्थिक परिस्थिती व मानवतेच्या दृष्टीकोनातुन महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह मनपाच्या सर्व रुग्णालयात उपचाराकरीता दाखल झालेल्या रुग्णाचा उपचार चालु असताना किंवा रुग्णालयात दाखल असताना मृत्यु झाल्यास सदर रुग्णाचे मृत्युसमयी असणारे थकीत बील माफ करणेस मान्यता दिलेली आहे.

श्री.वामन श्रीपती वाघमारे नामक रुग्णांस दिनांक ११/०२/२०१८ रोजी वाय.सी.एम.रुग्णालयात उपचाराकरीता दाखल केलेले होते. सदर रुग्णांवर वाय.सी.एम. रुग्णालयात दि.११/०२/२०१८ ते दि. २७/०३/२०१८ या कालावधीत औषध उपचार केलेले आहेत. सदर रुग्ण दिनांक २७/०३/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. सदर रुग्णांवर दिनांक २७/०३/२०१८ अखेर केलेल्या औषध उपचाराचे एकुण बील र.रु. **४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस)** झालेले आहेत. परंतु रुग्णांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने सदर बिलापैकी **र.रु. २०,०००/-(अक्षरीर.रु. वीसहजार)** मा.योगेश बहल, नगरसेवक यांचे सांगणेवरुन माफ केलेले आहे. सदर बिलापैकी उर्वरीत **र.रु. २७,९४६/-(अक्षरी र.रु. सत्तावीस हजार नऊशे शेहचाळीस)** भरणेबाबत मयत व्यक्ती वामन श्रीपती वाघमारे यांचे नातेवाईक श्री. मारुती बाबु मांजरे, ओटा स्किम, रुपीनगर, निगडी, यांना या कार्यालयाकडील पत्र क्र.वायसीएमएच/८ब/कावि/४३२/ २०१९ दि. ०२/०३/२०१९ अन्वये कळविले होते. तथापि, "**तपास लागत नाही, सबब परत**"असा पोस्टाचा शेरा नमुद करुन सदरचे पत्र परत आलेले आहे.

मयत व्यक्ती वामन श्रीपती वाघमारे यांचे उपचाराची थकीत रक्कम वसुल होणे शक्य नाही. मानवतेच्या दृष्टीकोनातुन मा.योगेश बहल, नगरसेवक यांच्या सांगणेवरुन एकुण र.रु.**४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस) पैकी र. रु.२०,०००/-(अक्षरी र. रु. वीस हजार)** माफ केलेले असले तरी सदर एकुण **रक्कम रु.४७,९४६/-(अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस)** क्षमापित करणे आवश्यक आहे. अन्यथा सदरची रक्कम लेखा परीक्षणामध्ये आक्षेपाधीन निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर रक्कम क्षमापित करणे बाबत मा.स्थायी

समितीने दि. २७/१२/२०१९ रोजी विषय क्रमांक ७३, ठराव क्रमांक ६२३८ नुसार मान्यता दिलेली आहे.

मा. मुख्य लेखापरिक्षक यांचे दि. ५/११/२०१९ चे शेराकंनानुसार सदर रक्कम क्षमापित करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५२१ विषय क्रमांक – १४

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नरवि/कावि/१२/२३/२०२० दि.२२/१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्र.पीसीसी/३०९६/१८०१/सीसर-२६१/नवि-२२, दि ११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून, शासन निर्णय क्र.टीपीएस १८९२/१६०/प्र.क्र ५८/१२/पुनर्बांधणी क्र.२७/१२/ईपी मंजुरी /नवि-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखडयातील मौजे दिघी येथील स.नं ८७ पै व ६४ पै मध्ये आरक्षण क्र.

२/१३३ टेलिकॉम सेंटर (Telecom Center) या प्रयोजनाकरिता ४० आर क्षेत्र आरक्षीत आहे.

सदर आरक्षण बाबत अर्जदार श्री प्रमोद वसंत बेलसरे यांनी म.प्रा.व नर.अधिनियम १९६६ कलम ४९ अन्वये शासनास नोटीस दिली होती. दि.०४/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना इकडील विभागामार्फत संविस्तर अहवाल पाठविण्यात आला व सदर अहवानुसार विषयांकित आरक्षण पुणे–आळंदी रस्त्यालगत असून बीआरटी रस्त्यालगत वाहनतळ व तत्सम सुविधा उपलब्ध करण्यासाठी सदर जागा मनपास उपयुक्त ठरेल व त्यामुळे उक्त आरक्षण कलम ५० अन्वये रद्द होण्याऐवजी मनपा म.प्रा.व नर.अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये उक्त आरक्षणाचे प्रयोजन बदलून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मा. महापालिका सभेच्या मान्येतेने विहित कार्यवाही पूर्ण करून सादर करेल असे कळविणेत आले होते.

त्यानुसार दि.०५/०१/२०१८ रोजी शासनाकडे सुनावणी झाली. तसेच दि. ०५/०२/२०१८ चे पत्रान्वये सहाय्यक महाव्यवस्थापक, बी.एस.एन.एल यांनी मा.उप सचिव ,नगर विकास विभाग यांना सदर उक्त आरक्षण बाबत त्यांना आवश्यकता नसून सदर आरक्षण रद्द करणे बाबत विनंती केली होती व सदर पत्राची प्रत इकडील विभागास पाठविण्यात आलेली होती.

वरील सुनावणी च्या शासनाकडील दि.२३/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उक्त आरक्षण बाबत कलम ५० अन्वये रद्द होण्याऐवजी कलम ३७ अन्वये उक्त आरक्षणाचे प्रयोजन बदलून फेररबदलाचा प्रस्ताव शासनास महापालिका सभेच्या मान्यतेने विहित कार्यवाही पूर्ण करून सादर करणेबाबत कळविणेत आले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखड्यातील मौजे दिघी येथील स.नं ८७ पै,६४ पै मधील आरक्षण क्र. २/१३३ टेलिकॉम सेंटर (Telecom Center) या प्रयोजनाकरिता ४० आर क्षेत्र पुणे – आळंदी रस्त्यालगत असून बीआरटी रस्त्यालगत **वाहनतळ व तत्सम सुविधा** उपलब्ध करण्यासाठी सदर जागा मनपास उपयुक्त ठरेल असे मत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाची जागा टेलिकॉम सेंटर ऐवजी **वाहनतळ व तत्सम सुविधा** या वापरासाठी असा बदल करणेस मान्यता मिळणे कामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्धीचे मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील स.नं ८७ व ६४ पै ४००० चौ.मी क्षेत्राचे आ.क्र.२/१३३ "टेलिकॉम सेंटर" या प्रयोजनाऐवजी " **वाहनतळ व तत्सम सुविधा** " असे प्रयोजन करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मान्यता व फेरबदलाची पुढील वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.उषा मुंढे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५२२ विषय क्रमांक – १५

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/२१/२०२० दिनांक ५/०२/२०२०

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन

यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,१४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र. रु १४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०१/२०२० अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र"अ"

महानगरपालिकेचे नाव		**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**	**शेरा**
जिल्हा		पुणे	
वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या		१८०५३	
केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान" च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या		१८०५३	
मंजूर अर्जांची एकूण संख्या		१५४८९	
बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या	वैयक्तिक घरगुती शौचालय	एकुण बांधकाम पुर्ण-१५४६९	मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-१०६७९ सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४७९०
बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या	सामुदायिक शौचालय	५८२ सीटस	महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण

निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता	११०३८ लाभार्थी	GOI+GOM=६६२.२८लाख	GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा
		ULB = २२०.७६ लाख	ULB =२०००/- हिस्सा
	एकुण	**८८३.०४ लाख**	
निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता	१०३९५ लाभार्थी	GOI+GOM=४१५.८०लाख	GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा
		ULB =२०७.९० लाख	ULB =२०००/- हिस्सा
	एकुण	**६२३.७ लाख**	

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

मा.निर्मला कुटे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(गोंधळ)

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२३ विषय क्रमांक – १६

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>समित्यांचे अहवाल</u>

<u>मा.विधी समिती</u>

अ) दिनांक ०३/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १७/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२४ विषय क्रमांक – १७

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>

अ) दिनांक २६/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ०९/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२५ विषय क्रमांक – १८

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.शहर सुधारणा समिती</u>

अ) दिनांक २६/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ०८/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२६ विषय क्रमांक – १९

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>

अ) दिनांक १३/१२/२०१९, १६/१२/२०१९ व २७/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २७/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५२७ विषय क्रमांक – २०

दिनांक – २६/२/२०२० विभाग – मा.नगरसचिव

<u>मा.शिक्षण समिती सभा</u>

अ) दिनांक ०२/०१/२०२० व ०४/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १६/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.महापौर- सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/४०२/२०२०
दिनांक - ७/७/२०२०

(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

.

(मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ६६५४ दि.५/२/२०२० चे लगत)

प्रपत्र 'अ'

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे ४११ ०१८

वैद्यकिय विभागांतर्गत आवश्यक मनुष्यबळ संख्या

अ. क्र.	पदनाम	पदसंख्या
१	स्त्रीरोग तज्ञ	०६
२	बालरोग तज्ञ	०७
३	भुलतज्ञ	०६
४	फिजिशियन	०६
५	रेडिओलॉजिस्ट	०१
६	नेत्ररोग तज्ञ	०१
७	वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस)	१२
८	वैद्यकिय अधिकारी (एमबीबी एस / बीएएमएस)	०९
९	निवासी वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस / बीएएमएस)	१४
१०	दंतशल्य चिकित्सक	०३
११	फार्मासिस्ट	११
१२	स्टाफनर्स	३९
१३	लॅब टेक्निशियन	०५
१४	एक्स रे टेक्निशियन	०१
१५	सफाई सेवक (महिला)	२६

प्रपत्र ‘ब’

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे ४११ ०१८

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयांतर्गत आवश्यक मनुष्यबळ संख्या

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या
१	ब्लड बँक टेक्निशियन	०२
२	ब्लड बँक कौन्सिलर	०१
३	एम.एस.डब्ल्यु.	०१
४	डाटा एन्ट्री ऑपरेटर	०५
५	डायलिसीस टेक्निशियन	०१
६	फार्मासिस्ट	०५
७	एक्स रे टेक्निशियन	०३
८	जी.एन.एम.स्टाफनर्स	६६
९	लॅब टेक्निशियन	०३
१०	पुरुष कक्ष मदतनीस	०५
११	स्त्री कक्ष मदतनीस	०५